वज़ीर मुरारराव.

वजीर मुरारराव.

मकरंद मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध झालेली

कादंबरी.

लेखक.

राजाराम वामन कुलकर्णी

जानोरकर.

वाई येथें ' मोदवृत्त ' छापखान्यात छापलें.

शके १८३०.

किंमत ५

प्रस्तावना.

ह्या लहानशा पुस्तकाला प्रस्तावना ती काय लिहावयाची ? तथापि, आह्माला एक दोन गोष्टींचा खुलासा करणे आहे तो ह्या सदराखालीं केल्यास वावगें होणार नाहीं.

वास्तविक पहातां, प्रस्तुत कादंबरी कल्पितच आहे. तथापि इसवीसनाच्या सोळाव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्राची जी परिस्थिति होती, असे इतिहासावरून वाटलें, तिला अनुसरून कथानकाची योजना करण्याचा प्रयत्न केला आहे. आतां तो कितपत साधला आहे हें पहाण्याचे काम प्रेमळ वाचकांचे आहे. आणि एवढयाचकरिता ह्या पुस्तकाला 'ऐतिहासिक कादंबरी' ह्मटलं आहे. बाकी ह्या कादंबरीतील कित्येक प्रमुख पात्रांचीं नांवें, आह्मीं ज्या काळची ही गोष्ट लिहिली त्या काळच्या इतिहासांत जरी प्रमुखत्वानें दिसत असली तरी त्यांचे परस्परसंबंध आह्मीं दाखविल्याप्रमाणे नसून अगदीं भिन्न होते हें इतिहास शिकणारा एखादा मुलगाही सांगू शकेल.

आमचा हा प्रथम प्रयत्न आणि तोहि मनःकल्पित, हें समजल्यावर ह्यांत जर लहान मोठे दोष राहिले असतील तर त्याबद्दल वाचक आमचा उपहास करणार नाहींत. अशी आमची खात्री आहे.

शेवटीं ह्या पुस्तकात् बऱ्याच खिळेवजा चुका व काहीं नजर चुका राहिल्या आहेत. त्या श्रीयुत गो. ना. बेळगांवकर ह्यानीं वेळोवेळीं सुचविल्याबद्दल आह्मी त्यांचे फार आभारी आहोंत. ठोकळ चुका— पान ७ धर्मविहितच्या ऐवजीं धर्मविहित, पान ४९ तारुण्यमदनानें—तारुण्यमदानें, सुस्मणींचे—सुररमणींचे; पान ६१ हर्मिर्धी—हर्मिंध्या; पान ९७ मन्मथ-मन्मन, पान १४२ देवी—देवि. वगैरे चुका आहेत.

नाशिक ता. १९।८।०८

पुस्तककर्ता.

अनुक्रमणिका.

वजीर मुरारराव.

प्रकरण १ लें.

प्रियेचा निरोप.

वैशाख शुद्ध पौर्णिमेची मध्यरात्र. रोहिणीकांत आकाशमंडळाच्या मध्य-भागीं आरूढ झाला होता. जिकडे तिकडे चांदणें स्वच्छ पडलें होतें. लहान मोठ्या जलाशयाच्या जलतरंगांत चंद्राचीं किरणें प्रतिबिंबित होऊन तीं जणूं जलक्रीडाच करीत आहेत असें भासत होतें. रात्रविकासी कमलें फुलल्यामुळें, तीं चंद्राकडे पाहून जणूं हंसतच होतीं. गर्द झाडीमध्यें काजव्यांचे पुंजच्या पुंज चमकत होते. हिंस्र श्वापदांच्या कर्णकठोर गर्जना ऐकूं येत होत्या. मोठमोठाले भुजंग गारव्यासाठीं बिळांतून बाहेर येऊन पडले होते. सुगंधित फुलांफळांवरून वहात येणाऱ्या गार वाऱ्याच्या झुळकी शरीराला व मनाला आनंद देत होत्या. सर्वत्र शांत दिसत होतें.

अशा रम्य आणि आल्हादकारक समयीं, सप्तशृंग गडावरील एका भक्कम घरापुढील छोट्या आणि रमणीय उद्यानात, एका लतामंडपाखालीं, दोन अठरा अठरा वर्षांच्या समवयस्क आणि सुंदर तरुणी बसल्या होत्या. त्यांतील एकीचें सौंदर्य तर अप्रतीम होतें. त्यांच्या मुखश्रीवरून आणि पेहेरावावरून त्या थोरामोठ्यांच्या असाव्यात, असें दिसत होतें. जी फार सुंदर होती, ती दुसरीस ह्मणाली ' गडे कमले ! मी येवढी माहेरीं आलें आहेना ? पण मला तिथं जसें करमतें, तसें इथे नाहीं बाई करमत ! ' असें ह्मणून ती सस्मित मुखानें कमलेकडे पाहूं लागली.

' बरोबरच आहे बाई ! ' खोंचणाऱ्या दृष्टीनें पहात कमला ह्मणाली, ' तिथें काय ! सासू, सासरा किंवा कोणीं धाक दाखवायला नाहीं. तूं सुशिक्षित, हुषार, गुणी ह्मणून पतिराजांची तुजवर पूर्ण प्रीति ! तुला जेणेंकरून समाधान होईल आणि आनंद वाटेल असेंच ते वागणार ! मग अधिक न करमायला काय झालें ? '

' मला वाटलेंच तुझें असें उत्तर येणार ह्मणून ! तरी बरें; तुला सासु-

सासरे आईची आणि बाबांची आठवण होऊं देत नाहींत. शंकरभावजी तर तुला केवळ देवताच समजतात. पण एखादें माणूस जन्माचेंच असमाधानी बाई ! बरें. तें असो. पण कमले, माझ्या विवाहाच्या वेळेस तूं कांहीं आली नाहींस हं ! बरं. अजून काय झालं आहे ! '

' इंदिरे, तुला काय सांगूं ? मी आल्याखेरीज कां राहीन ? आह्मां सर्वांचा बेत दिखिल झाला होता यायचा पण ऐनवेळीं तिकडे सडकून ताप भरला ! दुखणें अधिक झालें ! तुझ्या लग्नाला येण्याची तिकडची मला परवानगी होती, व मामंजींनींही मला जाण्याचा आग्रह केला. पण मला तिकडे तसें टाकून येववेना ! पण काय ग ? तुझ्या लग्नाला ह्मणे बादशहा आले होते. खरेंच कां ? '

' अहमदनगरीं लग्न झालें असतें तर बादशहा आले असते. पण तें येथेंच आल्यामुळें बादशहास येतां आलें नाहीं. सरदार बरीक पुष्कळ आले होते. अहमदनगरीं गेल्यावर आह्मां उभयतांस बादशहांनीं पोषाख दिले. तिकडे बादशहाची मर्जी अगदीं बहाल आहे. '

' खरेंच बाई, कां नसेल ? मुरारराव आहेतच तसे. तें एक रत्न आहे. तू मोठ्या नशिबाची ह्मणून तुला तें प्राप्त झालें आहे. त्यांना आनंद देणें आणि सुखी ठेवणें हें सर्वस्वीं तुझ्याकडे आहे. '

' तें कां मला सांगायला पाहिजे वाटतें ? खरेंच कमले ! तिकडच्या सहवासांत किती आनंद वाटतो ह्मणून सांगूं. ' इंदिरेला मुरारराव जणूं आपल्या पुढेंच आहेत असें वाटलें.

कमला ह्मणाली— माझें देखील बाई असेंच होतें. खरेंच; आपणां दोघींस ह्या दोन सहवासांचें जें सौख्य लाभलें त्याच्यापुढें स्वर्गसुख सुद्धां तुच्छ वाटतें !

" तिकडे शंकरभावजींची नेहमीं आठवण व्हायची, आणि ' काय बोवा. शंकरचा तिकडे जमीनजुमला आहे, ह्मणून कांहीं इलाज चालत नाहीं. नाहींतर त्याला येथें राहून घेतलेंच असतें ' असे उद्गार काढायचे. "

' ती एक हरिहराची जोडीच आहे ! '

इतक्यांत तेथें एक तेवीसचोवीस वर्षांचा तरुण गृहस्थ आला. त्याची काठी मजबूत असून गोंडस होती. तो फार देखणा होता. त्यानें अंगांत

मुसलमानी तऱ्हेचा मांड्यापर्यंत पोहोंचणारा व पोकळ बाह्यांचा एक पातळसा सदरा घातला होता. पायांत गुडघ्यापर्यंत फुगलेली आणि खालीं पावलांपर्यंत निमुळती होत गेलेली, पांढरी विजार घातली होती. त्यानें मुसलमानी तऱ्हेचा, जरतारीचा, नक्षी केलेला चढाऊ जोडा घातला होता. डोक्यास जरीचा गुलाबी पटका बांधिला होता. त्याच्या डाव्या हातांत म्यानांत घातलेली तरवार असून त्याच हातावर शेला होता. त्यानें सकलादीच्या टोपीनें आपलें सर्वांग झांकलें होतें. त्याला पाहून त्या दोघी लाजून उभ्या राहिल्या. त्यांच्याकडे पाहून त्यानें स्मित हास्य केलें. लतामंडपांतील चौथऱ्यावर बसत बसत तो हास्य मुखानें ह्मणाला, ' कां कमलाताई, येवढ्या रात्रीं बाहेर कशा बसलांत ? तुमच्या मैत्रिणीची तर भित्रेपणाबद्दल ख्याती आहे ! '

' लग्नापूर्वी होती खरी ! इंदिरे, मला आतां फारच झोंप येते बाई ! ' असें ह्मणून कमला झट्कन् घरांत गेली. तरुणानें-मुराररावांनीं--इंदिरेचा हात धरून, तिला आपल्या जवळ बसविलें. कांहीं वेळ तो तिजकडे प्रेमानें पहात बसला. मग तिचें चुंबन घेऊन तो तिला ह्मणाला ' मी तुझा निरोप घेण्यासाठीं आलों आहें. ! '

' ह्मणजे ? मला नाहीं कांहीं कळलं बाई. निरोप कशाबद्दल ? इंदिरा अधीरतेनें आणि विस्मयानें ह्मणाली. '

' उत्तर हिंदुस्थानांत स्वारीवर जाण्याचा बादशहानें मला हुकूम केला आहे. ह्मणून तिकडे मी लष्कर घेऊन जात आहें. पाल्खेडास हल्लीं मुक्काम पडला आहे. जातां जातां तुझा निरोप घ्यावा ह्मणून आलों. तिकडून जय मिळवून आलों कीं तुला अहमदनगरीं नेईन. '

' स्वारीवर जाण्याचा बादशहाचा हुकूमच झाला आहे, कां स्वखुषीनें स्वारीला निघायचें ? '

' हो. स्वखुषीनेंच. तुला माहितच आहे कीं, बादशहाची मजवर आणि हुसेनमहंमदखानावर फार मेहेर नजर आहे कांहीं दिवसांपूर्वी वजीर मुजफ्फरजंग मरण पावले, त्यांची जागा आह्मां दोघांपैकीं कोणास तरी द्यावी असें बादशहाच्या मनांत फार आहे. दिल्लीचा सेनापती कुतुबशहा हा दक्षिणेंत स्वारीसाठीं येत आहे, असें नुकतेंच कळलें. ' आपल्या राज्याच्या बाहेरूनच त्याला हांकून घावयास जो जाईल, त्याला

मी वजीर करीन ! ' असें बादशहा आह्मांस ह्मणाला. हुसेनखानानें तें नाकारलें. मग स्वामिकार्य ह्मणून मीं तें कबूल केलें. शिवाय ईशकृपेंकरून जर फत्ते मिळाली तर (तिचें स्नेहपूर्वक चुंबन घेऊन) हें रत्न वजिराची अर्धांगी होणार ! '

' पुरे मेली वजिरी ! काय त्या वजिरींत आहे कोण जाणें. देवाच्या दयेनें आहे तितकें पुरें ! ' खिन्न स्वरानें इंदिरा ह्मणाली.

' इंदिरे, तूं येवढी शिकलेली आणि चतुर असतां असें ह्मणावेंस ? आहे त्या स्थितींत समाधान मानून कां कोठें गुणांचें चीज होत असतें ? स्वामिकार्य तर केलेंच पाहिजे. तें करतां करतां जर वजिरी मिळते तर ती कां व्यर्थ दवडावी ? बाकी मी वजिरी मिळावी ह्मणून जातों, असें नाहीं. केवळ स्वामीची सेवा करावी ह्मणून जात आहें. मग वजिरी मिळो, अथवा न मिळो. '

' मग मला घेऊन जायचें बरोबर. ह्मणजे मला फार आनंद होईल. '

मुरारराव हंसत ह्मणाले ' हें पहा, इंदिरे ! असें भलतेंच बोलूं नकोस. युद्धाला कां कोठें स्त्रियास नेतात ? आणि नेलेंच तर आह्मी पुरुष मग काय करणार ? '

इंदिरा मुराररावास मिठी मारून लडिवाळपणानें ह्मणाली, ' गडे ! मला येथें मुळींच करमायचें नाहीं. आतां सुद्धां मी आठपंधरा दिवसांत येणारच होतें तिकडे ! '

' जशी आठपंधरा दिवस लोटणार होतीस, तसेच आणखी कांहीं दिवस काढ. मला तरी तुला सोडून जाणें बरें वाटतें काय ? झीज सोसल्या-खेरीज चीज होत नाहीं ! '

' आतां मीं अधिक तरी काय बोलावें ? जगदंबेच्या कृपेनें यशस्वी होऊन या ह्मणजे झालें ? '

' खरोखर तुझ्या या बोलण्यानें मला फार आनंद झाला. तूं कांहीं काळजी करूं नकोस. जगदंबा मला खास यशस्वी करील. प्रिये इंदिरे, तुझ्यावांचून मला तरी कोठें चैन पडतें ? तुझ्या संगतीनें सर्व काळ घालवावा, असें मलाही वाटतें. पण आह्मां पुरुषांना स्वाऱ्या, शिकारी करण्यास आणि अलौकिक कृत्यें करण्यास ह्या वयाखेरीज दुसरा काळ कोणता बरें ! बरें तर, मी घेतों आतां निरोप. नेमानें पत्र पाठवीत जा. जगदंबेची सेवा

करीत जा. आणि चांगली वागणूक ठेव ! ' असें ह्मणून मुराररावानें इंदिरेस मिठी मारली. त्यांच्या डोळ्यांतून अश्रु गळूं लागले. इंदिरेचे नेत्रही पाण्यानें भरून आले. त्या दोघांसही काय बोलावें आणि काय न बोलावें असें होऊन गेलें. त्यांना पुष्कळ बोलावेंसें वाटत होतें. पण एकासही काय बोलावें तें सुचेना. शेवटीं मुराररावांनीं मिठी सोडली. इंदिरा डोळे पुशीत ह्मणाली, ' बाबा घरांत आहेत. ! '

' चल तर; मी त्यांचा लवकर निरोप घेतों. आतां पहाट झाली आहे. मला लष्करांत लवकर गेलेंच पाहिजे ! '

तीं दोघेंही उठून घरांत गेलीं. जातांना मुराररावांनीं इंदिरेस सांगितलें कीं, ' मी धोंडोपंतास येथें पाठवून देईन. तुला कांहीं वस्तु लागल्यास किंवा दुसरें कांहीं काम पडल्यास त्यांना सांग ! '

घरांत मुराररावांच्या आगमनाची बातमी कमलेनें आधींच दिल्यामुळें, एकूणएक माणूस जागें झालें होतें. मुराररावांनीं सासुसासऱ्यांच्या पायावर मस्तक ठेवून त्यांना स्वारीची हकीकत थोडक्यांत सांगितली. त्या दोघांनींही प्रेमभरानें मुराररावांस आशीर्वाद दिला. इतक्यांत इंदिरेनें श्रीखंडाच्या वड्यांचा डबा आणून तो जिवाजीपंताच्या (वडिलांच्या) हातांत दिला. त्यांनीं तो मुराररावांजवळ दिला. मग मुरारराव निघाले. जिवाजीपंत, इंदिरा व कमला त्यास गडाच्या पायथ्यापर्यंत पोंचवायास गेले. पायथ्याशीं गेल्यावर मुरारराव जिवाजीपंतास ह्मणाले ' उद्यां येथें धोंडोपंत येतील ' त्यांची नीट सोय लावून द्यावी. ' मग ते कमलेकडे पाहून ह्मणाले ' कमलाताई, लोभ ठेवा. शंकरला मीं इकडे येतांना पत्र पाठविलेंच आहे. त्याला सांगा कीं, पत्र पाठविण्यास आळस करीत जाऊं नकोस. बरें. येतों आतां ' असें ह्मणून त्यांनीं जिवाजीपंतास नमस्कार केला. त्यांनीं अश्रुपूर्ण नेत्रांनीं इंदिरेच्या खिन्न वदनाकडे पाहिलें व आपल्या घोड्यावर स्वार होऊन एका क्षणांत ते दिसेनासे झाले. मग हे तिघे मागें फिरले. वाटेनें इंदिरेच्या मुखांतून ' आई जगदंबे ! सुखानें परत आण ' असे शब्द सहज निघाले. ह्यावर जिवाजीपंत ह्मणाले ' बेटा, येतील बरें सुखरूप. कांहीं चिंता करूं नकोस. अग ह्या लढाया ह्मणजे आह्मां वीरांच्या पांचवीस पुजलेल्या. ' ह्यावर कोणी कांहीं बोललें नाहीं. घरीं गेल्यावर इंदिरा कमलेशीं ह्यासंबंधानें किती

वेळ तरी बोलत बसली व रोज तिचा बहुतेक हाच विषय असे. दुसरे दिवशीं दुपारीं धोंडोपंत १००।१५० लोकांसह गडावर आले.

प्रकरण २ रें.

विशेष माहिती.

आम्ही ज्या काळची गोष्ट सांगत आहोंत, त्या काळीं अहमदनगरचें राज्य विस्तृत असून भरभराटींत आलें होतें. ह्याच्या दक्षिण सरहद्दीवर अर्धा पुणें प्रांत आला होता. पूर्वेस औरंगाबादेपर्यंत हें वाढलें होतें. बागलाण संपूर्ण आणि खानदेशचा थोडासा भाग ह्याची उत्तर सीमा होती; आणि पश्चिमेस थेट समुद्रापर्यंत हें राज्य पसरलें होतें. सारांश, सगळ्या हिंदुस्थानांत, मोंगलांच्या खालोखाल हेंच राज्य होतें. त्या काळीं ह्या राज्यांत पूर्ण शांतता नांदत होती. शेती, व्यापार वगैरे सुरळीत चालली होतीं. नानाप्रकारचे कलाकौशल्याचे धंदे जोरांत चालू होते. त्यामुळें देश सुसंपन्न व सुखी होता. त्या राज्याला ही स्थिति आणण्यास बादशहा मनसूरअल्ली निजामशहा हा तर कारण होताच. कारण, हा बादशहा कार्यदक्ष, शूर आणि चतुर होता. तरी त्याला चतुर साबाजीपंत नामक एका ब्राह्मण सरदाराची फार मदत झाली. मनसूरअल्लीचा बाप अन्यायी आणि जुलुमी होता. त्यामुळें त्याच्या कारकीर्दीत प्रजा नेहमीं हवालदील आणि असंतुष्ट असे. आणि ह्मणूनच दंगेधोपे नेहमीं होत असत. निजामशाही त्यावेळीं झोटिंगपाच्छाई ह्मणून प्रसिद्ध असे. मनसूरअल्ली त्यावेळीं लहान होता. ह्याच वेळीं भर ज्वानींत आलेले चतुर साबाजीपंत आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेनें प्रसिद्धीस आले. हे फार राजकार्यधुरंधर असून निजामशाहीचे अभिमानी होते. हे पहिल्या प्रथम एक कारकून होते. पण त्या पदावरून चढत चढत लवकरच सर्व राज्याच्या जमाबंदीचे ते मुख्य कामदार बनले. मुलकी खात्यांत त्यावेळीं अंधार होता; लाचलुचपत, जुलुम, अन्याय वगैरे कामांत अधिकारी लोक अगदीं तरबेद बनले होते. पण साबाजीपंतांनीं त्या खात्यांत पुढें अप्रतिम सुधारणा

केल्यामुळें त्यांचें नांव सर्वतोमुखी झालें हें मनसूरअल्लीच्या विक्षिप्त बापास आवडलें नाहीं. शिवाय साबाजीपंतांच्या व्यवस्थेमुळें त्यांच्या चैनीसही खो येऊं लागला. त्यामुळें कांहीं हलकट खुषामत्यांच्या सांगण्यावरून बादशहानें साबाजीपंतास कैदेंत ठेविलें. तो मरेपर्यंत ते केदेंत होते. पुढें मनसूरअल्ली राज्यावर बसला तेव्हां त्यानें त्यास बंधमुक्त केलें. आणि साबाजीपंत, महंमदखान व मुजफरजंग ह्या त्रिवर्गांच्या सहाय्यानें त्यानें वर सांगितलेल्या स्थितींत आपलें राज्य आणिलें.

साबाजीपंताचे मुरारराव हे एकुलते एक चिरंजीव! मुरारराव रूपानें आणि गुणांनीं फार चांगले होते. त्यांना मराठी खेरीज संस्कृत आणि उर्दु ह्या दोन भाषांचें उत्तम ज्ञान होतें. ह्या तीन्ही भाषांत त्यांना उत्तम कविता करितां येत असत. त्या काळच्या विद्वान् पंडितांत मुराररावचें नांव मोडत असे. मुरारराव शौर्यांतही कांहीं कमी नसून, घोड्यावर बसणें, दांडपट्टा फिरवणें, तरवारीचे हात करणें, निशाण मारणें वगैरे मर्दानी कामांत त्यांचा हातखंडा असे. त्यांना स्वधर्माचा फार अभिमान असून, धर्मविहित कामें करावयास त्यांचें मन धजत नसे. आपल्या वडिलाप्रमाणेंच निजामशाहीचे ते कट्टे भक्त होते. मनसूरअल्ली बादशहाबद्दल त्यांना फार पूज्यबुद्धि वाटत असे. आणि त्यांची आपल्या हांतून नेहमीं सेवा घडावी अशी त्यांच्या मनांत नेहमीं आकांक्षा असे. साबाजीपंतांची सरदारी त्यांच्यामागें मुराररावांस मिळाली. एकदां ते कांहीं सरकारी कामासाठीं बागलाणच्या सुभेदाराकडे (बागलाणचे सुभेदार जिवाजीपंत होते) गेले होते. जिवाजीपंताची मुलगी इंदिरा ही त्या वेळीं अविवाहितच होती. मुराररावांचाही विवाह झाला नव्हता. त्यामुळें इंदिरेचा व त्यांचा प्रीतिविवाह ठरला. तो लवकरच अतीशय थाटानें पार पाडण्यांत आला. त्यावेळीं मुराररावांचें वय वीस एक वर्षांचें होतें. व नुकतीच त्यांचीं मातापितरें निवर्तलीं होतीं.

जिवाजीपंतांचे वडील लहानपणीं अगदीं गरीब अवस्थेंत होते. पण वयांत आल्यावर त्यांनीं आपलें नशीब काढिलें. ते बागलाण प्रांताचे सुभेदार झाले. त्यांच्या मागें कर्तबगारी करून त्रिंबकप्रांताचीही सुभेदारी जिवाजीपंतांनीं मिळविली. ह्मणजे ते बागलाण व त्र्यंबक ह्या दोन प्रांतांचे सुभेदार बनले. ते फार स्वराजनिष्ठ, सदाचारी आणि शूर होते. त्यांची

पत्नी लक्ष्मीबाई ही सुरूप, सुशील आणि सद्गुणी स्त्री होती. अशा ह्या प्रेमळ दांपत्याची इंदिरा ही एकुलती एक लाडकी कन्या होती. इंदिरा ही सौंदर्याचें आणि सद्गुणाचें केवळ माहेरघरच होती. त्या काळीं मुलीस शिक्षण देण्याची चाल प्रचारांत फारशी नव्हती. पण जिवाजीपंतास त्याची फार आवड असल्यामुळें त्यांनीं इंदिरेस सच्छिक्षण दिलें. त्यामुळें ती मायाळू, प्रेमळ आणि विनयशील निघाली. तिच्याखेरीज त्या उभयतांस दुसरें अपत्य नसल्यामुळें आणि तीही आपल्या सद्वर्तनानें त्यांस अधिक प्रिय झाल्यामुळें त्यांच्यानें तिला लवकर सोडवेना. ती चवदा वर्षांची होईपर्यंत त्यांनीं तिच्या लग्नाची गोष्ट मनांतही आणिली नाहीं. पण पुढें नाइलाज झाल्यामुळें ते घरजावई शोधूं लागले. इतक्यांत सुदैवानें मुराररावांचें त्यांच्या घरीं आगमन झालें. तेव्हां मोठ्या आनंदानें त्यांनीं आपली इंदिरा मुराररावांस अर्पण केली. त्यावेळीं बालविवाहाची चाल सर्वत्र प्रचारांत होती परंतु जिवाजीपंत ह्मणजे दोन प्रांतांचे सुभेदार. तशांत तापट. त्यामुळें त्यांच्यापुढें ब्र काढण्याची कोणाची छाती झाली नाहीं. इंदिरा कोणा गरीबाची असती तर तिच्या आईबापांस लोकांनीं खाऊं कां गिळूं करून विहिरींत जीव द्यावयास लाविलें असतें. पण संपत्तीचा आणि अधिकाराचा प्रभाव असाच आहे!

जिवाजीपंतांचा परशरामपंत ह्मणून एक जीवश्च कंठश्च मित्र होता. त्याची मुलगी कमला. कमलेच्या बाळपणींच तिचे आईबाप मरण पावले. तेव्हां जिवाजीपंतांनीं कमलेचें पालनपोषण केलें. कमलाही सुंदर आणि मोकळ्या मनाची होती. इंदिरेबरोबर जिवाजीपंतांनीं कमलेसही शिक्षण दिलें होतें. कमला आणि इंदिरा यांचें एकमेकींवर सख्ख्या बहिणीपेक्षांही अधिक प्रेम होतें. कमलेचें तिच्या बाराव्या वर्षी शंकरराव नांवाच्या एका श्रीमंत जमीदाराच्या तरुण मुलाशीं जिवाजीपंतांनीं लग्न लावलें. शंकरराव मुराररावांचा खरा मित्र होता. त्याचें लहानपण अहमदनगरींच गेलें व त्याचें शिक्षणही मुराररावाबरोबरच झालें होतें. शंकरराव सशक्त आणि विनोदी होता. त्याचें कमलेवर व तिचें त्याच्यावर अतोनात प्रेम होतें. कमलेचें सासरचें नांव पार्वती होतें. पण तिला त्या नांवानें हाक मारणारे फारच थोड होते. असो.

कमला व इंदिरा या दोघींचीं लग्नें झाल्यापासून त्या बहुतेक सासरींच असत. पण आतां त्या दोघीही माहेरीं आल्या होत्या. त्यामुळें त्यांस एक-

मेकींशीं बोलण्यांत दिवसही पुरेनासा होई. चांदण्या रात्रीची वेळ असल्यामुळें त्या आपल्या वडिलांची परवानगी घेऊन मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें उद्यानांत येऊन बसल्या होत्या. त्यापुढील हकीकत वाचकांस समजलीच आहे.

प्रकरण ३ रें.

आमिनालुब्ध धोंडोपंत.

जिवाजीपंत बहुतकरून नाशिक येथेंच नेहमीं रहात. परंतु, उन्हाळ्यांत मात्र सप्तशृंग गडावर जाऊन रहाण्याचा त्यांचा क्रम असे. धोंडोपंतास सप्तशृंगगडावर रहाणें फार आवडलें. हे धोंडोपंत मुराररावाचे खासगी कारभारी असून, त्यांचें मुराररावाशीं कांहीं बरेंच लांबचें नातेंही होतें. त्यांच्या लहानपणीं सावाजीपंतांनीं त्यास कुशाग्र व चलाख मुलगा ह्मणून आपले घरीं बाळगिलें. ते धोंडोपंतास सर्वतऱ्हेचीं खासगीं कामें हरहमेश सांगत असत. धोंडोपंत मुराररावाहून दहाबारा वर्षांनीं वडील होते. त्यांची देहयष्टि चांगली असून चेहराही मोहक होता. मुरारराव त्यास वडील बंधूप्रमाणें मान देत असत. व त्यांचाही मुराररावावर लोभ होता. इतकें होतें तरी शहाणपणाच्या कामांत धोंडोपंत अगदींच कमी होते. त्यांचें मन उथळ होतें. त्यांना स्वतःचा विचार असा कांहींच नव्हता. पृथ्वी आदिकरून ग्रह जसे स्वयंप्रकाशित नसून, सूर्याच्या प्रकाशानें प्रकाशणारे आहेत, तसेंच धोंडोपंतांचें मन स्वतःच्या विचाराप्रमाणें चालणारें नसून दुसऱ्या कोणाच्या तरी तंत्रानें वागणारें होतें. त्यांना बाळपणापासून अशी संवयच लागलेली. त्यांत त्यांचा दोष नव्हता.

भर दोन प्रहरची वेळ. धोंडोपंत जेवून बिछायतीवर नुकतेच विडा खात बसले होते. जवळ दहापांच मंडळी होती. शिळोप्याच्या गप्पा चालल्या होत्या. इतक्यांत हुजऱ्यानें त्यांच्या जवळ एक पत्र देऊन सांगितलें ' अहमदनगराहून एक मुसलमान स्वार आला आहे, त्यानें हें पत्र आणिलें ! धोंडोपंत पत्र घेऊन फोडूं लागले. पत्र फोडतांना त्यांच्या डोक्यांत अनेक विचार आले. अहमदनगराहून पत्र येण्याचें कारण काय

असावें ? मुरारराव तर सर्व बंदोबस्त करून स्वारीवर गेले. मग हें पत्र कोणाचें व काय ह्मणून आलें असावें ? सरकारी ह्मणावें, तर तें येथें कशाला येईल ? स्वारींत जाईल. कारण, आपण येथें खासगी रीतीनें आलों आहोंत; सरकारी कामासाठीं आलों नाहीं. ऐवढेंच नाहीं तर आपण येथें आलों हें अहमदनगरीं कोणासही माहीत नाहीं. मग हें पत्र येथें कसें आलें ? धोंडोपंतास कांहीं तर्क होईना. शेवटीं त्यांनीं तें पत्र फोडून मनांतच वाचलें. तें पत्र अहमदनगराहून हुसेनखान याच्याकडून आलें होतें. ' येथें सरदार मलिकसाहेब ह्यांच्याकडे मुराररावांच्या पांच हजार मोहोरा आहेत. त्या घेऊन तुमच्या स्वाधीन कराव्यात असें मुराररावांनीं मला पत्र लिहिलें आहे. त्याप्रमाणें मीं त्या घरीं आणिल्या. आपली गांठ पडली नाहीं. विश्वासू माणूस कोणी नसल्यामुळें त्या तुह्मी येथें येऊन घेऊन जाव्यात ! ' असें हुसेनखानानें धोंडोपंतास त्या पत्रांत लिहिलें होतें. व धोंडोपंताचा गौरवही बराच केला होता.

पत्र वांचून धोंडोपंतास फार विस्मय वाटला. मलिकसाहेबांपासून मोहोरा यावयाच्या, त्या मुरारराव हुसेनला द्यावयास कशाला सांगतील ? त्यांचा आपल्यापेक्षां हुसेनवर ज्यास्त भरंवसा आहे. छेः; तें तर अशक्य. मोहोरा घेण्याचें काम मुरारराव मजखेरीज दुसरे कोणासही सांगणार नाहींत. अर्थात् हें हुसेनचें कपट असलें पाहिजे. बरें; तसें ह्मणावें तर हुसेनला कपट करण्याचें काय कारण ? शिवाय हें जर खरें कपट ह्मणावें तर मी येथें आलों हें त्याला कसें कळलें ? कारण, मी अहमदनगराहून मोहिमेवर ह्मणून जाण्यास निघालों. सप्तशृंगला मी आलों हें अहमदनगरीं कोणासही ठाऊक होण्याचा संभव नाहीं. येवढेंच नव्हे तर तेथून निघते वेळीं मी येथें येणार हें मलाही माहीत नव्हतें. पालखेडास मुक्काम होता तेव्हां तें मला कळलें. माझ्या येथील येण्याची बातमी कोणासही माहीत नाहीं. मग हुसेनलाच ती कळण्याचें काय कारण ? अर्थात् त्याला मुाररावाचें पत्रच आलें असलें पाहिजे. मग आतां जावें कीं, न जावें ? जावें तर मुराररावांनीं येथून कोठें जाऊं नका असें सांगितलें आहे ! न जावें तर मुराररावांच्या सांगण्यावरूनच एका बड्या सरदारानें त्यांच्याच कामासाठीं बोलाविलें आहे. न गेलों तर मुरारराव पुढें कदाचित् मला दोषही देतील. ह्याप्रमाणें ते मनांतल्या मनांत जावें कीं, न जावें ह्याचा

विचार करण्यांत गुंग झाले. जवळ बसलेल्या मंडळींनीं पत्रांत काय मजकूर आहे ह्मणून दोनतीन वेळ विचारलें. पण धोंडोपंतांचें लक्ष्य तिकडे कोठें होतें ! शेवटीं मजकूर कांहींतरी गुह्य आहे असें समजून मंडळी एकामागून एक सर्व उठून गेली. अखेर धोंडोपंतांनीं जाण्याचा बेत ठरविला. त्यांनीं विचार केला कीं, मोहोरांची बातमी खरी असली आणि आपण न गेलों तर तसें करणें अयोग्य होणार आहे. बरें, कदाचित् ती खरी नसली तरी आपलें जाऊन येण्यांत काय बिघडतें !

धोंडोपंताचा अहमदनगरीं जाण्याचा बेत निश्चित होण्यास आणखी एक कारण होतें तें जरी अयोग्य वाटण्याजोगें होतें, तरी धोंडोपंतास अहमदनगरीं नेण्यास इतर सर्व कारणांपेक्षां तेंच अधिक कारणीभूत झालें. तें कारण येथें सांगणें इष्ट आहे. ज्या हुसेनखानाचें धोंडोपंतास पत्र आलें होतें त्याची आमिना ह्मणून एक बहिण होती. ती फार सुस्वरूप आणि चतुर होती. तिला विणण्याशिवण्याचा फार नाद असे. त्यामुळें ती पुष्कळ तऱ्हेचे रेशमी व सुती हातरुमाल, पातळ व मृदु शेले वगैरे जिन्नस तयार करीत असे. हे जिन्नस ती कधीं कधीं राणीस व तिच्या द्वारें बादशहास नजर करीत असे. तिच्या वडिलांचा (महमदखानाचा) आणि साबाजीपंतांचा फार स्नेह असल्यामुळें धोंडोपंतास कधीं कधीं त्यांच्याकडे जाण्याचा प्रसंग पडे. त्यामुळें कित्येक वेळां आमिना त्यांचे दृष्टीस पडे. ती व धोंडोपंत दोघेही त्या वेळीं भरज्वानींत असल्यामुळें धोंडोपंत तिच्या प्रेमानें वेडे होऊन गेले होते. पण तिचें संसाराकडे मुळींच चित्त नव्हतें. ती मोठ्या आनंदानें बेगमच (अविवाहित) राहिली. आपला देह सर्वस्वीं ईशसेवेकडे लावावयाचा असा तिचा निश्चय झाला होता व त्याप्रमाणें ती खरोखरीच वागली. तिचें वर्तन अत्यंत शुद्ध होतें. परंतु कामासक्त धोंडोपंतास तिचें हें वैराग्य आवडेना. त्यांचा तर लग्न करीन तर हिच्याशींच; नाहींतर करणारच नाहीं असा तिला प्रथम पाहिल्याबरोबरच निश्चय झाला होता व तो त्यांनीं दोनतीनदां तिला कळविलाही होता, पण तिनें तो साफ नाकारला. तेव्हांपासून धोंडोपंतांनीं लग्नाचें नांवच टाकिलें. आमिना आपल्याशीं लग्न करील तरच लग्न करण्यांत मजा आहे असें त्यास वाटत होतें. आमिना आज नाहीं उद्यां पण आपल्याशींच लग्न करील अशी त्यास आशा मात्र वाटत होती. ती आशा वाटण्याचें कारण इतकेंच कीं, त्यांना आपल्या

सुस्वरूपाची खात्री होती. आपल्या रूपावर आमिना मोहित झाली आहे पण ती यवन व आपण हिंदू, ह्मणून आपल्याशीं लग्न करण्यास ती धजत नाहीं असें त्यांना वाटत होतें. तेव्हां ' मी तुझ्यासाठीं मुसलमानही व्हावयास तयार आहें ' असेंही त्यांनीं तिला ह्मटलें. पण ती लग्न करण्यास तयार झाली नाहीं. तेव्हां मात्र त्यांची निराशा झाली. तथापि इच्या भावाकडून हिला लग्नाचा आग्रह केला तर ही कबूल होईल असें वाटून त्यांनीं हुसेनजवळ ती गोष्ट काढिली. पण त्यानें ह्यांना झिटकारून टाकिलें. त्यामुळें धोंडोपंतांनीं त्या बाबतींत बोलावयाचेंच सोडलें. मात्र ते अविवाहित राहिले. अशा स्थितींत दहापंधरा वर्षें गेलीं. मुरारावांनीं आणि इतर मंडळींनीं व खुद्द आमिनेनेंही त्यांना लग्न करण्याचा आग्रह केला. पण त्यानीं कोणाचेंही ऐकलें नाहीं. त्यांना नेहमीं वाटे कीं, कधीं तरी आमिना आपण होऊनच लग्नाची गोष्ट काढील. पण अगदींच जेव्हां निराशा झाली तेव्हां स्वारी मुरारावांच्या मोहिमेबरोबर जंजिऱ्याच्या निमित्तानं अहमदनगरास कायमचा रामराम ठोकणार होती – नव्हे त्यांनीं ठोकलाही होता. परंतु हुसेनचें पत्र येतांच आमिनेची रम्य मूर्ति त्यांचे अंतःकरणांत प्रकट झाली. त्याबरोबर धोंडोपंतास आपल्या निश्चयाचें भान न राहून त्यांनीं तेथें जाण्याचा निश्चय ठरविला !

प्रकरण ४ थें.

हुसेन महमदखान.

दुपारची वेळ. अहमदनगरीं या वेळीं एका टोलेजंग वाड्यांतील भव्य व सुंदर दिवाणखान्यांत सुमोरें पंचवीस वर्षांचा एक मुसलमान तरुण बसला होता. दिवाणखाना बराच शृंगारलेला होता. त्याच्या भिंतीस पक्का पांढरा रंग दिला असून त्यावर चित्रविचित्र रंगांत अनेक सुबक चित्रें काढिलीं होतीं. आढ्यास शुभ्र छत दिलेलें असून त्याला रंगीबेरंगी झालरी लावल्या होत्या. दर खणांत पांढऱ्या, हिरव्या, तांबड्या वगैरे रंगांच्या हंड्या टांगलेल्या असून मध्यें एक एक झुंबर मोठें टांगलें होतें. तजबिरा व आरसेही पुष्कळ लाविले होते. जमिनीवर मोठमोठाल्या गाद्या टाकून त्यावर पांढऱ्या

शुभ्र चादरी पसरलेल्या होत्या. दिवाणखान्याच्या मध्यभागीं एकापेक्षा एक लहान असे तीन चौरंग एकावर एक ठेविले होते. ते शिशवीचे असून त्यावर अप्रतीम नक्षी कोरलेली होती व त्यास वरून सोन्याचांदीचे पत्रे मारले होते. सर्वांत वरच्या चौरंगास टेकावयाला मागें नक्षीदार पाठ लाविली होती. चौरंगावर मऊ व उंच गादी टाकली होती. मागें टेकावयास तांबड्या रेशमाच्या अभ्रयानें आच्छादिलेला तक्क्या ठेवला होता. ह्याच चौरंगावर तो मुसलमान सरदार बसला होता. त्याचा चेहरा मोहक आणि भव्य होता. त्याचा वर्ण गौर असून कपाळ विस्तृत होतें. डोळे लहान असून बरेच खोल गेलेले होते. त्याची काळीभोर लहानशी दाढी त्याच्या वक्षस्थळाला स्पर्श करीत होती. त्यानें अंगांत पोकळ बाह्यांचा मुसलमानी पद्धतीचा सदरा घालून त्यावर जरीचें एक जाकीट घातलें होतें. पायांत मांड्यावर गुडघ्यांपर्यंत आणि खालीं निमुळती होत गेलेली विजार घातली होती. त्याचा चेहरा पाहिल्याबरोबर हा मनुष्य खोल मनाचा आणि आंतल्या गांठीचा असावा असें दिसून येई. प्रिय वाचकहो ! ज्याचा आतांपर्यंत अनेक वेळां उल्लेख आला आहे तोच हा हुसेन महंमदखान.

तो घटकेंत मांड्यावर दोन्ही हात ठेवून त्यावर मस्तक ठेवी. लागलींच ते वर करून कपाळाला आंठ्या घाली व डोळे बारीक करून वेडींवांकडीं तोंडें करीत इकडे तिकडे पाही. मधून मधून हातवारे करी व माना डोलवी. ह्यावरून त्याच्या डोक्यांत कसल्या तरी गोष्टींचा विचार चालला असावा असें दिसत होतें. पण तो इतक्यांत कांहीं पुटपुटूं लागला. कोणत्याही गोष्टीचा मनांत फार खल झाला, ह्मणजे ती आपोआप तोंडाबाहेर येते. तसेंच हुसेनचें झालें. तो अगदीं स्पष्ट बोलूं लागला. त्यानें असें केलें नसतें, पण दिवाणखान्यांत कोणी नसल्यामुळें बोलावयास त्याला कांहीं हरकत वाटली नाहीं. तो मिशीवर ताव देऊन ह्मणाला ' ह्या हुसेनची कर्तबगारी अजून कळली नाहीं ! हा पठ्ठ्या अहमदनगरची वजिरात तर काय, पण इंद्राचें राज्य सुद्धां मिळवील ! बादशहाला काय ह्यांत येवढें गूढ पडलें कोण जाणें ! मुरारराव झाला—चतुर साबाजीपंताचा मुलगा झाला ह्मणून काय झालें. तो गनीम नाहीं कीं काय ? .... आमच्या बाबांनीं कर्तबगारी थोडी कां केली ? मुरारराव ह्मणे गुणी आहेत ! असतील, पण असें हिंदूस जर अधिकार देत गेले आणि तेही मोठमोठाले तर आह्मीं मुसलमानांनीं काय भिका मागाव्यात;

ह्मणून कां आमचे पूर्वज इतक्या लांबून येथें आले ? हें सर्व जग मुसलमानांकरितां परमेश्वरानें निर्माण केलें आहे. इतर मूर्ख धर्माच्या लोकांकरितां नाहीं. मग ते मुरारराव असोत कीं, कोणीही असोत. छे ! छे ! हें बादशहाचें वेड घालविलेंच पाहिजे. तो नीट शब्दांनीं, उपदेशानें किंवा आर्जवांनीं ऐकणार नाहीं तर त्याला कांहीं तरी अपूर्व कृतीच करून दाखविली पाहिजे. मुरारराव मोहिमेवरून आला कीं, बादशहा आपली वजिरी त्याला देणार. ह्यांत बादशहानें न्यायानें वागण्याचा किती जरी आव घातला तरी मी हा आपला अपमानच समजतों ! ....आमच्या चुलत भावानें-मलिकंबरानें—कर्तबगारी करून औरंगाबादेस राज्य स्थापलें, व तो तें हल्लीं चालवीत आहे. मग आमच्या घराण्यांत मींच कां सामान्य सरदार रहावें ! किंवा फार तर, सेनापति व्हावें ? छेः हें अगदीं अयोग्य आहे. .... माझा प्रतिस्पर्धी मोठा आहे. तो स्वतःही शूर, विद्वान्, मुत्सद्दी, मिट्ठा बोलणारा व चतुर आहे. त्याच्या बापानें निजामशाहीची सेवा केली, व ती आमरण इमानें इतबारें केली. त्याचमुळें बादशहाचें मन द्विधा झालें आहे. नाहीं तर मला वजिरी कधींच मिळती. बरें, मोहिमेवर जाऊन फत्ते करून आलों असतों तर वजीरी मुराररावास न मिळतां मलाच मिळाली असती. पण आतां काय करावें ? ' येथें तो थांबला आणि बराच वेळ विचार करीत तक्याला टेकून पडला. मग तो पुन्हा बोलूं लागला, ' हं, असेंच केलें पाहिजे. आतां आड मार्गांतच शिरलें पाहिजे; कारण, सरळ चालून आपला मुळींच निभाव लागावयाचा नाहीं. मुरारराव सीधा माणूस आहे. आपण त्याच्याशीं गूढपणानें कपटानें वागलों व वरवर मोठा स्नेह दाखविला, तर त्याला आपला कधींही संशय येणार नाहीं. कोळी जसें आपलें भलें मोठें जाळें पसरतो व त्यांत लहान मोठे किडे पकडतो, तसेंच मींहि आतां आपलें कपटजाल पसरतों आणि येथें राहून इच्छेप्रमाणें त्याचीं सूत्रें हालवितों. त्यांतून तूं सुटलास तर मोठें भाग्य समज ! प्रसंग आलाच तर कुटिल नीतीनें वागावयास हरकत नाहीं. कपटानें वागणाऱ्यास ईश्वर ह्मणे शासन करितो आणि त्याचे कामांत नेहमीं अपयश आणितो ! हः, ईश्वर असता तर ह्या जगांत श्रीमंत गरीब, लहान मोठ, बुद्धिमान् मठ्ठ, सुखी दुःखी असे भेदच कां पडते ? ईश्वराचीं सगळींच लेंकरें असल्यामुळें त्यानें सगळ्यांसच सारखी स्थिति दिली असती. पण पाहंच आतां माझ्या दीर्घ

प्रयत्नांपुढें कोण काय करितों तें! बसू ह्यापुढें एकाच गोष्टीकडे लक्ष द्यावयाचें. तिच्यासाठीं कांहीं जरी करावें लागलें तरी बेहेत्तर आहे. प्रथम मुराररावांद्दल बादशहाचें मन कलुषित करून टाकितों. व मग हळूं हळूं माझ्या कपट नाटकास प्रारंभ करितों. अरे पण, हो,—एक गोष्ट जर घडून आली तर मी वजीरीची अपेक्षा करणार नाहीं. स्वोन्नतीची इच्छा सोडून देईन. मुराररावाचा द्वेष करणार नाहीं. फार तर काय? पण घरादारावर सुद्धां पाणी सोडीन!' अशी कोणती विचित्र आणि अद्भुत गोष्ट होती कीं, जी झाल्यानें हुसेन स्वस्थ होणार होता? पण तोच पुढें बोलूं लागला आहे, तें ऐका. ह्मणजे कदाचित् ती गोष्ट कळेल. तो स्मित हास्य करून डोळे मिचकावीत ह्मणाला 'अहारे, परी! तिला घडून ईश्वर थकला असावा; ह्मणूनच तिच्या इतकें सौंदर्य त्यानें कोणास दिलेलें आढळत नाहीं! अहाहा! काय तो गोंडस बांधा! काय तें मोहक स्वरूप! तो केशकलाप- तें नासिक. मृदु हात—तो नितंबभाग—अरेरे! प्यारी—प्यारी!!'

जणूं काय ती परी आपल्या संन्निधच आहे असें त्याला वाटत होतें. मनांत तो त्या परीबरोबर जणुं विहारच करीत होता. पुन्हां मिटक्या मारीत तो ह्मणतो 'तें रत्न—तो हिरा—तें मानवकुलभूषण, मीं थोडेंच वेळां पाहिलें आहे. पण तेवढ्यानें मी अगदीं दिवाणा होऊन गेलों. त्या अप्सरेची आणि नूरजहानची कांहीं दिवस मैत्रीही जमली होती. पण इतक्यांत ती सप्तशृंग गडीं गेली. अशा दीलखुष परीला अहमदनगरसारख्या विलासी शहरांत ठेवावयाचें. तें सोडून तिला तिच्या त्या अरसिक पतीनें त्या डोंगरावर, अरण्यांत लावून दिली. ईश्वर असलाच तर तो तरी केवढा अंधळा! असलें रत्न आह्मां रसिक, रंगेल व पवित्र मुसलमानांत उत्पन्न करावयाचें सोडून, तें त्या काफर जातींत उत्पन्न केलें. मुरारराव! व्यर्थ तुझी विद्वत्ता व इतर सगळे सद्गुण! पूर्व सुकृतामुळें, तुला असल्या अलभ्य देणगीचा लाभ झाला असतां, तूं त्याचें कांहींच चीज करीत नाहींस! तुला स्वामिभक्तिपिशाच्यानें घेरलें आहे. अरे, कसली स्वामिभक्ति! ह्या जगांत कोणी स्वामी नाहीं कोणी चाकरहि नाहीं. बादशहा झाला तरी तो आपल्या सारखाच माणूस आहे कीं, नाहीं? मग त्याच्यावर ती एवढी भक्ति कशाला? बादशहाचा हुकूम झाला ह्मणून त्या कोमलांगीला भर तारुण्यांत एकटें टाकून तूं मोहिमेवर गेलास! माझ्यासारखा तर कधींही न जातां.

पण माझें इतकें भाग्य कोठें आहे ? ....असो. आपलें दैव स्वतः उद्योग केल्याशिवाय उदयास येणार नाहीं ! रत्न उकरडयावर कोंबड्यास सांपडलें तर त्याचा काय उपयोग ? त्याचा योग्य उपयोग करणें माणसाचें काम आहे.' इतकेंच बोलून तो स्वस्थ बसला. मग पुन्हां थोड्या वेळानें पोक्तपणानें तो ह्मणाला ' बरें, आह्माला कदाचित् ती वश झाली नाहीं (दाढीवर हात फिरवून) आमच्या या रूपावर फिदा झाली नाहीं तरी, ' तुझ्या पत्नीच्या पातिव्रत्याची परीक्षा पाहिली. तूंच तिचा नवरा ह्मणून बरें ! दुसरा कोणी असता तर त्यानें तिला जिवंतहि ठेविली नसती ! ' असें त्याच्या हृदयांत विष ओतितां येईल. व त्यामुळें तो खास झुरणीस लागणार ! आत्महत्या करणार. निदान तोंड तरी काळें करणार ! आणि मला तरी तेंच पाहिजे आहे ! !

इतक्यांत हुजऱ्यानें " मुराररावांचे धोंडोपंत आले आहेत " ह्मणून वर्दी दिली. त्याबरोबर चौरंगावरून ताडकन् उठून तो घाईघाईनें ह्मणाला ' जा, जा. त्यांना इकडे घेऊन ये ! ह्मणून हंसत आणि भेदकदृष्टीनें पहात दिवाणखान्यांत तो इकडे तिकडे फेऱ्या घालूं लागला.

वाचकहो ! धोंडोपंत दिवाणखान्यांत येईपर्यंत हुसेनबद्दल विशेष माहिती सांगितल्यास कांहीं हरकत नाहीं. नाहीं बरें ! ऐका तर मग.

महंमदखान ह्मणून एक अत्यंत शूर सरदार होता. तोच हुसेनचा बाप महंमदखानास तुर्कस्थानांतून गुलाम ह्मणून त्याच्या लहानपणीं हिंदुस्थानांत विकण्यासाठीं आणिलें होतें. खुस्त्रूखान ह्मणून एक मनुष्य त्यावेळीं निजामशाहीचा सेनापती होता. त्यानें महमदास विकत घेतलें. मनसूरअली राज्यावर बसल्यावर थोड्याच दिवसांत एक मोठी लढाई झाली. तींत सेनापती खुस्त्रूखान मरण पावून, सैन्याचा पराभव होणार होता. पण महंमदानें लोकास धीर देऊन त्या दिवशीं जय मिळविला. त्यामुळें बादशहानें त्याला एकदम सेनापती केलें. खुस्त्रूखानच्या तरुण मुलीनं महंमदखानाशीं आपखुषीनें लग्न लावलें. तिच्यापासून त्याला दोन अपत्यें— मुलगी आमिना व मुलगा हुसेन— झाल्यावर ती निवर्तली. पुढें महंमदखानानें आपल्या मुलीस व मुलास सर्व प्रकारचें शिक्षण दिलें. हुसेन प्रत्येक गोष्टींत मुराररावांच्या बरोबरीचा होता. त्यांचें जितकें शिक्षण झालें होतें, तितकेंच त्याचेंही झालें होतें. त्यांच्या ज्ञानाइतकें याचेंही ज्ञान होतें. त्यांच्या इतकाच हा शूर होता. पण हुसेन धर्मासंबंधानें पूर्ण नास्तिक होता. तथापि

लोकांस तो महंमदीधर्माचा बाह्यात्कारीं मोठा अभिमान दाखवी. त्याची बहिण बरीक खरोखरच देवभोळी, सरळ मनाची व शांत वृत्तीची होती. पण हुसेन ह्मणजे पक्का आंतल्या गांठीचा माणूस. त्याचा बाप निजामशाहीशीं आजन्म इमानानें वागला. पण हुसेनला तिच्याबद्दल विशेषशी भक्ति मव्हती. पण वाचकहो ! ते पहा, धोंडोपंत आले. आतां आह्मीं आपली हकीकत सांगण्याचें बंद करितों. धोंडोपंत आल्याबरोबर हुसेननें त्यांचा हात धरून आयिथे जनाब ! असें ह्मणून त्यांस चौरंगावर नेऊन बसविलें आणि आपणही तेथेंच बसला.

प्रकरण ५ वें

विषाचें बीजारोपण.

बिचारे धोंडोपंत ! हुसेन आपला इतका आदर करील हें त्यांच्या स्वप्नींही आलें नव्हतें ! कारण, त्यांनीं हुसेनजवळ आमिनेशीं लग्न लावण्याची गोष्ट काढल्यापासून हुसेन त्यांचा नेहमीं तिरस्कार करी. आपण गेलों कीं, हुसेन आपल्या हातीं मोहोरा देणार; आणि थोडा वेळ बोलून आपण आपला मार्ग सुधारणार ! मात्र हरतऱ्हेनें आमिनेचें बरीक दर्शन घ्यावयाचें, असा त्यांनीं निघतेवेळीं मनसुबा करून ठेविला होता. पण येथें पहातात तों सर्वच विपरीत ! तेव्हां त्यांना वाटलें का, आमिनेला आपली दया आली असावी. आणि तिनेंच हुसेनला मला बोलावण्याचा आग्रह केला असावा. ती वडील आहे. प्रत्येक गोष्टींत हुसेन तिचें ऐकतो. तिचा शब्द हुसेनला मोडवला नसावा. आणि ह्मणूनच मोहोरांच्या कामांत हेंही साधून घ्यावें अशा विचारानें स्वारी इतका आदर करीत असावी ! असा विचार मनांत येतांच त्यांची कळी उमलली. ते हर्षपूर्ण दृष्टीनें पाहूं लागले. हुसेनला ते आनंदानें ह्मणाले ' खानसाहेब, आपलें पत्र पावतांच मी त्वरेनें आलों. मुराररावांशीं आपलें इतकें सख्य अजूनही आहे, ही फार चांगली गोष्ट आहे. '

' हं. हं. हं ! अहो, सख्य नसायला काय झालें ! त्यांच्यावांचून कां

कोठें निजामशाहीची भरभराट होणार आहे ?' हुसेन हर्षानें ह्मणाला व लागलींच गंभीरपणा आणून तो अगदीं सभ्यपणानें बोलला, 'पण कायहो ! धोंडोपंत ! मला तुह्माला कांहीं विचारावयाचें आहे. विचारूं कां ?'

'हो; हो. वा ! विचारावयाला काय हरकत आहे ?'

धोंडोपंतास वाटलें कीं, आमिनेसंबंधींच कांहीं तरी प्रश्न येणार व आतां आपण युक्तीनें उत्तरें दिलीं पाहिजेत असेंही त्यांनीं मनांत ठरविलें.

हुसेन—तुमचें वय या वेळीं चाळीस वर्षांचें असेल नाहीं बरें ?

धोंडोपंताच्या वरील विचारास दुजोरा येऊन त्यांची पूर्ण खातरी झाली कीं, हा प्रश्न लग्नासाठींच असला पाहिजे. त्यांनीं हुसेनला बरें वाटावें ह्मणून उत्तर दिलें 'छे. छे. इतकें कोठलें ! मला नुकतेंच बत्तिसावें तर लागलें. तुमच्या बहिणीपेक्षां—' इतकें बोलून त्यांनीं जीभ चावली. हुसेनच्या तें लक्ष्यांत आलें. परंतु त्यानें तिकडे लक्ष्य न दिल्यासारखेंच दाखविलें. तो पूर्ववत् गंभीरपणानें ह्मणाला, 'इतकें ज्याअर्थीं तुमचें वय झालें त्याअर्थीं तुह्मीं जमीनी, घरेंदारें वगैरे बरींच कमावलीं असतील.'

ह्या वेळेस बरीक धोंडोपंतास उत्तर सुचेना. हुसेनखानासारख्या सरदाराशीं सोयरीसंबंध संपादण्यास आपणही त्याच्या तोलाचे असलें पाहिजे. हें आज त्यांच्या लक्ष्यांत आलें. त्यांना इतके दिवस वाटत होतें कीं, मुराररावांपेक्षां लोक मला वेगळे समजत नाहींत पण आज त्यांच्या मनांत प्रकाश पडला. ते जरा गोंधळून हुसेनला ह्मणाले "मुराररावांच्या जमीनी, घरेंदारें तेंच सर्व माझें ! मी व मुारराव कांहीं दोन नाहीं. बाकी मी जर स्वतःसाठींच झटलों असतों तर जमीनजुमलाच काय पण बादशहापासून एखादी जहागीरही मिळविली असती. आज जरी मुराररावांजवळ इस्टेटीचा अर्धा वांटा मागितला तरी त्याची छाती नाहीं मला 'नाहीं' ह्मणावयाची. पण—"

"मग पणवीण कां ? अहो, मुारराव झाला ह्मणून काय झालें ? ह्या जगांत कोणी कोणाचें नाहीं. ज्याचा तो. असें निदान माझें तरी मत आहे.; आज तुह्मी बाबासाहेबां (साबाजीपंत) पासून त्या घराण्याची येवढी सेवा केली. तरी त्यांनीं खटपट करून दरबारांत सरदारी, सुभेदारी, जहागीर किंवा एखादा जमीनीचा तुकडा, निदान एखादें छोटेंसें वतन तरी तुह्माला दिलें आहे कां ? मुराररावांनीं एक शब्द खरचला तर बादशहा आज तुह्माल

वाटेल तें देईल. पण मुराररावांना वाटतें कीं, तुह्माला मोठेपणा प्राप्त झाला तर आपलें काय राहिलें ? व तुह्मीही गुळमुळीतच ! मला याबद्दल आश्चर्य वाटतें, व तुह्मासाठीं फार फार हळहळ वाटते !

धोंडोपंतास नक्की वाटलें कीं, आपल्या बहीणीचें कल्याण व्हावें ह्मणूनच हा इतकें कळकळीनें बोलत आहे. आतां तर आपला आमिनेशीं खास विवाह होणार. ते ह्मणाले ' त्यांत काय वाईट आहे ? मला काणतें कमी— "

' वाहवा ! धोंडोपंत तुह्मींच कां बोलतां हें ? अहो, तुमचें अजून लग्न व्हावयाचें आहे. मुलेंबाळें होतील ! मुरारराबांचीं पोरें तुमच्या मुलांस घरांत पाय तरी घालून देतील काय ? येवढें कशाला ? मुरारराबच बायकोच्या नादीं लागून तुमचे वाटेल तें करण्यास तयार होतील. नव्हे, झाला–! '

' छेः हो, असें व्हायचें नाहीं.' धोंडोपंत मध्येंच ह्मणाले "तुमची कांहींतरी गैरसमजूत झाली आहे. मुराररावांची बायको तर फार सद्गुणी आहे. ती मला वडील दिराप्रमाणें मान देते. व तुह्मी असें कसें ह्मणतां ? '

' मला काय त्याचें ! पण, धोंडोपंत सावध रहा बरें ! मुरारराव बायकोच्या अध्यीं वचनांत आहेत. व ती तुमचा आंतून फार द्वेष करते. प्रत्येक गोष्टींत मुरारराव तुमची सल्ला विचारतात हें तिला खपत नाहीं. नवरा आपल्या मुठींत रहावा ही तिची इच्छा—तिचें नवऱ्यावर खरें प्रेम तर कांहींच नाहीं ह्मणा. पण तिला यथेच्छ वागण्यास तुमचाच अडथळा आहे. तुह्माला जर सर्व कळत असूनही त्याचें कांहीं वाटत नाहीं तर मला—'

" मला सर्व कळतें ! खानसाहेब, मला तर कांहीं असला प्रकार दिसत नाहीं. "

" नाहींच हो तो दिसायचा. तुह्माला दिसलें तर मग काय राहिलें. पण खरेंच सांगू कां धोंडोपंत, हो, नाहींतर ह्मणाल मोहोरांच्या निमित्तानें मला हा त्रास दिला ! मोहोरा तर आहेतच. जातात कोठें ? पण तुह्माला त्रास होत असला तर नाहीं मी बोलत. "

' बोला, बोला खानसाहेब ! त्यांत काय त्रास आहे ? खरें सांगावयाला काय हरकत आहे ? तुह्मी खोटें कशाला सांगाल ? मोहोरांबद्दल काय मोठेंसें ! त्या मिळतीलच केव्हां तरी ! '

' असें ! काय लाख रुपयांची गोष्ट बोललांत ! अहो, मी सांगतों त्यावर जर भरंवसा ठेवाल तर तुमचें कल्याणच होईल. ' हुसेन त्यांना अधिक लालचावण्याचे हेतूनें पुढें ह्मणाला, ' तुह्माला माझी बहीण आमिना माहीत आहेच ! ' असें ह्मणून तो त्यांचेकडे पाहूं लागला. एवढयाबरून तर धोंडोपंतास स्वर्ग दोनच बोटें राहिलें. ' तिला तुह्मी पदरांत ध्या ' असेंच हा पुढें ह्मणणार असें त्यांना बाटलें. व आतां कांकूं करतां मुळींच कामाचें नाहीं असेंही त्यांनीं ठरविलें. इतक्यांत ' तिच्याकडे ती मुराररावांची बायको वारंवार येत असे. ' असें हुसेनचें पुढील बाक्य ऐकून ते अगदीं विरमले. हुसेनच्या तें सगळें लक्ष्यांत आलें. तथापि त्यांची चित्तवृत्ति आपणांस जणूं कळलीच नाहीं, असें दाखवून हुसेन ह्मणाला ' तिच्या तोंडचें एकदा मीं ' तो मेला धोंड्या आहेना खवीस; त्याला आधीं हांकून दिलें पाहिजे ' इतके शब्द ऐकले ! व मला त्याचें फार नवल वाटलें ! धोंडोपंत नीट कान देऊन ऐकत आहेत असें पाहून मनांत आनंदून हुसेन आणखी ह्मणाला– ती गेल्यावर आमिनेला यासंबंधीं मीं विचारलें, तेव्हां ती ह्मणाली, ' भाऊ ! अरे, त्या धोंडोपंताकडे पहारे जरा ! त्यांच्याकरितां माझा जीव तिळतिळ तुटतो. ते कसे निर्मळ मनाचे, सुस्वभावी आणि मुराररावांचे खरे हितचिंतक आहेत ! .... ' हुसेन आपल्या बहिणीचा प्रत्येक शब्द अशा रीतीनें उच्चारीत होता कीं, त्या प्रत्येक शब्दानें धोंडोपंताचा आमिनेबद्दल व स्वतः आपल्या बद्दलही पूज्यभाव वृद्धिंगत व्हावा. हुसेन हें सर्व जाणून होता. त्याचें चऱ्हाट पुढें चालूंच होतें. ' पण ती मेली आहेना कैदासीण–मुराररावांची बायको ! मुराररावांच्या मनांत त्यांच्याबद्दल तिनें अगदीं वाईटसाईट भरवलें आहे. आणि त्या दोघांनीं बेत केला आहे कीं, मुराररावांची बायको माहेरीं गेली कीं, कांहींतरी निमित्त काढून त्यांना तिकडे पाठवायचें. व मग तेथें त्यांच्या जिवाचें कांहीं बरें....'काय सांगूं धोंडोपंत ! तिला पुढें बोलवेना. ती स्फुंदस्फुंदून रडूं लागली. मलाही अत्यंत वाईट वाटलें ! पण तिचें दुःख कमी व्हावें ह्मणून मी मोठया कष्टानें ह्मणालों " जाऊं देग. धोंडोपंतास जर त्याबद्दल कांहींच वाटत नाहीं, तर आपण बोलूनचालून परके. आपण काय करावें ? " त्याबरोबर ती पुन्हां ह्मणाली " भाऊ, ते परके नाहींतरे ! ते आपल्यांतलेच आहेत. त्या देवमाणसाला इंदिरेचे हे पाचपेच

कांहीं समजत नाहींत ! धोंडोपंत, हें ऐकून मी तुह्मांला लवकर जागें करण्याचा विचार केला. पण तुमच्या जवळ बोलण्याचा धीर होईना; कारण, तुह्मी आमच्यांत कलागती लावून परस्परांत द्वेष वाढविण्यासाठीं हें सगळें करीत आहां ! ह्मणून ह्मणाल अशी मला भीती पडली. पण जेव्हां सप्तशृंगगडीं तुह्मी गेलां ह्मणून ऐकलें तेव्हां आह्मां दोघांसही धीर निघेना ! ह्मणून मीं तुह्माला ताबडतोब बोलावलें. "

प्रत्येक वाक्याचे वेळीं हुसेनचें लक्ष्य धोंडोपंताचे चेहऱ्याकडे पूर्ण होतें. आपल्या बोलण्याचा इष्ट परिणाम धोंडोपंतांचे मनावर पूर्ण होत आहे असें त्यास कळून येत होतें–हुसेनच्या पहिल्या भाषणाचे वेळीं मुराररावांचे बायकोबद्दल तिटकारा व अमिनेबद्दल सप्रेम आदर इतकेंच काय तें धोंडोपंताच्या मनांत होतें. पण हुसेनचें सर्व भाषण झालें तेव्हां मात्र त्यांची बुद्धी बावचळली. हुसेन ह्मणतो तसें होणें शक्य आहे असें त्यास वाटूं लागलें. इंदिरेबद्दल त्यांचें मन पूर्ण कलुषित झालें. व मुराररावांचाही त्यांस फार राग आला.

एकादी गोष्ट किंवा व्यक्ति वाईट असा मनाचा कायमचा समज धरून, तिचा विचार केला तर, तीबद्दल मनांत अनावर द्वेष उत्पन्न होतो. देवकीचे पोटीं कृष्ण ह्मणून एक बालक जन्मून तें आपला नाश करणार आहे अशी कंसाची समजूत होतांच त्यानें देवकीचीं आठ मुलें निजधामास पाठवलीं व पुढें कृष्ण गोकुळांत आहे असें समजतांच तेथेंही कंसानें भयंकर राक्षस पाठवून गोकुळास त्राहि भगवन केलें. शिवाजी महाराजांचें मंत्रिमंडळ आपल्या विरुद्ध आहे अशी प्रथमारंभीं संभाजीची उगीच कल्पना झाल्यावरून त्यानें अनेक क्रूर कृत्यें केलीं. नानाफडणीस आपल्या विरुद्ध आहेत अशी थोरले बाजींची कल्पना झाल्यावरून नाना देशहिताचीं अनेक सत्कृत्यें करीत असतां, त्यानें विनाकारण त्यास कारागृह दाखवून स्वदेशाचें नुकसान करून घेतलें. असा ह्या गैरसमजुतीचा प्रभाव आहे. इंदिरेसंबंधानें मन कलुषित झाल्यावर तिच्या बद्दल विचार करतांना धोंडोपंताची वरीलप्रमाणें स्थिति झाली. इंदिरेच्या ज्या गोष्टी त्यांना पूर्वीं चांगल्या वाटत असत, त्याच आतां वाईट वाटूं लागल्या. इंदिरा अहमदनगरीं होती, तेवढ्या मुदतींत तिचें आपणांशीं वर्तन कसें होतें, त्याचा धोंडोपंत विचार

करूं लागले. ती आपली बरदास्त राखीत होती. पण ती कृत्रिमच खास असावी. कारण, इंदिरा आपल्या मागें मुराररावांशीं कुजबुजत असे. शिवाय कधीं कधीं ती आपल्याला उद्धटपणाचींही उत्तरें देत असे. मुराररावांच्या वर्तनांतही अलीकडे तसाच चमत्कारिक फरक पडला होता. इंदिरा येण्यापूर्वींच मुरारराव प्रत्येक बाबींत मला सल्ला विचारीत असत, पण अलीकडे तें कांहीं नाहीं ! त्या अर्थी त्या दोघांसही आपली किंमत वाटत नाहीं हें खास ! बरें इतकेंच झालें असतें तर पुरवतें; पण माझ्या जिवावरही उदार ! ! येथून निघतेवेळीं मोहिमेवर जावयाचें येवढेंच मला सांगितलें. सप्तशृंगचें नांवही नाहीं. पालखेडास मुक्काम असतां ऐनवेळीं ' सप्तशृंगाला जा ' ह्मणून सांगितलें. रात्रीं गडावर एकटेच गेले. कशाला गेलां ? ह्मणून विचारलें असतां हंसून ' उगीच ' असें अर्धवट उत्तर. गडावर जावयास निघालों तेव्हां त्यांचें एक प्रकारचें चमत्कारिक पहाणें वगैरे गोष्टींनीं त्यांचे मनांत जास्तच विपर्यास उत्पन्न झाला. बरें, हें सोडून दिलें तरी इंदिरेच्या व्यवस्थेला मी कशाला पाहिजे होतों ? तिचे वडील तेथें नव्हते कीं काय ? बरें पाठवावयाचेंच तर दुसरे कोणा विश्वासू मनुष्याला कां नाहीं पाठविलें ? मलाच कां पाठवलें ? मला कां लढाईत लढतां येत नाहीं ? अर्थात् मला तेथें धाडण्याचा हुसेन ह्मणतो तसाच कांहीं तरी प्रकार असला पाहिजे. एरवीं आमिनेला आणि हुसेनला वाईट नाहीं वाटावयाचें ! तें कांहीं नाहीं. हें सगळेंच विपरीत दिसत आहे. आतां आपणास सावध राहिलेंच पाहिजे ! बाहेर भीक मागुन काळ घालवूं पण मुराररावाचा दरवाजा फिरून ओलांडायचा नाहीं. आमिनेचे व हुसेनचे आपणावर कितीतरी उपकार आहेत ! आमिनेचें आपणांवर अगदीं निष्कलंक प्रेम खास आहे. तिचा सहवास लाभला तर बरेंच आहे. नच लाभला तर मुराररावांस आतां दुरूनच नमस्कार ठोकायचा. इंदिरेचें तर मुखावलोकनही नको. जें वरून चांगलें दिसतें तें आंतूनही तसेंच असतेंअसें नाहीं. हें तत्त्व आपण विसरलों,' इत्यादि विचारांनीं धोंडोपंतांचें डोकें भणाणून गेलें. त्यांनीं आश्चर्यानें विचारलें, " हुसेनसाहेब, मग मोहोरांबद्दल तुह्माला मुराररावांचें पत्र आलें हें खरें नाहींच कीं काय ? "

हुसेन त्यांच्या मनांतील विचार ताडून आनंदित झाला. व त्या आनंदाचे

भरांत हंसून तो " अर्थात् " असें जरा ऐटींत ह्मणाला आणि ' तुमचें कल्याण केलें कीं, नाहीं ' अशा प्रश्नदर्शक दृष्टीनें तो त्यांच्याकडे पाहूं लागला.

' पण मी सप्तशृंगीं आहें असें तुह्मांला कसें कळलें ? '

' न कळायला काय झालें ? तुमच्याबद्दल इंदिरा भोळ्या भावानें आमिने-जवळ सर्व बोलून गेली ! तुह्मी मोहिमेवर निघालां, असें पाहिल्याबरोबर आह्मीं सावध झालों व तुमच्या मागोमाग स्वार पाठवले. पालखेडाहून तुह्मी इंदिरेच्या माहेरीं गेला असें समजल्यावरून तुह्माला निमंत्रणपत्र पाठविलें. कोणाला संशय येऊं नये ह्मणून मजकूर मात्र निराळा लिहिला ! '

प्रियवाचकहो ! पाहिलीत ना आपले हुसेनची युक्ति ! धोंडोपंत आल्याबरोबर जर त्यानें पत्राबद्दल त्यांना असा मजकूर सांगितला असता तर त्याचा कांहीं उपयोग होता ना ! पण आतां धोंडोपंतास त्याचें हें सगळें करणें चांगलेंच वाटूं लागलें. हुसेनची अशी नेहमीची खुबी असे कीं, एकादी गोष्ट कपटानें साध्य करावयाची असल्यास एकदम तिच्याबद्दल न बोलतां भाषणाचा ओघच असा आणावयाचा कीं, आपली इच्छित गोष्ट सिद्धीस जावी.

आतां तूंच माझा साह्यकर्ता असा मला पूर्ण विश्वास आहे, असें स्पष्ट दर्शविणारे स्वरानें धोंडोपंत हुसेनचा हात धरून ह्मणाले " मग मीं यापुढें काय करावें असें तुह्मास वाटतें ? "

' एखाद्याला बडतांना, फांसावर चढवलेला असतांना किंवा संकटांत प्राण जात असतांना वांचविलें, ह्मणजे तो प्राणदाता जसा त्याच्याशीं गोड बोलत असतो किंवा त्याच्याकडे पहात असतो—तें बोलणें किंवा ती दृष्टि नेहमीं-पेक्षा फार भिन्न असते—त्याप्रमाणें धोंडोपंताकडे पहात, हुसेन ह्मणाला, " आतां काय करतां ? मी सांगतों तसें वागा. मी तुमचें हितच करीन. परंतु, मजवर पूर्ण विश्वास असूं द्या. तुह्मी आज कित्येक वर्षें त्या घराण्याची सेवा केली असतांही, मुराररावानें बायकोच्या नादीं लागून तुमचा सर्वस्वीं घात करण्याचा बेत केला; ह्मणून त्या दोघांवर सूड उगवलाच पाहिजे. तो कसा तें सांग— '

' छे. छे ! खानसाहेब, आपण हें काय बोलतां ! मुराररावांचे जिवावर आपण आज इतके दिवस चैन भोगली, आणि त्यांच्यावर सूड ! इंदिरेचा जरी मला राग आला आहे तरी ती अबला आहे. अबलेवर सूड ! ! बाः शत्रूवर सूड उगवायचा कीं, ज्याचें अन्न खाल्लें त्या नातेवाईकावर. ' !

' तुमचे हिंदू लोकांचे चुकतें तें येथेंच. जे आपला प्राण घेऊं इच्छितात ते कां आपले नातेवाईक ? तेच तर पक्के शत्रु ! बाहेरच्या शत्रूपेक्षां हे घरांतील शत्रूच फार भयंकर असतात. समजा, मीं तुह्मास बोलावलें नसतें, तर कांहीं दिवसांनीं त्या चांडाळणीनें तुह्माला जिवंत तरी ठेवलें असतें काय ? नाहींना ! मग ती कसली नातेवाईक ! अहो हुमायून बादशहानें आपल्या दुष्ट भावास शासन नकरितां क्षमा केली.त्याबद्दल त्यास किती विपात्ति भोगावी लागली! माझें तर असें साफ मत आहे कीं, ह्या घरांतील शत्रूंस कार्डीचीही क्षमा करतां कामा नये. ह्यांना क्षमा केली ह्मणूनच माझ्या बापाला गुलाम व्हावें लागलें. पहा बुवा ! पटलें तर पटलें. नाहीं तर माझें काय त्यांत जाणार आहे ? तुमचाच प्राण जाईल. ! '

' पण आतां तर मी त्यांचे हातांतून सुटलों आहें. पुन्हां त्यांच्या वाऱ्यासही गेलों नाहीं ह्मणजे झालें. मग कसा माझा प्राण जाईल. ? '

' खळे तर नाहीं तुह्मी धोंडोपंत ! अहो तुह्मी कोठेंही गेलांत, तरी ते काय तुमचा हरतऱ्हेनें नाश केल्यावांचून सोडतील ! कारण, लोकांत तुह्मी त्यांच्या वाईटपणाबद्दल डंका वाजवाल अशी त्यांना भीति आहेच कीं नाहीं ? आणि शिवाय केवळ सुदैवानें ह्मणून या अरिष्टांतून सुटलांत ! अर्थात् त्यांचा सूड घेतलाच पाहिजे. नाहींतर ते तुह्माला अगर तुमचे सारखे दुसरे एखादे निःसीम हितचिंतकास भोगावें लागणारच. '

हुसेनच्या ह्या चर्पटपंजरीनें धोंडोपंत निरुत्तर झाले. एखाद्या दांडग्या स्त्रीच्या अनुमतीशिवाय तिचा नवरा कोणतीही गोष्ट करूं लागला, तर ती त्या निर्बळ मनाच्या नवऱ्याला आपल्या वाक्पांडित्यानें अगदीं निरुत्तर करिते ! तद्वत् धोंडोपंताची स्थिति झाली. मग ते अगदीं हलक्या स्वरांत ह्मणाले " खानसाहेब, कसा काय सूड उगवायचा; तें तर सांगा. उगवणें किंवा न उगवणें मग माझ्या मर्जीवर आहे ! "

' अहो, येथें असें वागल्यावांचून गत्यंतरच नाहीं. आतां असें करा. मुरारराव आयतेच मोहिमेवर गेले आहेत. ते त्या कडव्या लोकांशीं लढतांना बहुतेक स्वर्गास जाणारच ! औषधावांचून खोकला गेला ह्मणायचा ! बाकी राहिली इंदिरा. तिला येथें नूरजहानपाशीं आणून ठेवा. ह्मणजे तिला वारंवार बोलून खजील करितां येईल. तिला आणखी जास्त चिडवायचें

ह्मणजे तिचें माझ्याशीं लग्न लावा ह्मणजे झालें ! लग्न झाल्यावर मीहि तिच्याशीं असें वागेन, कीं तिला मेल्यापेक्षांही मेल्यासारखें होऊन जावें ! अहो पुरुषांचा सूड द्वंद्वयुद्ध करून, किंवा विश्वासघात करून ठगविणें बरोबर आहे. पण बायका— बोलून चालून त्या अबला. त्यांचा सूड कां पुरुषासारखा घेतात ! त्यांचा सूड ह्मणजे ज्यायोगें नेहमीं लाजून, त्या झुरणीस लागतील आणि लवकरच मरतील, असाच घेतला पाहिजे. बाकी इंदिरा (तुह्मांला खरें वाटणार नाहीं धोंडोपंत) त्या नेभळ्या पतीला सोडून माझ्याशीं विवाह करण्याला अगदीं एका पायावर तयार आहे ! पण मित्रप्रेमामुळें मी तिकडे दुर्लक्ष्य करीत आलों. हं उठा आतां ! विस्मयांत नका पडूं. जा आणि त्या इंदिरेला येथें घेऊन या ! '

हुसेनचें हें लांबचलांब भाषण चालूं असतां, धोंडोपंतांनीं मध्यें बोलण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण त्यानें त्यांस बोलूंच दिलें नाहीं. त्याचें चऱ्हाट चालूंच होतें. तो अगदीं थांबल्यावर धोंडोपंत राग गिळून शांतपणानें ह्मणाले, ' हं ! झालें कीं नाहीं तुमचें बोलणें ? नसल्यास चालूं द्या आणखी ! खान साहेब ! मी कितीही भोळा झालों तरी माणूस आहे-वाटेल तें ऐकून घेणारा नाहीं ! तुह्मी येवढे मोठे सरदार ! आणि असें ह्मणावें ? परस्त्रीचा अभिलाष धरावा ? अहो हा सूड नव्हे. ही आपल्या कामवासनेची शांती आहे-ह्याच्यापेक्षां तिला विहिरींत लोटून द्यावी. कड्यावरून ढकलून द्यावी. गळा दाबून ठार करावी हा खरा सूड. पण मुराररावानें आणि तिनें माझा काय अपराध केला ह्मणून मी सूड उगविणार ? केवळ मला ठार मारणार ह्या संशयावरून ! बरें, समजा मी मेलों तर जग ओस पडणार आहे कीं काय ? मी एकटा फटिंग ना मला बायको कीं पोर ! कीं कोणीं जवळच्या नात्याचेंही माझें नाहीं. आतां जे तुह्मी मला माझ्याबद्दल इतकी कळकळ दाखवितां, त्या तुमच्याजवळ आमिनेबद्दल गोष्ट काढिली ह्मणजे तुह्मांला कसें वाटतें ? तें सर्व असो. मी मरणार होतों. पण आतां तर वांचलों ना ? मग काय आतां त्याचें राहिलें ?

' पण वांचविणारानें कांहीं सांगितलें तर तें ऐकणें तुह्माला भाग आहे. तुह्मी हिंदु आहांत ! कृतोपकार तुह्माला फेडलाच पाहिजे. आणि मी केलेला उपकार माझ्या सांगण्याप्रमाणें केलेंत, ह्मणजे फिटला असें मी समजेन ! '

' पण ह्यांत तुह्मी उपकार काय केलांत ? आमिनेवर त्रागा करून मी ह्या संसारासंबंधीं उदासीन राहिलों व कांहीं दिवसांनीं मरूनही जाईन ! तो ह्यामुळें लवकर मेलों असतो तें तरी बरें झालें असतें पण मला आतां वांचवून अधिक दुःख दिल्याचें पाप मात्र जें डलेंत ! त्यांनीं मला मारिलें असतें तर त्यांची अपकीर्तीच झाली असती व तोच त्यांचा सूड होय ! '

' पहा बुवा ! स्त्रीचरित्र अगाध आहे. कालच मला इंदिरेचें पत्र आलें कीं, मला घेऊन जा किंवा तुह्मी या ! मी तिला आणावयास आतां लोक पाठविणार व आहे ! तुमचा मुरारराव आतां लढाईतून परत येत नाहीं. आमिनेनें मला गळ घातली आहे, कीं धोंडोपंतांशीं इंदिरेनें जें वर्तन केलें, त्याबद्दल तिला चांगलें शासन कर. व तुह्मांला सांगितल्याप्रमाणें इंदिरेला प्रायश्चित्त हें देणारच मी ! मग तुह्मी हो ह्मणा नको ह्मणा. आमिनेचा शब्द मला मोडवत नाहीं. तिच्या आग्रहावरून मी तुह्मांस त्या काळाच्या जबड्यांतून ओढिलें. तरी तुह्मी उपकार समजत नाहीं ! ह्मणे त्रागा केला. अहो असे त्रागेबिगे आह्मी सबझुट मानितों. असो. आतां अधिक बोलायला वेळ नाहीं ! आतां एकच गोष्ट—'

' कांहो पण हुसेनखान ! इंदिरेचें पत्र आलें ह्मणून तुह्मीं ह्मणतां. आणि तिला आणून छळणार असेंही ह्मणतां-मग आटोपलाच प्रश्न ! मग माझें काय काम मधेंच ! '

' वः तुमच्याचकडून ती येथें आली ह्मणजे तिला कळेल कीं धोंडोपंतांस छळल्याबद्दल हें प्रायश्चित्त ! नाहीं तर आह्मांला ती ' धोंडोपंतांच्या नांवाखालीं तुह्मींच माझा छळ चालविला आहे ' असें ह्मणेल. त्यामुळें तुह्मांला त्रास दिल्याचे तिला कांहींच वाटणार नाहीं ! पहा आतां माझें ऐकाल तर वजीर झाल्यावर तुह्मांला मी जहागिरी वगैरे मिळवून देईन. मी लवकरच वजीर होण्याचा संभव आहे.' धोंडोपंतांचें मन द्विधा झालें. एकपरीनें त्यास वाटें कीं, ह्याच्या सांगण्याप्रमाणें वागणें ह्मणजे मनुष्यत्वास फांटा देणेंच होय ! पुन्हां त्यांस असें वाटें कीं, हें सर्व आपण मध्यें न पडलों तरी घडून येणारच ! मग आपण तरी कां हात दाखवूं नये ? मुरारराव तिकडेच स्वर्गवासी झाला; आणि हुसेननें बोलल्याप्रमाणें इंदिरेशीं लग्न करूनही तिची हेळणा केली नाहीं व तो तिजवर लंपट झाला; तरी तिचें हें वर्तन लोकांत पसरवून तिची

नाचकी करितां येईल, बरें, मुरारराव आलाच तरी तुमची बायको अशी निघाली ह्मणून सांगून त्याचा लोभ संपादन करितां येईल. असा विचार करून ते हुसेनला ह्मणाले, ' कांहो तुमची बहीण आणि तुह्मी मजबद्दल एवढी काळजी बाळगिता, तर ती माझ्याशीं लग्न कां लावीत नाहीं, आणि तुह्मांला-ही तें कां आवडत नाहीं ? '

' पंत, काळजी असली ह्मणजे लग्नच करावें असें कोठें आहे ? शिवाय ती बेगम, साधू. तिला प्रपंचाचा तिटकारा. ती कसें लग्न लावील ? आणि तिच्या इच्छेविरुद्ध करणें मला तरी कसें आवडेल ? '

' खानसाहेब ! माझें पण एकच बोलणें. मला आमिना द्याल तर मी वाटेल तें करावयास सिद्ध आहे ! ' धोंडोपंत, तुह्माला वेड तर नाहीं लागलें ? तुमचें व तिचें वय कां आतां लग्न करण्यासारखें आहे ? तशांत ती ईशसेवेला लागली. संसारांत तिचें मुळींच लक्ष नाहीं. ती संसाराविषयीं उदासीन, आणि तुह्मी संसार सुख भोगेच्छू ही सांगड कशी काय चालणार ? तुह्मांला लागतील तर एकच काय पण छपन्न तरुणी मिळवून देतों. हौसच असेल तर आमच्या जातींतील— '

' मग मला नसत्या कां मिळवतां आल्या ? एक आमिना मला द्याल तर मी तुमचें वाटेल तें ऐकत जाईन ! '

' पहा बुवा तिला विचारून ! ती कबूल झाली, तर माझी कांहीं आड-काठी नाहीं ! '

' बस् बस् मला तेंच पाहिजे. ' धोंडोपंत आनंदून जाऊन ह्मणाले. आतां आमिना काय ? एक शब्द बोलण्याचा उशीर कीं झालीच वश. तिला भावाचेंच भय वाटत आहे. पण भावाची परवानगी मिळाली असें तिला सांगितलें कीं आटोपलें. असें वाटून धोंडोपंत सहर्ष झाले. हुसेन ह्मणाला, ' मग आतां सांगितल्याप्रमाणें कराच ! आतां रात्र झाली आहे. उद्यां सकाळीं सूर्योदयीं निघा. ' इतकें सांगितल्यावर दोन घटका त्यांचें कांहीं कुजबुजणें चाललें होतें. मग त्यानें धोंडोपंतांची व्यवस्था करावयास कारकुनास हांक मारून सांगितलें. धोंडोपंत कारकुना-मागून गेले. प्रिय वाचक ! हुसेनच्या बोलण्यांत किती धरसोड होती ! इंदिरेच्या पत्राबद्दल, आमिनेच्या कळकळीबद्दल हुसेननें सर्वस्वी खोटें सांगि-तलें. पण धोंडोपंतांच्या तें लक्षांत आलें नाहीं !

दुसऱ्या दिवशीं सूर्योदयीं धोंडोपंत निघाले. हुसेननें त्यांच्याबरोबर आपले शंभर लोक दिले. असें करण्यांत त्याचा असा हेतू होता कीं, इदिरेला पहातांच धोंडापंतांचें मन चळलें, आणि त्यांनीं सांगण्याप्रमाणें न केलें, तर आपल्या लोकांनीं तिला पळवून आणावें ! त्यानें धोंडोपंतांस 'आतां दगा कराल तर विचार करा; कठिण जाईल;' अशी जातेवेळीं धमकावणी (सभ्य शब्दांत) दिली. धोंडोपंतांनीं त्याला विचारिलें, 'तिचीच जर तुमच्याकडे येण्याची इच्छा आहे, तर तिला तुमचें नाव सांगावयास काय हरकत आहे ? मीहि साह्य झालों ह्मणून तिला आनंद होईल !'

'छे छे. तिला आनंद होण्यासाठीं कां तुह्मी इकडे आणीत आहांत ? तिला दुःखच झालें पाहिजे. शिवाय, तुह्मी माझें नांव सांगितलेंत कीं, तिला वाटेल कीं हा मुराररावांचा उजवा हात व माझा द्वेष्टा! हा हुसेनचें नांव करून मुराररावाकडे नेऊन माझी फजिती करील. आणि ह्मणून ती येणारच नाहीं !'

'बरें बोवा तुह्मी सांगतां तसें !' धोंडोपंत दुर्बलतेनें ह्मणाले.

प्रकरण ६ वें.

गडावरून प्रयाण.

धोंडोपंत निघाल्यावर तीन दिवसांनीं गडावर पोंहोंचले. गेले त्या दिवशीं ते कांहींच बोलले नाहींत. इंदिरेला पाहिलें कीं, त्यांच्या तळव्याची आग मस्तकाला जाई. अशा सौंदर्यवती स्त्रीच्या पोटांत इतकें जहर कालकूट भरलेलें असावें ह्याचें त्यांस फार आश्चर्य वाटे. इदिरेबद्दल त्यांना येवढिशी कळकळ नव्हती. पण मुराररावांबद्दल बरीक त्यांस कींव येऊन खेद वाटे. पण ते मनाची अशी समजूत करीत कीं, मुरारराव मरणार ते कां आपल्या इच्छेनें मरणार आहेत थोडेच ? तें त्यांच्या कर्मावर आहे. इंदिरा तर खानसाहेबांवर अनुरक्त आहेच ! अशी दुष्ट स्त्री मुराररावाला तरी कशाला पाहिजे ? अर्थात् इंदिरेला आपण नेणार ह्यांत कांहीं पाप नाहीं. असें त्यांना वाटूं लागलें.

दुसऱ्या दिवशीं धोंडोपंतांनीं इंदिरेस आणि तिच्या मातापित्यांस बातमी

कळविली. ते ह्मणाले, ' मुरारराव नंदुरबारच्या अलीकडे एकदोन मजलीवर होते; तेव्हां नगरास परत येण्याचा त्यांना बादशहाकडून हुकूम झाल्यामुळें ते परभारें अहंमदनगरास गेले. ज्यादिवशीं मी तेथें गेलों, त्याच दिवशीं ते आले. मी परत येणार नव्हतों. पण त्यांनीं मला तिच्यावांचून करमत नाहीं, असें ह्मटल्यामुळें आणि येथें आमचे शें, दिडशें लोक आहेत त्यांसही न्याव-याचें असल्यामुळें, मी इंदिरेस न्यावयास आलों आहे, उद्यांच निघावें. हें बरें.'

' ठीक आहे. उद्याच निघावें. जांवईबोवाजवळ तरी कोणी नाहींच. इंदिरा जाईल तेंच बरें. ' असें ह्मणून जिवाजीपंतांनीं इंदिरेची जाण्याची तयारी करण्यास आपल्या पत्नीला सांगितलें.

धोंडोपंत आल्यापासून आपल्याकडे अगदीं तिरस्कार दृष्टीनें पहात आहेत, हें त्या चाणाक्ष मुलीच्या लक्ष्यांत पहिल्यांदाच आलें. पण असें कां व्हावें, ह्याचा तिला तर्कही होईना ! बरें, तें कोणांस सांगावें, तर जवळ तरी कोण आहे ? तिची मैत्रीण कमला तर आदल्यादिवशींच सासरीं गेली होती ! आईला तिनें एकदां ती गोष्ट सांगितली, तेव्हां ती ह्मातारी इंदिरेच्या पाठी-वरून हात फिरवून ह्मणाली, ' बाळ, कोणी कसें कां असेना ! तूं कोणां-कडे लक्ष्यच देऊं नकोस. तुझ्या आराध्य मूर्तीची सेवा कर ह्मणजे झालें. धोंडोपंत आले आहेत लांबून प्रवास करून, ह्मणून त्रासले असतील झालें. दुसरें काय ! ' भोळीभाबडी बिचारी ह्मातारी ! तिला इंदिरेचें मनोगत काय कळणार ? आणि इंदिरा तरी पुढें काय बोलणार ? मी येथें येईन आणि तुला घेऊन जाईन असें सांगणें झालें. आणि आतां अहंमदनगरीं कसें बोलावणें झालें ? बरें बोलाविलें असलें तरी धोंडोपंतांची चर्या अशी कां दिसते ? त्या हुसेनशीं वजिरीबद्दल बरोबरी लागली आहे. त्यानें तर द्वेषानें ह्यांचे कान फुंकले नाहींत ना ? शिवाय धोंडोपंत आपल्या बरोबर आणखी शंभर पाउणशें लोक घेऊन कशाला आले ? इत्यादि विचार तिच्या मनांत आले. ' कांहीं असो. आई भवानी, तिकडचें रक्षण कर आणि त्या चरणांची मजकडून सेवा होऊं दे. ' अशी ती मनांत करुणा भाकूं लागली. सासरीं जावयाचें, असें कळलें ह्मणजे तिला मागें किती तरी आनंद होई. उल्हास वाटे. पण आतां तिला असें वाटूं लागलें कीं, मुरारराव स्वतः येतील, किंवा त्यांचें पत्र येईल, तरच जावें. धोंडोपंतांच्या सांगण्यावर जाऊं

नये. तिनें जिवाजीपंतांसही आपलें वाटणें तुटक तुटक सांगितलें. तेव्हां ते हंसत ह्मणाले ' पोरीला कितीही शिकवा सवरा. त्या आपल्या स्वभावावर जावयाच ! इंदिरे, तूं येवढी शहाणी ! तरी देखील सासरीं जावयास कुरकुरावेंस ? मग बिचाऱ्या सातसात आठआठ वर्षांच्या पोरी, माहेरीं यथेच्छ खेळायहंसायला मिळतें, आई लाडानें बोलतें, भाऊ कौतुक करितात, तें सोडून सासरीं जाण्यास खळखळ करतात, त्यांत त्यास तरी कसा दोष द्यावा ? आईबापांनीं कठोर मन करून, आपल्या हातांनीं त्यांना मारीत बाहेर काढल्याखेरीज, त्या बिचाऱ्या सुखानें सासरीं जात नाहींत; तसें तुला करावयाचें आहे कीं काय ? जा. जा. बेटा. आह्मांला सोडून जावयाचें, ह्मणून तुला वाईट वाटतें; दुसरें काय ? पण मुरारराव भेटले, ह्मणजे नाहीं आमची आठवण होणार बरें ! अग, मुलीला केवळ जन्म देणारे आई बाप ! ती मुलगी वास्तविक त्यांची नसते. दुसऱ्यांचीच ती असते. आणि तिचा सासरकडे ज्यास्त ओढा असावा. हेंच इष्ट ! ' हें वाक्पांडित्य ऐकून इंदिरा बिचारी दूर गेली ! जिवाजीपंत ! मुलीची अशा तऱ्हेनें समजूत घालण्याचा प्रयत्न करण्यांत तुम्ही किती तरी चुकत आहांत बरें ! आजपर्यंत सासरीं जातांना, तिनें असें कां बरें कधीं ह्मटलें नाहीं ? छेः, ती मुलगी तशांतली नव्हे. पण तुह्मांला तरी तिच्या भिडस्त अंतःकरणांत काय चलबिचल आहे, हें कसें कळणार !

इंदिरा गडावरील जगदंबेच्या देवालयांत गेली. आणि त्या सप्तशृंगनिवासिनी, भक्तरक्षिणी, जगदंबेच्या सुप्रसन्न मुखकमलाकडे पहात ती बराच वेळ उभी राहिली. अतिशय दुःख किंवा आनंद झाला, ह्मणजे मनुष्याला ग्लानी येते त्याप्रमाणें इंदिराही त्या देवळाच्या भिंतीला टेंकून बसली असतां तिला ग्लानी आली. शीत वायूच्या मंद मंद लहरी तिच्या शरीरास स्पर्श करीत होत्या. त्यामुळें तिचा किंचित् डोळा लागला तेव्हां जगदंबेनें आपल्या मस्तकावर वरदहस्त ठेविला आहे, असें तिला स्वप्नांत दिसलें. ती जागी झाली. अंबिकेच्या चरणांवर मस्तक ठेवून व तिला अनन्य भावानें आळवून ती घरीं परत आली. तों दाराशीं एक स्वार तिला आढळला. तो तिच्या ओळखीचा होता. त्यानें तिला लवून मुजरा केला. ' कोणीकडून आलास ? ' असें तिनें विचारल्यावर तो ह्मणाला, ' मी धनीसाहेबांकडून

पत्र घेऊन आलों. कारभाऱ्यांजवळ (धोंडोपंतांजवळ) दिलें आहे. ' ' पण तूं आलास कोण गांवाहून ? '

' जी. नंदूरबारच्या अलीकडे शिंदवड ह्मणून खेडें आहे. तेथून आलों. स्वारी गेली असेल आतां नंदूरबारीं. ' इंदिरेच्या पोटांत धस्स झालें. धोंडोपंत सपशेल खोटें बोलले. त्यांचा माझा घात करण्याचा बेत होता खास ! आतां ते जरी नाकबूल गेले, तरी तिकडचें पत्र दाखवून त्यांस निरुत्तर करितां येईल. जिवावरील संकट टळलें. असा आनंद वाटून ती घरांत गेली. धोंडोपंताजवळ पत्राचा तिनें खुलासा केला. तों ' स्वाराजवळून पत्र घेऊन घरांत येत असतां, तें कोठें तरी पडलें बुवा ' असें त्यांनीं सांगितलें. आणि ते तेथेंच इकडे तिकडे पत्र शोधूं लागले. तें पत्र ते धुंडीत आहेत, तोंपर्यंत त्याबद्दल थोडी ज्यास्त माहिती झाली असतां धोंडोपंतांच्या पुढील कृतीचा वाचकांना चांगला विचार करितां येईल.

मुरारराव इंदिरेचा निरोप घेऊन गेले. तेथून दरकूच दरमजल करीत ते नंदूरबारपर्यंत गेले. तेथून त्यांनीं गडावर दोन पत्रें पाठविलीं. एक इंदिरेस असून त्यांत प्रणयविनोद लिहिला होता. इंदिरेला नीतिशुद्ध राहण्याला उत्तेजन येईल, अशीही त्यांत लिहिण्याची योजना केलेली होती. दुसरें पत्र धोंडोपंतांस लिहिलें असून, त्यांत स्वारीचें सगळें वर्तमान कळविलें होतें. हीं पत्रें वाचून धोंडोपंतांचें धाबें दणाणलें. व त्यांनीं त्या पत्रांचे तुकडे करून, ते आपल्या आतल्या बंडीच्या खिशांत ठेविले. अर्थात् पत्र हरवलें ह्मणून त्यांनीं जें इंदिरेला ह्मटलें, तें निव्वळ ढोंग होतें.

इंदिरेला धोंडोपंतांच्या ह्या वर्तनाचें फार आश्चर्य वाटलें. व तिचा त्यांच्या वरील संशय दुणावला. धोंडोपंतांस पत्र कोठेंही सांपडेना. इंदिरा स्तब्ध उभी होती. एखादा माणूस अत्यवस्थ अजारी असतां, त्याच्या जिव्हाळ्याच्या माणसांनीं चाकराला एखादें औषध आणावयास सांगावें, आणि त्या चाकरानें रेंगाळत चालूं लागावें; ह्मणजे त्या माणसाला त्याचा जसा संताप येतो, तसा इंदिरेला ह्यावेळीं धोंडोपंतांचा राग आला. तिकडून पत्र आणणारा स्वार ह्मणतो कीं, स्वारी मोहिमेवरच आहे; आणि धोंडोपंत ह्मणतात अहंमदनगरीं आहे. मग खरी बातमी काय ? पत्रावरून सर्व उलगडा झाला असतां, तर तेंही सांपडत नाहीं. पत्र आलें व तें घेतलें ह्मणून धोंडोपंत

कबूल करितात. पण तें पडलें ह्मणावें तर सांपडत कसें नाहीं ? येथें कांहीं मुलेंबाळें नाहींत कीं, पत्र उचलतील. असा विचार मनांत येऊन तिला धोंडोपंतांचाच संशय ज्यास्त आला. तिच्या मनांत आलें, कीं एकदां आपलें जाज्वल्यरूप प्रगट करून धोंडोपंतास खरें काय आहे ते विचारावें; पण तिचा जीव होईना. शेवटीं ती चाचपत चाचपत धोंडोपंतांस ह्मणाली, 'तिकडूनच आलें आहेना पत्र ? त्यांत खुशाली लिहिली आहे कीं नाहीं ?' हे शेवटचे शब्द तिच्याकडून आपोआप जरा खेंचून उच्चारिले गेले. तेव्हां चिडून धोंडोपंत एकदम ह्मणाले, 'आतां त्यांची खुशाली मी स्वतः पाहून आलों ना ? पत्र हरवलें, त्यांत कांहीं तोटा नाहीं. त्या पत्राचा मला असा राग आला आहे! तें हुसेन महंमदकडून— थांब; पण मी त्या गुलामाकडूनच सर्व हकीकत काढितों !' असें ह्मणून धोंडोपंत तडक उठलेच. ते बाहेर गेले. आणि रागाचा आविर्भाव करून त्या स्वाराचा त्यांनीं हात धरिला. आणि त्याच्यावर खेंकसून ह्मणाले, 'चल— चल पाहूं. मला सगळें खरें सांगशील तरच सुटशील.' असें ह्मणून ते त्याला ओढीत घेऊन चालले. तो स्वार बिचारा 'अहो, पण मी येतों; मला असें ओढतां कां ?' असें ह्मणतच होता. धोंडोपंतांस धक्का मारून, दूर करण्याची त्याला छाती होईना ! इंदिरा धोंडोपंतांच्या ह्या चमत्कारिक वागण्याचा विचार करीत दारांत उभी होती. ते दोघे दिसेनासे झाल्यावर ती हें वृत्त आपल्या वडिलांस सांगावयास घरांत गेली. इकडे धोंडोपंतांनीं त्या स्वारास एका मोठ्या झाडाआड नेलें व ह्मणाले, 'हें पहा तुकाराम! ह्या इंदिरेला अहंमदनगरीं बादशहानें राणी होण्यास बोलाविलें आहे राणी. पण ही तशी येणार नाहीं ह्मणून मुरारराव नगरास आले आहेत; त्यांनीं तुला बोलाविलें आहे; असें मीं तिला सांगितलें आहे. तूंही आतां असें सांग कीं 'मुरारराव आतां नगरासच असतील. ते परत जाणार होते. पण जायखेड्यास माझें सासर आहे; तेथें मी कांहीं दिवस राहिलों; त्यामुळें तें माझ्या स्मरणांतच राहिलें नाहीं !' अरे, इंदिरा राणी झाली तर मुराररावांचें काय वाईट होणार आहे ? उलट त्यांचा उत्कर्षच होईल. तुझ्यापेक्षां माझी त्यांच्यावर भक्ति ज्यास्त आहे. मुराररावांला काय ? इंदिरा नसली तर इंदिरेची आई दुसरी ! बायकांला काय तोटा गेला आहे ! यःकश्चित इंदिरेकरितां आपण आपल्या

धन्याचें व आपलें हित होत असलें तर सोडून द्यावें. पहा मी सांगितल्याप्रमाणें बोलशील तर आठशें मोहरा मोजून तुझ्या पदरांत टाकतों ! !'

तुकाराम आश्चर्य, खेद आणि संताप ह्यांनीं व्याप्त झाला. हे बोलतात हे धोंडोपंतच आहेत, कीं दुसरें कोणी आहे, ह्याचा त्याला संशय येऊं लागला. मनुष्याच्या नीचपणाची इतकी कमाल झालेली त्यानें आजच पाहिली. मुराररावांस न कळतां इंदिरेला बादशहाच्या जनानखान्यांत नेऊन, हा नराधम त्यांचें हित करावयास पहातो, ह्याचें त्याला अत्यंत आश्चर्य वाटलें. पण शेवटीं आठशें मोहरांची गोष्ट आली, तेव्हां मात्र तो घोंटाळला. त्याची स्वार्थबुद्धी त्याला तें नीच काम कर, ह्मणून सांगत होती. आणि त्याची सदसद्विवेकबुद्धी प्राण गेला तरी तें नीच कृत्य करूं नको, ह्मणून सांगत होती. साधारणपणें असें आढळून येतें कीं, मनुष्य एकदां विकारवश झाला ह्मणजे त्याच्या सदसद्विवेक बुद्धीची सतत टोंचणी असतांही असत्कर्म करावयास तो प्रवृत्त होतो. आणि तसें प्रवृत्त न होणें ह्यालाच आत्मसंयमन ह्मणावयाचें ! हें आत्मसंयमन फारच थोड्यांच्या ठिकाणीं असतें. तुकारामाच्या मनांत ही स्वार्थबुद्धी जागृत झाली. आठशें मोहरा मिळाल्या तर जन्मभर बायकांपोरांत सुखानें रहातां येईल, असें त्याला वाटूं लागलें. पण शेवटीं त्याच्या सदसद्विवेक बुद्धीचाच जय झाला. आपण तिऱ्हाईत ! मालक ह्या नात्याची गोष्ट सोडून दिली, तरी पण द्रव्यलोभानें आपण दुसऱ्याला उगीच काय ह्मणून संकटांत लोटावें ? आणि तें द्रव्य तरी काय मला पचणार आहे ? आठशें मोहरा घेऊन, आज ह्यांचें एक काम केलें कीं, उद्यां दुसरें कांम सांगावयास हे उरावर आहेतच ! आणि कांहीं झालें तरी मुरारराव आपले मालक ! त्यांनीं आजपर्यंत आपलें काय वाईट केलें ? काळ्याचे पांढरे होईपर्यंत ह्यांच्या अन्नावर वाढलों आणि ह्यांची इमानानें सेवा केली. तीवर ह्या द्रव्याकरितां पाणी सोडून, आपण आपल्या नांवाला बट्टा कां लावावा ? उगीच एका प्रेमळ जोडप्याच्या सुखांत माती कालविण्यांत काय अर्थ आहे ? इंदिरा केवळ देवताच. किती मोकळ्या मनाची, शहाणी, सुंदर आणि तशीच पतिव्रता. तिला यवनाच्या हातीं देऊन हा दुष्ट तिच्या व मुराररावांच्या जन्माचें मातेरें करीत आहे ! मुराररावांस बायका पुष्कळ

मिळतील; पण एका इंदिरेवर जें आमच्या धनीसाहेबांचें प्रेम जडलें आहे, तें कां इतर पुष्कळ बायकांवर राहील ? आपण तर साफ खोटें बोलणार नाहीं. इतकेंच नाहीं; पण इंदिराबाईसाहेबांस हें सर्व सांगून देऊं. असा पक्का विचार करून तुकाराम ह्मणाला, ' पंत, तुह्मांला बोलायला कांहीं वाटत नाहीं ? मुराररावांच्या मागें असल्या गोष्टी करितां ? मी तर साफ सांगतों कीं, आठशें काय पण आठ कोट मोहरा जरी मला दिल्या, तरी असलें महा नीच काम मीं कधींहि करणार नाहीं ! व तुह्मांलाही सांगतों कीं मुराररावांस विचारल्याखेरीज तुह्मी असें करूं नका. '

मोहरांचें नांव घेतांच तुकाराम कबूल होईल, असें धोंडोपतांस वाटलें. पण त्यानें तेंही झिडकारलेलें पाहून, आतां काय करावें असा त्यांना विचार पडला. थोड्याच अंतरावर हुसेनच्या घरच्या लोकांपैकीं पांच सहा लोक चालले होते त्यांस त्यांनीं जवळ बोलाविलें. हें पाहून तुकाराम पळून जाऊं लागला पण त्याला धोंडोपंतांनीं बळकट धरून ठेविलें तरी ते लोक जवळ येत आहेत असें पाहतांच तुकारामानें धोंडोपंतांच्या नाकावर बुक्की मारली व तो पळाला. धोंडोपंतांच्या सांगण्यावरून आलेल्या माणसांनीं धांवाधांव करून तुकारामाचा पुष्कळ शोध केला; पण तो सांपडला नाहीं !

नंतर धोंडोपंत घरांत गेले. जिवाजीपंतांस इंदिरेनें धोंडोपंतांची ही वर्तणूक कळविली होती. ह्मणून ते धोंडोपंतास काय घोंटाळा आहे ह्मणून विचारण्यासाठीं निघालेच होते; इतक्यांत धोंडोपंत आले. त्यांना विचारलें तेव्हां ते ह्मणाले. ' आतां जो स्वार आला होता, हा नुकतांच मुराररावांची नौकरी सोडून हुसेनच्या घरीं चाकरीस राहिला आहे. इंदिरा आधीं आली, ह्मणून तिला ही गोष्ट माहित नाहीं. तें पत्र हुसेननेंच मुराररावांच्या सहीनें लिहिलें असून, ' अहंमदनगरीं ये ' असा त्यांत मजकूर आहे—नव्हे होता. हुसेनचे पांच पन्नास लोक वाटेंत लपून बसले होते. ते आतां सगळे हांकून दिले आहेत. मुरारराव इंदिरेची वाट पहात आहेत. तेव्हां उद्यां निघावें हें बरें. मग ह्यावर तुमचें तुह्मी पहा. मी तर उद्यां निघणार ! '

' मग आमची तयारी आहेच. जा उद्यां तिला घेऊन. ' जिवाजीपंत ह्मणाले. इंदिरेला काय करावें हें सुचेना. आलेला स्वार तर तिकडच्या विश्वासांतील. मग त्याचें ह्मणणें खरें कीं, धोंडोपंतांचें ? धोंडोपंतांस जर खोटें ह्मणावें, तर

तेंही बरोबर दिसत नाहीं. तो स्वार तरी हुसेनच्या नौकरीला राहिला नसेल कशावरून ? असें एकदां तिला वाटे; तोंच पुन्हां, तो स्वार हुसेनच्या नौकरीला राहिला, हें तरी खरें कशावरून ? आणि धोंडोपंतास जर त्याच्याकडून हें कबूल करून घ्यावयाचें होतें, तर त्यांनीं त्याला असा दूर कां नेला ? असेंही वाटे. सारांश, तिला कांहींच ठरवितां येईना. डोक्यांत विचार मात्र पुष्कळ येत होते. तिला ' मी सासरीं जात नाहीं असें स्पष्ट सांगावें ! ' असेंही पुष्कळदां वाटलें. पण आपल्याला बाबा काय ह्मणतील ? आई काय ह्मणेल ? बाबांना तर इतकें शिकवूनही, मी असें करितें, ह्याचें अतोनात वाईट वाटेल. शिवाय स्वारी जर अहंमदनगरीं असली, तर हा आपला मूर्खपणाच होणार आहे. असें वाटून तिनें स्वतःचा धिःकार केला. शेवटीं आपली वडील माणसें सांगतील तसें वागायचें असें तिनें ठरविलें.

रात्र झाली. आतां तीनसाडेतीन प्रहर गेले कीं, इंदिरेला निघावयाचें. मुराररावांसारख्या थोर सरदाराची ती आवडती पत्नी आणि जिवाजीपंतांसारख्या नाणावलेल्या सुभेदाराची ती कन्या. तिची तयारी करावयाची ह्मणजे बराच वेळ पाहिजे. खाण्यापिण्याचे जिन्नस करून द्यावयाचे, जावयास उत्तम उत्तम वस्तु पाठवावयाच्या, त्या काढून ठेवावयाच्या, वगैरे कारणांस्तव इंदिरेच्या आईला देखरेख ठेवितां ठेवितां अर्धी रात्र झाली. इंदिराही शून्य मनानें एका ठिकाणीं बसून राहिली होती. तिला तिच्या मातेनें कितीतरी सांगितलें कीं ' नीज आतां. पुन्हां उद्यां प्रवासाचा शीण होईल; करितां आज विश्रांती घे. ' पण इंदिरेनें तें ऐकल्या न ऐकल्यासारखेंच केलें. शेवटीं आई जेव्हां रागावली, तेव्हां इंदिरा एकदांची अंथरुणावर पडली. पण तिला झोंप येईना. साधारण असें आहे कीं, आपलें पुढें वाईट होणार कीं चांगलें होणार, आपलें काम सिद्धीस जाणार कीं न जाणार, वगैरे भविष्यकाळच्या गोष्टी, अंधुक अंधुक अशा, आपल्या मनाला आधींच कळतात. ह्यालाच मनोदेवता असें ह्मणतात. ह्या मनोदेवता जागृत असतात ह्मणूनच पुष्कळ माणसें साहसाचीं कामें करून जातात. कारण अमक्या तऱ्हेनें वागलें तर इष्ट कामांत हटकून यश येणार, असें त्यांची मनोदेवता त्यांस सांगत असते. इंदिरेची मनोदेवता तिला असें सांगू लागली कीं, पुढें कांहीं तरी संकट येणार.

तिनें स्वतःची पुष्कळ समजूत केली. एवढेंच नव्हे तर, आपल्या आवडत्या माणसाकडे (मुरारराबांकडे) जावयाचें त्यांत वाईट काय ह्मणून वाटून ध्यावें ? असा तिनें आपल्या मनास दोष दिला. पण छे; तिची तळमळ जाईना; शेवटीं ती उठलीच. कांहीं वेळ विचार केल्यावर, तिनें कमलेला एक पत्र लिहिलें. त्यांत सर्व हकीकत सविस्तर लिहून, ‘ धोंडोपंतांची चर्या ठीक दिसत नाहीं. आपल्या शत्रूचे हाल होत असतां, एखाद्याला मनांत जसा क्रोधपूर्ण आनंद होतो, आणि ‘ कसा पण सूड उगविला ! ’ असें दर्शविणारी जशी त्याची चर्या असते, तशी मला धोंडोपंतांची दिसत आहे ! माझी जाण्याची तयारी झाली. थोड्यावेळानें मी निघेनही. पण मला उल्हास वाटत नाहीं. खाटीक गाय वधस्थळीं घेऊन चालला ह्मणजे तिला काय वाटत असेल ह्याची मला आतां अगदीं बरोबर कल्पना येत आहे. शंकरभावजींस हें पत्र दाखीव आणि तुमचा उभयतांचा काय बेत ठरेल तसें करा. अधिक काय सांगूं. भावजींना नमस्कार. ’ असा त्यांत मजकूर होता. हें पत्र बंद करून जिवाजीपंतास उठविलें आणि एका स्वारा करवीं तें सातान्यास कमलेकडे रवाना करावयास सांगितलें. मजकूर माहीत नसल्यामुळें जिवाजीपंतास तिचें हें करणें अगदीं वेडेपणाचें वाटलें. पण कन्या प्रेमामुळें त्यांनीं एका स्वाराजवळ पत्र देऊन, त्या तश्शा रात्रीं त्याला सातान्यास दवडिलें.

रात्र संपली. पूर्वेकडे आकाश सुवर्णवर्णी झालें. पक्षी उडूं लागले. हिंस्रश्वापदें झाडींत व गुहांत दडालीं, गुरें चरावयास निघालीं, लोक उठून प्रातर्विधी करूं लागले. इंदिरेस नुक्तीच झोंप लागली होती; तोंच तिला तिच्या मातेनें उठविलें. तिनें उठून प्रातःकालीन कृत्यें उरकलीं. रोज गडावरील रम्य देखावा पाहून तिचें हृदय आनंदानें उचंबळत असे. पण आज सर्व शून्य. तिच्या मुखावर खिन्नतेची दाट छाया दिसत होती. खिन्न मनानें आपल्या आईबापांबरोबर ती जगदंबेच्या मंदिरांत गेली. तल्लीन मनानें तिनें त्या जगज्जननीस आळविलें. नंतर ते गड उतरूं लागले. मुराररावांनीं धोंडोपंतांच्या हातांखालीं ठेविलेले दीडशें आणि हुसेननें अहंमदनगराहून धाडलेले शंभर लोक पुढें चालूं लागले. इंदिरेचे आईबाप तिला गडाच्या पायथ्यापर्यंत पोंचविण्यास गेले. पायथ्याशीं गेल्यावर इंदिरेनें त्या दोघांच्या चरणांवर मस्तक ठेविलें. सद्गदित अंतःकरणानें ती त्यांच्याकडे पाहूं लागली. ह्यांचें पुनः कधीं दर्शन होईल कीं नाहीं कोण

जाणें, असें तिला त्या वेळीं वाटलें. ' आई, बाबा, जातें बरें! ही भेट—' असें ह्मणून ती रुदन करूं लागली. बिचारी लक्ष्मीबाई मोहानें व्याप्त होऊन ती इंदिरेला कवटाळून अश्रु ढाळूं लागली. शेवटीं जिवाजीपंतांनीं,' बेटा, जा. असें वाईट कां वाटून घ्यावें '? खुशाली कळवीत जा. ' असें ह्मटल्यावर इंदिरेनें आईची मिठी सोडली व ती मेण्यांत जाऊन बसली. जिवाजीपंतांचे चाकर गडी आले होते, ते इंदिरेला ' ताईसाहेब, आह्मां गरिबांची आठवण ठेवा बरें कां! ' असें मोठ्या भक्तीनें ह्मणाले. इंदिरा स्मित हास्य करून ह्मणाली, ' आईला, बाबांना माझ्या ठिकाणीं तुह्मीच आहांत. त्यांना माझी आठवण होऊं देऊं नकां! ' त्या भिल्लकोळी वगैरे इमानी लोकांस तिच्या ह्या सांगण्याचा फार अभिमान वाटला. धोंडोपंतांनीं जिवाजीपंताचा निरोप घेतला. भोयांनीं मेणा उचलिला. इतकावेळ इंदिरेच्या पाठीवर हात ठेवून तिच्याकडे एकसारखी पाहत असलेली लक्ष्मीबाई मोठ्या कष्टानें मागें सरली, आणि धोंडोपंतांस, ' आह्मां दोघांच्या ठिकाणीं इंदिरेला तुह्मी अहांत, ' असें कळवळून ह्मणाली. धोंडोपंतही ह्मणाले, ' तुह्मी मुळींच कांहीं काळजी करूं नका! ' मेण्याच्या मागें पुढें लोक चालूं लागले. धोंडोपंतही घोड्यावर बसून मेण्याबरोबर चालूं लागले. इंदिरेचे आईबाप व त्यांचीं गडी माणसें मागें परतलीं. वर जाईपर्यंत इंदिरेच्या गुणवर्णना शिवाय त्यांना दुसरा विषयच सुचला नाहीं.

* * *

येथें हेंही सांगितलें पाहिजे कीं, मुराररावांनीं दिलेल्या आपल्या हाताखालील लोकांस धोंडोपंतांनीं ' मुरारराव अहंमदनगरीं आले आहेत, ह्मणून इंदिरेसह आपणांस त्यांनीं तेथें बोलाविलें आहे. ' असेंच सांगितलें. कारण त्या लोकांची मुराररावांवरील भक्ती त्यांना माहित होती. हुसेनकडून आलेल्या लोकांसही ' आह्मी नुकतेच मुराररावच्या नौकरिला राहिलों आहोंत त्यांच्या हुकमानेंच आह्मी येथें आलों; असें सांगण्याबद्दल त्यांनीं पढवून ठेविलें होतेंच. त्यामुळें मुराररावांच्या लोकांस संशय येण्यास जागाच राहिली नाहीं.

प्रणरण ७ वें.

वाटेंत !

इंदिरेच्या मेण्याबरोबर चाललेले लोक मुकाटयानें चालले होते. कोणी कोणाशीं बोलत नव्हतें इतक्यांत दोन तीन भिल्ल घेऊन तुकाराम थेट मेण्याजवळ आला, आणि ओरडून ह्मणाला, ' बाईसाहेब ! हा नराधम तुह्मांला बादशहाकडे नेत आहे. मी धनीसाहेबांकडून आलों ह्यांत रतिमात्र खोटें नाहीं. ते अहंमदनगरीं मुळींच नाहींत ' असें ह्मणून तो आपल्या सोबत्यांसह दूर पळाला, आणि तेथून पुन्हां ओरडून ह्मणाला, अरे भिकारडयाच्या पोरा धोंडया ! खायला मिळत नव्हतें ह्मणून तुला बाबासाहेबांनीं (साबाजी पंतांनीं) जवळ ठेविलें आणि आतां त्यांच्या पोरावर उलटतोस काय ? थांब लेका. तूं जातोस कोठें ? अजून तरी मेणा मागें परतव नाहींतर विचार कर. ' असें ह्मणून तुकाराम व त्याचे सवंगडी एका क्षणांत झाडींत दिसेनासे झाले. त्यामुळें धोंडोपंतांच्या हुकमावरून जे कांहीं स्वार त्यांना पकडावयास गेले, त्यांना चुंबत परत यावें लागलें.

मुराररावांच्या लोकांचा तुकाराम ओळखीचा असल्यामुळें, त्यांना त्याचें ह्मणणें खरें वाटून, ' आह्मी तर येत नाहींच. व मेणाही पुढें जाऊं देत नाहीं ! ' अशी त्यांनीं धोंडोपंतांस धमकी घातली. तेव्हां धोंडोपंतांनीं व हुसेनच्याही कांहीं लोकांनीं दादा बाबा करून, आणा शपथा वाहून, ' तुकाराम हुसेनच्या नौकरिला राहिला आहे, त्याच्या मनांत मुराररावांचें नांव करून इंदिरला हुसेनकडे न्यावयाचें आहे ! ' अशी त्यांची महत्प्रयासानें समजूत घातली तेव्हां पुन्हां पहिल्यासारखें सर्व शांत झालें. मात्र धोंडोपंतांनीं युक्तीनें मुराररावांच्या लोकांस मेण्यापासून बरेंच दूर केलें.

तुकाराम हातचा सुटला, हें पाहून धोंडोपंतांस ज्यास्तच धास्ती बसली. हा जाऊन मुराररावांस आपलें कारस्थान कळवील, असें त्यांस वाटलें. कदाचित् जिवाजीपंतांजवळ ही गोष्ट सांगून, इंदिरेला परत गडावर नेण्यास तो त्यांचें मन वळवील. हा सर्व प्रदेश त्यांचाच असल्यामुळें हुसेनच्या शंभर पाऊणशें लोकांनीं लढून इंदिरेला पळविण्याचा यत्न केला, तरी तो व्यर्थ

होणार. आणि मग आपली छी, थू, होणार, असेंही त्यांच्या मनांत आलें. पण लागलेंच, जिवाजीपंत तुकारामापेक्षां आपल्यावरच अधिक विश्वास ठेवतील; त्याचें ऐकणार नाहींत, असें वाटून त्यांना धीर आला. गडावर आल्यापासून इंदिरेकडे ते इतक्या क्रुद्ध आणि तिरस्कृत दृष्टीनें पहात कीं, खरोखरच तिला त्याबद्दल अत्यंत वाईट वाटलें, आणि थोडीबहूत भीतिही वाटली. त्यामुळें तिजकडून न कळत कांहीं क्षुल्लक चुका झाल्या. त्यावरून धोंडोपंतांनीं असा तर्क केला कीं, इला मुराररावांकडे जाणें बरें वाटत नाहीं, ह्मणूनच ही इतकी बावरली आणि दुःखित झाली आहे असा विचार येतांच आपण करीत आहोंत तें योग्यच आहे असें त्यांस वाटलें. मात्र तुकाराम मुरारराबांकडे जाईल, ह्या धास्तीनें त्यांस कांहीं सुचेनासें झालें आणि मुरारराबांची व त्याची गांठ पडूं देऊं नकोस असें तें देवाला विनवूं लागले.

इंदिराही एकसारखा विचार करीत होती. धोंडोपंतांनीं तिकडून अहंमदनगरीं येणें झालें असें निक्षून सांगितलें. खोटें बोलत असतांना मनुष्य धिटाईनें जरी बोलत असला तरी त्याचा चेहरा त्याचें खरें मनोगत सांगतो. पण धोंडोपंतांच्या चेहऱ्यावरून त्यांचा कपट करण्याचा हेतू आहे, असें दिसलें नाहीं. (हुसेनच्या फुसलावणीनें धोंडोपंतांचें मन इतकें निर्दय बनलें होतें कीं, गडावर त्यांना ज्या खोटया गोष्टी कराव्या लागल्या त्या करितांना त्यांना कांहीं सुद्धां विधिनिषेध वाटला नाहीं व ह्मणूनच इंदिरेला त्यांचें मनोगत नक्की कळलें नाहीं.) किती केलें तरी धोंडोपंत आपल्या वडील नात्याचे ते आपलें अनहित कशाला करतील ? ते सांगतात त्याप्रमाणें तिकडचें नांव करून तुकारामाचा आपल्याला हुसेनकडे नेण्याचा हेतु खरोखर नसेल कशावरून ? व्यर्थ आपण धोंडोपंतांचा संशय घेतला असें तिला वाटलें आणि स्वारी अहंमदनगरीच असावी अशी खात्री होऊन तिला बराच उल्हास वाटला. एखाद्या विषयावर आपण विचार करूं लागलों तर विषयांतर होतां होतां शेवटीं आपण अगदीं निराळ्याच विषयावर विचार करीत आहोंत असें पुष्कळदां आढळून येतें. तसेंच इंदिरेचेंही कांहीं अशीं झालें. अहंमदनगरीं आपण आपल्या जीवितेश्वराकडे सुखरूप जाऊं; असे तिला वाटल्यावर आपल्या पत्रांतील मजकूर वाचून

घाबरलेली कमला तेथें येईल आणि आपली भीति व्यर्थ आहे, असें पाहून आपली खूप थट्टा करील असें तिला वाटलें. मग ती कमलेच्या मोकळे-पणाचें आणि विनोदी वृत्तीचें कौतुक करूं लागली. तें करितां करितां कम-लेच्या पतीचे—शंकररावांच्या—सौजन्य आणि मित्रप्रेम ह्याबद्दल तिच्या मनांत विचार आले. थोड्याच वेळानें मुराररावांच्या सद्गुणांबद्दल ती विचार करूं लागली. त्या विचारांत तिचें मन इतकें रंगलें कीं तिला मागचा पुढचा सर्व विसर पडला. अशा रीतीनें मुराररावांसंबंधीं विचार करितां करितां शेवटीं हल्लींच्या प्रकाराबद्दलचा विचार तिच्या मनांत आलाच. तिचे पुन्हां पूर्ववत् विचार सुरू झाले. तुकाराम आपल्याला आणि धोंडोपं-तास खऱ्या कळकळीनें आणि क्रोधानें सांगत आहे असें त्याच्या स्वरावरून तर दिसलें. त्याला तरी खोटें कशावरून ह्मणावें ? लोभ मोठा खराब आहे. बादशहानें न जाणो धोंडोपंतास कांहीं लालूच दाखविली असेल. त्यामुळें हे माझा—आणि माझ्याबरोबर तिकडच्या घात करण्यास प्रवृत्त झाले असतील. बादशहाच्या जनानखान्यांत जाऊन पडावें लागणार, हा विचार मनांत येतांच तिच्या पोटांत धस्स झालें ! फाशीची शिक्षा मिळालेल्या एखाद्या निरपराधी मनुष्यास फांसाजवळ घेऊन चाललें ह्मणजे त्याला जसें अपरिमित दुःख होतें, तसें त्यावेळीं तिला दुःख होऊं लागलें. धोंडोपंत तिच्याबरोबरच चालले होते; ते तिला निव्वळ काळासारखे भासूं लागले. ती क्रुद्ध मुखानें त्यांच्याकडे पाहूं लागली. तितक्यांत धोंडोपंतांचीही नजर तिच्याकडे गेली, त्याबरोबर तिनें तोंड फिरविलें; आणि ' धोंडोपंत ! कायहो ही तुमची निर्दयता ! ' असें मनांत ह्मणून ती मुळु मुळु रडूं लागली. तिचे अश्रूंनीं डवडवलेले नेत्र आणि भीषण मुद्रा पाहून, ' इला मुराररावांकडे जावयास नको आहे हेंच खास. ' असें त्यांच्या मठ्ठ डोक्यानें ठरविलें. ते एकंदर स्त्री जातीला दोष देऊं लागले. पण एकटी अमिना कायती त्यांच्या दोषांतून सुटली. ती एक देवताच आहे, असें त्यांना वाटलें.

इंदिरा हुसेनवर अनुरक्त तर आहेच, असें आतांपर्यंत तिचें जें वर्तन झालें त्यावरून आपली खात्री झालीच आहे. मग हळूं हळूं आपला हेतू तिला कळवून, तिचें दुःख कमी करण्यास काय हरकत आहे ? मात्र तिच्या मनांत मुराररावांकडे जावयाचें

नाहीं, इतकें तिच्या तोंडून प्रत्यक्ष ह्मणा, अप्रत्यक्ष ह्मणा, काढून घेतल्याशिवाय आपल्या हेतूचा तिला मागमूसही लागूं दिला नाहीं ह्मणजे झालें. असा पोक्त विचार करून, धोंडोपंत इंदिरेस किंचित् हंसून ह्मणाले, 'इंदिरे! हें काय मांडलें आहेस आज तूं ? मुराररावांकडे तुला जावेंसें वाटत नाहीं कां ? खरेंच सांग ?'

आतां मात्र इंदिरेच्यानें राहवेना. आतां सर्व खुलासा काढिलाच पाहिजे, असा विचार करून ती डोळे पुसून ह्मणाली, ' धोंडोपंत, खरेंच कां अहंमदनगरीं असायचें ? तो मेला तुक्या कांहीं भलतेंच सांगत होता तसा तर कांहीं प्रकार नाहींना ? तुह्मी तसें करणार नाहीं ह्मणा ! आह्मी उभयतां तुह्मांला लेंकरांसारखें आहोंत. आज मला चमत्कारिकच वाटत आहे. तुह्मी आल्यापासून माझ्यावर रागावलेले दिसत आहांत, मग तुह्मांला आमच्याबद्दल कोणीं काय सांगितलें असेल तें असो. आजपर्यंत आमच्याकडून तुमचे अपराध झाले असतील; नाहीं असें नाहीं. पण आह्मी अजून मुलेंच आहोंत. संसार कोठें नुकताच थाटला आहे. कसें वागावें तें आह्मांला पुरतें कळत नाहीं. ह्मणून मागच्या अपराधांबद्दल मनांत किंतु ठेवूं नका. येवढेंच माझें मागणें आहे. एकदां देवाला स्मरून आजचें खरें काय आहे, तें सांगा. ह्मणजे मला रुखरुख लागणार नाहीं. मी आनंदानें येईन !'

हें तिचें अनपेक्षित उत्तर ऐकून, आणि बोलतांना कींव आणणारी तिची मुद्रा पाहून, धोंडोपंत फार चकित झाले. आतांपर्यंत तिच्यासंबंधीं आपणांस जें वाटत होतें तें सगळ खोटें, असें त्यांचे त्यांनाच आतां वाटूं लागलें. हे दोघेजण स्वतःला आपलीं लेंकरें ह्मणवितात; आणि आपण त्यांचा गळा कापण्याला सिद्ध होतों, ह्याची त्यांना फार लाज वाटली. झालें, त्यांना वाटूं लागलें कीं, हुसेन आपलें पुढें काय करील त करो, पण इंदिरेला तर आतां परत फिरवावेंच गडावर. त्याप्रमाणें त्यांनीं उपक्रम केलाही. ' काय ग, इंदिरे, तुला हींव आलें वाटतें ? ' असं ते मोठ्यानें बोलले. त्यांत त्यांचा असा हेतु होता कीं, हुसेनचे लोक आले आहेत. त्यांना वाटावें कीं इंदिरेला हींव आलें आहे. तेव्हां धोंडोपंत ह्मणतात (ते पुढें ह्मणणारच होते) त्याप्रमाणें तिला गडावर जाऊं द्यावी. पण हुसेन

महावस्ताद ! धोंडोपंतांचें क्षणांत बदलणारें मन तो ओळखूनच होता. किती केलें तरी इंदिरा धोंडोपंतांच्या नात्याची. तिला आणते वेळीं त्यांना केव्हां तरी उपरती होणारच, हेंही हुसेन जाणून होता. ह्मणून त्यानें धोंडोपतांबरोबर आपले जे लोक दिले होते त्यावर मुबारीक नामक आपल्या अत्यंत विश्वासू चाकरास मुख्य केलें होतें. हुसेनला बरींच कामें करावयाचीं असल्यामुळें त्यानें एक नवीन सेवक-मंडळ निर्माण केलें होतें. ह्याची वाचकांस पुढें ओळख होणारच आहे. येथें इतकेंच सांगावयाचें कीं, ह्या मंडळांतील सेवक हुसेनचे विश्वासू, आज्ञाधारक आणि धन्यासाठीं प्राण देणारे, तसेंच चतुरही होते. त्यांतीलच मुबारीक होता. त्याला हुसेननें सांगून ठेविलें होतें कीं, ' धोंडोपंतांबरोबर जाऊन, त्यांच्याच साह्यानें इंदिरेला कसें तरी बाहेर काढ. मग धोंडोपंतांस उपरती झाली, तरी इंदिरेला पळवून आणण्यास चुकूं नकोस. त्या जिवाजीपंतांच्या तडाख्यांतून मात्र निसट. तिला पळवून आणणें फार कठिणच वाटूं लागलें तर मजकडे जलदीनें स्वार पाठीव. ह्मणजे मी मदत पाठवीन. ' मुबारीक तरी हुसेनचाच चेला. धन्याकडून मदत घेतल्यावर आपली ती काय कर्तबगारी ? आपण स्वत: करामत करून धन्याचें काम तडीस नेलें पाहिजे-आणि नेणारही, असा त्याचा निश्चय झाला होता. धोंडोपंतांची हिंवाची कांगावखोर कल्पना त्यानें लागलीच ओळखली. त्याबरोबर, त्यानें ' कांहो, धोंडोपंत ! ' अशी हांक मारून, ' ह्या प्रांतीं पिकें चांगलीं होत असतील नाहीं ? ' असें ह्मटलें. तो मेण्याच्या मागें होता, तो आतां मुद्दाम अगदींच मागें राहिला. सर्व लोक मेण्यासह पुढें गेले. धोंडोपंतांस अर्थात् त्याला उत्तर देण्यास थांबावें लागलें. त्यामुळें मेणा व लोक त्यांच्याही पुढें गेले. मुबारीक ' इकडे जिराईतच फार दिसतें ! असें कां बरें ? ' ' डोंगर ह्मणून ? ' असे प्रश्न एकसारखे विचारीत हळूं हळूं येत होता. थोडक्यांच वेळांत तो धोंडोपंताजवळ आला. लोक बरेच पुढें गेलेले पाहून, मुबारीक त्यांना ह्मणाला, ' पंतसाहेब ! मी तुमचा कावा समजलों. पण आतां इंदिरा वाटेंत मरणोन्मुख जरी झाली, तरी तिला परत नाहीं फिरविता येणार ! आह्मी आमिनेचे बंदे गुलाम आहोंत. तिनें आह्मांस सक्त हुकूम केला आहे, कीं, ' इंदिरेला येथें आणिलेंच पाहिजे. इंदिरेला दु:खांत व

धोंडोपंतांस सुखांत पडलेलें पाहीन, तेव्हांच मला बरें वाटेल ! ' आह्मांला तिचा हुकूम मोडतां येत नाहीं. धोंडोपंत, आमची धनीण तुमच्याबद्दल एवढी काळजी घेत असतां, तुमचें हें वर्तन पाहून मला फार नवल वाटतें बुवा ! अहो, आमिना किती सुंदर ! तिच्या नखाचीहि सर ह्या पिंवळट इंदिरेला येणार नाहीं ! आमिनेचें तुमच्यावर जसें प्रेम आहे, तसें माझ्यासारख्या पठ्यावर तिचें असतें, तर मी तिच्यासाठीं जीव दिला असतां—जीव ! पण नाहीं आमचें भाग्य !--कांहो, पण तुमचें व आमिनेचें लग्न लागणार, असें आमचे हुसेनसाहेब ह्मणत होते, तें खरें कां ? पण तुमचें दोघांचेंही वय बरेंच आहे—-असो ह्मणा—वयावर काय आहे ! आमचे धनीसाहेबही ह्मणतच होते ' प्रेमाला वय नाहीं, जात नाहीं, शील नाहीं, कांहीं नाहीं, तें अंध आहे ! ' तेंच खरें. पण मला तर वाटतें बुवा कीं, तुह्मी बरीक प्रेमाला डोळस केलेत ! कशी पण परी शोधून काढलीत ?—कीं जी रूपानें तर अप्सराच ! पण तुह्मांला पाहिल्याबरोबर तुमच्यावर फिदाही झालेली ! वाहवा ! मजा आहे बुवा आतां तुमची ! '

मुबारिकनें आपल्या मिठ्या भाषणानें धोंडोपंतांस अगदीं गार करून सोडिलें ! मागें धोंडोपंतांनीं आमिनेची आशा बहुतेक सोडलीच होती. व आतां तरी अहंमदनगरीं गेल्यावर त्यांना तिचें मन वळवावयाचें होतें. त्यामुळें त्यांना मुबारीकच्या शेवटल्या बोलण्याचें सानंदाश्चर्य वाटलें. हुसेननें ज्याअर्थी मुबारीकला देखील आपल्या लग्नासंबंधीं बोलून दाखविलें, त्या अर्थी त्या दोघांच्याही मनांत तेंच असावें अशी त्यांची खात्री झाली. लग्नाचा विचार मनांत येतांच आनंदून ते स्वतःशीच ह्मणाले. ' तरीच ह्मटलें ह्या दोघांचा इंदिरेवर कां येवढा रोष ! आपला हिनें छळ केला ह्मणूनच ह्यांना इतकें वाईट वाटतें. ते जर आपल्यासाठीं इतके झटतात तर आपण तरी कां त्यांच्यापासून दूरदूर रहावें ? ह्यापुढें मी त्यांचा ! मी आतां त्यांच्या मताप्रमाणें वागणार ! कारण ते माझे खरे हितचिंतक आहेत. मुरारराव व इंदिरा मला पाण्यांत पहातात. ते माझा केव्हां घात करतील ह्याचा नेम नाहीं.—इंदिरेला तर आतां सोडतां उपयोगीच नाहीं. इनें आपलें कारस्थान बहुतेक ताडलेंच आहे. आणखी त्यांतून सोडलें ह्मणजे ती हरप्रयत्नानें

आपलें हें कृत्य उघडकीस आणणारच ! व आपली मग पुरीच दुर्दशा व अपमान होणार. त्यापेक्षां इला सोडूंच नये ! '

असा विचार करून ते मेण्याबरोबर चालूं लागले. मुबारीकही कमीजास्त न बोलता पूर्ववत मेण्यामागें मुकाट्यानें चालूं लागला. धोंडोपंतांनीं आपल्याला हिंवाचा हा ना शेंडा ना बुडखा असा काय प्रश्न केला हें इंदिरेला समजेना—ती त्याचा विचार करूं लागली तेव्हां ' आपला कांहीं तरी घात होणार ' ह्यापलीकडे तिच्या विचाराचा अंत झाला नाहीं !

धोंडोपंत जवळ आलेले पाहून इंदिरा त्यांस थबकत थबकत ह्मणाली, ' तुह्मी हिंवाबद्दल काय विचारलेंत मला ? '

कांहीं नाहीं. मला किं नाहीं आज पांच सहा दिवस प्रवास पडला, त्यामुळें माझें चित्त मुळींच ताळ्यावर नाहीं. तुला थंडी वाजते कां ह्मणून विचारावयाचें तें हिंवच आलें तोंडांत !'

इंदिरा पुन्हां थबकत थबकत ह्मणाली, ' आतां तुकाराम ह्मणत होता तें-ऽऽ-०

' इंदिरे, तुझा माझ्यावर इतका विश्वास नाहींना ? मीं खरोखर तुला बादशहाकडे नेत नाहीं ! झक् मारतो तो तुक्या ! लुच्चा कोठला साऱ्या मुलखाचा. '

खरें तर सांगूं नये आणि खोटें तर बोलूं नये, अशा पोक्त विचारानें धोंडोपंतांनीं बादशहा हा शब्द जरा जोर देऊन उच्चारिला. पण तें त्या चतुर पोरीच्या लक्ष्यांत येऊन ती धीर धरून ह्मणाली, ' मग दुसऱ्या कोणाकडे नेतां ? एखाद्या सरदाराकडे ? '

धोंडोपंत ह्या प्रश्नानें जरासे गोंधळले. तरीपण लवकरच एक उत्तर त्यांना आठवलें. ते हंसत ह्मणाले, ' हो सरदाराकडेच आपणांस जावयाचें. मुरारराबही सरदारच आहेत ! '

धोंडोपंत मुरारराबांशीं आणि इंदिरेशीं नेहमीं वडीलपणाच्या नात्यानें वागत. त्यामुळें त्या दोघांशींही ते कधीं चेष्टेनें किंवा निरर्थक ज्यास्त बोलत नसत. अर्थात् तेही त्यांच्याशीं मर्यादेनें बोलत ! पण आज धोंडोपंतांचें हसून बोलणें, बोलण्यांत डावपेच दाखविणें वगैरे प्रकार पाहून इंदिरेला फार आश्चर्य वाटलें. तितकेंच आश्चर्य त्यांनाही इंदिरेच्या बोलण्याचें वाटलें.

कारण ती कधीं त्यांच्याशीं सहसा फारसें बोलत नसे. असो. धोंडोपं-ताच्या शेवटच्या उत्तरापुढें आणखी प्रश्न विचारण्याचा इंदिरेला धीर झाला नाहीं. जें काय होणें असेल तें होईल. आपण आपला जगदंबेवर भार घालावा. असा विचार करून ती स्वस्थ बसली. एकादी भयंकर गोष्ट घडणार, असा मनाचा पक्का ग्रह झाला ह्मणजे मनुष्याला एकप्रकारचें अवसान येतें. त्यायोगें त्याला त्या गोष्टीबद्दल फारशी पर्वा वाटत नाहीं. तशीच स्थिती इंदिरेची झाली. आपल्यावर पुढे जें संकट येणार त्याची काळजी केल्यानें तें नाहींसें थोडच होणार आहे ? जें दैवांत व्हाव-याचें असेल तें होणारच. त्याला काय इलाज ? आल्या संकटाला तोंड दिलेंच पाहिजे. असें मनांत आणून ती स्तब्ध राहिली. तिला मोठा विश्वास काय तो कमलेचा. आपण कोठेंही असलों तरी ती आपल्याला हरप्रयत्नानें सोडवील, अशी तिची खात्री होती. शिवाय आपल्याला आपलें पातिव्रत्य कोठेंही कोणत्याही संकटांत असतां उपयोगी पडेल, असें तिला वाटलें, इतक्यांत तिला सकाळीं गडावर देवीच्या देवळांत पडलेल्या आदल्या दिवशींच्या स्वप्नाची आठवण झाली. तिची भावी कल्पित संकटाची भीति-पुष्कळ कमी झाली. तिला बराच उल्हास आला. थोडावेळ उल्हासांत गेला नाहीं तोंच, ‘ कमलेला पत्र पोहोंचेलच कशावरून ? आपल्या पातिव्रत्याचा प्रभाव काय पडणार आहे ? जगदंबेनें आपणांवर वरदहस्त ठेविला, तें ‘ मनीं वसें तें स्वप्नीं दिसें ’ ह्या ह्मणीप्रमाणेंच असलें पाहिजे ! ’ असेंही तिला वाटूं लागलें. तात्पर्य, सर्व मंडळी जशी कांहीं न बोलतां झर झर चालली होती, तशी इंदिरेच्या अंतःकरणांत आशा, निराशा, उल्हास, दुःख हींही एकमेकामागून झपाटयानें चालली होती; पण ती वरून कोणालाही समजण्याजोगीं नव्हतीं !

प्रकरण ८ वें.

बादशहा.

धोंडोपंतास सप्तशृंगाला पाठविल्यापासून हुसेन त्यांच्या येण्याची चातका-प्रमाणें वाट पहात होता. सप्तशृंगाहून अहंमदनगरीं येण्यास कमींतकमी पक्के तीन दिवस लागतात, ही गोष्ट हुसेनला ठाऊक होती. आणि जलदीनें येण्यास आपण धोंडोपंतांस जरी बजावलें आहे, तरी त्यांना येण्यास सात आठ दिवस लागणार, हेंही त्याला कळत होतें. पण मन मोठें विचित्र आहे. प्रसंगीं असंभाव्य गोष्ट सुद्धां मनाला संभाव्य वाटूं लागते. हुसेनच्या वेड्या मनालाही असें वाटूं लागलें कीं, धोंडोपंत सडे असल्यामुळें दौडत दौडत दोन दिवसांत जातील. मुराररावां-च्या भेटीच्या आनंदानें इंदिराही तबडतोब निघेल; आणि चार दिवसांतच सगळे येथें येतील! हुसेनला वाटलें म्हणून तसें होणार, असें थोडेंच होतें? इंदिरेला येण्यास जितके दिवस लागावयाचे तितकेच लागले. पण तोंपर्यंत हुसेनला सारखी हुरहुर लागली होती. त्याला ध्यानीं, मनीं, स्वप्नीं इंदिरा दिसत होती. जेवण सुचत नव्हतें, निद्रा सुचत नव्हती, दरबार सुचत नव्हता. इंदिरा एकदांची आपल्या येथें येऊन पडली म्हणजे मिळविली, असें त्याला वाटत होतें. ती आपलें रूप, विद्वत्ता, वैभव व वजन पाहून आपल्याला भुलून जाईल. मग आपण तिच्याशीं अनेक क्रीडा करूं, तिला फुलाप्रमाणें बाळगूं, वगैरे मनोराज्य तो करीत होता. ह्यायोगें पाप घडेल, बेअब्रू होईल, नाश होईल, वगैरे विचार त्यानें स्वप्नींही आणले नाहींत. फार तर काय, आपल्या उरावर तिकडे मुरारराव आहेत, ह्याचें देखील त्याला भान राहिलें नाहीं! इंदिरा ही आपली राख बनल्यासारखीच आहे. म्हणून तिच्याबद्दल आपण कांहींही बोललों, तरी हरकत नाहीं, असें तो समजूं लागला! अशीं त्याची इंदिरामय वृत्ती झाल्यामुळें, कोणाशींही बोलतांना तो तिच्यासंबंधीं गोष्ट काढून तिच्या रूपाची तारीफ करी. ह्या योगानें एखादे वेळेस कोणाला संशय येत आहे असें दिसलें, तर तो लागलीच, 'धन्य माझा दोस्त मुरारराव, कीं त्याला असलें रत्न लाभलें. ईश्वर त्या

जोडण्याला दीर्घायु देवो.' असें बोलत असे. त्यामुळें त्याचा कोणाला फारसा संशय आला नाहीं. व आला असलाच कोणाला, तरी कोणी तिकडे लक्ष्यही दिलें नाहीं. असो. सायंकाळची वेळ. अहंमदनगरचा बादशहा मनसूरअली निजामशहा हा आपल्या टोलेजंग राजवाड्यांतील अतिशय भव्य आणि सुंदर अशा एका आरसेमहालांत बसला होता. तो महालाच्या मध्यभागीं एका सुंदर सिंहासनावर आपल्या उजव्या कुशीवर पडला असून, त्याच्या हातांत रुप्याच्या गुरगुडीची सोन्याची नळी होती. सिंहासनाच्या खालीं त्याच्या पायाकडे कांहीं अमीर उमराव बसले होते. त्यांच्यांशीं तो गप्पा ठोकीत होता, आणि मधून मधून हुक्का पीत होता. त्याचे हुजरेही जवळच उभे होते. बादशहाच्या चेहऱ्यावरून तो सभ्य, दिलदार, आणि भारदस्तपणें वागणारा असा दिसत होता. त्याचें कपाळ विस्तृत असून त्यावर बारीक बारीक आठ्या पडल्या होत्या. त्याचा वर्ण गौर असून त्याची पांढरी शुभ्र दाढी त्याच्या छातीवर पसरली होती. त्याला पाहिल्याबरोबर त्याच्याबद्दल मनांत पूज्यभाव उत्पन्न व्हावा, अशी त्याची चर्या होती. तो एका विचित्र खटल्यासंबंधीं उमरावांशीं बोलत होता, इतक्यांत तेथें हुसेन आला. त्यानें बादशहास लवून तीनदां मुजरा केला व तो त्याच्या उजव्या बाजूस सिंहासनाखालींच बसला. वर सांगितल्याप्रमाणें हुसेनची इंदिरामय स्थिती झाल्यामुळें, त्याचें चित्त ठिकाणावर नव्हतें. त्याला चिंतातुर पाहून बादशहा स्मितहास्य करून ह्मणाला, 'क्यौंजी हुसेनखान! आज फार खिन्न दिसतोस? डोकें दुखणें अजून कमी नाहीं कां झालें?' हुसेन आनंदीत मुद्रा करून हंसत हंसत ह्मणाला, 'कांहीं नाहीं खाविंद. खिन्न कशानें झालों? एका ठिकाणीं मी सुंदर स्त्रीचें रूप कसें असतें तें वाचलें, त्याचा विचार करीत होतों झालें!'

'मग आह्मांला तर सांगशील काय वाचलेंस तें'?

ज्याचें शिक्षण बेताचेच असतें तो फार गरीब मनाचा असतो. कोण्याही शिकलेल्या माणसाजवळून कांहीं ऐकण्याचा सुप्रसंग आला तर तो अगदीं भाविकतेनें ऐकतो किंवा विचारितो. त्याचप्रमाणें बादशहानें वरील प्रश्न केला. बादशहा स्वभावतः जरी बुद्धिमान होता, तरी शिक्षणाच्या बाबतींत त्याची फार हयगय झाली होती. त्याचा बाप नेहमीं वारांगनांच्या सहवासांत राहिलेला

असे. त्यामुळें तो आपल्या बायकोकडे आणि मुलाकडे मुळींच लक्ष्य देत नसे. माता फार धर्मनिष्ठ आणि कोंवळ्या मनाची होती. तेच गुण तिनें आपल्या बाळाच्या मनावर ठसविले. पण तिला लिहिण्यावाचण्याची किंमत नसल्यामुळें तिनें आपल्या मुलाला तें शिकविण्याची काळजी घेतली नाहीं. अशा रीतीनें माता आणि पिता ह्या दोघांकडूनही मनसूरला शिक्षण न देवविण्यांत आल्यामुळें त्याला कळूं लागेपर्यंत लिहितां वाचतां येत नव्हतें. पुढें समजूं लागल्यावर तो ऊर्दू भाषा शिकला व पुढें अनुभवानेंही तो पुष्कळ शहाणा झाला. तरी तो ज्ञानांत मुरारराव आणि हुसेन ह्या दोघांसही श्रेष्ठ समजत होता. राज्यकारभाराच्या कामांत जरी तो त्या दोघांस फारसें विचारीत नसे तरी पण विद्वत्तेच्या बाबतींत तो त्यांना फार पूज्य मानीत होता व नित्य संध्याकाळीं कांहीं वेळ त्यांच्याशीं बोलत बसण्यांत त्याला फार आनंद होत असे. आजही हुसेन आतां सुंदरस्त्रीचें वर्णन कसें करितो, हें त्याला पहावयाचें होतें. तो हुसेनला पुढें ह्मणाला, ' हें पहा, हुसेन, पद्यांत सांगशील तर अधिक चांगलें होईल ! '

' आज्ञा सरकार ! मी वाचलें गद्यांतच पण तुह्मांला नवीन पद्य रचून सांगतों. '

असे ह्मणून हुसेन कागद व कलमदान घेऊन कविता लिहावयास बसला. इंदिरेची मूर्ती त्याच्या अंतश्चक्षूंपुढें होतीच; तिचेंच तो वर्णन लिहूं लागला. बादशहा त्याच्याकडे कौतुकानें पहात होता. थोड्यावेळानें हुसेननें ती कविता पुरी करून, सुस्वररीतीनें ती बादशहास ह्मणून दाखविली. बादशहाला स्वतः कविता करितां येत नव्हती, तरी पण त्याला तो विषय फार आवडत असे तशांत आजच पद्य हुसेननें आपल्या समोर करून ह्मणून दाखविलें ह्मणून तर तें बादशहाला फार आवडलें ! इंदिरेच्या रूपाची यथार्थ कल्पना वठविणारें तें पद्य असें होतें:—

पद. (चंद्रकांत राजाची कन्या— ही चाल.

सुवर्णकेतकीपरि तनुकांती रुचिर अतीव दिसे ।
केशकलापही भुजगासम तो पृष्ठीं लोळतसे ।।
विस्तृत भाल तयावरि सुंदर कुंकुम तिलक दिसे ।
जणुं आकाशीं मंदतेजरवि सुंदर चमकतसे ।।

रेखिव भृकुटी धनुपरि दिसती त्यांच्या संधानीं ।
वीरशिरोमणि मूढचि बनती हतबल होवोनी ॥
कमलांसमते विकसित असती नेत्र सुरमणीचे ।
मृगनयनांपरि चंचल असती मीनाकृतिसाचे ॥
नेत्र लाल तारुण्यमदानें मदिरे सम दिसती ।
किंवा भरली उदयकालची त्यांत सूर्य कांती ॥
सरळ नासिका चंपककलिका रूपा लाजविते ।
भ्रूधनुमध्यें शरजणुं; विव्हल करितो चित्तातें ।
पक्वबिंबफल कांती सम किनि आरक्त ओष्ठ दिसती ।
गुलाबपुष्पापरिते कोमल मोहक बहु असती ॥
मौक्तिक पंक्तीसम दंतावलि; पडुनि तीवर ती ।
अधरकांति, डाळिंबबियांपरि दंत शोभताति ॥
कर्णद्वय ते सुबक गुलाबी- गाल सुंदरीचे ।
पाहुनि गमतें तुच्छ मनाला रूप अप्सरेचें ॥
पुष्ट सरळ ते दंड; हस्तही गोंडस बहु असती ।
वक्षस्थळ बहु विशाल, उन्नत, बघुनि गमे चित्तीं ।
चक्रवाक हे दोन असति कीं कुंभचि हेमाचे ।
मदनाला अभिषेक कराया विनर्मिले साचे ।
कर्दळिच्या गाभ्यासम ऊरू उच्च नितंब तिचे ।
पाहुनि गमते गंडस्थल जणुं प्रमत्त हत्तीचें ।
रक्तकुवलयांपरि ते कोमल चरण सुरमणीचे ।
तिजला पाहुनि लज्जित होई मुख सुरमणींचें ॥ १ ॥

हुसेननें हें पद इतक्या खुमारीनें ह्मटलें कीं, बादशहा व जवळ बसलेली मंडळी ह्यांचीं मनें अगदीं तल्लीन होऊन गेलीं ! पद संपूर्ण झाल्यानंतर थोडा वेळ जिकडे तिकडे अगदीं स्वस्थ होतें. मग बादशहा हंसत हंसत ह्मणाला, ‘ कांरे, पण हें हिंदस्त्रीचें वर्णन असावें. नाहीं बरें ? ’

‘ हांजी, खाविंद ! ह्या बाबतींत अल्लानें अगदीं अन्याय केला आहे. असलें रत्न त्यानें त्या काफर जातींत निर्माण केलें आहे ! ’

'मग अशी स्त्री खरीच आहे तर ? तूं ह्मणालासना पुस्तकांत वांचलें ह्मणून ?'

'वाचलें तर खरेंच. पण असें एक—नव्हे दोन रत्नें मी डोळ्यांनीं पाहिलींहि आहेत.'

'कोणतीं बरें तीं ?'

'एक आपल्या राणीसाहेब!' हुसेन तेथें नुकत्याच एक रेशमाचा सुंदर हातरुमाल बादशहास देण्याकरितां आलेल्या राणीसाहेबांकडे पाहून हंसत हंसत ह्मणाला! परंतु राणीसाहेबांना कांहीं जरूरीचें काम असल्यामुळें हुसेनकडे लक्ष न देतां त्या बादशहाजवळ रुमाल देऊन निघून गेल्या! बादशहा रुमाल घेऊन अधीरतेनें ह्मणाला, 'आणि दुसरें ? दुसरी तुझी बायको हामिदाबिबी वाटतें ? वा.—'

'छे, छें, सरकार,' हुसेन मध्येंच ह्मणाला, 'मी सांगतोना, कीं, ती अप्सरा खुदानें काफरजातींत निर्माण केली ह्मणून ?'

'मग सांगशील कीं नाहीं कोणती तीं ?'

'आपले मुरारराव ह्या बाबतींत भाग्यवान् आहेत!'

'ह्मणजे ? मुराररावाची बायको अशी आहे ?'

'होय सरकार, मला त्यात आनंदच आहे!'

'तूं अगदीं पद्यात वर्णन केल्याप्रमाणें आहे ?'

'अगदीं तशी आहे!'

बादशहा विस्मित झाला. भर तारुण्यांत अशी सुंदर स्त्री सोडून केवळ पातशाहीकरितां मुरारराव स्वारीवर गेला. अशा सुंदर स्त्रीपुढें त्याला वजिरीची काय किंमत आहे ? पण केवळ स्वामिसेवेसाठीं त्यानें हा स्वार्थत्याग केला. असा मला दरबारांत हल्लीं तर कोणी दिसत नाहीं. शाबास आहे मुराररावाची! असें मनांत येऊन बादशहाची मुरारराबाबद्दलची पूज्यबुद्धी ज्यास्त उद्दीपित झाली. मुरारराव औदार्य, दीनदयालुत्व, मनाचा खुलासपणा, धिम्मेपणा वगैरे गुणानीं हुसेनपेक्षां अधिक चांगला आहे, असें बादशहास पहिल्यापासूनच वाटत होतें; आणि अशा महात्म्याच्या पत्नीला 'रत्न' वगैरे शब्दानीं संबोधणें; येवढेंच नव्हे, तर तिचा येथें संबंध आणून तिच्यावर चर्चा करणें, हें अगदीं हलकटपणाचें आहे, असें त्याला वाटलें!

तो किळस आल्यासारखें करून ह्मणाला, ' हुसेन, कांहींतरी विचार कर. कोणत्याही गुणांत मुरारराव तुजपेक्षा कमी नसून त्याला तूं काफर ह्मणतोस ! आणि देवानें त्याला अशी स्त्री दिली ह्मणून देवाचे आभार मानावयाचें सोडून त्याला अन्यायी ह्मणतोस ! '

' सरकार, देवानें अशी स्त्री निर्माण केली, ह्मणून मला आनंद वाटतो, असें मी मघांच ह्मटलें. पण जातिबद्दल ह्मणाल तर हिंदुलोकांस मी काफीरच ह्मणणार. मुरारराव गुणी आहेत हें कां मी नाकबूल करितों ? पण ते बिचारे त्या हीन जातींत पडल्यामुळें, त्याचे गुण कवडीमोल झाले ! पूर्वजन्मीं कोणतें पातक केलें होतें त्यांनीं कोणजाणें ? '

' हिंदुलोकांतही हुषार, ज्ञानी, आणि कर्तबगार लोक असतात. नाहीं असें नाहीं. तेव्हां त्यांना काफर ह्मणणें ह्मणजे आपलें अज्ञान उघडें करणें होय ! '

बादशहाचें ज्ञान आपल्यापेक्षां कमी आहे, अशी हुसेनची समजूत होती ! त्यामुळें आपल्याला अज्ञानी ह्मटल्याबद्दल त्याला फार राग आला ! एखाद्या जादुगारानें काहीं चमत्कार केला, आणि त्याला ' ही तूं हातचलाखी केलीस ' ह्मणून ह्मटलें ह्मणजे तो चवताळून ' माझी परीक्षा घेतोस ? चल ये. ' असें ह्मणतो, त्यावेळीं त्याची जशी मुद्रा असते तशी मुद्रा करून उद्दाम स्वरानें हुसेन ह्मणाला, ' खाविंद, आपल्या कृपेनें मला थोडेंसें ज्ञान प्राप्त झालें आहे. त्यावरून मला जें काय वाटतें तें मी सांगतों. आपण मेहेरबानी करून ऐका ! आपण हिंदुस्थानांत आलों कशाला ? ह्या हिंदुजातीचा बडेजाव राखावयास नव्हे. किंवा येथें ऐषआराम भोगण्यासही नव्हे. महंमद पैगंबरानें आपणासाठीं जो हा पवित्र धर्म निर्माण केला, व ज्याचा प्रसार आज खूप वाढला आहे, तो सगळ्या हिंदुलोकांस सक्तीनें शिकविण्यास आपण आलों आहोंत ! आपला पवित्र धर्म जर ह्या रानटी लोकांनीं न स्वीकारिला तर ते नरकांत पडतीलना ? मग त्यांच्यावर अनुग्रह करणें हें आपलें आद्य कर्तव्य नाहीं काय ? सगळें जग मुसलमान झालें ह्मणजे नरकाचें नाव कशाला ? व ह्या नरकयातना सुटाव्या ह्मणून तर आपणां मनुष्यासाठीं अल्ला पृथ्वीवर अवतीर्ण झाला. परंतु, ह्या अडाणी लोकांस हें कांहीं कळत नाहीं. हे रानवट मूर्ति काय करितात ! त्यांना भूतें काय चालतात !

असे दगड धोंडे पुजल्याने का कोठें ईश्वर प्राप्त होतो? ह्यांचे देव तरी किती ! अबब ! इतक्यांची हांजी हांजी करितां करितांच मरण यावयाचें ! देव एक आहे. सद्धर्म एकच आहे, पण तें ह्यांना कळत नाहीं. बरें, ' दादा बाबा ' करून आपण ह्यांना समजून सांगितलें, तरी त्यांना आपला हाडीं मासीं खिळलेला रानवटपणा सोडावासा वाटत नाहीं. हें भविष्य खुदाला माहितच होतें. म्हणून तर त्याची सक्त आज्ञा आहे कीं, ' एका हातांत कुराण व दुसऱ्या हातात तरवार घेऊन सर्व जग मुसलमान करा. 'त्या-प्रमाणें आपल्या लोकांनीं केलेंही. आज आरबस्थान, तुर्कस्थान, इराण, काबूल, समर्कंद, तार्तरी वगैरे देशांत आपलाच धर्म चालत आहे. ते समुद्रकांठीं रहाणारे फिरंगी व्यापारी तर असे सांगतात कीं, तुर्कस्थानच्याहि पलीकडे ग्रीस, मिसर, रोम, फिरंगाण वगैरे अवाढव्य देश आहेत, तेथेंही इस्लामी धर्माचा फार प्रसार झाला आहे. सरकार; ह्या हिंदुस्थानातही वाढला आहे. पण सगळें हिंदुस्थान मुसलमानमय झाल्याखेरीज आपण स्वस्थ कसें बसावें ? आणि जे मुसलमानेतर आहेत, जे हट्टानें हा पवित्र धर्म स्वीकारीत नाहींत, त्याना काफर, गनीम, जंगली, हींच नावें यथायोग्य आहेत. मग मुरारराव नाहीं थोरले पंत (साबाजीपंत) असले, म्हणून आम्हांला काय त्याचे ? '

हुसेनचें हें साभिनय व्याख्यान बादशहा निमूटपणें ऐकत होता. त्यावेळीं तेथें जी मंडळी बसली होती ती बहुतेक मुसलमानच असल्यामुळें, हुसेनचें भाषण चालू असतां, ती माना डोलवीत होती, व मधून मधून वाः, अफसोस, आहा, वगैरे उद्गार काढीत होती. बादशहासही हें भाषण ऐकून आपल्या धर्माबद्दल व मुसलमानान्या धाडसाबद्दल फार कौतुक व अभिमान वाटला. पण, धर्म सगळे सारखेच. कोणताही अधिक चागला किंवा वाईट नाहीं. परधर्मीयाचा वृथा छळ करणें पाप आहे. आपण मात्र आपले धर्माप्रमाणें वागावें. असें त्याचें ठाम होतें. त्यामुळें त्याच्या मनावर हुसेनच्या भाषणाचा परिणाम स्वधर्माचें व स्वजातीयाचें कौतुक वाटण्यापलीकडे फारसा झाला नाहीं. हुसेनचें बोलणें संपल्यावर थोड्या वेळानें बादशहा गंभीरतेनें म्हणाला, ' हुसेन, तुझें रक्त ताजें आहे म्हणून तुला असें वाटतें झालें ! अरे बाबा, अशा दंडलीनें कां कोठें धर्म वाढत असतो !

तरवारीच्या जोरावर आपण आज एका हिंदूला मुसलमान केलें. उद्यां तो त्या फिरंग्यांच्या धर्मांत जाईल. परवां तिसराच एखादा धर्म स्वीकारील. सारांश असा जबरीनें बनविलेला मुसलमान, खऱ्या मुसलमानांत मुळींच शोभणार नाहीं आणि आपण तरी परधर्मीयांस, आपल्या धर्मांत त्यांनीं यावें ह्मणून कां छळावें ! आपणांस परमेश्वरानें उत्पन्न केलें. आणि त्यांना नाहीं कां केलें ! मग आपण जर त्यांना छळिलें तर त्याला राग नाहीं कां येणार ! त्यांच्या आवडत्या धर्माच्या आज्ञेप्रमाणें ते वागतील. मग ते अनेक देव भजोत कीं दगड पुजोत ! आपल्याला काय करावयाचें त्याच्याशीं ? आपल्याला एखाद्यानें ' तुह्मीं देवाची तिनदांच कां प्रार्थना करितां ? एकदां किंवा नेहमीं कां करीत नाहीं ? तसेंच तुह्मी कुराणच कां वाचतां ? दुसरे उपयुक्त व ज्ञानदायक ग्रंथ कां वाचीत नाहीं ? ' असें ह्मटलें, तर आपण त्याला काय उत्तर देऊं ? ' तुला काय त्याची जरूर ! ' हेंच ना ? मग त्यांचीही तीच गोष्ट. आतां इतका आपला धर्म वाढला, तर माझें काय त्यांत बिघडणार आहे ? उलट मला आनंदच वाटेल. पण मी ह्मणतों, इतक्या अगणित मुसलमानांत धर्माप्रमाणें वागणारे सर्वच आहेत कां ? जुलमानें मुसलमान केलेले—आपल्या इच्छेच्या विरुद्ध मुसलमान झालेले—लोक ह्मणजे निव्वळ रडतराऊत घोड्यावर बसवून जशा मोहिमा मारितां येत नाहींत, तसेंच बळजबरीनें अधिक मुसलमान बनविले, ह्मणजे आपल्या धर्माला बळकटी आली, असें ह्मणतां येत नाहीं. त्यांच्या मनांत आपल्या धर्माबद्दल प्रीति उत्पन्न होऊन, ते आपण होऊन आपल्या धर्मांत येतील, अशीच आपली वागणूक पाहिजे. तीच खरा धर्मप्रसार. आणि असें जर होईल, तर खरोखरच नरकाचें नांव राहणार नाहीं. आतां आपणांला येथेंच रहावयाचें आहे. अर्थात् आपणांस येथील लोकांशीं मिळून मिसळूनच राहिलें पाहिजे. कारण, आतां आपला हाच देश. आपण केवळ धर्मच वाढवावयास आलों नाहीं, तर पोटासाठीं देखील आलों ! आतां आपणांस परत तुर्कस्थानांत किंवा दुसरीकडे मुसलमान ह्मणून हातभर तरी जागा मिळेल कां ? मुळींच नाहीं. ह्मणून आपल्याला ह्याच लोकांत राहिलें पाहिजे. अर्थात् त्यांना काफर, रानटी ह्मणून चिडविण्यात काय अर्थ आहे ? ती माणसें नव्हेत कां ? ते सगळे आज आपल्यावर उठले तर आपलें काय होईल ! आपल्याला येथें इतका मान आहे, हें आपलें भाग्यच नाहीं कां ! '

आपलें एखादें ठाम मत असलें, ह्मणजे आपणांस तें अगदीं सप्रमाण सिद्ध करितां येतें. कारण, त्याला अनुकूल अशाच गोष्टी आपण नेहमीं शोधीत असतो; व त्याच गोष्टी आपण आपल्या मताच्या पुष्टयर्थ देतों. बादशहाचीं हीं उपरोक्त ठरींव मतें होतीं; ह्मणून त्यानें हुसेनच्या बोलण्याचें येवढें खंडन केलें. मुसलमानी राज्यें हिंदुस्थानांत कायम झाल्यापासुनच मुसलमानात नेहमीं ह्या विषयावर- जुलमानें हिंदूंस बाटविण्याबद्दल—वादविवाद होत. ह्या वादविवादाचा अंत कधींच झाला नाहीं. कारण कित्येकाचें मत हुसेन ह्मणाला तसें -हिंदूंस जुलमानें बाटवावें असें—होतें. व कित्येकाचें बादशहाप्रमाणें ह्मणणें असे. ह्या दोन्ही मताच्या लोकाची संख्या सारखी असून नेहमीं अस्तित्वात असे. ह्मणून अमुकच मत खरें असें कधींच सिद्ध झालें नाहीं. ह्याचा परिणाम असा होई कीं, बादशहा ज्या मताचा, असेल, त्या मताची सरशी व्हावी. बादशहा पहिल्या मताचा असला तर हिंदूंस बाटविण्याचा व छळण्याचा सपाटा सुरू व्हावा. त्या बादशहाच्या गादीवर त्याच्या मागें दुसऱ्या मताचा बादशहा आला तर लागलीच हा प्रकार बंद होई. साराश, हें सर्व बादशहावर अवलंबून असे. मनसुरअल्लीचें मत वाचकास समजलेंच आहे. तसें त्याचें मत असल्यामुळें, व तो न्यायी असल्यामुळें, त्याच्या राज्यात हिंदुमुसलमानास सारखेंच वागविलें जात असे. त्याचें जरी तें ठरींव मत होतें, तरी पण त्याच्याबद्दल हुसेनसारख्या विद्वानाजवळ जास्त ऊहापोह करण्याची त्याला सहाजीक जिज्ञासा होतीच. व ह्मणून तो आपलें भाषण संपवून हुसेनच्या उत्तराची वाट पहात बसला. पण हुसेनची त्या विषयावर अधिक बोलण्याची इच्छा दिसली नाहीं. त्याला मुळीं आज मुरारराबाबद्दल बादशहाचें मन कलुषित करावयाचें होतें. त्याचा स्वभाव असा असें कीं, जी गोष्ट साधून घ्यावयाची ती एकदम काढावयाची नाहीं. तर बोलण्याबोलण्यावरून ती सहज निघेल, असाच मुळीं बोलण्याचा उपक्रम करावयाचा. त्याच्या मनातून मुराररावास धर्मदृष्ट्या नीच ठरवावें, व मग इष्ट हेतु साधावा, असें होतें. त्याला बादशहाच्या बोलण्याचा आनंद किंवा वाईट काहींच वाटलें नाहीं. कारण तो नावाला मुसलमान होता. त्याची कृती नास्तिकासही लाजवील अशी होती. नास्तिक ईश्वर नाहीं, असें समजून इहलोकचे उपभोग भोगतो, व दुःखें सोसतो पण हुसेनला आनंदप्रसंगीं ईश्व-

राची आठवणही होत नसे. दुःखाच्यावेळीं मात्र देवाला त्याच्या इतक्या कोणीं शिव्या दिल्या नसतील ! ही परमेश्वराची नास्तिकाहून अधिक अवहेलना नव्हे काय ? अशी त्याची वृत्ती असल्यामुळें, आपल्या मताचें बादशहानें खंडन केलें, ह्याचें त्याला वाईट वाटलें नाहीं. पण आपण आपल्या वक्तृत्वानें बादशहास गारीगार करून टाकूं, त्याला मुरारराव वाईट आहे, नीच आहे असें भासवूं वगैरे त्याचे मनोरथ ढासळल्यामुळें त्याला वाईट वाटलें. व आपण इष्ट विषयावर मुद्यामुद्यानें जाणार, तों पहिलाच मुद्दा बादशहास नापसंत व वादग्रस्त ठरला, ह्यामुळ त्याचा फार विरस झाला. व अशा स्थितींत तो स्तब्ध राहिला. हें पाहून बादशहा त्याचीं कींव आल्यासारखा स्वर काढून ह्मणाला, ' अजून तरी हिंदुबद्दलची अढी तुझ्या मनांतून गेली कीं नाहीं ? पुन्हा मुराररावाच्या पत्नीसंबंधीं असें बोलूं नकोस. ती तुला सख्ख्या बहिणीप्रमाणें आहे. ' आधींच विरस झालेल्या हुसेनला, इंदिरेला आपली बहिण ह्मटली ह्याचा फार संताप आला. धर्माच्या बाबतींत स्वतःच्या वाक्पांडित्यानें आपलें मत त्याला प्रस्थापित करिता आलें नसतें असें नाहीं. पण अशा वादविवादाला दिवसगत लागणार. तितके दिवस निरर्थक वाद करण्याची त्याची इच्छा नव्हती. त्याला फक्त मुराररावांस हीन कुलोत्पन्न ठरवावयाचें होतें. पण त्यासाठा वाद करावा लागणार, असें पहातांच त्यानें आपण हरलों असें दाखविलें. व दुसरी युक्ति शोधण्याच्या कामांत त्याचें डोकें गर्क असता, ' ती तुला बहिणीप्रमाणें आहे ' हे बादशहाच्या तोंडचे शब्द त्याच्या काळजास भेदून गेले. इंदिरा आपली भगिनी ? आपण स्वसागामी ? छे. छे. इंदिरा आपली पत्नी–निदान राख आहे–निदान होईल ! अर्धांगीच्या नात्यानें मी तिला असें ह्मणूं नये–तिला ' रत्न ' वगैरे हलकटासारखीं विशेषणें देऊं नयेत–हें खरें ! पण तिला आपली भगिनी ह्मणावें ? जणूं काय इंदिरेवर आपला यजमानपणाचा हक्क आहे असेंच हुसेनला वाटत होतें. ह्मणून तिला बहीण ह्मटली असतां तो संतापानें लाल झाला ह्यांत काहीं नवल नाहीं ! पण त्याला आपला संताप बादशहाला उघड दाखवितां येईना ! शेवटीं आपला संताप त्यानें खालील युक्तीच्या शब्दांत प्रगट केला:—

' काय ती काफर स्त्री माझी भगिनी ? सरकार, मी आपला बंदा

आहे. आह्मी काय वाटेल तें करा ! पण मी हिंदूस काफर, जंगली, रानटीच ह्मणणार ! त्या स्त्रीला बहीण तर प्राणांतींही ह्मणणार नाहीं. मग ती सुंदर असली ह्मणून काय झालें ! ! '

आपल्या बोलण्याचा हुसेनच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं, ह्याचें बादशहाला वाईट वाटलें; आणि त्याला त्याचा किंचित रागही आला. पण हुसेनचें बोलणें एकसारखें चालू होतें, ह्मणून तें तो शांतपणें ऐकून घेऊं लागला. हुसेन ह्मणाला ' ज्या मुराररावांच्या गुणांवर लुब्ध होऊन, तुह्मी हिंदू जातीचा येवढा मान राखतां ती किती दुष्ट आहे, हें तह्मास कळलें, तर तुह्मींही त्या जातीचा तिरस्कारच कराल ! अहो, मी कधींपासून ह्या हिंदूलोकांचे जन्मस्वभाव ओळखून आहे. माझें असें मत आहे कीं, ही जात मुळचीच नीच आणि हरामखोर. '
' अरे, हो पण. ' पुन्हां जातीबद्दल त्याचें चऱ्हाट सुरू झाल्याबरोबर त्रासून बादशहा ह्मणाला, ' हुसेन, "माझें डोकें दुखतें, ' ह्मणून तूं दोन तीन दिवस ह्मणत आहेस, त्या वेदनांनीं त्रासून तर हें बडबडत नाहींसना ? किंवा औषध ह्मणून मद्याची बाटली तर झोंकून नाहीं आलासना ? असें असेल तर प्रकृती साफ होईपर्यंत त्वां घरींच रहावेंस ! तूं मुराररावाचा द्वेष करूं लागलासच ! मला वाटत होतें कीं, जशी साबाजीपंतांनीं आणि महंमदखानांनीं निजामशाहीची भरभराट केली, तशी तुह्मी दोघेंही कराल. पण आतांच्या तुझ्या बोलण्यावरून माझी निराशा झाली. अरे मुराररावांची योग्यता केवढी, त्याचें मसनदीवर प्रेम केवढें ! त्याला नीच ह्मणतोस ! मी ह्मणतों त्याला नीच ह्मणून तूं बरीक नीचपणा पदरीं घेतलास ! '
बादशहास फार राग अलासें दिसलें. त्याचें बोलणें झाल्यावर कांहीं वेळ तेथें स्तब्ध होतें. बादशहाचा राग कमी होऊन तो शांत होईपर्यंत हुसेन कांहीं बोलला नाहीं. मग अगदीं शांतपणानें त्यानें बादशहाच्या पायांवर मस्तक ठेविलें व मी शरणागत आहे, अशी मुद्रा दर्शवून तो गंभीरपणानें ह्मणाला, ' मायबाप ! शांत व्हा. मला फारसा अनुभव नाहीं. त्यामुळें बरें वाईट मला कळत नाहीं. मी मुराररावांबद्दल व हिंदूजातीबद्दल जें बोललों, तें जर गुन्हा ठरत असेल, तर त्याची माफी करा. मुराररावांच्या सद्गुणाबद्दल आणि त्यांच्या पत्नीच्या सौंदर्याबद्दल मला कधींही अनादर वाटणार नाहीं. इतकेंच

नाहीं, तर त्याचा माझा खाजगी स्नेहसंबंधही बराच आहे. पण खाविंद, राजकीय गोष्टींत प्रत्यक्ष भाऊ जरी विरुद्ध वागूं लागला तरी त्याला क्षमा करणें योग्य आहे कां ? भाऊ हा संबंध खाजगी. राजकीय–सरकारी नाहीं. मग आपलें खाजगी बंधुप्रेम एकीकडे ठेऊन, त्याला शिक्षा करविणें हें आपलें कर्तव्य नाहीं काय ? '

हुसेनचें हें दीनपणाचें व नरमपणाचें सर्व ढोंग होतें. पण त्याची त्यावेळची दीन आणि गंभीर मुद्रा पाहून, तो सुस्वभावी बादशहा फार ओशाळला. आपण केवळ बादशहा ह्मणूनच हा महापंडित आपल्या पायां पडला. वास्तवीक आपली काय योग्यता आहे ! कदाचित् हा ह्मणतो तसा मुरारराव असेलही. दुसऱ्याचें मन कोणास समजणार ? कदाचित् असेंही झालें असेल कीं मुराररावाच्या हातून क्षुल्लक चूक झाली असेल. तीं ह्याच्या ताज्या रक्ताला खपली नसेल. असें मनांत येऊन, समजूत घालण्याच्या उद्देशानें तो हुसेनला ह्मणाला, ' हुसेन, अविचारानें कधींही बोलूं नये, हें तुला सांगावयास पाहिजे ? हिंदु जात नीच. ह्मणून मुरारराव नीच. हें जें तूं ह्मणतोस हें अगदीं अयोग्य आहे. त्याचा नीचपणा–दुष्टपणा दाखवून दिला असता तर एक असो. पण जातीवरून त्याचा अपराध सांगतोस ह्याला काय ह्मणावें ? त्याचा अपराध सांग मग– '

' पण मुराररावांनीं अपराध केलाच नाहीं अद्याप, तर सांगूं तरी काय! '

' मग आज इतका त्याच्यावर चरफडतोस कां ? '

' मी असाच चरफडत रहाणार ! कारण मुरारराव ह्यापुढें तो अपराध करणार आहेत व मीही त्यांस प्रतिकार कारणार आहे ! '

' कोणता तो अपराध ? '

' मुरारराव आल्यावर आपण त्याला वजिरी देणार ना ? '

' हो. त्याबद्दल तुला वाईट वाटतें कीं काय ? '

' नाहीं सरकार ! त्यांचा असा हेतु आहे कीं, वजीर झाल्यावर, कांहीं दिवसांत चांगली लोकप्रियता संपादन करावी. मग तुह्मांस पदच्युत करून वाटल्यास ठार मारून–हिंदुपदपातशाही करावयाची. मशिदी पाडून देवळें बांधावयाचीं, व मुसलमानांचा छळ करावयाचा. हा त्यांचा बेत मला धोंडोपंत ह्मणून त्यांचे मसलतगार आहेत, त्यांनीं सांगितला. हे धोंडोपंत त्यांच्या

येथें त्यांच्या वडिलांपासून असल्यामुळें, ते त्यांस नेहमीं आपलें हृद्गत सांगतात. अर्थात् त्यांनीं सांगितलेला हा मुराररावांचा बेत खराच असला पाहिजे. ही गोष्ट जेव्हां माझ्या कानावर आली, तेव्हां मला मुराररावांचा इतका संताप आला कीं, त्याचक्षणीं त्यांच्या नरडीचा घोट घ्यावा असें मला वाटलें ! पण काय करावें !– तेव्हांपासून मला संतापातिशयानें कांहीं सुचत नाहीं ! '

हुसेनचें हें बोलणें ऐकून बादशहा बुचकळ्यांत पडला. हुसेन ह्मणतो तसा मुराररावाचा बेत असेलही. कांहीं तरी विश्वसनीय बातमी असल्याखेरीज हुसेन तरी हट्टास पेटून येवढें भांडण कां करील ? आपली सुंदर स्त्री सोडून जाण्यांत त्याचा असाच कांहीं बेत झाला असावा ! असें वाटून बादशहाचें मन किंचित् कलुषित झालें. तरीपण त्यानें तें हुसेनच्या लक्ष्यांत येऊं दिलें नाहीं. हुसेनला मुराररावाबद्दल जी शंका येते, ती निरर्थक आहे असें आपणांस वाटतें, अशी मुद्रा करून बादशहा ह्मणाला, ' ऊंः त्यांत काय मोठेंसें ? तुझ्यासारखे कैवारी असल्यावर गादीला काय धक्का आहे ! मुरारराव आल्यावर मी त्याला वजिरी देणार. त्याच्या मनांत कांहीं नाहीं. तुला हुरहूर लागावी ह्मणून कोणीतरी ही बातमी सांगितली झालें ! '

' आतां ह्या आंधळ्या विश्वासाला काय ह्मणावें ? ! ' हुसेन कळवळल्यासारखें करून ह्मणाला, ' सरकार, खाविंद, धोंडोपंतास येथें आणवून मी तुमची ह्या बाबतींत खात्री करून देईन. पण गरीबपरवर, ह्या दासाला थोडे दिवस तरी ह्या वजिरीपदाचा लाभ होऊं द्या ! ' हुसेन थोडावेळ थांबला. मग डोळे पुसून करुणस्वरानें तो बादशहास ह्मणाला, ' मला निजामशाहीबद्दल किती काळजी आहे हें खुदाला कीं मला ठाऊक. जहांपन्हा, मुरारराव मोहीम फत्ते करून येईपर्यंत तरी मला दया करून वजीर करावें अशी माझी नम्र प्रार्थना आहे. '

बादशहाचें कोंवळें मन विरघळलें. तो ह्मणाला, ' हुसेन, तुला वजिरी देण्याचें माझ्या मनांत नाहीं असें तूं समजूं नकोस. तूं मोहिमेवर जातास तर तुला मी वजीर केलें असतें. तूं स्वामीनिष्ठ आहेस हें मला सांगायला कशाला पाहिजे ? कांहीं चिंता नाहीं. तुझ्या इच्छेप्रमाणें मुरारराव येईपर्यंत मी तुला वजीर करितों. उद्यां दरबारांत तुला वजिरी मिळेल. '

आपले मजवर फार उपकार आहेत, अशी मुद्रा हुसेननें दर्शविली. पण त्याला अंतर्यामीं काय वाटत होतें हें सांगणें कठीण आहे!

हुसेन मग बादशहाचा निरोप घेऊन घरीं गेला. घरीं गेल्यावर एका गादीवर अंग टाकून तो विकट हास्य करून ह्मणाला, 'कुच फिकिर नाहीं. बसंजीला सुळीं द्याव्याचा हुकुम होईल अशी अटकळ होती ती चुकली. तरी चिंता नाहीं. वजिरी तर हातीं आली!'

दुसऱ्या दिवशीं एक पत्र लिहून, त्यानें तें ममाऊद ह्मणून एका विश्वासू सेवकाजवळ दिलें, व त्याला हलक्या स्वरांत कांहीं सांगितलें. मसाऊद पत्र घेऊन एका खंद्या घोड्यावर स्वार झाला; व त्यानें घोडा भरधांव सोडिला!

प्रकरण ९ वें.

मोहिमेकडील वार्ता.

मुरारराव प्रियेचा निरोप घेऊन निघाले. बागलाण प्रांताची हद्द संपेपर्यंत निजामशाहीच असल्यामुळें, त्यांस कांहीं अडथळे आले नाहींत. पुढें खानदेश लागल्यावर मात्र त्यांना बऱ्याच लढाया माराव्या लागल्या. हा खानदेश प्रांत त्यावेळीं नेहमीं स्वतंत्र असे. ह्यांत अनेक राज्यें असून तीं एकमेकांपासून स्वतंत्र असत. तेथील राजे बहुतेक भिल्ल जातीचे होते. त्या वेळीं बलाढ्य आणि सार्वभौम ह्मणून गाजणाऱ्या सर्व राजांच्या आटोक्याच्या बाहेर हा डोंगराळ प्रदेश असे. दिल्ली, अहंमदनगर, गुजराथ, आणि चांदा (वऱ्हाड) हीं त्यावेळीं फारच प्रख्यातीस आलेलीं राज्यें होतीं. ह्यापैकीं प्रत्येकाच्या हद्दीवर हा प्रांत असल्यामुळें ह्याला कोणीही जिंकून घेई. पण तो जिंकून घेणारा परत गेला कीं, हे भिल्ल राजे पुन्हां स्वतंत्र ते स्वतंत्रच! ह्यामुळें खानदेश जिकण्याच्या भरीस कोणी फारसें पडत नसे. मुराररावांनीं सर्व प्रांत जिंकल्यावर अशीच स्थिती व्हावयाची. पण त्यांनीं मुळीं तेथें आपलें ठाणेंच दिलें. सर्व प्रांत जिंकल्यावर मुराररावांनीं आपल्या सैन्यांत भिल्ल लोकांची भरती करण्यास सुरुवात केली. त्यांची वाणी गोड,

वर्तन सभ्य व भारदस्त, आणि स्वभाव मनमिळाऊ असल्यामुळें, त्यांनीं जणूं काय त्या आडाणी लोकांस भारून टाकल्याप्रमाणें, ते सर्व सैन्यांत येऊन मुराररावांजवळ इमानेंइतबारें वागण्याच्या शपथा घेऊं लागले. सर्व भिल्ल राजेही निजामशाहीचें मांडलिकत्व पत्करून, मुराररावांस वेळप्रसंगीं मदत देण्याचीं अभिवचनें देऊं लागले. ह्यावेळीं दिल्लीचा सेनापती कुतुबशहा हा बुंदेलखंडांतच होता. मुराररावांनीं सातपुडा ओलांडून नर्मदाकांठीं छावणी केली. कुतुबशहाला गुजराथेंतून किंवा वऱ्हाडांतून येतां येऊं नये, ह्मणून त्यांनीं त्या दोन राजांशीं दोस्तीचा तह केला व ' आह्मी कुतुबशहाला आमच्या राज्यांतून निजामशाहीवर येऊं देणार नाहीं, ' असें त्यांजवळून वचन घेतलें. त्याबद्दल नर्मदेच्या पलीकडचा मुलूख नवा जिंकून, त्यापैकीं कांहीं त्या दोघांस देण्याचें कबूल केलें. असें झालें ह्मणजे कुतुबशहा परत तरी जाईल, किंवा आलाच तर खानदेशांतच येईल. त्याला अडवावयास आपण आहोंतच. आपल्याला येथेंच (नर्मदेच्या अलीकडे) राहिलें ह्मणजे भिल्ल लोकांची आपल्या सैन्यांत हवी तेव्हां भरती करितां येईल. येथें दाणापाणीही भरपूर मिळेल. अडचण आलीच तर सातपुड्यांत शत्रूचें चांगलेंच चंदन करितां येईल. शिवाय अहंमदनगराहून आपल्याला मदतही चांगली मिळत जाईल. असा मनसुबा करून मुराररावांनीं नर्मदा कांठीं रामगड येथें छावणी दिली. त्यांनीं आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एक भाग रामगडास ठेवावा. व दुसऱ्याच्या अनेक टोळ्या करून त्यांना सर्व मोंगल राज्यांत संचारार्थ पाठवाव्यात; व त्यांनीं दिल्लीपर्यंत सर्व मुलूख हैराण करावा आणि कांहीं आपल्या ताब्यांतही आणावा. असा बेत करून त्यांनी तो लागलीच अमलांतही आणला.

दोनप्रहरची वेळ. ऊन अगदीं कडक पडलें होतें. ह्यावेळीं रामगड येथील छावणींत अगदीं सामसूम होते. बहुतेक लोक आपल्या डेऱ्या राहुट्यांत निद्रिस्त झाले होते. कांहींजण आपापलीं धर्मपुस्तकें वाचीत होते. कांहीं हलके हलके गप्पा मारीत होते. छावणीच्या मुख्य हिरव्या जरीच्या निशाणाजवळ भरजरीचा मोठा तंबू दिला होता. हें निशाण आणि तंबू हीं छावणीच्या मध्यभागीं उंचवट्यावर होतीं. त्यामुळें छावणीच्या कोणत्याही भागांतून तें फडफडणारें निशाण आणि तो भव्य तंबू हीं स्पष्ट

दिसत. निशाणाच्या भल्या मोठ्या हिरव्या फडक्यावर पांढरा चांद फार शोभत होता. निशाणाजवळ सशस्त्र लोक होते. त्यांतील कांहीं बसले होते. कांहीं तेथल्यातेथेंच फिरत होते. तेथून जवळच ह्मणजे ४०।५० कदमांवर तो तंबू होता. त्यांत मुदपाकखान्यासाठीं एक, धर्मकृत्यांसाठीं एक, निजण्यासाठीं एक आणि भेटी, मसलती ह्यांसाठीं एक, अशीं चार मोठालीं दालनें होतीं. पैकीं शेवटीं सांगितलेल्या खोलींत एका पलंगावर लोडाला टेकून मुरारराव सचिंत पडले होते. त्यांच्यापुढें पोथी असून तिचें एक पान त्यांच्या हातांत होतें. ते नांवाला मात्र त्या पानाकडे पहात होते, पण त्यांच्या डोक्यांत कांहींतरी निराळे विचार चालले होते. कांहींवेळानें पोथीचें पान खालीं ठेवून ते तंबूंतल्यातंबूंतच फेऱ्या घालूं लागले. ते चिंतायुक्त स्वरानें स्वतःशींच ह्मणाले, ' तुकाराम अति चपळ स्वार ह्मणून त्याला मुद्दाम पत्र देऊन पाठविलें. त्याला जाण्यास दोन, फार तर तीन दिवस, आणि येण्यासही तितकेच. ह्या मानाने तो परवांच यावयास पाहिजे होता; पण अजून त्याचा पत्ता नाहीं. वाटेंत तर तो कोठें विनाकारण खास थांबणार नाहीं. मग कां अद्याप आला नाहीं ? ' इतक्यावर बोलणें थांबवून ते तसेंच फेऱ्या घालीत राहिले. त्यांच्या डोक्यांत विचार चाललेंच होते. थोड्यावेळानें पुन्हां स्वतःशीं बोलूं लागले, ' ऊंः काळजी करण्याजोगें कांहीं नाहीं. तीच पत्र काय लिहावें ह्मणून विचारांत पडली असेल. त्यामुळें उलट उत्तर देण्यास उशीर झाला असेल. धोंडोपंतांनीही तुकारामाला ठेवून घेतलें असेल इकडची सविस्तर बातमी कळण्यासाठीं. येईल येवढ्या एकदोन दिवसांत. '

असे उद्गार काढून पुन्हां ते बिछान्यावर बसले. त्यांची चिंता बरीच कमी झाल्यासारखी दिसली. त्यांनीं पोथीचें पान हातांत घेतलें, तों त्यांच्या ध्यानांत—

> दौर्मन्त्र्यान्नृपतिर्विनश्यति यतिः संगात्सुतो लालना-
> द्विप्रोऽनध्ययनात्कुलं कुतनयाच्छीलं खलोपासनात् ।
> ह्रीर्मद्यादनवेक्षणादपि कृषिः स्नेहः प्रवासाश्रयात्
> मैत्री चाप्रणयात्समृद्धिरनयात्त्यागात्प्रमादाद्धनम् ॥

हा भर्तृहरीचा श्लोक आला. तेव्हां ते मनाशीं ह्मणाले, ' ह्या श्लोकांतील सर्व गोष्टी खऱ्या आहेत. पण एकठिकाणीं बरीक तो चुकला असें ह्मणावें

लागतें. दुर्मंत्री असले ह्मणजे राजाचा नाश होतो. ह्याला उदाहरण माजी निजामशहा व ह्याच्या उलट ह्मणजे हल्लींचे निजामशहा. बाबासाहेब (साबाजीपंत), महंमदखान, मुजफरजंग, वगैरे सुमंत्री मिळाल्यामुळें निजामशाहीची भरभराट होऊन, मनसूरअल्ली शहाचा नावलौकिक झाला. ह्याचप्रमाणें सगळ्या गोष्टी. पण ' स्नेहःप्रवासाश्रयात् ' हे शब्द त्यानें कसे घातले कोण जाणे! स्नेह—मात्र तो दृढतर झाला असला पाहिजे—प्रवासामुळें नाहींसा होणारा नसून वाढणारा आहे. मीच पहाना! तिच्यापासून इतका दूर आहे, तरी माझें तिच्यावरील प्रेम तिळभरही कमी झालें नाहीं. तिचीही स्थिति अशीच असेल. बरें, माझा मित्र शंकर नेहमीं सातार्‍यास रहातो; मी अहमदनगरीं रहातों. ही नेहमींची स्थिति. तरी आमचें मित्रत्व कधीच कमी झालें नाहीं. मग तें आतां प्रवासात असता तरी कसें कमी होईल! ' येथें मुरारराव थांबले. बराच वेळ ते स्वस्थ बसले. शंकररावाची आठवण होताच त्यांच्या मनाला एकप्रकारची शांतता वाटली. बाळपणीं त्याच्याबरोबर ज्या क्रीडा केल्या त्या त्यांना आठवल्या. त्यानंतर नेहमीं हास्यमुखी असणारी कमला, त्यांच्या अंतश्चक्षुपुढें उभी राहते न राहते तोंच इंदिरेची रमणीय मूर्ती त्यांना दिसूं लागली. त्यांच्या मनाला अनुपम आल्हाद वाटूं लागला व त्यांच्या तोंडांतून सहजपणें खालील उद्गार निघून गेले.

' प्रिये, विरहानलानें मला जशी पीडा होत आहे, तशी तुलाही होत असेल. मी जसा तुझ्या पत्राची नेहमीं वाट पहातों, तशी तूंही पहात असशील. मी जसा तुझ्या आरोग्याबद्दल आणि नीतीनें वागण्याबद्दल देवाची विनंति करितों, तशी तूंही करीत असशील. तूं खरी आर्यस्त्री आहेस. तुझें मन सुसंस्कृत झालेलें आहे. तूं देवाला भिणारी आहेस. तुझें मजवर पूर्ण प्रेम—नव्हे भक्ति, निष्ठा आहे. तुजबद्दल संशय घेणें देखील रास्त नाहीं. वास्तविक तुला सोडून यणें योग्य नाहीं. पण स्त्रीच्या सहवासांत राहण्यापेक्षां स्वदेशासाठीं, स्वराज्यासाठीं, हातावर शिर घेऊन, आपल्या युद्धचमत्कारानें, रणकौशल्यानें, शत्रूंस दे माय धरणी ठाय करणें, हेंच आह्मा हिंदुवीरांना अधिक प्रिय आहे. कोठेंही दोन हात करण्याचा प्रसंग आहे असें कळलें कीं, आह्मांला घर सुचत नाहीं, दार सुचत नाहीं, फार काय पण घरात जेवणें देखील बरें वाटत नाहीं! '

मनुष्यस्वभाव मोठा चमत्कारिक आहे. त्याला कधीं अश्लाघ्य कृत्य करण्याची सुरसुरी येते; तर एखादेवेळीं अगदीं शुद्धपणें वागण्याचा तो निश्चय करितो. कधीं कधीं त्याला अनावर आळस येतो; तर कधीं त्याच्या शरीरांत अनावर वीरश्रीचा संचार होतो. अशावेळीं त्याच्या मनोवृत्ती बेफाम होऊन त्याला कांहींच सुचेनासें होतें. मुराररावांसही ह्यावेळीं खूप वीरश्री आली. ते खरे वीर होते. त्यांची वीरश्री पोकळ नव्हती. लढाई त्यांच्या हातावरचा मळ होता. तरवार त्यांची अर्धांगी होती. लढाईचें रम्य चित्र त्यांच्यापुढें उभें राहिलें. इंदिरेचें त्यांना पूर्ण विस्मरण झालें. ह्या मोहिमेंत आजवर ज्या लढाया मारल्या त्यांचे स्मरण होऊन, आपण चुकलों कोठें, आपलें करणें यथायोग्य कोठें होतें, वगैरेचा ते विचार करूं लागले. बराच वेळ असा विचार करितां करिता मोंगलासंबंधीं विचार त्यांच्या मनांत आला व ते मोठ्यानें ह्मणाले, ' आज दिल्लीचें साम्राज्य केवढें बलिष्ठ ! काबूलपासून तों तहत माळव्यापर्यंत आणि सिंधू नदीपासून बंगाल्यापर्यंत सर्व मुलख त्या साम्राज्यांत मोडतो. महान् महान् शूर रजपूत, अफगाण वगैरे लोक दिल्लीच्या राजास शरण गेले. त्या बादशहाच्या सेनापतीस जिंकलें तर केवढी कीर्ति होईल, आणि निजामशाहीची किती भरभराट होईल ! ' इतकें ह्मणून ते स्वस्थ बसले. त्यांना बराच उल्हास आला. मनुष्य कांहीं विचार करीत असतां, आरंभीं जरी तो खिन्न असला तरी विचारांतर होतां होतां शेवटीं त्याला अगदीं उल्हास येतो, असें कधीं कधीं घडते. तोच प्रकार मुराररावांचा झाला. ते तंबूच्या दारांतून दिसणाऱ्या डोंगराकडे शून्य मनानें एकसारखें पहात होते. इतक्यांत द्वाररक्षकानें येऊन ' तुकाराम आला आहे ' असें सांगितलें त्याबरोबर एकदम खडबडून उठून ते ह्मणाले ' त्याला आंत पाठवून दे. जा. ' हुजऱ्या गेला व थोड्याच वेळांत तुकाराम आला. तो दारांत आलेला पहातांच ते जागेवरून उठून एकदम ह्मणाले, ' आण. ते पत्र आण आधीं. मग काय विचारावयाचें तें विचारीन. '

' धनीसाहेब पत्र मिळालें नाहीं— मी '

तुकारामाचे हे शब्द ऐकून, ते विरमून जागच्याजागींच उभे राहिले. तुकारामालाही नेहमीं गंभीर असणाऱ्या मुराररावांची ही उतावीळ पाहून आश्चर्य वाटलें. पण कोणालाही आमिष्टांच्या पत्रांबद्दल आदरच असतो,

असेंही लागलीच त्याच्या लक्ष्यांत येऊन त्याचें आश्चर्य नाहींसें झालें. आपला मित्र आज अगदीं येणारच, अशी खात्री धरून एखादा मनुष्य स्टेशनावर जाऊन बसला, परंतु, त्यावेळच्या आगगाडींत त्याचा मित्र आला नसला, तर त्या मनुष्याची जशी निराशा होते, त्याचप्रकारची निराशा ह्यावेळीं मुराररावांची झाली. ते आश्चर्यानें ह्मणाले, ' पत्र मिळालें नाहीं ? तूं तेथें गेला तरी होतास कां ?' ' महाराज हकीकत बरीच मोठी आहे. ती तुह्मी सावकाशपणें ऐकून तर घ्याल ? '

' सांग सांग लवकर काय आहे ती ! ' असें ह्मणून ते बिछान्यावर जाऊन बसले. तुकारामानें त्याच्या देखत गडावर व वाटेंत घडलेली हकीकत इत्थंभूत सांगितली व शेवटीं ह्मणाला, ' मी वाटेंत धोंडोपंतांपासून पळाल्यावर गडावर गेलों. जिवाजीपंतास शपथा घालून खरी हकीकत सांगितली. पण त्यांना मुळींच कांहीं खरें वाटलें नाहीं. ते ह्मणाले, धोंडोपंतापेक्षां मला तुझा अधिक विश्वास मुळींच येत नाहीं. त्यांनींच मला सांगितलें कीं, तुकाराम अलीकडे हुसेनच्या चाकरीस राहिला आहे; त्याचा इंदिरेला हुसेनकडे नेण्याचा बेत आहे. ' मी त्यांची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण शेवटीं त्यांनीं मला हांकून देण्याची धमकी घातल्यामुळें निरुपायानें खालीं आलों. माझ्या एका भिल्ल दोस्तास ही हकीकत शंकररावांना कळविण्यास पाठविलें आणि त्वरेनें मी इकडे आलों. ' इतकें बोलून तो स्वस्थ उभा राहिला.

मुरारराव तुकारामाचें बोलणें अगदीं शांतपणें ऐकून घेत होते. ते वरकांतीं शांत दिसत होते; पण त्यांच्या अंतःकरणांत आश्चर्य, संताप, खेद इत्यादि मनोविकारांची सारखी खळबळ होऊन राहिली होती. धोंडोपंतांनीं इंदिरेला आपणास न कळवितां अहंमदनगरीं नेलें, ह्याचा त्यांना फार संताप आला. ते बेभान झाले. त्यांनीं मनांत ह्मटलें, ' हरहर ! आताच मी भर्तृहरीला, ' स्नेहप्रवासाश्रयात् ' ह्याबद्दल चुकीचा ठरविलें ! पण हे सर्वज्ञ राजा, तुझें ह्मणणें सत्य आहे. अशी माझी धोंडोपंताच्या वर्तनावरून खात्री झाली ! धोंडोपंत ! आजपर्यंत तुमच्यावर वडीलभावाप्रमाणे प्रेम ठेविलें—विश्वास ठेविला आणि तुह्मी माझा असा घात करावा ? तुह्मी हाल सोसावयाचे होते. प्रसंगीं प्राणही द्यावयाचें होतें. पण त्या निरापराध अबलेला त्या

कसाईखान्यांत पाठवावयाचें नव्हतें. मी तुमचा धाकटा भाऊ, ह्या दृष्टीनें असें करणें तुमचें कर्तव्यच होतें. बरें मासें राहो. पण एका निरपराध तरुणीचा संकटांतून बचाव केल्याबद्दल तुह्मांला पुण्य लागलं असतें. लहानपणापासून तुह्मी आमच्या येथें राहिलांत. तुह्मांला आमची कांहीं देखील कळकळ असूं नये ? —बादशहा—अहो, तुह्मी आमचे वडील ना ? मग मुलीबद्दल आपणांस पापवासना कशी उत्पन्न झाली ?—कामवासना भयंकर आहे. तुह्मी बादशहा झाला ह्मणून तिला काय परवा आहे ? तिनें तुमच्यावरही पगडा बसविलाच ! ' मुरारराव भांबावून गेले. इंदिरेची रमणीय मूर्ति त्यांच्यापुढें उभी राहिली. तिच्या गुणांची त्यांना आठवण झाली. तिचें सुंदर रूप त्यांना दिसूं लागलें. अशी गुणसुंदरी आपणांस अंतरली; येवढेंच नव्हें, तिच्या आकस्मिक मरणास आपण कारण होणार — कारण ती आतां प्राणत्याग केल्याखेरीज रहाणार नाहीं — ह्याचें त्यांना फार वाईट वाटलें. तिला बादशहाकडे नेलें आहे. मग फिर्याद तरी कोठें करावयाची ? बरें कांहीं बळाचा चमत्कार बादशहाला दाखवावा तर आजपर्यंतची आपल्या कुळाची ' स्वामीनिष्ठ ' ह्मणून जी ख्याती आहे तिला हरताळ लागणार ! मग करावें तरी काय ? असा त्यांना प्रश्न येऊन पडला. पण कांहीं सुचेना. इंदिरा आपखुषीन तर गेली नसेल ? असें क्षणभर त्यांच्या मनांत आलें. पण तुकारामानें जी हकीकत सांगितली, तीवरून तसे घडणें शक्य नाहीं असें लागलीच त्यांच्या लक्ष्यांत आलें. त्यांचे विचार वाढत चालले. त्या विचारांचा अंतही होईना. तेव्हां विचार दाबून टाकून त्रासिक स्वरानें ते ह्मणाले, ' कायरे, पण ही गोष्ट खरी आहे कां अगदीं ? '

' धनीसाहेब, मी आणखी कशी खात्री करून देऊं ? बाईसाहेब अहंमदनगरीं जावयास निघालेल्या मी प्रत्यक्ष पाहिल्या. माझ्यावरील तुमचा विश्वास देखील नाहींसा झाला ? '

मुररारावांनीं त्याला अधिक न बोलूं देतां बादशहास एक पत्र लिहिलें. त्यांत सौम्यपणानेंच बादशहाची खूप कान उघाडणी केली होती. तें पत्र बंद करून ' हें पत्र बादशहाजवळ दे. जा. अगदीं जलद जा. ' असें ते ह्मणाले, व त्यांनीं तुकारामाच्या स्वाधीन तें केलें. इतक्यांत ' हुसेनखानाचा स्वार आला आहे ' अशी हुजऱ्यानें वर्दी दिली. व मुराररावांची त्याला आंत

आणण्यास परवानगी मिळाल्यावर तो स्वार आंत आला. तुकारामही मुरार-रावांस मुजरा करून चालता झाला. त्या मुसलमान स्वारानें तुकारामाकडे अगदीं चमत्कारिक रीतीनें पाहिलें. पण तें तुकारामाच्या किंवा मुराररावांच्या लक्ष्यांत आलें नाहीं. हा स्वार वाचकाच्या ओळखीचा आहे. मागील प्रकरणांत हुसेननें मसाऊदास पाठविलें असें आलें आहे. तोच मसाऊद हा आतां आलेला स्वार होय. त्यानें मुराररावांस तीनदा लवून मुजरा करून त्यांच्या हातांत एक पत्र दिलें. त्यांनी तें फोडून वाचलें. त्यांत ' मला आपण येईपर्यंत वजीर नेमलें आहे. धोंडोपंताचें सप्तशृंग गडावरून सर्वत्र मंडळी खुशाल असल्याचें पत्र आलें. ' इतकाच महत्वाचा मजकूर होता. हें पत्र वाचून तर ते अधिकच बुचकळ्यांत पडले. तुकाराम आपल्या विश्वासाचा. तो सांगतो कीं धोंडोपंतानीं इंदिरेस अहंमदनगरीं नेलें. आणि हुसेन लिहितो कीं, धोंडोपंत सर्व मंडळीसह सप्तशृंगास खुशाल आहेत ! तेव्हां खरें काय समजावें ? तुकारामाचें ह्मणणें खरें धरावें, तर हुसेन असें कसें लिहील ? धोंडोपंताचा ओढा नूरजहानकडे असल्यामुळें, त्यांनीं हुसेनला खुशाली खरोखरच कळविली असेल ! त्यानें तें आपणास लिहीलें. असा विचार मनांत येऊन त्यांना हुसेनचें ह्मणणें खरें वाटलें. व तें वाटल्यावर बादशहाला आपण पत्र पाठविलें हें योग्य केलें नाहीं असें त्यांना वाटं लागलें. पण उपाय काय आतां ? तुकाराम तर बराच दूर गेला असेल. शिवाय तो कोणत्या रस्त्यानें गेला आणि कोणत्या नाहीं हें तरी कसें समजावें ! अर्थात् तें पत्र बादशहाचे हातीं पडणार. असा विचार येऊन त्यांना पत्र धाडल्याचा फार पश्चात्ताप झाला. त्यांना असेंही वाटूं लागलें कीं यदाकदाचित् धोंडोपंतानीं तिला बादशहाकडे नेलें, तरी आपण रागाच्या भरांत त्यांना असें लिहिणें अनुचित होय. त्यांची इभ्रत केवढी ! ते आपले स्वामी, अर्थात् देव आहेत. ' ना विष्णुः पृथ्वीपतिः ' हें तत्व आपण कसें विसरलों ? त्याच्यासाठीं आपण हातावर शिर घेतलें ! आणि केवळ त्यांनीं स्त्रीचा अपहार केला ह्मणून त्यांची कानउघाडणी ? छे. हें अगदींच अयोग्य. आपली स्त्री पतिव्रता असली तर मरेल—मेली तरी पतीसाठींच मरेल ना ? मग तिला चांगली गती मिळालीच पाहिजे. बरें, ती पतिव्रता हिंमतवान नसली तर तिला तें स्थान योग्यच आहे ! मग बादशहास दोष देण्यांत काय अर्थ आहे ? '

प्रिय वाचक ! ह्या ठिकाणीं मुराररावाची ही स्वामीभक्ती पाहून तुह्मांला हसूं येईल. पण त्यांना स्वामीभक्तीचें बाळकडूच इतकें तीव्र पाजलें गेलें होतें कीं धन्यासाठीं आपल्या कुळाची राखरांगोळी झाली तरी हरकत नाहीं पण धन्याची एकनिष्ठपणें सेवा केलीच पाहिजे. अशी त्याची बळकट समजूत झाली होती. ही गोष्ट लक्ष्यात घेता त्याचे हे विचार वाईट होते असें तुह्मालाही ह्मणता येणार नाहीं ! असो.

सरतेशवटीं त्यानीं हुसेनच्या पत्राचें उत्तर लिहून तें मसाऊद जवळ दिलें. मसाऊद तें पत्र घेऊन मुराररावास मुजरा करून अश्वारूढ झाला. व छाती फुटेल इतक्या वेगानें त्याने घोडा काढला.

तो गेल्यावर ते पुन्हा विचारमग्न झाले. हुसेन आपल्याशीं द्वेष तर करीत नसेलना ? जर करीत असला तर मी इकडे स्वस्थ रहावें ह्मणजे तिकडे बादशहाचें काम बिनबोभाट होईल; ह्या हेतूनेंही तो मला असें लिहील असें संभवतें ! पण हुसेन आपला द्वेष काय ह्मणून करील ? आपण त्याचा काय अपराध केला आहे ? असेंही त्याना वाटलें शेवटीं, वजिरी मिळाली ह्मणून आनंदात त्यानें हें पत्र लिहिलें झालें ! अशी त्यानीं मनाची समजूत करून घेतली. थोडक्याच वेळात तुकारामास परत आणण्यासाठीं त्यानीं सगळया रस्त्यांकडे स्वार रवाना केले.

प्रकरण १० वें.

दोघा स्वारांची भेट.

मसाऊद एका हमरस्त्यानें वेगानें चालला होता. त्याला छावणी एका क्षणात दिसेनाशी झाली. त्यानें वाटेंतील ओढे ओलांडले कित्येक नद्या ओलांडल्या, पुष्कळशीं खेडींही ओलांडिलीं तरी त्याच्या घोड्याचा वेग कायमच होता. सुमारें एक तास दीड तास ह्याप्रमाणें गेल्यावर घामघूम झालेल्या घोड्यावरून खालीं उतरून लघुशंका करीत असलेला तुकाराम त्याच्या दृष्टीस पडला. त्याबरोबर त्यानें आपला घोडा थांबविला, आणि तो आपल्या तोंडावरील घाम पुसूं लागला. तुकाराम लघुशंका आटपून मसाऊ-

दास ह्मणाला, ' कां मसाऊदमिया ! येवढया वाईनें घोडयाला टांच मारिली ? '

मसाऊदानें त्रासल्यासारखें करून, उसासे टाकीत उत्तर दिलें, ' अरे बाबा, केवळ तुला गांठण्यासाठीं ! '

' काय मला गांठण्यासाठीं ? आमच्या धनीसाहेबांनीं कांहीं निरोप सांगितला वाटतें ? ' तुकाराम आश्चर्यानें ह्मणाला.

' तुझ्या धनीसाहेबांनीं तर नाहीं सांगितला, पण माझ्या धन्यानें (हुसेननें) बरीक सांगितला आहे. '

' काय खानसाहेबांनीं मला निरोप सांगितला ? नीट आठवण कर. आमच्या धन्यांनाच्या सांगितला असेल. '

' अरे नाहीं बाबा तुलाच ! ' त्रासून ह्मणाला.

' त्या झाडाखालीं चल ह्मणजे तुला सांगतों सगळे. '

' मला जरूरीचें काम आहे. बसायला मुळींच वेळ नाहीं.

' मोठा आला कामाचा. अरे, विचार कर. निरोप कोणाचा आहे ? बादशहाच्या गळ्यांतील ताईत, मुरारराबाचे प्राणप्रिय दोस्त, वजीर हुसेनखान, ह्यांचा निरोप. आणि तोही तुजसारख्या यःकश्चित मनुष्यास ! अरे, खानसाहेबाचा एक शब्द ह्मणजे केवळ देवाचा प्रसाद असें आह्मी समजतों. '

शेवटीं तुकाराम बसावयास एकदाचा कबूल झाला. ते दोघेही घोडयास मोकळें सोडून एका झाडाखालीं जाऊन बसले. मग मसाऊद हास्यमुद्रा करून ह्मणाला, ' कायरे, तुकाराम तुला एक गोष्ट विचारली तर राग नाहींना येणार ? '

' राग येण्यासारखी नसली तर मला राग काय ह्मणून येईल ? पण अशी गोष्ट आहे तरी कोणती ? '

' तुझी धनीण कशी काय आहे ? '

' हात्तिच्या, कशी ह्मणून काय विचारतोस ? रूपानें ह्मणत असशील, तर अशी सुंदर बाई आपण तर कांहीं पाहिली नाहीं बुवा ! गुणासंबंधीं ह्मणत असशील, तर इतकी दयाळू, शहाणी, मोकळ्या मनाची, पतिव्रता आणि शिकलेली बायको तीच. नेहमीं बिचारीचें हंसें तोंड. आमच्या

धनीसाहेबांचा आणि तिचा जोडा कसा रामसीतेप्रमाणें शोभतो ! जन्मास यावें आणि ह्या मनुष्यरूपी देवांची सेवा करावी !'

आपणांस एखादी गोष्ट आवडत असली ह्मणजे आपण तिचें वर्णन कोठेंही आणि केव्हांही फार चांगल्या रीतीनें करूं शकतों. तीच स्थिति तुकारामाची होती. त्यांची ह्या तरुण दांपत्यावर अतोनात भक्ति होती. भगवद्भक्तांस केव्हांही ईशलीला वर्णन करण्याचा प्रसंग येवो, ते अगदीं प्रेमानें त्या वर्णन करितात. तुकारामही तितक्याच प्रेमानें इंदिरेचें वर्णन करीत होता. त्यामुळें त्याच्या भाषणांत इतकें माधुर्य आलें होतें कीं, मसाऊदासही इंदिरेबद्दल पूज्यबुद्धी उत्पन्न झाली.

येथें मसाऊदला तुकारामास भेटण्याची येवढी उत्कंठा कां होती हें सांगितलें पाहिजे. ह्मणजे त्यांच्या पुढील संवादाचा संदर्भही कळेल.

हुसेनचें जें विश्वासू सेवकमंडळ होतें ह्मणून मागें सांगितलें आहे त्यांतीलच मसाऊद हा होय. हाही केवळ विश्वासू नसून चतुर, समयसूचक आणि हुसेनचा कट्टा भक्त होता. मसाऊदला इतक्या तातडीनें पाठविण्यांत हुसेनचा असा हेतु होता कीं, आपणांस वजिरी दिली हें ऐकतांच मुरारराव जयप्राप्तीबद्दल ज्यास्त प्रयत्न करतील; त्यामुळें इंदिरेकडे त्यांचें फारसें लक्ष्य जाणार नाहीं. अर्थात् आपल्यालाही इकडे कांहीं अडथळा येणार नाहीं ! आणखी कदाचित् कोणा एखाद्या माणसास आपला कावा समजून त्यानें ही गोष्ट मुराररावांस कळविली असेल, किंवा पुढें कळवील तर आपल्या पत्रामुळें त्यांचा त्याच्यावर विश्वास बसणार नाहीं. निदान ते घोंटाळ्यांत तरी पडतील. कारण त्यांचा आपल्यावर—त्यांचा मित्र, हितचिंतक ह्मणून चांगला विश्वास आहे. आपला हेतु सिद्धीस जावा ह्मणून त्यानें मसाऊदला धाडतेवेळीं असें सांगून ठेविलें होतें कीं, 'कसेंही करून मुरारराव तिकडे स्वस्थ रहातील असें कर.' मसाऊदही कमी चाणाक्ष नव्हता. तुकारामाला पाहिल्याबरोबर ह्याला गडावरील बातमी कळली असावी असा मसाऊदनें तर्क केला. कारण तुकारामाच्या चेहऱ्यावरून आणि पोषाखावरून, तो नुकताच कोठून तरी लांबून आला असावा असें त्याला नक्की वाटलें. आणि मुराररावही खिन्न दिसले. त्यानें पत्र दिल्यावर ते कितीवेळ तरी विचार करीत होते. ह्या गोष्टींनीं तर मसाऊ-

द्राची खात्रीच झाली. तुकारामाची व त्याची ओळख होती कारण त्या दोघां-सही एकमेकांच्या धन्याकडे पुष्कळदा जाणें पडे. तुकारामास त्याच्या धन्याचा आणि धनिणीचा तिरस्कार उत्पन्न करावयाचा; त्याला आपल्या-कडे मिळवून घ्यावयाचा; आणि त्याच्याच कडून इंदिरा गडावर सुखरूप आहे अशी मुराररावाची खात्री करावयाची असा बेत करून ममाऊदानें तुकारामास इंदिरेसंबंधीं वरील प्रश्न केला. तुकारामानें तिचें वर्णन केल्यावर तो शांतपणानें ह्मणाला, ' तूं तुझ्या धनीणीची येवढी प्रशंसा करितोस; पण ती तर अगदीं दुराचारी आहे ! '

तुकाराम त्वेषानें ह्मणाला, ' काय ? माझी धनीण दुराचारी ? बोला-यला काहीं तरी शरम ! बरें, असू दे असं ती तर. तुला काय करावयाचें आहे ? हेंच जर मला विचारावयाचें असेल तर मला अगदीं मुळींच वेळ नाहीं. ' असें ह्मणून तो उठूं लागला. ममाऊद त्याला खालीं बसवून ह्मणाला, ' हें पहा दोस्त ! एखाद्या गोष्टीबद्दल फाजील विश्वास नाहीं कामाचा. तू तुझ्या धनिणीची भारी शेखी मिरवतोस; ती ह्मणजे केवळ देवता असें समजतोस; पण बाबा, ती आमच्या खानसाहेबास लागूं आहे. तुला काय सागूं ? तिच्या त्यांना प्रेमपत्रिका येतात. त्यांच्या तिला जातात. आहे कीं नाहीं मजा ? अन ह्मणे तिच्या इतकी पतिव्रता तीच ! '

तुकाराम आश्चर्यानें गुंग झाला. इंदिरा दुराचारी ? तिची हमेनखानास पत्रें जातात ? त्याचीं इला येतात ? असं कसें होईल ? छे. हें सर्व खोटें आहे. असें कालत्रयीं घडणार नाहीं. असं तुकारामास वाटलें. त्याला मुरार-राव आणि इंदिरा ह्यांच्या अपसांतील प्रेमाची इतकी खात्री होती कीं मसा-ऊदचें ह्मणणें त्याला मुळींच खरें वाटलं नाहीं ! तो ह्मणाला, ' अरे, आहेच ती पतिव्रता. तूं सांगतोस हें सगळं खोटें आहे. गंगा समुद्राला सोडून सरो-वराला कधीं तरी मिळेल ? ' मुरारराव आणि इंदिरा ह्यांजबद्दल तुकारामाला जी पूज्यबुद्धी वाटते ती कोणत्याही गोष्टीनें नाहींशी होऊन तो आपल्याकडे वळेल ही गोष्ट अशक्य आहे अशी मसाऊदची खात्री झाली. तेव्हा त्यानें तुकारा-मास आपल्या पक्षाकडे वळविण्याची दुसरीच युक्ती योजिली. तो ह्मणाला, ' बरें, तें असो. पण तुला आता असें सांगावयाचें आहे कीं, आमचे धनी-साहेब झाले आहेत आता वजीर. त्यामुळें वजिरास शोभेलसा कोणीतरी

चतुर हुजऱ्या पाहिजे. आह्मी सगळे पुढें करूं लागलों. पण काय चमत्कार पहा ! त्यांनीं आह्मां सर्वांस साफ सांगितलें कीं, ' ' मुराररावांच्या पदरीं तुकाराम आहे; तसा तुमच्यांत मला एकही दिसत नाहीं. त्यालाच मी हुजऱ्या करणार. आणि त्याला पगारही भरपूर, ह्मणजे दरमहा शंभर मोहरा देणार ! ' तुझी खूप लाट होईल बुवा तूं हुजऱ्या झालास तर !. पण कायरे, तुझी त्यांना येवढी माहिती तरी कधीं झाली ? पण आतां मागें पुढें मुळींच पाहूं नकोस बरें का ? अरे, पैसे कितीतरी मिळणार ! पुन्हां वजिराचा सेवक ह्मणून घरीं दारीं मान हा ठेविलेलाच ! हो. मोठ्याचें कुत्रें देखील मोठेंच. त्याला देखील लोक मान देतात, तर तूं तर काय ? आवडता सेवक ! '

द्रव्यलोभ मोठा कठिण आहे. तुकारामास मसाऊदाचें हें बोलणें ऐकून मोह पडला ! शंभर मोहरा दरमहा ! ! अबब ! तो दिपून गेला. आपण पत्करावी ती चाकरी, असें त्याच्या मनांत येऊं लागलें. इतके चाकर पदरीं असतां हुसेनला आपणच पसंत पडलों ह्याचा त्याला फार आनंद आणि अभिमान वाटला. आणि हुसेनबद्दल त्याच्या मनांत आदरही उत्पन्न झाला. ही नवीन चाकरी पत्करावी किंवा न पत्करावी ह्याबद्दल विचार त्याच्या मनांत घोळूं लागला. मसाऊद मधून मधून त्याला उत्तेजनपर शब्द बोलतच होता. अशा स्थितींत थोडा वेळ गेला नाहीं, तोंच तुकारामापुढें इंदिरेची हास्यमुखमूर्ती आणि मुराररावांची सतेज व गंभीरमूर्ती दिसूं लागली. त्याबरोबर त्याचा मोह पळाला. बाबासाहेबांपासून ज्या घराण्याची आजपर्यंत सेवा केली; येवढेंच नव्हे पण आपल्या बापजाद्यांनींही ज्याची पूर्वी सेवा केली, तें घराणें सोडण्याचा आपण विचार करीत होतों, हा विचार मनांत येऊन तो लाजला ! तो निश्चित स्वरानें ह्मणाला, ' मला नाहीं ती चाकरी पत्करत ! मुराररावांनीं मला काय कमी ठेविलें आहे तर मी तुमच्या खानसाहेबांची नौकरी धरूं ? मला मुराररावांच्या येथली मीठभाकरी पुरवली. पण दुसऱ्या कोणाचा मलीदाही नको ! '

मसाऊद निराश झाला. तुकाराम इतका स्वामीभक्त असेल असें त्याला वाटलें नव्हतें. आतां हा तर आपल्या पक्षाकडे वळतच नाहीं. तेव्हां मुरारराव स्वस्थ राहतील असें करण्याकारितां निराळीच युक्ती काढिली

पाहिजे असें त्याला वाटलें. तो थोडावेळ स्वस्थ बसला. पण तुकाराम उठूं लागला, हें पहातांच तो मोठ्यानें हंसून ह्मणाला, ' हं, हं, हं ! कशी मजा झाली. कायरे, तुला हें सगळें खरें वाटलें ? अरे, ही तर मी थट्टा केली ! तुझ्या धनिणीला मीं एकदांच पाहिलें, पण मला देखील वाटलें; कीं, ती एक देवताच आहे. तुझी तिच्यावरील आणि तुझ्या धन्यावरील भक्ति पहाण्याकरितांच केवळ मीं हा विनोद केला. धन्य आहे तुझी ! तू आह्मांला स्वामीभक्तीचा हा धडाच शिकविलास ! पण तुला निरोप राहिलाच सांगावयाचा ! '

' चल सांग लवकर. उशीर होतो. '

' सांगतों. पण मला आधीं हें सांग कीं, तुझी धनीण गडावरच आहे कीं नाहीं ? '

' तुला बुवा वायफळ गप्पा मारायची फारच संवय दिसते. मला आपला निरोप सांग कसा ! '

' अरे पण सांग तर खरा. मला तिच्या सेवेंत रहावयाचें आहे ह्मणून विचारितों. '

तुकाराम दुःखानें ह्मणाला, ' आपणां अभाग्यांना तिची सेवा कोठून लाभणार ! तिला त्या पाषाणहृदयी धोंड्यानें बादशहाच्या जनानखान्यांत नेलें ! '

हा गडावरून आला असावा ह्मणून जो आपण तर्क केला तो खराच ठरला असें मसाऊदला कळून आलें.

इंदिरेसंबंधीं ही तुकारामाची कल्पना पाहून मसाऊदला फार हसूं आलें. मुराररावालाही ह्यानें असेंच सांगितलें असेल असा त्यानें तर्क केला. तो हंसून ह्मणाला, ' तेवेळीं इंदिरा बादशहाकडे जात होती कां ? अरे मग ती सुटली. ती माझ्या देखत गडावर गेली !

' गडावर गेली ? कशावरून ? ' तुकाराम सानंदाश्चर्य ह्मणाला.

मी इकडे येताना माझा मामेभाऊ वणीस रहातो ह्मणून वणीला गेलों. तों वाटेंत धोंडोपंत आणि तो गधडा मुबारीक इंदिरेला घेऊन चाललेले आढळले. मी माझ्या मामेभावाच्या मदतीनें शंभर पाउणशें लोक जमा केले. आणि मुबारीक व त्याचे सांथीदार ह्यांवर हल्ला केला. मुबारीकला मी स्वत: ठार मारिलें तेव्हां त्याचे सांथीदार पळून गेले. मग मी धोंडोपंतांना

खूप खोचून बोललों. तेव्हा ते पश्चात्ताप पाऊन ह्मणाले, ' ह्या अधमाच्या (मुबारीकच्या) नादीं लागून, इंदिरेला नरकांत नेत होतों. पण ईश्वर तुझ्या रूपानें आड आला ! ' मग मी त्याना इंदिरेसह गडावर रवाना केलें ! '

तुकाराम अतिशय आनंदून ह्मणाला, ' अगदीं खरेंना पण हें ? '

' हे अगदीं खरें. एक अक्षरही ह्यांत खोटें नाहीं ! मला वाटलें इंदिरेला मुराररावांनीं आपल्या जवळ आणिलें असेल, ह्मणून मी ' इंदिरा गडावरच आहे का ? ' ह्मणून तुला प्रश्न केला ! पण कायरे, तुझ्या धन्याला हें कळलें असेल ? '

तुकाराम कळवळून ह्मणाला, ' अरे हेरे ! ते विनाकारण तळमळताहेत. मी आता तूं सांगितलेली बातमी कळवितो त्याना. ' असें ह्मणून तो उठला.

मसाऊद कळकळ दाखवून ह्मणाला, ' त्यांना ह्मणावें, तुह्मी अगदीं काळजी करूं नका. इंदिरा सुखरूप आहे ! '

तुकाराम आठवल्यासारखें करून ह्मणाला, ' अरेहो. निरोप तर नाहींच सांगितलास ! '

' अं: त्यात कांहीं महत्वाचें नाहीं. आमच्या धन्याच्या पदरीं तो मुबारीक होता. तो तुला माहितच आहे. त्यानें नूरजहानसाहेबास एका हलकट श्रीमान् व्यापाऱ्याकडे पळवून नेण्याचा प्रयत्न केला. तो उघडकीस आला. खानसाहेबांनीं त्याला हाकून दिलें ! तरी तो दुष्ट इंदिराबाईसाहेबांस गोत्यांत घालावयास गेलाच. पण शिवा ! अशानें.चें वर्तन कोणी करूं नये, असें त्यांनीं आह्मास सक्त फर्माविलें. ' व मुराररावाच्या चाकरासही तसेंच सांगा, ' ह्मणून आज्ञा केली. आमच्या धन्याचा आणि मुराररावांचा स्नेह किती आहे, हें तुला ठाऊकच आहे. तूं भेटलास ह्मणून तुला सांगितलें झालें ! '

' हात्तिच्या, एवढया निरोपाकरिता इतका वेळ घेतलास ' ? तुकाराम घोड्यावर बसत ह्मणाला.

' अरे, आपणा चाकर लोकास गप्पागोष्टी करण्यास तरी वेळ कधीं मिळावा !' मसाऊदहि घोड्यावर उडी मारून बसून ह्मणाला. तुकाराम घोड्याला टाच मारण्याचे आधीं घाईने ह्मणाला, ' पण तूं आज एक मोठें कार्य केलेंस. तुला आमच्या धन्याकडून बक्षीस मिळेल ! बरें आहे, सलाम. ' इतकें बोलून

तुकारामनें मुराररावांच्या छावणीकडे घोडा पिटाळला. मसाऊदही सलाम करून अहंमदनगराच्या दिशेला चालला. जातां जाता तो स्वतःशींच म्हणाला, 'तुझ्या धन्याचें कसलं काम केलें? माझ्या धन्याचें काम बरीक मीं यथायोग्य केलें. आज जर थापा मारल्या नसत्या, तर बादशहाजवळ प्रकरण जाऊन, सगळाच स्फोट झाला असता. पण खानसाहेबांचे नशीब सवाई शिकंदर!'

प्रकरण ११ वें.

पुन्हां मुराररावाजवळ.

तुकाराम निघाल्यावर बऱ्याचवेळानें छावणींत दाखल झाला. मुराररावांचा आतां किंचित् डोळा लागला होता. तुकारामास आपण बादशहाजवळ पाठविलें, हें त्यांच्या मनाला फार खाऊं लागलें होतें. आणि कोणी त्याला परत येण्याचा निरोप सांगितला व तो आला तर किती बरें होईल, अशा तऱ्हेचे विचार एकसारखे त्यांच्या डोक्यांत येत होते. त्यामुळें त्यांचा मेंदू थकून त्यांचा डोळा लागला होता. परंतु, त्यांची ती झोंप विश्रांतीदायक नव्हती. तींत त्यांना अनेक असंबद्ध स्वप्नें पडत होतीं. एका स्वप्नानें ते खडबडून जागे झाले, तों जवळच आनंदी चेहरा करून उभा राहिलेला तुकाराम त्यांच्या नजरेस पडला. त्यांना क्षणभर वाटलें कीं, हें स्वप्नच असावें. एरव्हीं तुकाराम देवासारखा येथें येऊन उभा कसचा रहातो? त्यांनीं तीन तीनदा डोळे चोळले. इकडे तिकडे पाहिलें. शेवटीं आपण जागेच आहोंत, अशी त्यांची खात्री झाली. त्यांनीं तुकारामास प्रश्न केला, 'आलारे बोवा परत! बरें झालें. कोणी तुला निरोप सांगितला? तें पत्र आण इकडे. टाकूं दे फाडून!'

तुकारामाला त्यांच्या ह्या बोलण्याचें आश्चर्य वाटलें. आपणांस निरोप कोणी सांगितला? कोणी नाहीं. मसाऊद सहजासहजीं बोलून गेला, म्हणून आपण परत आलों. पण ह्यांनीं तर परत बोलावण्यासाठीं लोक-

पाठविले नसतील ना ? पण पत्र फाडण्याइतका प्रकार काय झाला ? ह्यांना कोणीं सांगितलें कीं, बाईसाहेब गडावर परत गेल्या ह्मणून ! कारण त्याशिवाय ह्यांना पत्र फाडण्याची उत्कंठा का ? अशा शंका तुकाराम काढूं लागला. व निरसनही स्वतःच करूं लागला.! आपण गेल्यावर, बादशहास पत्र लिहिलें, हें ह्यांना अयोग्य वाटलें असावें. त्यामुळें मला परत बोलावण्यासाठीं लोक पाठविले असावेत. कोणी तरी मला तो निरोप सांगितला, ह्मणून मी आलों, असें हे समजत आहेत; व मजजवळ पत्र मागत आहेत. असा त्यांच्या प्रश्नांचा यानें ठोकताळा बांधिला. हा तर्क त्याला इतक्या थोड्या वेळांत झाला, ह्यांत आश्चर्य वाटावयास नको. मुराररावाची स्वामिभक्ति त्यास माहित होती. त्यांनीं बादशहास पत्र लिहिलें, त्याअर्थी त्यांत त्याला दोषच दिला असला पाहिजे. आणि असें पत्र मुरारराव लिहितात कसें, हा विचार त्याचवेळीं त्याच्या मनांत आला. पण बादशहाच्या निंद्य कृतीनें राग येऊन, त्यांनीं असें पत्र लिहिणें साहजिकच आहे, अशी मनाची समजूत करून तो स्वस्थ राहिला होता. परंतु आपणास परत बोलावण्यास ह्यांनीं लोक पाठविले, त्यामुळें तुकारामास त्यांच्या स्वामीभक्तीचें बरेंच कौतुक आणि पुष्कळ खेद वाटला. तो मुराररावांच्या हातांत पत्र देत देत ह्मणाला, 'सरकार, मला कोणी नाहीं निरोप सांगितला. मीच आला. हें घ्या पत्र.' मुरारराव पत्राचे फाडून तुकडे करीत करीत ह्मणाले 'काय ? तुला कोणी नाहीं निरोप सांगितला ? मग तूं परत कशासाठीं आलास ?'

'एक आनंदवृत्त कळविण्यासाठीं !' तुकाराम हंसून ह्मणाला. मुरारराव पत्राचे तुकडे करण्यांत गुंतले होते. त्यामुळें त्यांनीं तुकारामचें ह्मणणें बरोबर ऐकलें नाहीं. ते सर्व तुकडे जमिनीवर फेंकून, त्यांनीं तुकारामाकडे लक्ष दिलें व ह्मणाले, 'काय ह्मणतोस ? आनंदवृत्त ? कोणचें बुवा ? हो. समजलों. तुझी धनीण बादशहाच्या सेवेला लागली, हेंच ना ? आहे तर खरेंच ! पण गड्या तूं थोड्या उशीरानें आलास. हें वृत्त आनंदाचें आहे, असें मला आधींच वाटूं लागलें ! नाहीं तर तुला बक्षीस मिळालें असतें !'

'तें नाहीं धनीसाहेब. मी जें आतां सांगेन तें आनंदवृत्त ऐकून तरीक तुह्मी मला बक्षीस दिल्यावांचून रहाणार नाहीं.'

'अशी काय आनंदाची बातमी आहे बुवा ?'

मसाऊदनें तुकारामाला शेवटीं जी इंदिरेसंबंधी गोष्ट सांगितली, ती त्यानें जशीच्या तशीच मुराररावांस निवेदन केली. मात्र पहिल्यानें बराच वेळ मसाऊदनें जी थट्टा केली, (तुकाराम ती थट्टाच समजत होता!) ती बरीक सांगितली नाहीं! शंभर मोहोरांची गोष्ट सांगायला बरीक तो विसरला नाहीं! कारण त्यायोगानें आपल्याला मुराररावांचें जास्त प्रेम संपादन करितां येईल, अशी त्याला आशा होती. सर्व हकीकत सांगितल्यावर तो ह्मणाला, ' बाईसाहेब, गडावर त्यास गेल्या असाव्यात. मुबारीक हुसेनच्या चाकरींतून निघाला. मग तो कोठें गेला, आणि कोठें नाहीं, हें इतर चाकरांस कळण्याचें कारण काय? ' मसाऊद ह्मणाला, ' मीं त्याला आणि धोंडोपंतांस पाहिलें. ' जर त्यानें पाहिलें नसतें, तर त्याला ही हकीकत कशी कळली? मला तर वाटतें कीं, आतां काळजीचें कांहीं कारण नाहीं. बरें झालें, धोंडोपंत लवकरच उमगले ह्मणून! '

तुकारामाला खराच आनंद झाला होता. ह्मणून तो उल्हासानें बोलत होता. आपला धनीही निश्चिंत व्हावा, अशी त्याची उत्कटेच्छा होती. व तसें चिन्हही मुराररावांच्या चेहऱ्यावर दिसूं लागलें. तुकाराम ह्मणतो, त्याप्रमाणें घडण्याचा संभव आहे, असें त्यांना वाटलें. कारण, मसाऊद हुसेनचा नोकर. धोंडोपंत इंदिरेला बादशहाकडे नेत होते, हें त्याला कळण्याचा काय संभव? धोंडोपंताबरोबर मुबारीक पाहिला, ह्मणून तुकाराम पहिल्यानें आला, तेव्हांही सांगत होता; व मसाऊदानेंही मुबारीकला पाहिलें—नव्हे ठार मारलें—असें त्याच्याच ह्मणण्यावरून तो आताही सांगत आहे. तेव्हां ही हकीकत विश्वसनीय आहे. असें त्यांना वाटलें. तुकारामानें सहज इंदिरसंबंधीं गोष्ट काढिली असेल, त्यावरून मसाऊदला ह्या हकीकतीची आठवण होऊन, त्यानें ती तुकारामास सांगितली असेल. खोटी हकीकत सांगून मला निष्काळजी करावें असें त्याच्या मनात असतें तर त्यानें ती मलाच सांगितली असती! अर्थात् ही गोष्ट खरी आहे. असें वाटून त्यांना आनंद झाला. डोक्यावर जणुं कोणी बोजा दिला होता, तो आतां उतरला; असें त्यांना वाटलें! त्यांनीं कृतज्ञतेनें तुकारामाकडे पाहिलें. मग त्याचा हात धरून ते ह्मणाले, ' तुकाराम, तूं माझा सख्खा भाऊ आहेस, असें मी समजतों. धोंडोपंतास कांहीं वेळ तरी माझा नाश करण्याची बुद्धी झाली.

पण धन्य तुझी ! माझ्याकरितां तूं आठशें मोहोरांवर पाणी सोडिलेंस. मज-कडून आजपर्यंत तरी तुला आठशें मोहोरा मिळाल्या असतील कीं नाहीं, ह्याची शंका आहे. पण, मी ह्मणतों, आपलें उभयतांचें प्रेम हेंच त्या आठशें मोहोरांच्या ठिकाणीं आहे. पण तुला माझ्या प्रेमापासून काय लाभ ? उलट दुःख व श्रम मात्र अधिक आहेत. पण येवढें लक्ष्यांत असूं दे, कीं तुझ्या सेवेचा मोबदला देणें जरी माझ्या नशिबांत नसलें, तरी तो परमात्मा कांहीं झोंपी गेला नाहीं ! तूं त्याच्या नजरेंतच आहेस. तो तुला कधींतरीं सुख दिल्यावांचून रहाणार नाहीं ! शंभर मोहोरा दरमहा देण्याची गोष्ट जर खरी असती, तर तुला मी हुसेनच्या नोकरीला रहाण्याचा उपदेश केला असता!'

'पण मीं तो ऐकला असता कीं काय ?'

उगीच आपण ती शंभर मोहोरांची गोष्ट ह्यांना सांगितली, असें तुकारा-मला झालें. त्यानें ती फुशारकी मारण्यासाठीं सांगितली होती, असें नाहीं. मुराररावांचें आपल्यावरील प्रेम ज्यास्त वृद्धिंगत व्हावें, अशा इच्छेनें त्यानें ती सांगितली होती. ह्मणून त्यानें मुराररावांस वरील उत्तर दिलें.

मुराररावांच्या डोळ्यांत अश्रू आले. तुकारामाचा स्वार्थत्याग ऐकून त्याच्या-बद्दल त्यांना फारच कृतज्ञता वाटली. त्याला काय द्यावें, आणि काय देऊं नये ! काय दिलें असतां ह्याचे उपकार अंशतः तरी फिटतील, असा जेव्हां ते विचार करूं लागले, तेव्हां त्यांना कांहींच अढळेना ! तुकारामलाही गहिंवर आला. मुराररावांनीं त्याला भाऊ ह्मटलें, त्यामुळे तर त्याला कसेंसेंच वाटूं लागलें ! मुराररावांच्या चरणांवर मस्तक ठेवून तो ह्मणाला, 'धनीसाहेब, आज तीनचार पिढ्या झाल्या, माझे बापजादे आपल्या घराण्याची सेवा करीत आले; मीही लहा-नपणापासून आपल्या जिवावर वाढलों. यःकश्चित् मोहोरांच्या लाभा-साठीं, मीं हें घर सोडून, माझ्या मुलाबाळांची येथली हक्काची आणि काय-मची भाकरी काय ह्मणून सोडीन ? बाबासाहेबही मला मुलासारखे मानीत असत; तुमची व इंदिराबाईसाहेबांचीहि मजवर मेहेरबानी आहे; मग मीं तुमची चाकरी सोडणें, हें कृतघ्नपणाचें नाहीं काय ? संकटप्रसंगीं उपयोगी पडणारा, पण ज्याचा आपला कांहीं संबंध नाहीं, अशा माणसाला बक्षिस देणें रास्त आहे ! पण माझ्यासारख्या पिढीजाद नोकराला बक्षीस ? उद्यां

तुमच्या मुलानें असेंच कांहीं काम केलें, तर त्यालाही तुम्ही बक्षीस देऊं लागाल! माझे तुम्ही दोन मोहरे हयात असले, म्हणजे मला वाटेल तितक्या मोहरा मिळतील. खरें सांगूं ? मला असें वाटतें कीं, तुमच्यासाठींच माझा प्राण जावा ! तुम्ही लक्ष्मी–नारायण आणि मी गरूड. तुम्ही सीता–राम आणि मी हनुमान—'

साधारण धन्यापेक्षां चाकरच अधिक बोलतात, असें ज्यास्त आढळून येतें. मग तो चाकर विश्वासू आणि प्रेमळ असला म्हणजे तर विचारूंच नका! मुरारराव आणि तुकाराम प्रेमानें बोलत असल्यामुळें, त्यांपैकीं प्रत्येकास दुसऱ्याचें बोलणें अमृतासारखें वाटत होतें. प्रियवाचकहो, खरा सेव्यसेवकभाव म्हणतात, तो हाला बरें का! मुरारराव म्हणाले, 'खरोखर ह्या जगांत मला जिव्हाळ्याचें माणूस म्हणजे एक इंदिरा व दुसरा तूं! पण कायरे? धोंडोपंत तिला घेऊन गडावर गेले खरे. पण तिकडे बादशहाचा तिळपापड होईल तो ! मला वाटतें, मुबारीकनें बादशहाचें नांव सांगून इंदिरेला कोठें तरी नेण्याचा घाट घातला असावा, असें मसाऊदनें जातां जातां जें सांगितलें, तेंच खरें असावें ! बादशहा असलें काम मुबारिकसारख्या यःकश्चित् मनुष्याला कसें सांगेल ? आणि बादशहा बहुतेक असें करणारही नाहीं !

तुकारामानें ' बादशहा बहुतेक असें करणार नाहीं. ' हे शब्द चांचरत चांचरतच उच्चारिले. पण मुराररावांस स्वामिप्रेमाचें भरतें येऊन, ते आवेशानें म्हणाले, अरे, बहुतेक कां? नाहीं ते असें करणार ! बादशहा म्हणजे नीतीचा मूर्तिमंत पुतळा आहे ! ते असें करणारच नाहींत. मुबारीकनें धोंडोपंतांस ती थापच मारली झालें ! शंकाच नको. '

मुरारराव अगदीं निश्चिंत झाले. मुबारीकला दुष्टपणाबद्दल योग्य शासन मिळालें. इंदिरा सुखरूप सुटली, धोंडोपंतांस कृतकर्माचा पश्चात्ताप झाला. बादशहाला मूर्खपणानें पत्र लिहून दुखविणार होतों तें चुकलें इतक्या आनंदकारक गोष्टी घडल्या, असें वाटून, त्याचें मन प्रफुल्ल झालें. धोंडोपंतांच्या मूर्खपणामुळें हा प्रकार झाला; तरी शेवट गोड झाला. धोंडोपंतांस तरी कां बोल लावावा ? आपल्या प्राक्तनास लावावा ! असा त्यांनीं आपल्या विचारांचा उपसंहार केला ! पण अरेरे—मुरारराव. तुम्हाला

वाटतें कीं, सर्व कचाटयांतून सुटलों ह्मणून; पण हा उपसंहारच तुह्मांला ज्यास्त कचाटयांत घालीत आहे! मुराररावांनीं मग एक पत्र लिहिलें. व तुकारामाला गडावर नेऊन देण्यास सांगितलें. नंतर ते नित्य व्यवसायाला लागले.

प्रकरण १२ वें.

अहमदनगरी आली.

सकाळची वेळ. हुसेन आपल्या जनानखान्यांत बसला होता. त्याचा जनानखाना ह्मणजे त्याची बहीण, बायको, आणि कांहीं दासी इतक्यांचाच असे. त्याच्या बहिणीची वाचकांस ओळख आहेच. त्याची धर्मपत्नी हमीदा ही रूपानें नीटस आणि आमिना व हुसेन यांच्या-सहवासानें बरीच शिकलेली होती. पूर्वीं तिच्या सुस्वरूपाचा आणि गुणांचा तो फार अभिमान बाळगीत असे. पण इंदिरेला पाहिल्याबरोबर त्याचा अभिमान लोपला. येवढेंच नव्हे, त्याला इंदिरेचा अगदीं ध्यास लागला. तरी पण हमीदा आपली धर्मपत्नी आहे, हें तो विसरला नाहीं. त्यानें तिला कधीं एका शब्दानेंही दुखविलें नाहीं. असो. तो आपल्या बहिणीनें केलेला सोंगट्याचा पट पहात होता. हा पट जरीचा केलेला असून, त्यांत कट वगैर चांगले साधले होते. हुसेन तो पट हातांत घेऊन, पहात होता व आमिनेच्या कौशल्याची तारीफ करीत होता. आमिना जवळच बसली होती. हमीदाही पटाकडे पहात किंचित् दूर उभी होती. कांहीं वेळानें हुसेन पट खालीं ठेवून आमिनेलाच, पण हमीदेकडे वाकडी नजर फिरवून, हंसत ह्मणाला, ' ताई, मला आज एक गोष्ट करावयाची आहे; व तुमची दोघींची परवानगी मिळेल तर ती मी करणार आहे ' असें ह्मणून तो स्वस्थ बसला.

' कोणची गोष्ट ? ' आमिनेनें जिज्ञासेनें विचारिलें.

' ते मुरारराव आहेतना ? त्यांची बायको इंदिरा. खरोखर, तुह्मी दोघीही कबूल कराल, कीं, ती सुंदर आहे ह्मणून ! नाहीं कां ? '

' बरें आहे. मग ? ' आमिना ह्मणाली.

' रागावूं नका ह्मणजे सगळें सांगतों ! तिच्याबद्दल मला अभिलाष उत्पन्न झाला आहे. तिला येथें आणवावी असें माझ्या मनात आहे ! ' इतकें बोलून त्यानें हमीदेकडे पाहिलें; त्याबरोबर ती मान फिरवून दुसरीकडे पाहूं लागली. तिला राग आलेला दिसत होता. तथापि, तिकडे लक्ष्य न देता हुसेन पुढें ह्मणाला, ' तिला आणविण्याचें मी मनातच ठेविलें नाहीं, तर तिला बोलावणें देखील धाडलें आहे. ती आज येण्याची वाट आहे. ह्मणून ह्मणतों तिचा आदरसत्कार करा. ह्मणजे तिला तेवढेंच बरें वाटेल ! '

आमिना आश्चर्यानें ह्मणाली, ' काय ? तूं बोलावणें पाठविलें ? आणि ती येईलही ? ती का व्यभिचारी आहे ? मी तर तिला सद्गुणी समजत होत्यें ! '

' आणि ती तशीच आहे ताई ! ' असें ह्मणून त्यानें धोंडोपंतास कसें वळविलें, वगैरे सर्व हकीकत सांगितली. दोघीही चकित झाल्या. आमिनेला धोंडोपंताची फार कींव येऊन ती ह्मणाली, ' तूं त्या धोंडोपंतास माझी आशा का दाखविलीस ? मी का लग्न करणार आहे ? ' ' तसें नव्हे गे ताई ! तुझ्या आमिषानें धोंडोपंत वळत होते; आणि ते वळल्यानें इष्ट काम सिद्धीस जात होतें ! बाकी त्यालाही शेवटीं इलाच दाखवावयाचा !'
' हुसेन, मला नाहीं वाटत, ती तुला वश होईल ह्मणून ! ती प्राणही देईल कदाचित्. धोंडोपंतही माझी प्राप्ती झाली नाहीं, ह्मणजे वैतागून असेंच काहीं करील. बिचाऱ्या मुरारराबाचाही विनाकारण नाश होईल ! '

' त्याचा नाश व्हावा ह्मणून तर हें सर्व. तो शूर आहे. लढाई जिंकून आला तर त्याला बादशाहा वजीर करणार आहे. तसें न होता, तुझ्या एकुलत्याएक भावजयीनें वजिरीण व्हावें, ह्मणून तर ही खटपट आहे ! मी काहीं केवळ रूपावर लुब्ध झालों नाहीं ! त्यात राजकीय हेतुही आहे ! बाकी तिला आणलें, ह्मणजे तुझ्या भावजयीचा मान कमी होईल, असें मुळींच नाहीं. काहीं झालें, तरी ती राख ! आणखी राजकीय हेतूमुळें शत्रूची आणलेली ! आणि ही किती केली तरी धर्माची पत्नी ! ' असें ह्मणून पत्नीकडे पाहून त्यानें मंदहास्य केलें. तिला समाधान झालेलें दिसलें नाहीं ! हमीदा फार पतिव्रता होती. हुसेनखान ह्मणजे तिला परमेश्वर वाटत असे. त्याकाळीं मुरारराव आणि हुसेन ह्यांच्या विद्वत्तेची आणि शौर्याची ख्याती, सर्व हिंदुस्थानभर पसरली होती. त्यांनीं

दोघांनीं अल्पवयांतच अनेक राजांच्या दरबारीं जाऊन सर्व पंडितांस थक्क केलें होतें. अहंमदनगरच्या राज्यांत तर लहान थोरांच्या तोंडीं त्यांचें नांव असे. आणि ह्मणूनच मनसूरअल्लीला, ' निजामशाहीचीं हीं दोन भूषणें आहेत, ' असें वाटत असे. अशी त्यांची कीर्ति असल्यामुळें, ती सहाजीकच त्यांच्या कुटुंबांच्या कानांवर जाई. हमीदेला हुसेनची कीर्ति ऐकून पराकाष्ठेचा आनंद होई. तिला हुसेनबद्दल अतिशय आदर वाटत असे. तिनें इंदिरेलाही पाहिलें होतें. ती आपल्यापेक्षां किती तरी सुंदर आहे. ती जर तिकडे वश झाली, तर तिकडे माझी आठवण देखील रहाणार नाहीं ! ह्या हिंदु स्त्रिया कपटी असतात. वश झाल्यास दाखवून ह्या प्राणघात करितात. ही इंदिराही आपल्या प्राणनाथास वश झालीसें दाखवून तिकडच्या जिवास कांहीं घातपात तर नाहीं करणार ? असें हमिदेच्या मनांत आलें. आपल्या पतीचा बेत तिला पसंत पडला नाहीं. हुसेनला तें समजलें. पण तें लक्षांत न आल्यासारखें करून, तो अभिनेला म्हणाला, ' मग करें काय ताई ? ती आल्यावर तिचा आदरसत्कार करालना ? पहिल्यापहिल्यानें असेंच केलें पाहिजे. पुढें ती बटीकच ! '

' मला काय विचारितोस बाबा ? मी तर ह्या संसारांत उदास. पण मला असें वाटतें कीं हें करणें अगदीं गैर आहे. तुला वजिरी मिळविण्यास दुसरा उपाय नाहीं कां एखादा ? ' ताई, मुरारराव कां असा तसा माणूस आहे ? परवां बादशहाजवळ कितीतरी त्याची नालस्ती केली. परंतु बादशहाचा त्याच्यावरील विश्वास कांहीं उडेना ! शेवटीं, तो येईपर्यंत वजिरी मला देण्याबद्दल बादशहाची कशी तरी समजूत घातली. आतां कपटमार्ग धरिलाच पाहिजे. मुरारराव हिंदु. त्यानें वजीर व्हावें—आणि मी—शहाणा म्हणून गाजलेला—यःकश्चित् सरदार रहावें, हें तुम्हां दोघींना बरें वाटतें कां ? इंदिरेच्या स्वरूपावर मी भुललों खरा. पण हें कारण नसतें, तर असा नीचपणा मी केला नसता ! '

हुसेन इतका गोड बोलत होता, कीं त्याचें म्हणणें व करणें बरोबर आहे, असें त्या दोघींसही वाटूं लागलें. त्यानें बोलण्यांत कांहींसा दीनपणा धरला होता. त्यामुळें तर त्याला त्याच्या इच्छेनुरूप करूं द्यावें—तेंच बरें—असें त्या दोघींच्या मनांत आलें. अभिनेला वास्तवीक आपलें खरें मत सांगन हुसे-

नचा निषेध करण्याचा अधिकार होता. व त्यानें तिचा तितका मानही ठेविला होता. पण तिला देखील त्याचें म्हणणें खोडून काढवेना. आपण आग्रह केला तर हा इंदिरेचा नाद निःसंशय सोडील; पण त्यायोगें त्याचें मन फार खट्टू होईल, असें मनांत आणून आमिना म्हणाली, ' पहा तुझें तेंच काय तें ! नाहींतर उगीच अपकीर्ति व्हावयाची. बाबांनीं—महंमदखानांनीं—सर्व निजामशाहीभर नांवलौकिक केला. त्याला बट्टा लागूं नये, येवढेंच माझें म्हणणें. खरें कीं नाहीं ग वहिनी ? '

' बन्सं मी कशाला उगीच कोणाच्या आड येऊं ? तुमची जी इच्छा आणि सांगणें, तीच इच्छा व तेंच सांगणें माझें. आजपर्यंत आबालवृद्धाकडून लौकिक मिळविला, त्याला काळिमा न लागावा हीच इच्छा. शिवाय ह्या हिंदू स्त्रिया लोभ दाखवून जिवास अपाय करितात, म्हणून मला तिकडूनच कैक वेळा सांगणें झालें आहे. इंदिराही घात करणार नाहीं कशावरून ? सिंधप्रातांतील दोन सुंदर हिंदु स्त्रियांस पकडून , महंमद कासिमानें—आरबांनी नाबतीनें—यांना दमास्कसच्या कालीफाला नजर केलें—पण त्या स्त्रियांनीं कालीफाकडून महंमदास मोतांत घालवून ठार मारविलें, व अशा रीतीनें सूड उगविला, ही गोष्ट स्मरणांत असूं द्यावी. माझें अधीक काहीं म्हणणें नाहीं ! ' हुसेन आपल्या पत्नीकडे एकदम तोंड फिरवून म्हणाला, ' त्याची नको काळजी. माझा दुर्लौकिक होणें तर नाहींच, पण उलट मी कीर्ति कशी मिळवितों, तेंच पहा. आतां हिंदू स्त्रियांबद्दल म्हणावें, तर महंमदकासम अगदीं नवखा. त्याला हिंदूलोकांचे स्वभाव कोठें माहीत होते ? माझी गोष्ट अगदींच निराळी; मी ह्या काफरांची जात पूर्णपणें जाणून आहे. शिवाय महंमद अगदीं शिपाई गडी. त्याला मुत्सद्याचे पाचपेच काय माहीत ? यःकश्चित् इंदिरा ! तिची येवढी भीती ! ' असें म्हणून तो हमीदेकडे सास्मितमुखानें पाहूं लागला. ती लाजून दुसरीकडे पाहूं लागली. तोच तिचा रुकार समजून हुसेन आमिनेला म्हणाला, ' तूं काहीं म्हण ताई ! पण माझी काळजी घेणारी, सद्गुणी आणि आज्ञाधारक अशी पत्नी तुझी मला पाहून दिली, म्हणूनच तर मला इतकें सुख आहे. नाहींतर त्या अडाणी बायका ? त्यांची समजूत घालतां घालतांच प्राण जावयाचा ! ' असें म्हणून तो प्रेमानें हमीदेकडे पाहूं लागला. ' कितीही अडाणी बायको असली, तरी येथें निरु-

तरच होणार ' असें कौतुकानें मनांत ह्मणत, हर्मदा झटकन् बाहेर निघून गेली. त्यावेळीं ती हुसेनला विजेप्रमाणें भासली ! आमिनाही मोठ्या कौतुकानें आपल्या बंधु-भावजीकडे पहात होती. इतक्यांत धोंडोपंत आल्याची वर्दी आली. ' काय आले धोंडोपंत ? ' असें ह्मणून तो घाईघाईनें बाहेर गेला. लहान चुकलेला भाऊ पुष्कळ वर्षांनीं आल्याची बातमी समजली, ह्मणजे जसा आनंद होतो, तसाच आनंद त्यावेळीं हुसेनास झाला. तो दाराजवळ जातो, तों त्याला खालील संवाद ऐकूं आला.

' धोंडोपंत ! हा तर हुसेनचा वाडा. आपला नाहीं. मग येथें आपण कशाला आलों ? ' हा मंजूळ आणि करुणास्पद प्रश्न इंदिरेचा होता. हें हुसेननें लागलींच ओळखिलें.

' इंदिरे, तूं घरीं नसल्यामुळें मित्र प्रमाणवातर मुरारराव सध्यां ह्याच वाड्यात बिऱ्हाड घेऊन रहात आहेत.

' आजचा दिवस येथेंच रहावें लागेल. उद्यां आपण आपल्या घरीं जाऊं ! "

' मग कोठें बाहेर येणें झालेलें दिसत नाहीं ? '

' अग असतील घरांत काहीं कामांत. किंवा बाहेर गेले असतील. त्यांनीं दाराशीं यावेंच असें कोठें शास्त्र आहे ? '

' आज बाई मला कसेंसेंच होत आहे ! ' हे उद्गार अगदीं अचानक आणि हलकेच पण स्पष्ट असे तिच्या मुखांतून निघाले.

हे उद्गार ऐकून हुसेनला तिची फारच कींव आली. तितकाच धोंडोपंताचा तिटकारा आला. ' अरेरे ! ' तो मनात ह्मणाला, ' एका निरपराध साध्वीचा मी विनाकारण छळ करणार. तो बैल धोंड्या अगदीं बेअकली आहे.— पण त्याला दोष दिल्यानें माझें पातक जाणार थोडेंच ! ' खरोखरच हुसेनला वाईट वाटलें. वाईट वाटलें ह्मणण्यापेक्षां भय वाटलें— त्याच्या उरात धडकी भरली, हें ह्मणणेंच अधिक शोभेल ! कारण तो कापूं लागला. त्याचें सर्व अवसान खचलें. त्याचा श्वासोछ्वास बरोबर होईना. आपल्या उरावर कोणी तरी खूप मोठं ओझें ठेविलें, असें त्याला वाटलें. त्याचे पाय निर्जीव होऊन, त्यानें बैठक मारली. आज त्याच्या जन्मांत त्याला जर काहीं भयंकर गोष्ट वाटली असेल, तर ती हीच ! पुढें आपला नाश होणार, असें त्याचें मन त्याला सांगूं लागलें. त्याच्या

अंगाला दरदरून घाम सुटला. इतक्यांत धोंडोपंत व इंदिरा आत येऊं लागले, हें पाहून तो आपल्या दिवाणखान्यांत गेला. इंदिरेसाठीं दुसराच एक दिवाणखाना त्यानें श्रृंगारून तयार केला होता. इंदिरा दारात येते, तोंच आमिना व हमीदा तेथें गेल्या. कांहीं कुशल प्रश्न झाल्यावर आमिनेनें तिला उपरोक्त दिवाणखान्यात नेलें. आणि आपण तिच्याशीं कांहीं इकडच्या तिकडच्या गप्पा मारून परत आली. ह्या गप्पांत तिनें इंदिरेला मुरारराबांसंबंधीं प्रश्न करण्यास अवसरच दिला नाहीं. त्यामुळें इंदिरेची संशय निवृत्तीही झाली नाहीं. इंदिरेची मनःस्थिती अहंमदनगरीं येतांना जशी वाटेंत होती, तशीच ती अद्यापही होती. तिच्या हृदयात आशा व निराशा ह्यांचें तुंबळ रण माजून राहिलें होतें. अहंमदनगरांत प्रवेश केला, तेव्हा बरीक तिला किंचित् उल्हास वाटूं लागला. तोही धोंडोपंत तिला हुसेनच्या वाड्यात घेऊन जाऊं लागले तेव्हां मावळला. धोंडोपंताचा चेहरा जसा वाटेंत होता, तसाच आतांही आहे. येवढेंच नव्हें तर त्यावरून ' आपण कृतार्थ झालों ' असें धोंडोपंतांस वाटत असावें, असें तिला वाटलें. मुरारराबासंबंधीं आमिनेला प्रश्न केले असता तिनें जी टाळाटाळ केली, तीही इंदिरेच्या लक्ष्यात आली. धोंडोपंत मला येथून बादशहाकडे नेतात, कीं येथें हुसेनलाच मला बळी देतात, हें तिला समजेना ! दोनप्रहर झाले, तरी मुरारराबाचा पत्ता नाहीं. ? इंदिरेला आता राहवेना. ती स्फुंद्स्फुंदून रडूं लागली. तिला खाण्यापिण्याला वगैरे सर्व घरच्याप्रमाणें मिळालें. पण तिचें खाण्यापिण्याकडे लक्ष कोठें होतें ? ती आपल्याच विचारात चूर होऊन बसली होती, त्या दिवशीं तिच्य जवळ आमिना गेली नाहीं. हमीदा गेली नाही. मुरारराव येथें असते, तर मला येथें असे एकटें रडत कोणींच बसूं दिलें नसतें. माझा मान निराळ्याच रीतीनें झाला असता, असें तिला वाटलें. आपण कोणाच्या तरी आधीन झालों खास, अशी तिची खात्री झाली. पण कोणाच्या झालों—बादशहाच्या कीं हुसेनच्या—हाच काय ता तिला प्रश्न पडला. हुसेनपेक्षा बादशहाकडे आपणास नेतील तर बरें होईल ! बादशहा वृद्ध आहे. त्याच्या चांगूलपणाबद्दल ख्याती आहे. त्याचे पाय धरले, विनवणी केली, त्याच्यापुढें रडलें, तर तो सोडील तरी ! पण हा हुसेन आपला प्राण गेल्याशिवाय आपणास सोडणार नाहीं. आधींच

तरुण—तरुण लोक बहुत करून ह्या विषयासंबंधीं तरी निर्दय असतात. त्यांचें ज्या स्त्रीवर मन बसलें ती दुःखित असली, फार तर काय तिला प्राणांतिक वेदना होत असल्या तरी ह्या निर्दयांना त्याबद्दल फिकिर नसते. ते कशी तरी आपली कामवासना तृप्त करावयास पहातात ! — त्यांतच कामांध, शिवाय अधिकारसंपन्न, असा हुसेन आपणांशीं कशाप्रकारें वागेल, ह्याची भयंकर कल्पना इंदिरेच्या डोक्यांत फार लवकर आली, ह्यांत नवल नाहीं ! तिला हुसेन काळासारखा भासूं लागला. तिच्या पुढें मुराररावांची मनोहर व प्रशांत मूर्ति उभी राहिली. त्यामुळें तर तिला रडूंच कोसळलें. तिला प्राणांतिक वेदना होऊं लागल्या. मुराररावांस आपण काय-मचे मुकलों, असें एकदां तिला वाटें तर लागलींच मुरारराव शिकारीबिकारीला गेले असतील असेंही वाटून, ते आल्यावर आपली कितीतरी चेष्टा करतील ! असा आनंददायक विचार तिच्या मनात येई ! व असा विचार मनांत आला ह्मणजे ती किंचित् स्वस्थ होई. पण पुन्हां थोड्याच वेळांत आतां कसची भेट ! काय अंबाबाईचा अपराध केला, ह्मणून तिनें हें शासन केलें ! असेही विचार तिच्या अंतःकरणात येत. ही हकीकत माहेरीं कळवावी, तर मनुष्य कोण आहे आपलें ऐकणारा ? तिकडच्या विश्वासाचे ते दीडशें शिपाई लोक होते, त्यांना धोंडोपंतानीं सर्वेच एका किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेविलें ! व असें करण्याचा तिकडचा हुकूम आहे ह्मणून बिनदिक्कत सांगितल्यामुळें ते शिपाईही तेथें राहिले. आता धोंडोपंतांचेच पाय धरले पाहिजेत. त्याखेरीज काहीं मार्ग नाहीं, असें तिला वाटूं लागलें. पण लागलींच ' धोंडोपंतास दया येईल का ? ' ह्मणून तिचा तिलाच प्रश्न पडला. धोंडोपंतांनीं तिला घात करून अहंमदनगरपर्यंत नेलें; त्यास शरण गेल्यास दया येईल कीं नाहीं, हा जो तिला प्रश्न पडला होता, तो यथार्थ नव्हता काय ? तथापी एकदा खडा टाकून पहावा, असा तिनें बेत केला. पण येथें आता धोंडोपंत येतील कीं नाहीं कोण जाणें, अशीही तिला काळजी पडली. सरतेशेवटीं तिनें दुःख न करण्याचा निश्चय केला. आले धोंडोपंत, तर पाहूं त्यांचे मन वळवून ! नच आले तर पातिव्रत्य रक्षणा-करिता आपला प्राण देऊं, पण नुसती चिंता करून काय होणार आहे ? असा विचार करून, डोळे पुसून ती एका खिडकींत उभी राहिली. बाहेर

एक सुरूबाग होता. त्याकडे तिची शून्य दृष्टी लागली होती. इतक्यांत त्या दिवाणखान्यांत धोंडोपंत आले. इंदिरेची आज चांगलीच खरडपट्टी काढावी. तिलाही आपला छळ करण्याबद्दल असें वाटलें पाहिजे कीं, बस. असें त्यांचें मनोराज्य चालूं होतें. इंदिरा कांहीं दुःख न करितां खुशाल आनंदानें उभी आहे, हें पाहून त्यांना फार आश्चर्य वाटलें. व आपण तिला येथें आणण्यांत कांहीं अयोग्य कृत्य केलें नाहीं असें मनांत येऊन त्यांना बरीच स्वस्थता वाटली. त्यांच्या पावलाची चाहूल लागून इंदिरेनें मागें पाहिलें व त्यांना पाहिल्यावर तिला पुन्हा रडें कोसळलें. परंतु, त्याचा धोंडोपंताचे मनावर कांहीं परिणाम झाल्याचें दिसलें नाहीं. त्यांना वाटलें कीं, हें सर्व ढोंग असावें. इंदिरेनें एकदम त्यांच्या पायावर मस्तक ठेऊन ती करड्या स्वरानें ह्मणाली—' धोंडोपंत, तुह्मी आमचे वडील आहात—खरें सांगा—मला तिकडून कोठें जाणें झालें आहे ? ' इंदिरेनें त्यांचे पाय धरल्यावर ते कांहींसे ओशाळले. परंतु, आपल्या स्वरांत उसना कठोरपणा आणून ते ह्मणाले ' इंदिरे, तुला उगीच संशयांत कशाला ठेऊं? तुला तुझ्या पापाचें प्रायश्चित्त भोगण्यास येथें मुद्दाम आणलें. समजलीस! मुरारराव सारख्या सत्शील मनुष्यास तुझ्या सारखी गोडबोली कर्कशा मुळींच शोभत नाहीं. शिवाय तूं जारिणी आहेस, ढोंगी आहेस! बस् एवढ्याकरिताच तुला येथें आणिलें! ' धोंडोपंतांनीं तिला जारिणी ह्मणतांच तिच्या अंगावर शहारे आले. एखाद्या अत्यंत पितृभक्त मनुष्याला, त्याच्या देखत कोणीं त्याच्या पित्याला वाईट वाईट शिव्या दिल्या ह्मणजे तो मनुष्य जसा संतापतो, बेभान होतो, तशीच स्थिती ह्यावेळीं इंदिरेची झाली. तिचे ओंठ थरथर कांपूं लागले. हा नराधम मनास येईल तसा आपला छळ करून पुन्हां आपल्यालाच जारिणी ह्मणतो. ह्याचें काय करावें आणि काय न करावें, असें तिला होऊन गेलें! पण लागलीच तिची नैसर्गिक नम्रवृत्ती जागृत झाली. धोंडोपंत आपल्याला वडिलाप्रमाणें त्यांनीं कांहीं ह्मटलें तरी आपण तें सहन केलें पाहिजे. असें मनांत आणून तिनें महत्प्रयासानें आपला क्रोध गिळला! ' मी जारिणी! हाय जगदंबे, हे शब्द ऐकण्याला मला जिवंत तरी ठेविलेंस कशाला! जन्मोजन्मीं हेंच पती मिळावे ह्मणून निशिदिनीं अंबाबाईस प्रार्थना करणारी मी जारिणी?—देवा! मला मुलीला पत्नीधर्म कळत नाहीं. पतीची निष्कपटपणें सेवा करून,

त्याला प्रसन्न ठेवणें ह्यापरतें काय करावें तें मला माहित नाहीं ! त्याचें प्रायश्चित्त इतकें घोर—हाय हाय ! ' असें मनांत ह्मणून ती रडत ह्मणाली, ' धोंडोपंत, तिकडच्या सच्छीलाला मी शोभत नाहीं ह्मणून, माझे तरवारीनें तुकडे करा ! पण हें विलक्षण अपूर्व प्रायश्चित्त कोठलें ? '

धोंडोपंतास तिची दया आली. पण ती लवकरच पळाली. ' मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम् ' हें त्यांनीं अगदीं पाठ करून ठेवलें होतें; व इंदिरेवर तरी विश्वास ठेवावयाचा नाहींच नाहीं ! असा त्यांचा निर्धार झाला होता. ह्मणून ते निर्दयतेनें पण कांहींसें नरमपणानें ह्मणाले. तें कांहीं नाहीं. तुझ्या आजपर्यंतचे अवहेलनेचें हें फळ होय.

धोंडोपंतांची आपण मुराररावांइतकी दक्षतेनें सेवा केली असतां हे असें ह्मणतात, ह्याचें तिला फार नवल वाटलें. तथापि, चुकून कधीं कांहीं झालें असेल असें समजून इंदिरा ह्मणाली— मी बुध्या तर तुमची कधीं अवहेलना केली नाहीं. जरी चुकून कांहीं झालें असलें तरी मी आपली मुलगी ना ! मग क्षमा करावयास काय हरकत आहे ?

' त्याची एकवेळ क्षमा झाली असती. परंतु तुमचा दोघांचाही मला ठार मारवण्याचा विचार ! तुह्मीं जसें सप्तशृंगीं नेऊन माझा घात करणार होता तसा मी तुमचा कां करूं नये ? ' ह्याचा अर्थ इंदिरेस कांहींच समजेना. धोंडोपंताचा आपण घात करणार होतो ? हे शुद्धीवर तरी आहेत कीं, नाहीं ह्याची तिला शंका वाटूं लागली. कोणीतरी ह्यांचे कान फुंकले असावेत ह्मणूनच हे इतके कठोर झाले आहेत. तिकडून पूर्ण विश्वासाचें माणूस ह्मणून यांना मजजवळ ठेवणें झालें. त्याचा फायदा घेऊन हुसेननें त्यांच्या मनांत ही कुकल्पना भरवून दिली असावी. धोंडोपंतास मोहोरांचे निमित्तानें बोलाविलें, तें ह्याचकरितां, हें आतां तिच्या लक्ष्यांत आलें. आणि तें लक्ष्यांत आल्यावर धोंडोपंतांनीं अहंमदनगराहून गडावर आल्यापासून आतां पर्यंत जें लपवा छपवीचें आणि निर्लज्जपणाचें वर्तन केलें, त्याचा तिला फार तिरस्कार उत्पन्न झाला. ती मनांत ह्मणूं लागली, ' माझ्यावर हल्लीं जो प्रसंग आला आहे, तो महासाध्वी सीता, द्रौपदी किंवा दमयंती ह्यांच्यावरील प्रसंगांहून अधिक बिकट जरी नाहीं, तरी त्यांसारखाच आला आहे. ही माझी परीक्षाच आहे ह्मणावयाची. बाबांनीं लोकापवादास न जुमा-

नता जें मला उत्तम शिक्षण दिलें, त्याचें चीज करण्याची वेळ हीच आहे. संकटांत सीता वगैरे साध्वी जशा वागल्या तशीच मी आतां वागणार !' अशा विचारपरंपरेंत ती असतां धोंडोपंतांस वाटलें कीं, ह्यांचा मला मारण्याचा बेत नक्की होता. एरव्हीं निरुत्तर कां झाली ? हा विचार मनांत येतांच धोंडोपंत जळफळत 'भोगा आता कृत कर्माचीं फळें !' असें ह्मणून रागानें बाहेर निघून गेले. हें मागाहून पुष्कळ वेळानें इंदिरेच्या लक्ष्यांत आलें. तिला नक्की वाटलं कीं हा दिवाणखानाच आपलें मरणस्थान होणार. धोंडोपंतांनीं कोणाला तरी बळी द्यावयास आपणांस आणिलें आहे हें खास ! पण कोणाला ? हुसेनला किंवा बादशहाला ? हा तिचा संशय अजून पूर्णपणें फिटला नव्हताच ! शेवटीं कोणींही असले तरीं पातिव्रत्यभंग होऊं लागला, तर आपण प्राणच देणार ! असा निर्धार करून स्वस्थ बसली. मुराररावाचा मुखचंद्रमा एकदा तरी आपल्या नजरेस पडावा, हीच काय ती आता तिची इच्छा राहिली होती !

धोंडोपंत अहंमदनगरीं इंदिरेला घेऊन आल्यावर थोडक्याच दिवसांत हुसेननें त्यास बादशहाकडे नेलें. पण ती हकीकत पुढें सागूं. सध्यां आपण साताऱ्यास चलावें हें बरें !

प्रकरण १३ वें.

शंकरराव आणि कमळा.

बलाढ्य अशा मराठी राज्याची राजधानी बनल्यामुळें जें पुढें फार नांवा रुपास आलें, त सातारा शहर आमच्या कथानकाच्या काळीं फारसें प्रसिद्ध नसून मोठेंही ह्मणण्या जोगें नव्हतें. अहमदनगर, विजापूर वगैरे शहरांतील तत्कालीन इमारतींसारख्या मोठमोठ्या इमारती सातारा शहरात फारच थोड्या होत्या. त्या थोड्या इमारती पैकींच एक शंकररावांचे वडील त्र्यंबकराव ह्यांच्या मालकीची होती. ह्या इमारतीस चार चौक होते. पैकीं सगळ्यांत पुढे जो चौक होता, त्याच्या काठावर शंकरराव इकडे तिकडे फेऱ्या घालीत होते. त्यांच्या हातांत एक पत्र असून तें कांहींतरी विचारांत

गुंग झाले आहेत, असें दिसत होतें. त्यांच्यापासून थोड्या अंतरावर एक भिल्ल स्वस्थ बसला होता. दोन तीन लहान मुलें ओसरीवर यथेच्छ खेळत असून मधून मधून तीं शंकररावाच्या पायांत येऊन घुटमळत असत. तरी पण त्यांचें तिकडे लक्ष नव्हतें. अशा स्थितींत कांहीं वेळ गेल्यानंतर शंकरराव त्या भिल्लास ह्मणाले ' पण बाईसाहेब गेलेल्या तूं नक्की पाहिलेंस ना ? '

' हावोना सरकार ! तुकाराम ह्मणत होता कीं, ते धोंडोपंत कां कोणते आमच्या सरकारच्या (जिवाजी पंताच्या) कारीला (मुलीला) बादशहाकडेच नेत आहेत. आणि ह्मणूनच त्यानें मला अगदीं वेगीवेगी यावयास सांगितलें. मी पर कसा सपाट्यानें आलों ह्मणता. अगदीं पाखरावाणी. त्या रोजीं तांबडं फुटल्यावर निघालों. फक्त न्याहारीला दुवक्त काय तो थांबत होतों. आणखी झोंप घेतलीच पाहिजे, ह्मणून चार घटका रात्रीचा कोठें तरी लवंडत होतों. आमच्या वणीला तर माझ्यासारखा जवरा चालणारा कोणीबी नाहीं ! तुमचें हें गाव—तुह्मी ह्याला सातारा ह्मणता जनु- गडीपुन किती लाब. अबब ! किती गांवें मला वाटेंत लागली ! कांहीं बेसुमार ! पण कसा चटक्यांत—अवघ्या चार दिवसांत आलों. तो बोपेगांवचा काळ्या भिल्ल चालणारा मोठा पटाईत ! पण लेकाचा माझ्यापुढें कसा गोगलगाय होऊन जातो ! '

त्या भिल्लाची चर्पटपंजरी एकसारखी चालूंच होती. शेवटीं शंकररावांचें आपल्याकडे मुळींच लक्ष नाहीं, हें पाहून तो स्वस्थ राहिला. पुन्हा कांहीं वेळानें तो ह्मणाला,

' तुह्माला सवारानं पत्र केव्हां आणून दिलें ? '

' हें आता तुझ्या पुढेंच. आतांच तो परत गेला. '

' असं काय ? अहो हे सवारन विवार झाले ह्मणून काय झाले ! ह्यांच्या परीस आह्मी लोक तरी बरें चालतों ! ' असें ह्मणून त्यानें डोक्याच्या फाटक्या मुंडाशांतून आपट्याची दोन चार पानें काढलीं. मुंडाशाच्या एका पदराला तंबाखूची लहानशी गांठोडी होती. ती सोडून दोन चिमटी तंबाखू काढिली. आणि एक विडी तयार करून, गारगोटीनें ती पेटवून, स्वारी धूम्रपान करूं लागली. व तें करीत असतांना ह्मणाली, ' बावा, ही कोण तुमचीं मुलें वाटतें ? '

' नाहीं. भाचे आहेत -बहिणीचीं मुलें आहेत ! '

' हं. असें. ' असें ह्मणून तो त्या पोरांशीं बोलूं खेळूं लागला !

इतक्यांत कमला घरांतून सहज बाहेर आली. शंकररावांनीं तिच्याकडे किंचित्काळ सहेतुक पाहिलें. व त्यांनीं तें पत्र तिच्यापुढें टाकिलें. तिनें तें घेऊन वाचलें मात्र ! तोंच तिच्या काळजाला धक्का बसल्यासारखें तिला झालें. तिच्या नेत्रांत अश्रुबिंदु चमकूं लागले. ती पदरानें ते पुसून ह्मणाली ' मग आतां पुढं काय करावयाचें ? मला तर बाई आतां पुढें कांहीं सुचत नाहीं '.

' मी ठेवला आहे सगळा बेत करून ! आतां आपण आधीं अहंमदनगरीं जाऊन इंदिरेचा शोध करून पाहूं ! कारण ती बहुधा तेथेंच असेल '.

' पण आपण गेलों तर मामंजी गांवाहून आल्यावर काय ह्मणतील ? कमला ह्मणाली.

' कांहीं नाहीं ह्मणणार. मी त्यांना खरी हकीकत सांगेन. ते विचारी आहेत. त्यांना ह्या गोष्टीचा कधींही राग येणार नाहीं. '

इतकें बोलणें झाल्यावर कमला घरांत गेली. त्या भिल्लास शंकररावांनीं विचारलें ' कायरे, तुला गडावर परत जायचें असेल ना ? आतां आमचे बरोबरच चल. आह्मी उद्यांच निघूं. '

' मला तिकडे नाहीं जायचं रावसाहेब. मला त्या पल्याडल्या आबासाहेबांनीं चाकरी देण्याचं कबूल केलें आहे. तिकडे तरी काय ! मला बायकोना पोर ना नात्याचें कोणी. राहीन येथेंच झालें. '

त्याची राहण्याची इच्छा पाहून शंकररावांनीं त्याला परत चलण्याचा आग्रह केला नाहीं. त्यांनीं त्याला यथेच्छ जेऊं घातलें. मग तो आबासाहेबांकडे गेला.

मग शंकररावांनीं आपल्या मातेजवळ अहंमदनगरीं जाण्याची गोष्ट काढिली. त्यांनीं तिला इंदिरेचें पत्र (सहाव्या प्रकरणांत इंदिरेनें एक पत्र लिहिलें ह्मणून ज्या पत्राचा उल्लेख आला आहे तें हेंच पत्र, हें वाचकांच्या लक्षांत आलेच असेल. तसेंच तो भिल्ल तुकारामानेंच पाठविलेला होता, हें सांगणें नकोच.) वाचून दाखविलें. त्यांच्या दोन बहिणीहि तेथेंच होत्या. शंकररावांनीं त्या सगळ्यास आपल्याला कमलेसह जाणें किती जरूर

आहे हें समजून दिलें. त्यावर कोणीहि त्यांना अडथळा आणिला नाहीं. मग शंकररावांनीं घरची सर्व व्यवस्था नीटनेटकी करून, त्याचा एक मावसभाऊ शहरांतच रहात होता, त्याला बाबा येईपर्यंत घर संभाळावयास सांगितलें. दुसऱ्या दिवशीं त्यांचा जावयाचा बेत ठरला. त्याची एक धाकटी दहाअकरा वर्षांची बहीण सासरीं गेलेली होती—तिचें सासर साताऱ्यासच होतें— तीही मुद्दाम भाऊ जाणार ह्मणून माहेरीं आली. दुसरे दिवशीं शंकरराव आणि कमला सर्वांचा मोठ्या प्रेमानें निरोप घेऊन निघाले. त्याकाळीं थोडे दिवसाकरिता जरी परगांवीं जावयाचें असलें, तरी, जणूं काय ही शेवटचीच भेट, असाच निरोप घेऊन जावें लागत असे. कारण, जाणाऱ्याच्या जीविताच्या सुरक्षितपणाबद्दल केव्हांही भरंवसा नसे. अर्थात् जाण्याचा निरोप घेणं ह्मणजे किती कष्टाचें काम असे, हें सांगणें नकोच. तशांत शंकरराव त्यांच्या मातेचे एकुलते एक लाडके चिरंजीव. त्यांच्या बहिणींचे एकुलते एक दादा. कमलेसही तिच्या नणंदा सख्याबहिणी प्रमाणें लेखीत असत व त्याजवर तिचेंच फार प्रेम असे. त्यामुळें त्या ठोवामही निरोप देण्याचें सर्वांच्याच जिवावर आलें, शेवटीं शंकरराव आपल्या मातेच्या चरणीं मस्तक ठेऊन व तिचा आशिर्वाद घेऊन सर्वांचें समाधान करीत चालूं लागले. त्यांचे बरोबर १००।१५० लोक अहंमदनगरीं जावयास निघाले. कमळेनें सर्वांचा निरोप घेतला आणि ती मेण्यांत जाऊन बसली. शंकररावही घोड्याचा लगाम हातांत धरून आपणास पोहोंचवावयास आलेल्या आई व बहिणीस परत जाण्यास सांगूं लागले. इतक्यात त्यांची दहा अकरावर्षांची धाकटी बहीण जरा रागावून ह्मणाली ' आई, दादानाही नाहीं अलीकडे माणसाचा फार कंटाळा येऊं लागला. ह्मणून ते वहिनीला घेऊन चालले. तेथें. बरें आता. मियां बिबि राहतील आपले ' ! हें तिचें बोळणे ऐकून शंकररावास फार कौतुक वाटलें. त्यांचा कंठ सद्गदीत झाला. ते तिच्याजवळ जाऊन तिच्या तोंडावर हात फिरवून ह्मणाले ' बाळ दुर्गाताई, आह्मी लवकरच येऊं बरें. तूं असी रागावूं नकोस गडे ' पण दुर्गाताईचें समाधान झालेलें दिसलें नाहीं.. तिच्या डोळ्यांत अश्रू आले. ते पुसून शंकरराव झटकन् आपल्या घोड्यावर जाऊन बसले. कमळेचें लक्ष सर्व इंदिरेकडे लागले होतें. त्यामुळें मेणा केव्हां चालूं लागला ह्याचें तिला भानही राहिलें नाहीं. थोडक्याच वेळांत शंकरराव—

कमळा त्यांचे घरच्या मंडळीच्या दृष्टीआड झाली व मंडळीही खिन्न मनानें परत गेली.

मार्ग क्रमीत असतां मध्यंतरीं १।२ वेळ कमळेनें ' इंदिरा अहंमदनगरींच आहे हे कशावरून ? ' म्हणून विचारलें.

तेव्हां शंकररावाचा व तिचा खालील संवाद झाला.

' कशावरून म्हणजे ? तिच्या पत्रात नाहीं कां लिहिलें ? त्याबद्दल शिवाय त्या भिल्लानेंही तिला शेंदानशीं लोकांसह जातांना पाहिलें ! ' तुकारामानें गडावर घडलेली सर्व हकीकत त्या भिल्लाला सांगुन, ती शंकररावांस कळीव म्हणून सांगितलें होतं. त्याप्रमाणें त्या भिल्लानें सातान्यास जऊन शंकररावाचा शोध काढिला, आणि त्यांना ती हकीकत इथ्थंभूत सांगितली. ती हकीकत शकररावानीं कमलेस आतां सांगितली. ती वाचकांस संपूर्ण माहीत असल्यामुळें त्याची पुनरुक्ती येथेंही करावयास नको.

आधींच इंदिरेच्या पत्रांतील हृदयद्रावक भाषा वाचून व्यथित झालेली कमला, ही हकीकत ऐकून अत्यंत उद्विग्न झाली. त्या दोघी लहानपणापासून एकाच ठिकाणीं आणि एकाच स्थितींत वाढल्या होत्या. त्यांचें एकमेकींवर इतकें प्रेम असे कीं, त्या देहानें मात्र दोन होत्या, परंतु मनानें अगदीं एक होत्या. अर्थात्, इंदिरेसंबंधींही अनिष्ट वार्ता ऐकून, कमला पराकाष्ठेची दुःखित झाली, ह्यात नवल नाहीं ! तिला लहानपणाच्या सर्व गोष्टी आठवूं लागल्या. लहानपणीं आपण दोघींनीं गोदावरीच्या निर्मळ पाण्यांत प्रहरन् प्रहर यथेच्छ क्रीडा करावी, गडावरील शिवालयांत, अगर एखाद्या झाडींत काळयाभोर शिळेवर बसून, पुराणांतील साध्वी स्त्रियांच्या सद्गुणाबद्दल कधीं कधीं विचार करावा. कधींकधीं आपल्या भावी स्थितीचीं चित्रें रेखाटावींत. त्याचप्रमाणें जिवाजीपंतांनी कित्येकवेळां ' माझ्या ह्या दोन पोरी मोठ्या भाग्यशाली निघतील ' असें म्हणावें; तर केव्हा केव्हा ' तुम्ही आम्हांला मुलाच्या ठिकाणीं आहांत ' असें उभयतां मातापित्यांनीं मोठ्या कौतुकानें म्हणावें. इंदिरेच्या आईनें दोघींनाहीं सारखेंच लेखावें, पण इंदीरेला त्याबद्दल चुकून देखील कधीं राग येऊं नये. किंवा वाईटही वाटूं नये. वगैरे एक का दोन ? अशा अनेक गोष्टी तिला आठवल्या. इंदिरेला लहानपणापासून एका गोष्टीची मोठी

चीड असे. ती गोष्ट ह्मटली ह्मणजे-कोणत्याही पशु, पक्षाला बंदींत ठेवणें. जिवाजीपंताच्या चाकरांनीं अनेक जातीचे सुंदर पक्षी किंवा चमत्कारिक जनावरें धरून ती आपल्या छोट्या धनीणीस नजर करावीत. कमला मोठ्या आनंदानें घेत असे पण इंदिरेनें ते प्राणी धरणारांचा व कमळेचा नेहमीं निषेध करावा. ह्यामुळें कमळेचा कित्येक वेळां फार विरस होई, पण इंदिरा तिची मधुर वाणीनें समजूत घाली. ह्या गोष्टीचे कमळेस स्मरण झालें. कमळा कळवळून मनाशीं ह्मणाली 'जी इंदिरा दुसऱ्यास बंदिवान करण्यास इतकी भीत असे, आपण एखादां पक्षी पिंजऱ्यांत घालण्यास तयार झालों ह्मणजे जिनें अश्रुपर्ण नेत्रांनीं कमळे, सोडगं त्याला! आपलां एखाद्यानें अशी स्थिति केली ह्मणजे आपणांस काय बरें वाटेल!' ह्मणावें. त्याच इंदिरेवर ह्या नरराक्षसाच्या बंदींत पडण्याचा प्रसंग यावा, ही किती शोचनीय स्थिती आहे!! परमेश्वराला याबद्दल कांहींच कां कींव येऊं नये! ह्यानंतर कमळेच्या मनांत धोंडोपंताच्या बेइमानपणाबद्दल विचार चालू झाला. इंदिरेच्या सासऱ्यानें धोंडोपंताचा लहानपणापासून प्रतिपाल केला, तेच धोंडोपंत मुरारराव—इंदिरेचा नाश करावयास, त्याच्या अब्रूची राखरांगोळी करावयास सिद्ध झाले, ह्यावरून 'कुणि न कुणाचा, जन स्वार्थाचा!' ही कवीची उक्ती अगदीं बरोबर आहे. ह्या जगांत अधमपणा किती कळसाला जाऊन पोंहोंचला आहे, हें ह्यावरून चांगलें निदर्शनास येतें, असें कमलेला वाटलें! बादशहाबद्दल तर कमलेला इतकें आश्चर्य वाटलें कीं, कांहीं विचारूं नका! इंदिरेनें बादशहाच्या चांगूलपणाबद्दल कमलेला पुष्कळ सांगितलें होतें. मुराररावावर बादशहाची पूर्ण कृपा आहे हेंही कमलेस ठाऊक होतें. शिवाय निजामशहाच्या सौजन्याची निजामशाहीच्या बाहेरही फार ख्याती झाली होती. त्यामुळें कमलेला, बादशहानें इंदिरेचा अपहार करावा, ह्याबद्दल जें अतिशय आश्चर्य वाटलें, तें योग्यच होतें.

इकडे शंकररावाचेंही मन विचाराच्या जाळ्यात गुरफटलें होतें. ही गोष्ट ऐकल्यावर मुराररावांस काय वाटलें असेल. त्याचे आजपर्यंतचे दिवस मोठ्या सुखांत गेले. त्याला ह्या भवदुःखाची कल्पना देखील नाहीं. त्याला बादशहाचा संताप आला असेल. पण येवढ्या समर्थ बादशहापुढें आपलें काय चालणार,

असें मनांत येऊन, आपली अब्रू नष्ट झाली ह्या दुःखद विचारानें तो आत्म-हत्या तर करणार नाहीं—किंवा केली नसेल हें तरी कशावरून? असा मनांत विचार आल्याबरोबर शंकरराव अत्यंत संतप्त झाले. त्यांना मनसूरअली तर काय पण एकंदर मुसलमान जातीबद्दल मुळींच आदर वाटत नसून, उलट तिरस्कारच वाटे! मुराररावांनीं त्याच्याबद्दल नेहमीं बादशहाजवळ तारीफ करावी. असा त्यानाही अहमदनगरीं असतांना थोडाबहुत अनुभव होताच. परंतु, ही गोष्ट ऐकून त्याचें मन भडकलें. बादशहानें मुराररावास आजपर्यंत जी मेहरनजर दाखविली ती केवळ इंदिरेस हरण्याकरितां असें शंकररावास वाटलें. शंकररावाचा लहानपणापासूनच स्वराज्याकडे कल असे. त्यांनीं मुराररावास वारंवार उपदेश करावा, ' मुरारराव, ही म्लेंच्छांची सेवा ह्मणजे खरोखर नरकवास! ह्यांना दयामाया काडीचीहि नाहीं! तुमच्यासारख्या सरदार, दरकदार लोकाना ह्यांचेकडून मान मिळत असल्यानें तुमची स्थिति काहीं बरी. पण बाकीच्या लोकाकडे पाहा. त्यांना जनावरापेक्षादेखील क्रूरतेनें वागवलें जातें. जे यवन अधिकारी लोकास न्याय मनसुबा मिळावा ह्मणून प्रांतोप्रांतीं नेमिले जातात ते अन्यायाचा कडेलोट करितात; आणि स्वतःच्या सुखासाठीं—मग तें यःकश्चितही असो गरीब हिंदूलोकाचे हाल करितात. मुरारराव! तूं सर्व गुण संपन्न आहेस. तुझं वजनही पुष्कळ वाढलें आहे. तुझ्या बापाच्या कीर्तीमुळें आज तुला पुष्कळ माणसें मिळूं शकतील. तूं वेळाशक हातांत शस्त्र धर. ह्या निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही वगैर शाह्यांचा निःपात करून ह्या लांडग्याची हड्डी चांगली नरम कर व हिंदूंचें राज्य स्थापन कर! लोक ह्या गोष्टीला हापापले आहेत. ते तुझे अत्यंत उपकार मानतील. तुला देवाचा अंश समजतील!'

मुराररावाची प्रखर स्वामीभक्ती वाचकांस कळलीच असल्यामुळें, मुरारराव हा उपदेश कितपत मनावर घेत असतील, ह्याची त्यांनीं अटकळ बांधलीच असेल. ते हा उपदेश मनावर घेत नसत; येवढेंच नव्हे, तर शंकररावांनींही तसें करूं नये, ह्मणून ते त्याना गळ घालीत. त्यामुळें शंकरराव देहानें तरी-मनानें तर कधींच नाहीं—स्वस्थ रहात. ही स्वराज्याची आवड शंकररावांसच होती असें नाहीं. त्याकाळीं बहुजनसमाजाचीच प्रवृत्ती राज्यक्रांती

करण्याकडे होती. मुसलमानांच्या असंख्य वेड्यावेड्या चारांनीं लोक अत्यंत क्षुब्ध झाले होते. शंकररावांच्या म्हणण्याप्रमाणें ते खरोखरच स्वराज्याला हपा-पलें होते. त्यांना कोणी तरी पुढारी पाहिजे होता. तो अर्थात् कर्तृत्ववान पाहिजे होता. मुरारराव खरोखर पुढारी होण्याला योग्य होते, व स्वामी भक्तीचें वेड त्यांना न लागतें, तर आज ज्या कारणामुळे आपण श्रीमदाद्य-छत्रपती शिवाजीमहाराजांस पूज्य मानितों, त्याचकारणासाठीं आपण मुरार-रावांचे उत्सव करूं लागलों असतों. मुरारराव स्वामीभक्त होते, ह्याबद्दल त्यांना दोष देतां येत नाहीं. तत्कालीन बहुतेक मराठे अमीरउमराव मुराररावांसार-खेच स्वामिभक्त होते. आणि अशीच स्थिती कोणत्याही राज्यक्रांतीचे वेळीं असते. राज्यक्रांती करावयास सधन किंवा अधिकारापन्न लोक बहुतेक तयार नसतात. कारण त्यामुळें त्यांच्या स्वतःच्या सुखास धोका येण्याचा संभव असतो. अर्थात् मध्यम आणि कनिष्ठ स्थितींतील लोकांस त्यांच्या साह्यावर फारसें अवलंबून न राहतां, आपल्या स्वतःच्याच बलावर साध्य स्थिति संपा-दन करावी लागते. पण खालच्या ह्या दोनही वर्गास, साध्य स्थिति सहज व लवकर प्राप्त होत नाहीं. त्यांना कालावधि लागतो. ह्या सामान्य नियमाप्र-माणें आमच्या कह्याखालीं मराठे लोक जरी प्रक्षुब्ध होते तरी पण साध्य स्थिति—हिंदपदपादशाही—मिळविण्यास त्यांना आणखी कांहीं कालावधीची जरूर होती. शंकरराव हें सर्व जाणून होते. पण आपण पुढाकार घेतला तर स्वराज्य आताही मिळेल अशी त्यांची खात्री होती. पण मुरारराव स्वतःहि तें कबूल करीनात आणि शंकररावांसही ते करूं देईनात, त्यामुळें शंकररावांचा नाइ-लाज झाला. आतां कदापि मुराररावाचें ऐकावयाचें नाहीं; त्यांचेकडून आपली हिंदुपद पादशाही स्थापावयाचीच असा शंकररावाचा ठाम निश्चय ठरला. आणि यदाकदाचित् जर मुराररावानें आपल्या जीवाचें बरें वाईट करून घेतलें असलें, तर निजामशाहीचीं अगदीं पाळेंमुळें खणून काढीन आणि मनसूरअलीला ठार करून माझ्या मित्राचा—मित्राचा कसला प्राणाचा सूड घेईन ! अशी शंकररावांनीं मनात प्रतिज्ञा केली. ती त्यावेळीं त्यांनीं कोणासही सांगितली नाहीं; इतकेंच नव्हे, तर आपल्या मनोवृत्ती कोणाला दिसूं नयेत म्हणून त्यांनीं फार प्रयत्न केला. शेवटीं अहमदनगर जसजसें जवळ येऊं लागलें तसतसें तेथें गेल्यावर काय करावयाचें ह्याबद्दल

ते विचार करूं लागले. बराच विचार केल्यानंतर ' कमलेचा इंदिरेजवळ हरयत्नांनीं प्रवेश करून द्यायचा. आणि आपण मुराररावांजवळ जाऊन, त्याचेसह अहंमदनगरीं परत यावयाचें, आणि मग त्या दोघांची सुटका करावयाची. नंतर आपणाला काय करणें, तें करूं ! ' असा त्यांचा बेत ठरला. हा बेत त्यांनीं कमलेला सांगितला नाहीं. तिलाही पुढें काय करावयाचें ह्याबद्दल विचारण्याची शुद्ध राहिली नाहीं. पुरुष बरोबर असले ह्मणजे बायका बहुशा निर्धास्त असतात; तीच स्थिति ह्यावेळीं कमलेची झाली. तिचें मन पहिल्यांदा सांगितलेल्या विचारतरंगांतच गटंगळ्या खात होतें !

सातार्‍याहून निवाल्यापासून पांच दिवसांनीं शंकरराव सर्व मंडळीसह अहंमदनगरीं येऊन पोंचले. त्यांचें तेथें एक लहानसें सत्तेचें घर होतें; तेथें ते कमलेसह जाऊन राहिले. मंडळीसाठीं त्यांनीं दुसरें सर्वांना पुरेल येवढें घर भाड्यानें घेतलें. तो दिवस त्या घरांत त्यांनीं कसातरी काढिला. कमलेनेंही ' इंदिरेनें आत्महत्या तर केली नसेलना ? ' अशा तर्‍हेचे त्यांना पुष्कळदां प्रश्न केले. पण त्यांनीं कांहीं उत्तर दिलें नाहीं. सारांश, दोघांनाही तो दिवस विचारांत आणि दुःखांत घालवावा लागला.

दुसरे दिवशीं सरदारी थाटाचा पोषाख करून, शंकरराव तडक राजवाड्याकडे गेले. त्यांनीं कोटाच्या भोंवतीं पुष्कळ घिरट्या घातल्या; शिपायांच्या, हुजर्‍यांच्या भाषणें बराच वेळ ऐकलीं. त्यायोगें समाधान न झाल्यामुळें ते राजवाड्यांत शिरले. सरदार दिसत असल्यामुळें पहारेकर्‍यांनीं त्यांना मज्जाव केला नाहीं. आंत गेल्यावरही ते आंतील एकुणएक इमारतींभोंवतीं फिरून आले. शेवटीं ते मागील बाजूच्या एका उद्यानांत शिरले. ह्याच बाजूला जनानखाना होता. शंकररावांनीं झाडाआड लपून प्रत्येक खिडकींत न्याहाळून पाहिलें. तथापि, त्यांची इच्छितवस्तू त्यांना दिसली नाहीं. ते निराश झाले आणि सचिंत एका झाडा खालीं उभे राहिले. इतक्यांत मागच्या पायर्‍यांतून एक स्त्री उतरत होती, तिचें त्यांच्याकडे लक्ष गेलें ! ते मूळचेच सुंदर. तशांत पोषाख अतिशय उत्तम प्रतीचा—त्यामुळें अधिकच मनोरम दिसत होते. त्यामुळें ती स्त्री फार मोहीत झाल्या सारखी दिसली. ती राणीसाहेबांच्या तैनातींतील एक दासी होती. नट्टी पट्टीकरून तिनें आपणांस बरीच शोभा आणली होती. शंकररावाकडे पाहून ती

कामचेष्टा करूं लागली ! पण त्यांचें तिकडे लक्ष होतें कोठें ? शेवटीं ते आपल्याच विचारांत दंग आहेत असें पाहून ती ठुमकत मुरडत त्यांच्याजवळ जाऊं लागली ! तितक्यांत शंकररावांची दृष्टी तिजकडे गेली. तिचा आशय जाणून त्यांना फार आनंद झाला. आपल्याकडे शंकररावांचें लक्ष आहे, हें पाहतांच ती स्त्री त्यांच्यापासून बऱ्याच अंतरावर एका ताटव्याचीं फुलें तोडूं लागली. तिच्या स्मरचेष्टा चालूच होत्या. शंकररावही तिजवर मोहीत झाल्यासारखें दाखवून हळूं हळूं तिच्याजवळ गेले. तिला फारच आनंद झाला व लाजल्याचें आविर्भाव करून तेथेंच उभी राहिली. शंकरराव तिला तिच्या भाषेंत ह्मणाले ' हे चारुगात्रे, मनोरमे, प्रणयसुंदरी, तुझें मुखकमळ पाहून मन्मथ भृंग फार लुब्ध झाला आहे. तुझा वदनचंद्रमा पाहून माझ्या प्रेमसागराला अलोट भरती आली आहे. माझें शांतवन कर. '

ती बिचारी लवंडी ! राजाराणीचे प्रणयकलह तिनें जरी पुष्कळ वेळां चोरून पाहिले होते तरी ती स्वतः त्याला अनभ्यस्तच होती. त्यामुळें तिला आनंद झाला असतांही काय बोलावें तें सुचेना ! शेवटीं ती अडखळत अडखळत ह्मणाली, ' सरदारसाहेब ! आपल्या पायाची दासी आपल्यासेवेला तत्पर आहे. '

शंकरराव ह्या उत्तरानें आनंदल्यासारखें करून ह्मणाले, ' आपण कोठें तरी परगांवीं जाऊन राहूं, आणि खूप सुख भोगूं ! आहे कां कबूल ? '

दासीनें तें मान हलवून कबूल केलें.

' पण मला एक सांग. येवढ्या आठपंधरा दिवसांत बादशहानें एका खुपसुरत हिंदूस्त्रीस जनानखान्यांत आणून ठेविलें आहेना ? ती स्त्री फारच सुंदर आहे. अगदीं परी आहे ! '

शंकररावांनीं एका सुंदर स्त्रीच्या सौंदर्याचें आपल्यापुढें वर्णन करावें, हें त्या दासीला खपलें नाहीं ! ती धिःकार स्वरानें ह्मणाली, ' कोण ? हिंदू स्त्री ? मी कांहीं नाहीं तरी आज वीस वर्षें येथें आहे, पण बादशहानें कोणाही परस्त्रीला आणून ठेविलेलें मला आठवत नाहीं. बादशहा फार पापभीरू आहे. तो असें कधींहि करणार नाहीं. ! '

तिच्या ह्या उत्तरानें शंकरराव फार अचंब्यांत पडले. तिच्या स्वरावरून

ती सत्य बोलत आहे, असें त्यांना वाटलें. ते पुन: तिला ह्मणाले, ' छे. ती स्त्री तर नक्की आली आहे. राजाराणीनें ही गोष्ट कळविली नसेल तुला. '

ती स्त्री राणीच्या प्रमुख आणि विश्वासु दासींपैकीं होती. जनानखान्यांतील यच्चयावत गोष्टी तिला ठाऊक होत्या. त्यामुळें शंकररावांचें हें बोलणें तिला बिलकुल रुचलें नाहीं. ती निश्चयात्मक स्वरानें ह्मणाली, ' अमीरसाहेब, अशी गोष्ट झाली असल्यास राणीसाहेब मला सांगितल्याखेरीज कधीं रहात्याना. त्या बादशहाबरोबर एकातांत असतांना घडणाऱ्या गोष्टी देखील मला सांगतात, तर मग हीच काय ? '

' प्यारी खरेंच सांग. ती स्त्री माझा घात करणार आहे. ती वाड्यांत असल्यास तिला भुलथाप देऊन येथें आण. येथल्यायेथें तिला नाहींशीं करूं. ह्मणजे मग आपण निर्भास्त झालों ! ' शंकरराव दीन स्वरानें ह्मणाले.

' ह्मणजे ? ' तिनें आश्चर्यानें विचारलें.

' ह्मणजे काय ? तिला पहिल्यानें पाहिलें तेव्हां मी तिच्यावर आषक्त झालों. तीही मजवर फिदा झाली. मग आह्मी कांहीं दिवस एकत्र राहिलों. एक दिवस ती बेइमान स्त्री परपुरुषासक्त अशी माझ्या दृष्टीस पडली. मी तिला ठार मारावयास गेलों. तेव्हां त्या पुरुषाच्या सहाय्यानें ती पळाली व जातांना ' थाव, मी बादशहाला वश करून तुझा नाश करिते ! ' असें ह्मणाली. ह्मणून ह्मणतों. ती राजवाड्यांत कोठें तरी–जनानखान्यांत नसेल कदाचित्–असेल ! पहा, तुला माझ्या गळ्याची शपथ आहे. तुझें जर मजवर खरं प्रेम असेल तर खरी गोष्ट सांग. मला ह्या सुंदर स्त्रियांचा अगदीं तिटकारा आला आहे. आता मी तुझ्याबरोबर आयुष्य घालवणार ! '

शंकररावांनीं सुदर स्त्रियांची नालस्ती केलेली पाहून व त्यांचा शेंवटला निश्चय ऐकून त्या लवंडीचे अंगावर पुष्कळ मांस आलें ! ती खऱ्या प्रेमानें आणि मनोभावानें ह्मणाली, ' सरदारसाहेब ! तुमच्यापुढें मला माझा प्राण तुच्छ आहे. मी माझ्या व तुमच्या गळ्याची शपथ वाहून सांगते कीं, जनानखान्यांत कोणाही हिंदू स्त्रीस आणिले नाहीं. बादशहाही अशा फंदांत नाहींत. ते दरबारचा वेळ खेरीज करून नेहमी राणीसाहेबांजवळ असतात. नाहीं म्हणायला संध्याकाळीं चार घटका हुसेनखानाशी मात्र गप्पा मारीत

बसतात. तरी त्यावेळीं आमच्यापैकीं कोणी तरी त्यांच्या सेवेला हजर असतेच.'

आतां बरीक शंकररावांची खात्री झाली, कीं इंदिरेला बादशहानें आणिलें नाहीं. मग तिला कोणी आणली ? हा प्रश्न सहाजीकच त्यांना उद्भवला. तुकारामानें येवढया लांब भिलु पाठविला, व तो स्वतःही मुराररावांजवळ गेला, तेव्हां तो ह्मणतो, तें तरी खोटें कशावरून ? खरें ह्मणावें तर दासीच्या बोलण्यावरून तें दिसत नाहीं ? अशा पेंचांत शंकरराव पडले. कांहीं वेळ विचार करून, त्यांनीं मनांत कांहीं बेत ठरविला. नंतर ते उठून त्या स्त्रीला ह्मणाले, ' समजलों. ती स्त्री कोठें आहे, तें आलें मझ्या लक्ष्यांत. मी आतां जाऊन तिला ठार मारितों. मी आजरात्रीं दोन चलाख घोडे घेऊन येथें येईन. तूं बरीक नक्की ह्याच ठिकाणीं रहा बरें. मग आपण इच्छित स्थळीं जाऊन यथेच्छ सुख भोगूं ! त्या कुलटेला मारून आल्यावर, हा-पड्या एक लक्ष काय,. पण हवें तितकें साखरेचें घे्ईल–' असें ह्मणून ते जाऊं लागले–ती स्त्री ह्मणाली, ' पण नक्की याबरें ! पुढील आशेवर मी आतां आपणांस सोडीत आहे ! '

' वा ! शाबास. मला अशीच रखेली आवडते ! '

असें बोलून ते चालते झाले. ती स्त्री प्रेमानें त्याच्यांकडे पहात होती. आज येवढ्या वेळांत सरदारानें आपल्याला चुकूनसुद्धां स्पर्श केला नाहीं ह्याचें तिला आश्चर्य वाटलें. तथापि, त्याचें त्या बेइमान स्त्रीला मारण्याकडे लक्ष होतें ह्मणून असें झालें, अशी तिनें समजूत करून घेतली.. शेंवटीं ती आपल्या कामाला गेली..

\+ + +

रात्रीं पळून जाण्याची तयारी करून ती तेथें येऊन बसली. पण सरदाराचा पत्ता नाहीं. थंडींत बिचारीनें पहाटपर्यंत वाट पाहिली.. शेंवटीं निराश होऊन वाड्यांत गेली. तथापि, आज येईल उद्यां येईल ह्या आशेनें बरेंच दिवस तिचा हा प्रकार चालू होता.. पण तिच्या प्रियकराचा ठिकाणा नाहीं !

प्रकरण १४ वें

शोध.

शंकरराव राजवाड्यांतून आपल्या घरीं गेले. वाटेनें त्यांनीं बराच विचार केला. इंदिरा अहंमदनगरीं तर खास आली, असें तिच्या पत्रावरून आणि त्या निष्कपटी भिल्लाच्या सांगण्यावरून त्यांना वाटत होतें. मात्र ती बादशहाच्या जनानखान्यांत नसून दुसऱ्यानेंच कोणीं तिला येथें आणिलें. धोंडोपंतांनीं तुकारामाला बादशहाचें नांव मुद्दाम सांगितलें असावें, असें त्यांना वाटलें. मागच्या प्रकरणांत त्या लवंडीच्या बोलण्यांत हुसेनखानचें नांव आलें, तें ऐकल्याबरोबर शंकररावांचे मनांत असें आलें कीं, ह्या हुसेनखानाचेंच हें कृत्य असावें, हुसेनची व त्याची ओळख होती. ते, मुरारराव आणि हुसेन एकाच गुरूच्या हाताखालीं शिकलेले. त्यामुळें त्यांची व हुसेनची साधारण दोस्ती देखील होती. तरी पण त्यांना हुसेनबद्दल फारसा आदर नसे. 'स्वसुखासाठीं काय पाहिजे तें करावें. त्यांत पाप नाहींन् पुण्य नाहीं.' हे हुसेनचे नेहमींचे उद्गार असत. ते शंकररावांस आठवले. हुसेनची व मुराररावाची वजिरीबद्दल साधारण चुरसच लागल्यासारखें आहे. आणि मुराररावांना आतां वजिरी मिळण्याचा रंग दिसत आहे. ह्मणून ह्या स्वसुखार्थ पापापुण्याची परवा न करणाऱ्या हुसेनखानानें, मुराररावांची अशारीतीनें नाचक्की करण्याचा बेत केला असावा, असा त्यांना बळकट संशय आला. व उद्यां हुसेनच्याच घरीं शोध करण्याचा त्यांनीं निश्चय केला.

घरीं गेल्यावर त्यांनीं सर्व वृत्तांत कमलेला निवेदन केला, आणि त्यांनीं वाटेंत जो निश्चय केला, तोही कळविला. कमलेला फार आश्चर्य वाटलें. तिलाही इंदिरा जर राजवाड्यांत नाहीं तर ती हुसेनच्या येथें असावी असा संशय आला, आणि त्यायोगें शंकररावांचा निश्चयही कायम ठरला.

शंकररावांनीं त्या दिवशीं गोसाव्याचें सोंग घ्यावयास अवश्य लागणाऱ्या सर्व वस्तु आणून ठेवल्या. हें पाहून कमला ह्मणाली, 'ह्या जिनसा कशाला आणल्यात ?'

'गोसावी व्हायला. आतां मी उद्यां काय करीन, तें पहा. सध्यां कांहीं विचारूं नकोस.'

कमला हंसत ह्मणाली, 'बरें पण रात्रीं राजवाड्यांत जावयाचें ना? एखाद्या मनुष्याला आशा लावून फसवणें चांगलें नाहीं!'

ह्यावर कांहीं उत्तर न देतां शंकरराव नुसते हंसले!

दुसऱ्या दिवशीं गोसाव्याचें रूप घेऊन शंकरराव हुसेनच्या घरीं गेले. रामनामाचा घोष करीत स्वारी हुसेनच्या दाराशीं उभी राहिली. दाराच्या देवडीवर कांहीं हुजरे वगैरे लोक चिलमी फुंकीत बसले होते. देवडीवरच्यां लोकांनीं भिकाऱ्यास भिक्षा घालावी, असा हुसेनचा सक्त हुकूम असे. त्याप्रमाणें एका हुजऱ्यानें गोसावीबुवास भिक्षा घातली. पण गोसावी पक्का वस्ताद! आशिर्वादावर आशिर्वाद देत देत, रामाची महती वारंवार वर्णन करीत, स्वारीनें देवडीवर तर आसन ठोकलेंच! तेथील लोकही गंजडीच! - त्यांना अशा मनुष्याची संगत तर अगत्याची. त्यांनींहि बोवांचा आदरच केला. एकानें त्यांच्यापुढें गांज्याची चिलीम केली. पण बोवांस साऱ्या जन्मांत गांजा पिण्याचा प्रसंग आला असेल तर ना ते चिलीम ओढणार! तथापि त्यांनीं आपलें व्यंग दिसूं दिलें नाहीं. ते ह्मणाले, 'भय्या, मी गांजा पीत नसतो. भगवान् रामचंद्रानें एक दिवस मला दर्शन देऊन सांगितलें कीं, तूं गांजा पीत जाऊं नकोस. भांग पीत जा! तेव्हांपासून मी गांजा सोडला. नाहींतर पूर्वी मला दरघडी गांजा लागे. आतां भांगेचा सकाळसंध्याकाळ एकएक लोटा लागतो. भांग ह्मणजे काय? केवळ अमृत!' असें ह्मणून बोवाजी मिटक्या मारूं लागले! अर्थात् चिलीम दुसऱ्या इसमाजवळ गेली. तो इसम मुसलमान होता. त्यानें चिलीम नीट सांवरून, बोवांस ह्मटलें, 'बुवाजी! कुयी मंतरतंतर येते कां?' असें ह्मणून त्यानें अंगांतील सर्व शक्ती एकवटून एक झुरका मारिला! दुसरा एक जवळच बसला होता, त्यानेंही विचारिलें, 'कांहीं हातबीत पाहतां येतो कां?'

तेथें मुसल्मान मंडळीही बरीच पाहून बोवा ह्मणाले, 'हां जी भय्या! सगळें येतें. हें सगळें मला एका अवलियानें शिकविलें. तो जरी मुसल्मान होता, तरी त्याचें मजवर फार प्रेम होतें. त्यानें मला त्याची एकूणएक विद्या

शिकविली. मला अधांत्रीं देखील उभें राहतां येतें. दरशुक्रवारीं अल्ला मला दर्शन देतो. रामही नेहमीं दर्शन देतो. अरे बाबा ' राम रहिम सब एकहि भाई ! ' मला हात तर फार सुरेख पहातां येतो. '

बोवासाहेबाचें हें पुराण ऐकून, तेथील अडाणी लोकांस—मुसलमानांस देखील—त्यांच्याबद्दल फार भक्ती उपजली जो तो त्यांना हात दाखवूं लागला. त्यांनींहीं खरें ह्मणा खोटें ह्मणा, प्रत्येकाचें भविष्य वर्तविलें. आणि बहुतेकांना त्यांचें भविष्य पटलेंही ! त्यामुळें त्या सर्वांचा त्यांच्यावर पूर्ण भरंवसा बसला. पुढें गोसावीबोवानीं त्यांना त्यांच्या धन्याचें नांव विचारिलें. व तें कळल्यानंतर कांहीं बोटें मोडून व बराच वेळ तोंडानें पुटपुटत राहून, त्यांच्या धन्याचेंही भविष्य—त्याच्या बापाचें, बहिणीचें, बायकोचें नांव, त्याचा हुद्दा, त्याला मिळणारा मान वगैरे—वर्तविलें. देवडीवाल्यास तें सर्व बरोबर पटलें. त्यानंतर थोडावेळ विचार करून, गोसावीबोवा हळूंच म्हणाले, ' तुमच्या धन्यानें नुकतीच एक तरुण आणि सुंदर परस्त्री घरात आणिली, असें आमच्या होऱ्यात येतें ! खरें आहे कीं नाहीं ? '

हें ऐकून सर्व हुजरे स्तब्ध झाले. ते एकमेकांस खुणा करूं लागले. हें पाहून शंकररावाची खात्री झाली कीं, इंदिरा येथेंच आहे. तरी पण हुसेनच्या हुजऱ्यांच्या तोंडून तें ऐकावें, ह्मणून ते पुढें ह्मणाले, ' काय माझें ज्योतिष चुकलें ? छे. असें कधीं होणार नाहीं. चुकलें तर मी स्वतःला जाळून घेईन; समजलांत ? खास कोणीतरी नवखी स्त्री येथें आली आहे. तिच्या नावाचें पहिलें अक्षर ' इ ' आहे. आहे कीं नाहीं बोला ! ' जों जों गोसावीबोवा आपला स्वर चढवून जास्त जास्त बोलूं लागले, तों तों त्या हुजऱ्यास अधिक भय वाटूं लागलें. सरतें शेवटीं त्यांतील एकजण ह्मणाला ' बोवाजी मोठ्यानें बोलूं नका. आली आहे एक बाऊ. आह्मी नाहीं का ह्मणतों ? तिचें—नाव—पहा बरें—तें—इंदिरा आहे. तुमचें जोतिष खरें आहे. आह्मी कोठें नाहीं ह्मणतों ? पण त्या बाईसंबंधीं एक अक्षरही उच्चारण्याची आह्मांला धन्याची सक्त मनाई आहे. '

' असें असेल, तर मी कशाला बोलूं बापडा ' असें ह्मणून गोसावीबुवा आपल्या विद्येची बरीच प्रौढी मारून चालते झाले. वाटेनें त्यांना हुसेनखानाचा अतोनात संताप आला. ते सगळ्या वाटभर स्वतःशीं ह्मणत होते.

' अहारे हुसेन ! मित्राची पत्नी चोरून आणण्यांत, त्याला शरम देखील वाटली नाहीं ! उद्या जन्मस्थानींही गमन करण्यास चुकणार नाहीं. तरी मी मुराररावांना सांगत होतों कीं, ' बाबा, जोड्यांशीं उभें करण्याइतकी सुद्धां ह्या बेइमानी नरपशूंची योग्यता नाहीं. ह्या नीचांनीं स्वतः मन मानेल तशीं अनन्वित कृत्यें करावींत ! आणि आह्माला उलटीं दूषणें देण्यास तयार व्हावें ! तरी देखील मुराररावांसारखे लोक शुद्धीवर येत नाहींत. ह्याचेंच फळ—त्यांनीं आपल्या बायका, आया, बहिणी बेलाशक पळवाव्यात !— हें होय. ' असो.

शंकरराव ह्याप्रमाणें जळफळत घरीं गेले. कमलेनें त्यांना उत्सुकतेनें विचारिलें, ' आहे कां तेथें इंदिरा ? '

' हो. आहे. ' असें ह्मणून शंकररावांनीं गोसाव्याचा वेष उतरला. नंतर त्यांनीं देवडीवर घडलेली सर्व हकीकत कमलेला सांगितली. इंदिरा आहे, असें ऐकून कमलेला अत्यंत आनंद झाला. तिच्या जिवांतजीव आला. ती शंकररावांच्या चातुर्याचें मनांत कौतुक करूं लागली. ती आश्चर्यानें ह्मणाली, ' पण गोसावी हात पहातात, असें आजपर्यंत आपण ऐकलें नाहीं बाई ! त्यापेक्षां जोशाचा वेष घेतला.नाहीं ? '

' जोशाच्या वेषात हुसेनच्या मी दृष्टीस पडलों असतों, तर त्यानें मला लागलींच ओळखिलें असतें. गोसावीवेषांत मी त्याला लवकर ओळखूं आलों नसतों. येवढ्याचसाठीं मी गोसावीवेष घेतला ! '

' पण देवडीवरचे लोक इतके भोळे कसे बाई ! त्यांना येवढें कळूं नाहीं, कीं गोसावी हात पहात नसतात ह्मणून ! '

' त्यांच्या भोळेपणाला कां हंसावें ? ' शंकरराव किंचित् रागाच्या झटक्यांत ह्मणाले, ' स्वतःला शहाणे ह्मणविणारे मुरारबुवा काय कमी भोळे आहेत ? आणि त्याची बायको तर विचारूंच नका. बिचारीचा भिडस्तपणा आणखी काय काय संकटें तिला भोगावयाला लावील, प्रभु जाणें ! '

' बरें पण, आतां पुढें काय करावयाचें ? ' कमला म्हणाली.

' आतां बुवा माझी कामगिरी संपली. तुझी राहिली कायती. कांहीं तरी सोंग घेऊन तूं इंदिरेजवळ गेलें पाहिजेस ! '

' सोंग ? मला नाहीं बाई सोंग घेता येत ! '

'मग इंदिरेसाठीं नुसता शोक करितां येतो?' शंकरराव किंचित् तिरसटपणानें ह्मणाले. कमळेला ह्या उत्तराचा किंचित् राग आला. तथापि तो गिळून ती हास्यमुखानें ह्मणाली, 'पण सोंग तरी कशाचें घ्यायचें?'

'दासीच—मग प्रवेश झाला तर होईल तेथें.'

'असें कां? मग मी तयार आहें!' असें ह्मणून ती दासीचा वेष घ्यावयास एका खोलींत गेली. दासीचा वेष तिला शोभणार नाहीं, हें शंकरराव जाणून होते. व ह्मणून त्यांनीं दुसरा बेतही योजून ठेविला होता. पण तिची गम्मत पहावी ह्मणून ते कांहीं बोलले नाहींत. इकडे कमलेनें सर्व दागिने काढले. तिचें एक अगदीं जुनें लुगडें होतें तें ती नेसली. कोपरापर्यंत लांब बाह्यांची एक चोळी तिच्या कापडांत होती ती तिनें अंगांत घातली. कुंकवाचा भला मोठा टिळा कपाळीं लावला. केश कसे तरी बांधून विसकटलेले ठेवले. अशा रीतीनें सजून ती बाहेर आली. प्रियवाचकहो! तुह्माला वाटलें असेल कीं, आतां ती अगदीं गचाळ दिसत असेल! पण नाहीं बरें. हा नवा पोषाक तिला चांगला दिसत नव्हता तरी तिचें मूळचें सौंदर्य काय लोपलें होतें? तें तर होतें तसेंच होतें. तिचे काळेभोर विपुल केश जरी विखुरले होते, तरी ते तिच्या मूळच्या सौंदर्यास शोभाच देत होते. असो. तिला बाहेर आलेली पाहून शंकरराव हंसून ह्मणाले, 'ही कोठली बुवा दासी? अशा दासी मिळावयास लागल्या तर हुसेनखान 'स्वर्ग पृथ्वीवरच आहे' असें विधान बेधडक ठोकील! बरें पण; ए दासी! तुझ्या भाषेंत बोल पाहूं' कमला फार लाजली तिच्या वेषाला योग्य अशी कुळंबाऊ भाषा, तिला मुळींच येईना! व ह्या सोंगाची बतावणी आपणाला करितां येणें शक्य नाहीं, हें लक्ष्यांत आल्यावर ती फार शरमली. तेव्हां शंकररावांनीं ह्मटलें हें राहूं दे आतां बाजूला. तुला लागतील तितके कपडेलत्ते व इतर सामान—विणण्याशिवण्याचें वगैरे—वे आणि माझ्याबरोबर हुसेनखाच्या घरीं चल. हुसेनची बहीण आमीना आहे, तिला ह्या लिहिण्यावाचण्याचा, शिवण्याविणण्याचा नाद आहे, हें तुला मीं मागें पुष्कळदां सांगितलें होतें. तिला तूं आपल्या ज्ञानानें वश करून घे व मी पुन्हां तुह्मांदोघींला परत नेण्यास येईपर्यंत, आमिनेच्या तंत्रानें वागून तेथेंच

रहा. इंदिरेची व आपली ओळख आहे, असें बरीक कधींही दाखवूं नकोस. मी तुला एका सरदाराची पत्नी ह्मणून तेथें ठेवीन ! ' ह्याप्रमाणें सांगितल्यावर कमलेनें आपली तयारी केली. इंदिरेला भेटण्याची तिला अत्यंत उत्कंठा लागली होती. शंकरराव तिला घेऊन हुसेनच्या घरीं गेले. दैववशांत अमिना दरवाजाजवळच उभी होती. तिला शंकरराव ह्मणाले, ' आमिना नांव आपलेंच कां ? '

आमिना ह्मणाली, ' होय. कां ? काय काम आहे ? '

' आमचे सरदारसाहेब जात आहेत आतां लढाईला ! ' दिवाणाचा वेष घेतल्यामुळें ओळखूं न येणारे शंकरराव म्हणाले, ' त्यांच्या ह्या पत्नीचा फार आग्रह पडला कीं, मला आमिनेची संगत फार आवडते. तिच्या सहवासांत माझा थोडा तरी काळ जाऊंद्या ! सरदारसाहेबांनांही आपली कीर्ति माहित असल्यामुळें, त्यांनीं मला बाईसाहेबांना तुमच्या जवळ आणून घालावयास सांगितलें. त्याप्रमाणें मी ह्यांना आणिल्या आहेत. '

आमिनेनें कमलेकडे पाहिल्याबरोबर, तिला तिच्याबद्दल फार आदर वाटला. तिचें नैसर्गिक सौंदर्य, कपड्यांचा नीटनेटकेपणा, हास्यमुद्रा, आणि स्वच्छपणा पाहून, आमिनेलाही ही आपणांस मैत्रीण मिळेल तर बरें होईल, असें वाटलें.

आमिनेनें दिवाणाचें ह्मणणें मान्य केलें. आपला भाऊ आपल्या इच्छेवि-रुद्ध जाणार नाहीं, ह्याची तिला खात्री होती. आमिनेनें आपलें ह्मणणें कबूल केलें हें पाहून शंकरराव परत जाऊं लागले. कमलेच्या डोळ्यांत अश्रु आले. शंकररावांस सोडितेवेळीं तिच्या पोटांत फार कालवा-कालव झाली. इंदिरेवरील अप्रतिम प्रेम तिला त्यांच्यांत ओढीत होतें. शंकर-रावांची व आपली भेट पुन्हां होईल कीं नाहीं, अशी तिला चिंता उत्पन्न झाली. त्यामुळें ती तेथल्या तेथेंच घोटाळली ! हें पाहून शंकरराव तिला एकीकडे नेऊन ह्मणाले, ' हें असें काय करावें ऐन वेळीं ! तुझी माझी पुन्हां गांठ पडेल. पण तूं यावेळीं जर न गेलीस, तर इंदिरेची गांठ पुन्हां ह्मणून पडावयाची नाहीं ! मी आतां मुराररावांकडे जातों. तुह्मांला सोडवायला मी खास, खास येईन ! '

ह्याप्रमाणें त्यांनीं सांगितल्यावर, कमळा डोळे पुसून अमिनेच्या मागोमाग

वाड्यांत गेली. तिच्याजवळ शंकररावांनीं बरेंच द्रव्य दिलें होतें तें तिनें आमिने-जवळ ती तें 'नको, नको' ह्मणत असतांही दिलें. आमिनेनें कमलेला काय काय येतें ह्मणून प्रश्न केला आणि जेव्हां कमला चांगली विद्वान, शिकलेली व शहाणी आहे, हें तिला दिसून आलें तेव्हां तर तिला महदानंद झाला. तिनें लवकरच आपण तयार केलेले शेले, रुमाल वगैरे वस्तु मोठ्या उल्हासानें कमलेस्या दाखविल्या. आपल्या कवितेच्या भोक्त्याला पाहून कवीला जसा आनंद होतो, तसाच, आपल्या व्यवसायाबद्दल आपल्याला धन्यता देणारी मैत्रीण लाभली, ह्मणून आमिनेला आनंद झाला. आमिनेचें व कमलेचें लाकरच पूर्ण सख्य जमलें.

कमला आलेली इंदिरेला पहिल्यानें समजलेंच नाहीं. ती नेहमीं त्या दिवाणखान्यांत असे. एकदां ती सहज दिवाणखान्याबाहेर आली तों तिला आमिनेजवळ बसलेली कमला दिसली. कमलेला आपण स्वप्नांत पहातों, कीं जागेपणीं पहातों ह्याचा तिला निश्चय करितां येईना ! कमला नवऱ्याच्या सहायानें आपणाला कदाचित् बंधमुक्त करील, असें जरी इंदिरेस वाटत होतं, तरी ती अशी आमिनेजवळ येऊन बसेल, अशी कल्पना देखील तिला आली नाहीं. कमला उतावळ्या स्वभावाची होती; इंदिरेला पाहिल्याबरोबर अतिशय आनंदित होऊन, ती तिला मिठी मारावयास उठली ! पण कमला स्वतःची ओळख न देतां आली असावी, असा तर्क करून इंदिरेनें तिला तसें न करण्याची खूण केली. सुदैवानें आमिनेचें लक्ष दुसरीकडे असल्यानें तिला हा प्रकार कळला नाहीं. इंदिरा आमिनेजवळ गेली, व तिनें तिला 'ह्या बाइ कोण आहेत ?' ह्मणून प्रश्न केला. आमिनेला जें माहीत होतें, तें तिनें खरें खरें सांगितलें. कमला मोठ्या कष्टानें आपलें हंसूं दाबीत होती ! इंदिराबरोक शांतपणें ऐकून घेत होती.

शंकरराव कमळेला आमिनेच्या स्वाधीन करून, आपल्या घरीं गेले. घराला कुलूप ठोकून जेथें त्यांची साताऱ्याहून त्यांच्याबरोबर आलेली मंडळी होती त्या घरीं गेले. इकडच्या हकीकतीचें एक सविस्तर पत्र आपल्या वडीलांस लिहून त्यांनीं त्या मंडळीपैकीं एकाजवळ दिलें. आणि 'मला सध्यां येतां येत नाहीं तुह्मी सगळे साताऱ्यास जा' असें सांगून त्या मंडळीस त्यांनीं वाटेस लाविलें. नंतर आपल्या घोड्यावर स्वार होऊन तेहि अहमदनगराबाहेर चालते झाले.

प्रकरण १५ वें.

अकल्पित हुकूम.

हुसेनला इंदिरा आल्याबरोबर पहिल्यानें जें स्मशानवैराग्य आलें होतें, तें लवकरच गेलें! हुसेन भित्रा, कच्च्या मनाचा, किंवा अनिग्रही स्वभावाचा होता, ह्मणून इंदिरा येतांक्षणींच तो इतका घाबरला, अशांतली गोष्ट नाहीं. त्याच्या सदसद्विवेक बुद्धीनेंच त्याची त्या दिवशीं अशी अवस्था केली! कोणीही मनुष्य एखादें दुष्कृत्य करावयास उद्युक्त झाला, ह्मणजे पहिल्यानें त्याच्या सदसद्विवेकबुद्धीपासून त्याला असाच त्रास होतो. तो इतका होतो, कीं कधींकधीं तो मनुष्य मोठा निग्रही असला, तरी सुद्धां दुष्कृत्य करण्याचें सोडून देतो! परंतु, जो अशा त्रासालाही न जुमानितां, हातीं घेतलेलें दुष्कृत्य पुढें चालवितो, तो आपल्या सदसद्विवेक बुद्धीचा खून करितो, असें ह्मणावयास हरकत नाहीं. हुसेननेंही आपल्या सदसद्विवेक बुद्धीचा खून करून, आरंभिलेलें कार्य शेवटास नेण्याचा दृढनिश्चय केला! तथापि इंदिरा आल्यापासून दहाबारा दिवस तो तिला त्रास द्यावयास पुढेंच गेला नाहीं. इतकेंच नव्हे, तर तो तिच्या नजरेसही पडला नाहीं! पहिल्यानें तिचें दुःख आणि राग कमी होऊं द्यावा. आणि ती आनंदांत असली, ह्मणजे एखादे दिवशीं जाऊन तिचें मन वळवावें, असा त्याचा बेत होता. ह्मणून तो दहाबारा दिवसांत तिजजवळ गेला नाहीं. पण असें होण्यास दुसरें एक कारण होतें. मुराररावांविरुद्ध कारस्थानें करण्यांत तो गढला होता; त्यामुळें त्याला फुरसत कमी मिळत असे. शंकरराव अहंमदनगराबाहेर ज्या दिवशीं चालते झाले ह्मणून मागील प्रकरणांत लिहिलें आहे, त्याचे दुसरे दिवशीं हुसेननें दोन स्वारांजवळ दोन पत्रें देऊन एकास मुराररावांकडे जावयास सांगितलें, आणि दुसऱ्यासही असेंच कांहीं सांगितलें. हे दोन स्वार मुबारिक आणि मसऊद नसून, त्यांच्या इतकेच हुसेनच्या विश्वासांतील होते. हुसेनच्या सांगण्याप्रमाणें ते खूप जलदीनें चालले. ते दोघे बरोबर न जातां, निरनिराळ्या रस्त्यांनीं गेले. प्रथम आपण मुराररावांकडे जाणाऱ्या स्वाराकडे लक्ष देऊं.

तो अहंमदनगराहून निघाल्यावर पांच दिवसांनीं मुराररावांच्या छावणींत

जाऊन पोहोंचला. रोज दिवसभर पूर्ण वेगानें मार्ग आक्रमीत असल्यामुळें, त्याला पांच दिवसांपेक्षां अधिक दिवस लागले नाहींत. मुराररावांची छावणी रामगडास कायमची होतीच. तो स्वार छावणींत गेला, तेव्हां मुरारराव सैन्यांत पहाणी करीत होते. नुकताच त्यांनीं सैन्य पाठवून मोंगलांच्या हद्दींतील महारत्नगड नांवाचा बळकट किल्ला सर केला होता. त्याचीही व्यवस्था करण्यांत ते गुंतले होते. इंदिरा सुखरूप आहे, असे त्यांस वाटत असल्यामुळें, तिच्याबद्दल त्यांना काळजीहि नव्हती. महारत्नगड आणि त्याच्या आसपासचा तीसचाळीस कोसांचा टापू ताब्यांत आल्यामुळें, त्यांना आनंद झाला होता. मोंगलांचें साम्राज्य ह्मणजे अफाट. त्यांचा कांहीं प्रदेश आपल्या हातीं आला; आणि बराच मुलूख आपल्या सैन्याच्या टोळ्यांनीं हैराण करून टाकिला. द्रव्य अगणित मिळवलें. लोकबळही पुष्कळ मिळालें. आजपर्यंत अपयशही कधीं आलें नाहीं. वगैरे सर्व गोष्टी त्यांना आनंद आणि उल्हास वाटण्यासारख्याच घडून आल्या. शिवाय मध्येंच घरची थोडीशी काळजी उत्पन्न झाली होती, ती आतां नष्ट झाली. बादशहाकडून मधून मधून त्यांना सन्मानाचीं आणि प्रोत्साहनपर पत्रें येत असतच. त्यांना कोणत्याही बाजूनें चिंता अमण्याचें कारण नव्हतें. ते प्रफुल्लमनानें सैन्यांत फिरत होते. ते स्वतः रोज आपल्या सैन्याची सर्व व्यवस्था पहात असत. एकाच ठिकाणीं तळ देऊन राहिलें असतां सैनिक गाफिल रहातात, सैन्यांत फंद फितूरी होते, ह्या गोष्टी त्यांच्या लक्षांत होत्या. ह्मणून ते आपल्या सैनिकांस स्वस्थ राहूं देत नसत. कोणांस श्वापदें मारण्यास, तर कोणास एखाद्या पुंडाचा नायनाट करण्यास, तर कोणांस कांहीं, अशा कामगिऱ्यावर ते पाठवीत व स्वतःही जात. महारत्नगड घेतल्यामुळें आज त्यांच्या सैन्याला विश्रांति होती; त्यामुळें सर्व सैन्य छावणींतच होतें. मुरारराव कांहीं लोक समागमें घेऊन हिंडत होते. हुसेनचा स्वार परवलचे ठरावीक शब्द उच्चारून, परवानगी मिळाल्यावर, सर्व पहारे ओलांडून छावणींत शिरला. नंतर विचारपूस करीत करीत तो मुरारराव होते तेथें गेला. त्यानें मुराररावांस त्रिवार लवून मुजरा केला. त्यांनीं त्याला कोठून आलास, का आलास वगैरे केलेल्या प्रश्नास उत्तरें दिल्यावर, त्यानें त्यांच्या जवळ दोन लखोटे दिले. ते दोन्हीही तेथल्यातेथेंच फोडून त्यांनीं वाचले. त्याबरोबर

त्यांची वृत्ती चमत्कारिक झाली. त्यांच्या चर्येवर खेद, आश्चर्य आणि किंचित् आनंद, ह्यांचें मिश्रण स्पष्ट दिसत होतें. ते आपल्या तंबूकडे जावयास निघाले. ते जड पावलांनीं चालले होते. त्यांच्या मस्तकांत विचारांचें काहूर माजून राहिलें होतें. अशा स्थितींत ते तंबूंत जाऊन पोहोंचले. त्यांस इतकें चिंतीत करणार तें पत्र वाचकांकरितां खालीं देतों:—

' स्वामिनिष्ठ सरदार मुरारराव यांसी-

मेहरबान खुदावंत परवरदिगार मनसूरअल्लीजहा निजामशहा यांजकडून हुकूम फर्मावण्यांत येतो एसा जे—आपली एकनिष्ठ सेवा पाहून आणि सांप्रतच्या मोहिमे-वरील आपलें शौर्य व कर्तबगारी पाहून, खूष झाल्यामुळें, आपणांस अहंमदन-गरची वजिरात देण्याचें हुजुरांनीं योजिलें आहे. मोहिमेंत आपल्या जागीं हुसेन महंमदखान यांची योजना केली आहे. हें आज्ञापत्र पाहतांच आपलें सर्व सैन्य हालवून विजयगड (हें स्थळ रामगडापासून अलीकडे बऱ्याच अंतरावर होतें) मुक्कामीं छावणी करावी. हुसेन महंमदखान एक महिन्यानें तेथें येतील. तोंपर्यंत सैन्यावर कोणी योग्य अधिपति नेमून आपण तावडतोब दरबारीं हजर रहावें. कळावें.

पत्राच्या खालीं बादशहाचें सरकारी शिक्कामोर्तब केलेलें होतें. ह्या पत्राब-रोबर जो दुसरा लखोटा स्वारानें दिला होता, त्यांत हुसेनखानाचें खासगी पत्र होतें. ' आपणांला वजिरात मिळाली, ह्मणून मला फार आनंद झाला. माझी प्रकृति अस्वस्थ असल्यामुळें मला तिकडे लवकर येतां येत नाहीं.... आपण इकडे लवकर यावें. कारण वजिरी मिळण्याकरितां येथें कांहीं बड्या लोकांच्या खटपटी चालल्या आहेत. ' अशा अर्थाचा मजकूर त्या पत्रात होता.

मुराररावांनीं हीं दोन्हीं पत्रें पुनःपुन्हां वाचलीं. आपण या मोहिमेंत अतिशय उल्हासानें काम केलें आणि आपणांकडूनच ही मोहीम फत्ते व्हावी, अशी त्यांची अत्युत्कट इच्छा होती. ती बादशहाच्या ह्या हुकुमानें व्यर्थ झाली; येवढेंच नव्हे, तर अंतिम यश मिळण्याची सर्व तजवीज आपण करून ठेवावी आणि दुसऱ्याच एकानें तिचा फायदा घेऊन, जय मिळवून नांव लौकीक करावा, ह्याचा त्यांना फार खेद झाला ! हें मनुष्य स्वभावास अनुरुप असेंच झालें ! मोहिमेवरून परत बोलाविल्याबद्दल त्यांना जितका खेद झाला, तितकेंच,

मोहिम पूर्ण होण्याचे आधीं बादशहा आपणांस वजीर कसें करतो, व हुसे-नही त्यांत आड कसा येत नाहीं, ह्याबद्दल त्यांना राहून राहून आश्चर्य वाटूं लागलें! आतां आपला इष्ट हेतु सिद्धीस जाणार—आपण वजीर होणार, आपली व इंदिरा, धोंडोपंत इत्यादिकांची भेट होणार, वगैरे विचार मनांत येऊन त्यांना कांहींसा आनंद झाला; नाहीं असें नाहीं. पण एकंदरींत त्यांना वाईटच ज्यास्त वाटलें! आतां पुढें काय करावें? मुकाट्यानें मार्गे परतावें, कां 'येवढी मोहीम मजकडून पुरी होऊं द्यावी. तो पर्यंत वजिरी कोणास द्यावी' अशी बादशहाला विनंती करावी, ह्याबद्दल त्याना विचार पडला. मुकाट्यानें मागें परतावें, तर लढाई करण्याचा आपला बेत फिसक-टतो, व तसें होणें तर आपणांस नापसंत आहे. बरें, येवढी मोहीम माझे-कडून पुरी होऊं द्या, अशी विनंती करावी, तर पुढें वजिरी आपणांस मिळे-लच, असें ह्मणतां येत नाहीं. आणि जर ती पुढें मिळणार नाहीं, तर ह्या स्वारींत मोठी कर्तबगारी दाखविण्याचा काय उपयोग? चालून आलेल्या लक्ष्मीला पाठ देण्यांत काय अर्थ आहे? वजीर झाल्यावर पुढेंही मोहिमा करितां येतील—ह्या मोहिमेंत यश मिळवून जी कीर्ति होईल, तशी पुढेंही आपल्या कर्तबगारीनें मिळवितां येईल; असा विचार करून त्यांनीं हुकमा-प्रमाणें वागण्याचा विचार ठरविला. आपण तावडतोब मागें फिरावें. न जाणों, हुसेननें लिहिल्याप्रमाणें अहंमदनगरीं आपल्याविरुद्ध खटपटी चालल्या असतील. आपण लवकर गेल्यानें कोणाचें फारसें चालणार नाहीं. असा बेत करून, दुसऱ्या तिसऱ्या दिवशींच त्यांनीं रायगडाहून छावणी उठविली आणि लवकरच विजयगडास पोहोंचून, तेथें तळ दिला. पूर्वीं त्यांच्या अर्ध्या सैन्यांतील टोळ्या मोंगलांचा मुलूख हैराण करीत असत, त्यांसही त्यांनीं तें काम सोडण्याचा हुकूम देऊन, परत लष्करांत बोलाविलें. आणि एकून एक सैन्य पुढें घोटाळा होऊं नये ह्मणून विजयगडास ठेविलें.

प्रकरण १६ वें

दुसऱ्या पत्राची गफलत.

आतां आपण हुसेनच्या पत्राकडे वळूं. तें पत्र नेणारा त्याचा जासुदही अतिशय वेगानें मार्ग चालला होता. ज्यावेळीं इकडे मुरारराावांस पहिलें पत्र मिळालें, त्यावेळीं ह्या स्वारीनें एका विस्तृत आणि भयाण अरण्यांत प्रवेश केला होता. तें अरण्य विंध्याद्री पर्वताच्या एका मोठ्या खिंडींतच होतें. त्यामुळें त्याच्या दोन्ही बाजूंला उंच उंच पर्वतांच्या रांगा लागल्या होत्या. त्या स्वारानें आपली तरवार म्यानांतून बाहेर काढून, हातांत धरली होती. कारण कीं, तेथें हिंस्र श्वापदांचे हल्ले केव्हां येतील आणि केव्हां नाहीं, ह्याचा मुळींच नियम नव्हता. ती जरी सकाळची वेळ होती, आणि त्या स्वाराची वाट जरी मळलेली दिसत होती तरी त्यावेळीं त्या वाटेनें कोणी जातां येतांना दिसलें नाहीं. तो स्वार दवडून दवडून त्रासला आणि दमलाही. पण त्याची तेथें थांबण्याची छाती होईना! तें विंध्याद्रींतील अरण्य. त्याच्या भयंकरपणाच्या गोष्टी ह्या स्वारानें पुष्कळ ऐकल्या होत्याच! ह्या अरण्यांतून एकटा माणूस सहसा सुटत नाहीं, असेंही त्यानें ऐकलेलें होतेंच! त्यामुळें स्वसंरक्षणाच्या तयारीनें आणि वेगानें तो चालला होता. त्याला वाटेनें कोणी माणूसही भेटेना, त्यामुळें तर थांबण्याचा बेत त्यानें अजीबात सोडून दिला. कसें तरी करून दिवस असतां अरण्याचे बाहेर पडावें, ह्मणून तो अगदीं जलद चालला होता. ती जरी सकाळची वेळ होती, तरी त्या अरण्यांतील वृक्ष अतिशय उंच वाढलेले असल्यामुळें आणि त्यांच्या फांद्या एकमेकांत गुरफटून गेल्यामुळें, त्या स्वाराच्या वाटेवर सायंकालच्या संधिप्रकाशासारखा प्रकाश पडला होता! वाटेच्या दोन्ही बाजूंस लांबवर, वृक्षांच्या डहाळ्यांतून आणि पानांमधून, लहानमोठ आणि अनेक आकारांचे असंख्य कवडसे पडले होते. ते कित्येक प्राण्यांच्या अंगावर पडून, ते प्राणी त्या स्वाराच्या सहज दृष्टीस पडत; आणि त्या योगें त्याची भीति दुणावत असे. मधून मधून एखाद्या दाट झुडपांतून ससासारखें एखादें जनावर सुरकन् निघून लवकरच कोठें तरी गडप होई. असलीं जनावरें तर केव्हां केव्हां वाटेवरून-

ही झरकन् पळत जात, आणि त्या स्वाराला भय उत्पन्न करीत. हिंस्त्रश्वापदांच्या एकसारख्या चालणाऱ्या गर्जनांनीं तर त्या स्वाराच्या कानठळ्या बसल्यासारखें झालें ! अशा स्थितींत त्या स्वाराची मनःस्थिती कशी असेल ह्याची, आपल्यावर राज्य करण्याचा आणि आपल्या मनाला सुख देण्याचा मक्ता, ना ओळख ना देख अशा कोणाला तरी देऊन, आणि त्यांतच पुरुषार्थ मानून, घरीं आपल्या उंच शय्येवर—ती तरि आतां कोठें राहिली आहे ह्मणा—आपल्या पूर्वजांच्या शौर्याबद्दल नुसत्या बाता ठोकणाऱ्या हिंद-पुत्रांस कल्पना येणें जरासें, कां, बरेंच कठीण आहे ! असो.

तो स्वार कसेंतरी अरण्याबाहेर पडण्यासाठीं, अतिशय वेगानें चालला असतां, अकस्मात् आपल्या जाळीमध्यें पडलेल्या एका अक्राळविक्राळ वाघोबांची नजर त्याच्यावर गेली. आणि एक धष्टपुष्ट घोडा आपल्या पुढून खुशाल ऐटीनें जात आहे, असें पाहून, आणि त्याच्या ह्या भयंकर राजद्रोहामुळें संतापून, वाघोबा आपलें अंग झाडून, त्या घोडेस्वारावर चालून आले ! स्वाराचीही वाघावर एकदम नजर गेली. त्या स्वाराजवळ त्याची तरवार आणि जंबिया वगैरे लहान लहान एकदोन शस्त्रें, ह्यां खेरीज शिकारीस उपयोगीं असें एकही शस्त्र नव्हतें. वाघही बराच अलीकडे आला. मग काय विचारितां ! स्वार आपल्या चढाऊ जोड्याच्या नाला घोड्याच्या पोटांत एकसारख्या जोरानें मारूं लागला. त्यामुळें आणि वाघाच्या भीतीनें तो घोडाही होत्या नव्हत्या तितक्या अवसानानें पळूं लागला. परंतु, हें त्या मृगराजास कोठलें सहन होणार ! यःकश्चित् घोडा आपल्याला आपली शक्ती दाखवितो, ह्याची लाज वाटून, ईर्षेनें वाघोबांची स्वारीही मोठमोठाल्या उड्या मारीत घोड्याच्या पाठीस लागली. घोडा अतिशय भडकला. तो स्वाराला आवरेना. वाटेलतिकडे पळूं लागला. त्यामुळें झाडांच्या फांद्या वगैरे लागून त्या स्वाराला बरीच दुखापत झाली. वाघही पाठ सोडीना. त्यामुळें त्या स्वाराची जिवंत सुटण्याची आशा नष्ट झाली. तो शूर होता. आजपर्यंत त्यानें पुष्कळ शिकारीही केल्या होत्या. पण आजचा प्रसंग कांहीं चमत्कारिकच ! घोडा अनावर होऊन भडकलेला, मागें वाघ लागलेला, आणखीहि श्वापदें अंगावर येण्याचा संभव, मनुष्य तर एकहि दिसेना. अशा स्थितींत गांगरून जाण्यापलीकडे त्याच्यानें

काय होणार ? तथापि अतिशय निराशा झाली ह्मणजे मनुष्यास एक प्रकारचें अमानुष साहस येतें ! जीव, अब्रू, कीर्ति वगैरेची चाड त्याला रहात नाहीं, तीच स्थिति त्या स्वाराची झाली, तो प्राणावर उदार झाला. वाघ मागें लागला आहे. आपण कितीही पळालों, तरी तो आपणांस सोडणार नाहीं. आपला जीव घेणारच. मग असें मरण स्वीकारण्यापेक्षां, वाघाशीं दोन हात करून आलेलें मरण पत्करलें. असा क्षणार्धांत विचार करून, तो घोड्याला थांबवूं लागला. पण तो ऐकना. तेव्हां त्यानें थांबावें ह्मणून, स्वारानें आपल्या तरवारीच्या मुठीचा रट्टा त्याच्या कपाळावर जोरानें मारिला. परंतु, त्यामुळें घोडा न थांबतां पराकाष्ठेचा चेकाळला. शेवटीं आटोपत नाहीं असें पाहून स्वारानें घोड्यावरून खालीं उडी टाकली. वाघाच्या उड्या चालूंच होत्या. स्वार आणि घोडा वेगळे झाल्यावर, वाघानें आपला मोर्चा घोड्याकडेच फिरविला ! कर्मधर्मसंयोगानें, वाघ घोड्यावर ह्मणून उडी मारायला गेला, तीच उडी अचानक स्वारावर पडली ! स्वारानें तत्क्षणींच चपळाई करून आपलें डोकें खालीं घातलें. त्यामुळें वाघाचे पुढील दोन पाय स्वाराच्या पाठीवर पडले. व त्याच्या तीक्ष्ण पंजामुळें स्वाराच्या पाठींतून रक्त वाहूं लागलें. तथापि तेवढ्यांतही स्वारानें होतें नव्हतें तितकें बळ करून, आपल्या हातांतील तरवार वाघाच्या मृदु पोटांत खुपसली. ती इतक्या जोरानें खुपसली गेली कीं, तिचें टोंक वाघाच्या पाठींतून वर निघालें. त्यामुळें घायाळ होऊन व्याघ्रराजाची स्वारी धरणीवर आडवी पडली ! मेली मात्र नाहीं ! रक्तस्राव झाल्यामुळें, तो स्वारही बेशुद्ध होऊन पडला. वाघाच्या वेदनांच्या दुःखानें होणाऱ्या कर्णकठोर गर्जनांखेरीज तेथें सर्व शांत होतें. असा बराच वेळ गेल्यानंतर, तेथें एक वाटसरू गोसावी आला. तो तरी भरभर आणि भीतभीतच चालला होता. तोंडानें तो ईश्वराचें भजन करीत असावा, असें त्याच्या ओंठांच्या पुटपुटण्यावरून वाटत होतें. तो ह्या दोघांजवळ येतांच आश्चर्यचकित झाला. वाघ किंकाळ्या फोडीत स्वस्थ पडला आहे, आणि त्याच्या अंगांतून तरवारही आरपार गेलेली दिसत आहे; तेव्हां त्याच्यापासून मुळींच भीति नाहीं. पण तो मनुष्य (स्वार) मेला आहे कीं, जिवंत आहे ? मेला असला, तर त्याला असेंच पडूं द्यावें, कीं त्याची सतद्गति लावावी ?

मूर्च्छित पडला असला, तर त्याला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करावा किंवा नाहीं ? ह्याबद्दल त्यानें किंचित्काळ विचार केला. शेवटीं, आपण पुढें न जातां ह्या मनुष्याची कांहीं तरी व्यवस्था लावावी, असा बेत करून, तो त्या स्वाराजवळ गेला. स्वाराच्या कंबरेला तांबूस रंगाचें उपरणें बांधलेलें होतें, तें सोडून व फाडून, गोसाव्यानें स्वाराच्या जखमा नीट बांधल्या. त्यामुळें बऱ्याचवेळानें जखमांतून होणारा रक्तस्राव बंद झाला. कांहीं वेळानें स्वारही किंचित् शुद्धीवर आला. जवळ मनुष्य पाहून त्याला बराच धीर आला. तो अडखळत दीनवाणीनें गोसाव्यास ह्मणाला ' कसेंही करून मला जवळच्या गांवीं ने ' गोसाव्याला त्याचें ह्मणणें कळलें. पण जवळच्या गांवीं ह्याला न्यावें कसें ? असा त्याला विचार पडला. जवळपास दुसरें माणूस नाहीं. जवळचा गांव कोठें असावा हेंहि माहीत नाहीं. त्यामुळें त्या गोसाव्याला काय करावें तें सुचेना. शेवटीं, उदार मन करून त्यानें त्या स्वारास आपल्या पाठीवर घेतलें आणि लवकरच तो वाटेला लागला. स्वार जसा अंगानें धट्टाकट्टा होता, तसाच गोसावीहि होता. जवळ जरी गांव नसला तरी हा चांगला शुद्धीवर येईपर्यंत ह्याला असेंच घ्यावें असा त्यानें बेत केला. तो सुमारें चार कोस चालून गेल्यावर अरण्य संपलें. तेथून कांहीं अंतरावर एक खेडेगांव त्याच्या दृष्टीस पडलें. तें एका डोंगराच्या पायथ्याजवळच वसलें होतें. गोसावी स्वाराला घेऊन त्या गांवीं गेला. स्वार आतां चांगला सावध झाला होता; आणि बोलूंही लागला होता. त्या खेड्यांत गेल्यावर, तेथील एका मोडक्यातोडक्या धर्मशाळेंत, त्यानें स्वारास उतरविलें. धर्मशाळेंत दोन प्रवासी उतरले आहेत, ही बातमी लवकरच त्या गांवांत पसरली. आणि त्यांनीही एक स्वार दिसल्यामुळें, तो कोणी तरी सरकारी कामदार आहे, अशी त्यांची (त्या खेड्यांतील लोकांची) समजूत होऊन, त्यांची कांहीं पुढारी मंडळी धर्मशाळेंत गेली, आणि त्या दोघांस काय पाहिजेनको, वगैरेबद्दल चौकशी करूं लागली. गोसावीबुवांनींही तो स्वार सरकारी कामदार आहे, अशीच बतावणी केली; आणि स्वतःही त्या मंडळीस धर्मतत्त्वांचा उपदेश करूं लागले. स्वार मुकाट्यानें बसला होता. त्यामुळें तर तो कोणी अधिकारी आहे, ह्याबद्दल त्या खेडवळांस मुळींच संशय राहिला नाहीं. त्या स्वाराबद्दल धाक व गोसाव्याबद्दल पूज्य-

बुद्धि उत्पन्न झाल्यामुळें, त्यांनीं त्या दोघांस दिवाबत्ती, बिछानें, शिधे, सरपणफाटा वगैरे यथास्थित दिलें. गोसावीबुवानी स्वतः पाकनिष्पत्ती करून भोजन केलें, व स्वारासही यथेच्छ अन्न वाढून दिलें. भोजन झाल्यानंतर सुमारें मध्यरात्र होईपर्यंत त्या गावची मंडळी गोसावीबुवांच्या सत्समागमाचा अनुभव घेत बसली; परंतु, पुढें झोपेनें फारच घेरल्यामुळें ती सर्व आपापल्या घरी चालती झाली. दोन महार मात्र खान साहेबांच्या तैनातीकरितां राहिले होते. पण ते धर्मशाळेपासून बऱ्याच अंतरावर घोरत पडले होते! गोसावी व स्वार दोघेहि खडखडीत जागे होते. पहिल्याला दुसरा कोण, कोठील वगैरे समजून घेण्याची इच्छा होती; दुसऱ्याला पहिल्याचे आभार मानण्याची व त्याच्या सौजन्याची तारीफ करण्याची प्रबळ इच्छा होती. शेवटी जवळपास कोणी नाहीं असें पाहून, गोसावी ह्मणाला, ' का खानसाहेब! आपण इकडे कोणीकडे आलांत?'

हा गोसावी आपला प्राणदाता! ह्याच्याजवळ खरें सांगावयास काय हरकत आहे? वर हा दिसतो इतका सज्जन आतून नसला तरी बोलूनचालून हा गोसावी! ह्याला इहलोकीच्या खटपटींचा अर्थातच कंटाळा. मग ह्याला आपल्या धन्याच्या खटपटी कळल्या, तरी हा नुसतें ऐकून घेण्यापलीकडे काय करणार आहे? कांहीं नाहीं. व कांहीं करण्याचें मनांत आणिलें तरी ह्याच्यानें काय होणार? खटाटी दुसतरवाच्या आहेत! त्या आमच्यासारख्या सामान्य लोकास तर काय, पण मोठमोठ्या मुत्सद्द्या नाही थक्क करून सोडितात! मग हा तर बिचारा यःकश्चित् गोसावी! - शिवाय ह्यानें आपला प्राण वांचविला-आपल्याला पुनर्जन्म दिला. चार कोस आपणास पाठीवर घेऊन चालला. ह्याला ह्याच्या प्रश्नाचें खरें उत्तर न दिलें, तर, आपला कृतघ्नपणा होईल! असा एका क्षणांत विचार करून स्वार ह्मणाला, ' फकीरसाहेब! तुह्मी ह्यावेळीं माझे आईबाप आहात; खरा खर, तुमचे मजवरील उपकार अवर्णनीय आहेत. माझ्या कातड्याचे मोचे करून, मी तुमच्या पायांत घातले, तरीही तुमचे उपकार फिटणार नाहींत. मी तुह्माला पुत्र ह्या नात्यानें खरीखरी हकीकत सांगतो. अहंमदनगराहून मी आलों, व बुंदेलखंडाकडे जात आहे.' हे शेवटलें वाक्य ऐकून गोसावी फार आश्चर्यचकित झाला, व किंचित् विचारांतही पडला. पण,

त्यावेळीं धर्मशाळेंतील दिवा विझून गेला असल्यामुळें, स्वाराच्या तें कांहीं लक्षांत आलें नाहीं. तो आपला पुढें सांगतच होता, ' माझा धनी हुसेन महंमदखान ह्मणून अहंमदनगरचा सरदार आहे. तो, मुरारराव ह्मणून एक सरदार हल्लीं रामगड येथें आहे, त्याचा फार द्वेष करितो. कारण, मुरारराव अहंमदनगरीं गेला, कीं, बादशहा त्याला वजीर करणार आहे. आमच्या धन्याच्या मनांत स्वत: वजीर व्हावें, असें आहे. त्यासाठीं हल्लीं तो कांहीं कारस्थानें करीत आहे. त्यांत मोंगल सेनापतीशीं कांहीं काम आहे. ह्मणून एक पत्र देऊन, त्यानें मला बुंदेलखंडांत कुतुबशहा आहे, त्याजजवळ देण्यास सांगितलें. त्याप्रमाणें चाललों असतां, आली होती गच्छन्तीची वेळ ! पण खुदाची कृपा. तो आपल्या रूपानें तेथें प्रकट झाला. खरोखर, फकीरसाहेब ! त्या भयंकर अरण्यांतच जर मी मेलों असतों, आणि तुह्मी मला वाचविलें नसतें, तर फारच अनर्थ झाला असता. खुदा शपथ, तुमचे उपकार मला बोलून देखील दाखवितां येत नाहींत, तर फेडतां किती येतील, तें दिसतच आहे. अल्ला तुह्मांला दीर्घायु करो. सुखी करो. '

उपकार फेडण्याचें सामर्थ्य किंवा संभव दिसत नसला, ह्मणजे मनुष्य सहाजिकच तोंडानेंच आभार मानीत असतो, व उपकारकर्त्याचें शुभ चिंतीत असतो. त्याप्रमाणें तो स्वारही एकसारखा कृतज्ञपणानें बोलत होता, व गोसाव्याचें शुभ चिंतीत होता. पण त्या गोसाव्याचें, स्वाराच्या ह्या शेवटील कृतज्ञतोद्गारांकडे मुळींच लक्ष्य नव्हतें. काय असेल तें असो. त्याला पराकाष्ठेचा संताप आला होता. तो एकसारखा दांतओठ खात होता, व ओठांतल्याओठांत कांहीं तरी पुटपुटत होता. नानाप्रकारचे विचार त्याच्या डोक्यांत चालले होते. अशा स्थितींत बराच वेळ गेल्यावर, तो पुन्हां शुद्धीवर आला व शांत झाला. आपले मनोविकार अजीबात दाबून ठेऊन, तो शांतपणानें ह्मणाला, ' बेटा, कोणी कांहीं कां करीना ? आह्माला कांहीं त्याच्याशीं गरज नाहीं. प्रभु रामचंद्रास आळवावें, व कालक्षेप करावा, हा आमचा जातिस्वभाव. प्रभूच्या मनांत आलें, ह्मणून त्यानेंच मला तुजजवळ येण्याची बुद्धी दिली. त्याचे उपकार मान; माझे कशाला मानितोस ?—तें असो. पण आतां तूं पुढें काय करणार ? मला वाटतें, त्वां परत अहंमदनगरीं जावें. '

'छे, छे, साधुवर्य, ते माझ्याकडून प्राणांतींही होणें नाहीं. स्वीकृत कार्यांत यश मिळवीन, तेव्हांच माझ्या धन्याला तोंड दाखवीन! आमचा धनी मोठा कर्ता पुरुष आहे. त्याचे आह्मी सेवक मरूं, पण हातीं घेतलेले काम सिद्धीस नेऊं, हा आमचा बाणा!'

गोसाव्याला फार आश्चर्य वाटलें, तथापि तसें बोलून न दाखवितां तो गंभीरपणानें ह्मणाला, 'शाबास. सेवाधर्म तुह्मी चांगला जाणतां ह्यांत संशय नाहीं. ज्याचें निमक खावें त्याचें नेहमीं निष्कपटपणें हितच करीत जावें. हाच खरा सेवाधर्म. स्वामीशीं विश्वासानें, स्त्रीशीं प्रेमानें, मित्राशीं निष्कपटपणानें, आणि धर्माशीं एकनिष्ठपणानें वागलें ह्मणजे पारलौकिक सुख खचित मिळतें. तुझा निश्चय पाहून मला फारच समाधान वाटतें. संसारांतही कांहीं लाल आहेत, अशी तुझ्यावरून माझी खात्री झाली. पण बेटा, तूं अगदीं गळून गेला आहेस. तुझ्यानें एवढा लांबचा पल्ला कसा आटोपेल?'

'कांहींही होवो. मी कसेंही करून जाणारच.'

'हें पहा मी मूळचा साधुवंशांतील. तशांत, संसारांतील अनन्वित प्रकार पाहून, मी ज्यास्तच विरक्त झालों आहें. मला ह्या जगाचा अगदीं वीट-वीट आला आहे. माझें ह्या ऐहिक गोष्टींकडे मुळींच लक्ष जात नाहीं. तरी पण तुझी अवस्था पाहून मला फारच वाईट वाटतें. बेटा, आण तुझें पत्र—माझ्या जिवाचें कांहीं होवो; पण मी तुझें कष्ट दूर करणार. दे-दे-तें पत्र. मला वाट नीट समजावून दे. मी जातों तुझ्याकरितां त्या ह्याच्याकडे. काय त्याचें नाव तूं ह्मणालास—हं, कुतुबशहा. तूं येथेंच रहा मी जातों.

'छे, छे, फकीरसाहेब, मजकरितां तुह्मांला त्रास कशाला? मीच जातों हळूं हळूं. शिवाय आपण आतांपर्यंत मजवर जे उपकार केले, त्यांच्या भाराखालीं मी दडपून गेलों आहें. त्यांत आणखी उपकार कशाला?'

'वेडा आहेस. तूं हळूं हळूं त्या सेनापतीजवळ जाणार कधीं आणि परत आपल्या धन्याकडे जाऊन पोहोंचणार कधीं? तुझ्या अंगावर कांहीं तरी नूर राहिला आहे?—शिवाय ही निजामशाही नसून इमादशाही आहे. शत्रूकडील हेर, ह्या संशयावरून तुला केव्हां पकडतील आणि केव्हां नाहीं, ह्याचा काय नेम सांगावा? मी काय? फटिंग. माझा कोणाला संशय येणार आहे? आतां उपकारांबद्दल ह्मणशील, तर कोणी

कोणावर उपकार करीत नाहीं. सर्व समर्थ कर्तासवर्ता तो (देव) आहे. मला जर तेथें येण्याची त्यानें बुद्धी दिली नसती, तर माझ्यानें काय झालें असतें बरें ? तुला मी माझा आतां शिष्य मानितों. शिष्याची भरभराट होण्यासाठीं, त्याला सुख मिळावयासाठीं अतिशय झटणें, हें गुरुचें कर्तव्य आहे. तें मी निःसंशय बजावीन. आतां तुझी सर्वत्र वाहवा होईल. तेव्हांच मला बरें वाटेल. असो ह्मणा. ती पुढची गोष्ट आहे. पण सकाळीं उठल्यावर, आधीं तुझ्याच कामाला लागतों. मला प्रयागास जावयाचें होतें-पण आतां जाईन झालें पुढें ' स्वाराला गोसाव्याचें बोलणें पटलें. तो क्षीणही बराच झाला होता. त्यामुळें पुष्कळ आढेवेढे घेऊन, सरतेशेवटीं त्यानें गोसाव्याचें ह्मणणें कबूल केलें एकदाचें. तेव्हां आनंदून तो स्वारास ह्मणाला, ' पण कायरे ? त्या पत्रांत मजकूर तरी काय आहे ? असेल कांहीं. आपणांस काय करावयाचें त्याच्याशीं ! '

' तसें नाहींरे. पण त्यांत त्या सेनापतीची निंदा केली असली, तर तो लागलीच डोकें उडवावयाचा; ह्मणून विचारतों. '

' तसा मजकूर त्यांत खास नसावा. कारण तसलें पत्र मजजवळ देऊन आमचा धनी मला पाठवावयाचा नाहीं. त्याची मजवर फार कृपा आहे. '

' तुला काय वाटत असेल तें असो. पण मला वाटतें, त्यांत कांहीं निंदास्पद मजकूरच असावा. एरव्हीं तुझा धनी-निजामशाहींतील सरदार-मोगलाकडे दुसऱ्या कोणत्या उद्देशानें पत्र पाठविणार आहे. असो ह्मणा. मला त्याची कांहीं परवा नाहीं. ' गोसावी बुवांच्या मनांत, पत्रांतील मजकूर त्या स्वाराजवळून काढून घ्यावा असें होतें. पण त्याला कांहीं माहीत नाहीं, पाहून त्यानीं ही शेवटची मखलाशी केली. त्यामुळें स्वाराला कांहीं संशय न येतां गोसाव्याच्या भोळेपणाबद्दल गालातल्या गालांत हंसूं आलें; कारण त्या पत्रांत गोसावी ह्मणतो तसा मजकूर नसून त्याच्या अगदीं उलट असावा अशी त्याची बळकट समजूत होती. आणि गोसाव्याला तें कांहीं समजलें नाहीं, असें पाहून त्याला बरें वाटलें ! असो. गोसावीबुवांनीं उतर घेऊन होतां होईल तितक्या जलदीनें त्याच खेड्यांत यावें; तोंपर्यंत स्वारानें तेथेंच रहावें असें त्या उभयतांनीं ठरवलें. त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळीं गोसावीबुवा निघालेही.

तो स्वार कोणी अंमलदार आहे, ही जी त्या खेड्यातील लोकांची समजूत झाली होती, ती त्यांची समजूत त्या स्वारानें कायमची ठेविली. आणि गोसावीबुवा येईपर्यंत तो तेथें एकाद्या अंमलदाराप्रमाणेच, पण सावधगिरीनें वागला!

गोसावीबुवा अगदीं जलदीनें चालले होते. वाटेंत त्यांनी चारपांच मुक्काम केले, आणि सुमार पांच एक दिवसांनीं ते कुतुबशहाच्या छावणीजवळ जाऊन पोहोंचले. छावणीच्या अलीकडे एका गांवीं त्यांनी आपला गोसावी पेशा सोडून, मुसलमानस्वाराचा वेष घतला! छावणीच्या पहिल्या पहाऱ्याजवळ जातांच, 'अतिशय जरूरच्या कामासाठीं अहंमदनगराहून स्वार आला आहे' अशी कुतुबशहास वर्दी देण्याबद्दल, पहाऱ्यावरील जमादारास मोठ्या ऐटीनें सांगितलं. तो बिचारा जमादार अतिशय चकित होऊन तावडतोब वर्दी घ्यावयास धांवला. थोड्या वेळानें परत येऊन, त्यानें आपल्या गोसावीबुवास (जे आतां स्वार बनले होते.) थेट कुतुबशहाच्या डेऱ्यांत नेलें. त्या डेऱ्यांत त्यावेळीं कुतुबशहा व त्याचा प्रिय दोस्त आणि मसलतगार अमीरखान असे दोघेच बसलेले होते. गोसावीबोवांनीं आत गेल्यावर कुतुबशहास तिनदा लवून कुर्निसात केला, आणि त्याच्यापुढें एक पत्र टाकिलं. तें पत्र घेऊन कुतुबशहा वाचूं लागला. वाचणें आटोपल्यावर त्यानें पत्र आणणाऱ्या स्वारास—आपल्या गोसावीबोवास पुन्हा हाकमारीपर्यंत बाहेर जावयास सांगितलें. तो गेल्यावर कुतुबशहा तें पत्र पुन्हा जरा मोठ्यानें वाचूं लागला. त्यांतील मजकूर असा:—

(प्रथम कुतुबशहास साजेसा मायना लिहिला होता. तो विस्तारासाठीं येथें देत नाहीं.) आपण पराक्रमी बादशहाचे सेनापती. आपल्या बादशहाचे राज्य अफाट, दरारा विलक्षण, आणि सामर्थ्य अप्रतीम. ह्या सर्व गोष्टी आपल्याच सहाय्यानें झाल्या आहेत. आपण दक्षिणेवर येत आहां. आमचा मुलूख थोडा. सामर्थ्य कमी. अशी खरी स्थिती असता बादशहानें मुराररावास आपल्या पारिपत्यार्थ पाठविलें. आपल्या प्रचंड सैन्यापुढें आमचा तेव्हाच पराभव होणार, अशी माझी खातरी असल्यामुळें, मी हें पत्र आपणांस पाठवीत आहें. बादशहा मुराररावांसारख्या बदमाष लोकांचे ऐकतो, हें मला पसंत नाहीं. तरी, मुराररावांनीं आतापर्यंत जो निजामशाही बाहेरील मुलूख घेतला, तो आपण

घ्यावा, अशी माझी विनंती आहे. मी त्या मुलुखाच्या प्रत्येक भागांत, ' हा प्रांत दिल्लीच्या राजाच्या ताब्यांत दिला ' आहे अशीं बादशाही मोर्तबांचीं आज्ञापत्रें धाडिलीं आहेत. मुराररावही परत येथे येतील, अशी व्यवस्था केली आहे. ह्या दोन गोष्टींमुळे तो मुलूख घेणें आपणांस मुळींच कठीण पडणार नाहीं. करितां आपण माझी विनंती मान्य करावी. मात्र आपणांस माझ्या दोन अटी कबूल केल्या पाहिजेत. पहिली ही कीं, दिलेला मुलूख ताब्यांत आल्यावर आपण पुढें येऊं नये. आणि दुसरी अशी कीं, ' मुराररावांस वजीर करा; नाहींतर आम्ही स्वारी करूं ! ' अशी धमकावणी आमच्या बादशहास घालावी. ह्या दोन अटी कबूल असतील, तरच आपणांस मुलूख मिळेल. ह्या अटी न जुमानितां, आपणांसाठीं पाठविलेल्या आज्ञापत्रांच्या जोरावर आपण मुलूख मिळवूं ह्मणाल तर फसाल— सपशेल फसाल ! करितां ह्या दोन अटी कबूल करून माझी विनंती मान्य कराल, अशी आशा आहे. कळावें. येवढा मजकूर पत्रांत असून, खालीं हुसेनचें सगळें नांव होतें. चपेटीची सही मात्र नव्हती !

हें पत्र वाचून दोघांसही आश्चर्य वाटलें. प्रथम तर त्यांना ह्यांचा अर्थच कळेना ! त्यांतही हुसेनची दुसरी अट वाचून तर ते गोंधळांतच पडले ! हुसेन आणि मुरारराव ह्यांच्या विद्वत्तेची व मुत्सद्दीपणाची ख्याती त्यांना ठाऊक होती. तेव्हां ह्या दोघांनीं मिळून आपणास फसविण्याचा बेत केला असावा, असा बळकट संशय येऊन कुतुबशहा ह्मणाला, ' अमीर, ह्यांत कांहीं तरी लबाडी दिसते. पत्राला भुलून आपण मुलूख घ्यावयास जावें; तेथें मुरारराव असेलच—त्यानें आपल्याला यथास्थित चोप द्यावा, असा तर ह्यांचा बेत नसेल ? '

' असेलही कदाचित्. कारण आज किती दिवस तरी आपण मुराररावांस नर्मदा कांठीं कुचंबावयास लाविलें ! पण मला वाटतें कीं, हुसेन आणि मुरारराव एकमेकांचा द्वेष करीत असतील. ह्मणून हुसेनला, आपणांकडून त्याच्या बादशहास धमकावणी दाखवून, मुरारराव आपणांकडे फितूर आहे, असें सिद्ध करावयाचें असेल, व तेणेंकरून मुराररावाची नाचक्की करावयाची असेल. आपण आतांच आपले हेर खानदेशांत रवाना करून त्या आज्ञापत्रांबद्दल, व मुराररावांच्या परत फिरण्याबद्दल शोध काढूं ह्मणजे झालें. '

' हो. असेंच करावें. ह्या पत्रांतील मजकूर जर खरा असला, तर बरेंच झालें! कारण, वऱ्हाडांतून व गुजराथेंतून खालीं दक्षिणेंत तर उतरतां येत नाहींच. आपणांस जाऊं देऊं नये, ह्मणून त्यांच्याशीं मुराररावानें दोस्तीचा तहच करून ठेविला आहे. आणि तो स्वतः खानदेशांत ! त्यामुळें दक्षिणदिग्विजयाबद्दल माझी बहुतेक निराशाच झाली आहे. कारण, मुरार-रावाशीं सामना देणें ह्मणजे काळाशींच सामना देणें होय. आणि ह्मणूनच तर कांहीं तरी युक्ती काढण्यासाठीं मी इथेंच खोळंबून राहिलों आणि ह्या पत्राप्रमाणे जर खरा प्रकार असला, तर माझी निराशा नष्टच झाली ह्मणा-वयाची ! आतां हुसेनच्या अटीप्रमाणे खानदेशापलीकडचा मुलख आपणांस मिळणार नाहीं, हें खरें. पण न मिळाला तरी हरकत नाहीं. पुढें कधीं जिंकूं ह्मणून आपल्या बादशहाची समजूत घालूं— '

इतक्यांत तेथें कुतुबशहाचा एक अल्लीनामक दोस्त आला. त्याच्या चर्येवर आश्चर्य आणि हर्ष स्पष्ट दिसत होता. तो एकदम कुतुबचा हात धरून ह्मणाला, ' कायरे बसल्याबसल्या तूं प्रांत काबीज करितोस नारे ? कां ! खानदेश आलाना हाताखालीं ? आपला अहमद हेर आतांच आला खानदेशाकडून ' खानदेश मोंगलांस दिला ' अशा अर्थाचीं कांहीं अज्ञापत्रें त्यानें पाहिलीं. तीं अद्याप उघडकीस आलीं नाहींत—पण—कायरे डाव कसा काय साधला ? '

' अरे पण आज्ञापत्रांचा मजकूर खरा आहे कां नक्की ? ' अमीरखान मध्येंच ह्मणाला.

' खुदाकसम. महंमद कधीं खोटें बोलणार नाहीं. तो माझा चेला आहे. मुराररावांनीं रामगडाहून छावणी हालविली. व ते त्याच्या सैन्यासह मागें हटत आहेत. अशी सुद्धां महंमदानें बातमी आणिली. पण तुझाला अजून कांहींच समजलें नाहीं असें दिसतें. '

कुतुबशहानें आनंदानें अमीराच्या हातावर टाळी दिली ! अमीरानें लाग-लीच एक पत्र लिहिलें व त्यावर कुतुबशहाचा शिकामोर्तब करून तें अहमद-नगरच्या स्वाराजवळ—गोसावी बुवाजवळ—दिलें. गोसावी बुवांनींही त्रिवार कुर्निसात करून आपला रस्ता पकडला, ज्या गांवीं त्यांनीं स्वाराचा पोषाख केला होता तेथेंच तो टाकून देऊन आपला पूर्ववेष धारण केला. ते सर्व

वाटभर तिरस्कार व किंचित् क्रोधपूर्वक हंसत होते, मग ते कां ते कोण जाणे ! आणि त्यांनीं स्वाराचा पोषाख कां केला होता हे तरी कोणास ठाऊक ? असो.

गोसावीबोवांस त्या खेड्याहून छावणींत जावयास जितके दिवस लागले, तितकेच छावणींतून त्या खेड्यांत परत यावयास लागले. त्या खेड्यांत गेल्यावर त्यांनीं कुतुबशहाचें पत्र त्या स्वाराजवळ दिलें, व त्याला सांगितलें, मी आतां सप्तशृंग गडावर देवीच्या दर्शनास जातो; माझी इकडील यात्रा संपली ह्मणजे मी अहंमदनगरीं येईन ? असें ह्मणून ते जावयास सिद्ध झाले. स्वारानें त्यांचे मनःपूर्वक उपकार मानिले, आणि मोठ्या खेदानें त्यानें गोसावीबुवांचा निरोप घेऊन, अहंमदनगरीं गमन केलें. जातेवेळीं त्या स्वाराला नवीन घोडा विकत घ्यावा लागला. कारण पहिला अरण्यांत कोठें गेला तो गेलाच ! अरण्य संपेपर्यंत सोबतीसाठीं ह्मणून चार माणसें, द्रव्य देण्याचें कबूल करून त्यानें बरोबर घेतलीं. तो अहंमदनगरच्या वाटेस लागला. गोसावीबोवा दुसऱ्याच एका वाटेला गेले ! असो. कुतुबशहानें अहंमदनगरीं जें पत्र पाठविलें, त्यांतील मजकूर वाचकांस पुढील प्रकरणांत कळेल.

प्रकरण १७ वें.

अहंमदनगरची वजिरात.

घोंडोपंत अहंमदनगरीं इंदिरेसह आल्यावर एकदोन दिवसांनीं हुसेन त्यांना किंचित् हंसत ह्मणाला, ‘ पंत, आपण आतां आमची एक विनंती मान्य केली पाहिजे ! ’

‘ कोणती खानसाहेब ? ’ असें जिज्ञासेनें ह्मणून, घोंडोपंत मनांत ह्मणाले, ‘ आमिनेच्या व माझ्या लग्नासंबंधीं तर कांहीं नसेलना ? ’

‘ हें पहा, तुह्मी मजबरोबर बादशहाकडे येऊन ‘ मुरारराvास राज्य मिळविण्याची महत्वाकांक्षा आहे ’ असें त्याला ह्मटलें पाहिजे. ’ असें ह्मणून एका-

घास कांहीं गळ घालणाऱ्या मनुष्यांची जशी दृष्टि असते तशा दृष्टीनें तो त्यांच्याकडे पहात राहिला.

धोंडोपंतास हुसेनच्या या बोलण्याचा अर्थच कळला नाहीं. आश्चर्ययुक्त नेत्रांनीं हुसेनकडे एखाद्या वेड्याप्रमाणें ते पहात राहिले !

हुसेनला त्यांच्या भोळेपणाची अत्यंत कींव आली; परंतु त्यांचा भोळेपणा आपणास फायदेशीर आहे, हें पाहून त्याला जितकी कींव आली तितकाच आनंद वाटला, धोंडोपंत मुकाट्यानें उभे राहिलेले पाहून तो पुढें ह्मणाला, ' असें गोंधळांत पडूं नका, मी काय ह्मणतों, तें नीट लक्ष्यांत आणा, एक दिवस काय झालें, कीं, बादशहाचा व माझा वाद सुरू झाला. बादशहा ह्मणाला, ' मुरारराव अगदीं निस्पृह आहे. त्याला अगदीं भिकारी केलें, तरी बिचारा त्यांतच समाधान मानील ! तुह्मीच सांगा, धोंडोपंत, असें असणें शक्य तरी आहे का ? मुरारराव शूर, विद्वान् व चतुर आहे. त्याला मोठमोठाल्या महत्वाकांक्षा नसणें संभवते तरी कां ? आपणांवरून जग ओळखावें. मला देखील सार्वभौम बादशहा व्हावें अशी महत्वाकांक्षा आहे ! मग ती मुराररावांस कशी नसेल बरें ? अर्थात् असलीच पाहिजे. ह्मणून मी बादशहास उत्तर दिलें, ' ग्वाविंद, तुमची ही अगदीं चुकीची समजूत आहे. मुराररावांस आहे ह्या स्थितींत मुद्धां समाधान नाहीं वाटत, तर गरिबींत काय वाटणार तें दिसतेंच आहे, सरकार, त्याला राजा होण्याची देखील महत्वाकांक्षा आहे, एवढेंच नव्हे तर या निजामशाहीवर राज्य करावयास देखील त्याला पाहिजेच असेल, संशयच नको, पाहिजे तर मी हें पुराव्यानें सिद्ध करून देईन ! ' झालें, इतकें बोललों मात्र, बादशहा रागानें ह्मणाला, ' तूं माझ्या विरुद्ध बोलतोस ? ठीक आहे, एक महिन्याच्या आंत जर तूं हें सिद्ध करून न दाखविलेस तर तुला जन्मभर अंधाऱ्या कोठडींत टाकीन. ' पंत, आमचे मुसलमान बादशहा ह्मणजे असेंच बरें ! यांची वजिरी किंवा ताबेदारी करणें, हे तापलेल्या तांबड्यालाल तव्यावर उभें राहण्याइतकें कठीण आहे. अहो, येथील बादशहा तर कांहींच नाहीं, आमच्या अरबस्तान, तुर्कस्थान, काबूल या देशांत पहावें, आपला केव्हां अपमान होईल, किंवा आपल्यावर केव्हां मरण्याची पाळी येईल, ह्याचा तेथील वजिरांस व अमिरांस नेमच वाटत नाहीं. तुह्मांला एकच गोष्ट सांगतो,

म्हणजे तुमची खात्री पटेल. तुर्कस्थानांत दमास्कस म्हणून एक भव्य आणि सुंदर शहर आहे. मागें तेथें एक बादशहा होऊन गेला, त्याला पोपट बाळगण्याची अतिशय आवड असल्यामुळें, त्याचेजवळ शेंकडों पोपट पिंजऱ्यांत बाळगलेले असत. तो एकदां आपल्या वजीरास म्हणाला, ' ह्या जगांत असा कोणी तरी असेल, कीं, ज्याला पोपट बाळगण्याची हौस नाहीं ?' वजीर म्हणाला, ' खाविंद, असे एक तर काय, पण लाखों आहेत. ईश्वरनिर्मित प्राण्यांचें स्वातंत्र्य हरण करणें, ईश्वराचा फार मोठा गुन्हा करणें होय, असें ते समजतात. ' हें वजिराचें उत्तर ऐकून, बादशहानें त्याला एकदम सुळीं देवविलें ! आपले बादशहा इतके लहरी नाहींत. पण त्यांनीं मजवर सध्यां असा प्रसंग आणिला ! धोंडोपंत, अशावेळीं तुम्ही मला सहाय केलें पाहिजे. मला स्वतःच्या जिवाची परवा नाहीं, पण मी जर बंदींत पडलों, तर माझ्या बहिणीचें व कुटुंबाचें कसें होईल, हीच मला काळजी आहे.— बरें, तुम्ही असें केल्यानें मुरारराबांचा कांहीं तोटा होणार नाहीं. बादशहाचें त्यांजवर प्रेम असल्यामुळें तमच्या तोंडून त्यांची राज्य करण्याबद्दल हौस ऐकून, तो ती पुरी करील— मुरारराबास राज्य देईल. बरें, जरी न दिलें, तरी आमचा हा विनोद असल्यामुळें बादशहा लवकरच ही गोष्ट विसरून जाईल.-- शिवाय तुम्हांलाच बादशहाजवळ नेण्यांत माझें दुसरें एक धोरण आहे. वास्तविक बादशहाला पुरावा दाखवावयास म्हणून, एका सरदाराकडून, ' मनुष्यस्वभावाप्रमाणें मलाही अधिक वैभव आणि सत्ता मिळविण्याची हाव आहे ' असा मुरारराबांचा हस्तलेख आणविला आहे. तुम्हांला नेण्याचा हेतू इतकाच कीं बादशहाला तुमची माहिती व्हावी—हो—पुढें मागें ती उपयोगीच पडेल. मग कसें काय ? बोला लवकर. '

एखाद्या मद्यप्यानें, ' आतां मद्य प्यावयाचें नाहीं ' म्हणून निश्चय करावा. इतक्यांत त्याच्या मद्यपी मित्रानीं येऊन दारूच्या गुत्यांत चलण्याचा त्याला आग्रह करावा—नव्हे ओढीतही न्यावें, म्हणजे तो जसा खिन्न होतो, तशा खिन्नतेनें धोंडोपंत म्हणाले, ' ठीक आहे. '

' पण हें पहा. बादशहा संतापल्यासारखें करून तुम्हांला प्रश्न विचारील. पण घाबरूं नका. ' आपणांस राज्य तर

कांहींही करून मिळवावयाचें. आतां येवढें खरें कीं, कांहीं वर्षे सरदा-रींत किंवा वजिरींत काढिली पाहिजेत. पण कांहीं हरकत नाहीं— शेवटीं राजा तर व्हावयाचेंच ' असे उद्गार मुरारराव काढीत असत, असें बादशाहास स्पष्ट सांगा. '

धोंडोपंतांकडून बादशहाला असें सांगविण्यांत हुसेनचा हेतु काय असावा, हें वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. ' निजामशाही बुडवून हिंदुपदपात-शाही करण्याचा मुराररावांचा बेत आहे, ' असें हुसेननें बादशहाजवळ म्हटल्याबद्दल आठव्या प्रकरणांत उल्लेख आलाच आहे. आणि ' हा बेत मला धोंडोपंताजवळून कळला ' असे त्यावेळीं हुसेननें काढिलेले उद्गारही वाच-कांस आठवत असतील. हुसेन जे ह्मणतो तें खरें आहे किंवा महत्वाचें आहे असें आपणांस वाटतें असें बादशहानें त्यावेळीं हुसेनला दर्शविलें नाहीं. हें पाहून त्यानें ती गोष्ट धोंडोपंतांकडूनच बादशहाला वदविण्याचा बेत केला आणि त्या बेताप्रमाणें त्यांनें धोंडोपंतापाशीं आज बादशहाकडे जाण्याची गोष्ट काढली.

मुराररावाबद्दल आपल्या अंतःकरणांत जो द्वेषाग्नि धुमसत आहे, तो धोंडो-पंतास दिसूं देणें इष्ट नाहीं, असें हुसेनला वाटत होतें. लहानपणापासून मुराररावाच्या घरीं राहिल्यामुळें आमिनेसाठीं धोंडोपंत जरी देशांतर, धर्मांतर किंवा आणखीही हलकीं कृत्यें करावयास सिद्ध झाले तरी पण जेणेंकरून मुराररावाचें अकल्याण होईल असें उघड दिसतें, अशा गोष्टी करावयास ते फारच कचरतील किंबहुना धजणारहि नाहींत हे तो जाणून होता, त्याला (हुसेनला) मुख्य दोन गोष्टी करावयाच्या होत्या, एक इंदिराप्राप्ति व दुसरी मुराररावांस वजिरीचा लाभ होऊं न देणें. ह्या दोनही गोष्टी साधावयास त्याला धोंडोपंत हें एक बाहुलें सांपडलें होतें ! धोंडोपंतांच्या मनांत इंदिरा व मुरारराव यांजबद्दल तिरस्कार उत्पन्न केला व आमिनारूपीं आमिष त्यांच्यापुढें ठेविलें ह्मणजे तें आपण सांगूं तें करतील असें हुसेनला पहिल्यानदां वाटलें. त्याप्रमाणे त्यानें त्यांना कांहींच्याकांहींच गोष्टी सांगून इंदिरेविषयीं त्यांचें मन कलुषित करून टाकिलें–इतकें कीं त्यांना इंदिरा डोळ्यापुढें नकोशी झाली ! स्त्रीबद्दल कोणाही पुरुषाचें मन कलुषित व्हावयास उशीर लागत नाहीं. ही गोष्ट लक्षांत आणली असतां धोंडोपंतांचें मन इंदिरेविषयीं इतकें कलुषित झालें याबद्दल आश्चर्य वाटणार नाहीं. इंदिरेबद्दल धोंडोपंतास तिरस्कार

उत्पन्न करण्याचें काम हुसेनला जसें सुलभतेनें सिद्धिस नेतां आलें, तसें मुराररावाबद्दल तिरस्कार उत्पन्न करण्याचें काम त्याला सिद्धीस नेता येईना ! ह्मणून त्यानें तसें करण्याच्या भरीस न पडतां धोंडोपंतास आपल्या वाक्जालांत अडकवून, व त्यांना आपल्या खऱ्या हेतूचा मागमूसही न लागूं देऊन, त्यांचे कडूनच आपलीं इष्ट कार्यें करवावयाचीं असा निश्चय केला. त्यानें हा निश्चय अमलांत आणला असें त्याच्या व धोंडोपंतांच्या वरील संवादावरून दिसून येईल;कारण आपला व बादशहाचा वाद झाला,बादशहानें आपणांस रागावून शिक्षा ठरवली, दमास्कसच्या बादशहानें वजिरास सुळीं दिलें, एका सरदाराकडून मुराररावांचा हस्तलेख आणविला, इत्यादि त्यानें सांगितलेल्या गोष्टी निखालस खोट्या व बनावट होत्या.

परंतु, धोंडोपंतास त्या सर्व गोष्टी खऱ्या वाटल्या ! मग हुसेनला ' ठीक आहे ' असें उत्तर देते वेळीं ते खिन्न कां झाले ? त्याचें कारण इतकेंच कीं, हुसेनच्या सांगण्याप्रमाणें बादशहाजवळ बोलणें, तें अगदीं खोटें बोलावें लागणार—मग तें मुराररावांच्या हिताचें कां असेना !—असा विचार त्यांच्या मनांत आला. खोटें बोलतेवेळीं किंवा खोटें बोलावें लागणार असा संभव दिसूं लागला तर मनुष्य कांहींवेळ तरी खिन्न होतो हें सर्वांसच ठाऊक आहे. असो.

ठरल्याप्रमाणें हुसेन धोंडोपंतासह राजवाडयांत गेला. बादशहा मागें एकदां सांगितलेल्या दिवाणखान्यांतच बसला होता. धोंडोपंतास बाहेर ठेवून हुसेन एकटाच त्या दिवाणखान्यांत गेला. बादशहास त्रिवार मुजरा केल्यानंतर आणि कांहींवेळ इकडच्या तिकडच्या गप्पा ठोकल्यानंतर तो बादशहास ह्मणाला, ' खाविंद, बाहेर मुराररावांचे धोंडोपंत आले आहेत. त्यांच्यापासून आपली खात्री करून घ्या. कीं मुरारराव राजा होऊं इच्छितो कीं नाहीं. बोलावूं कां त्यांना आंत ? ' असें ह्मणून तो, बादशहाकडे पहात राहिला. बादशहा विद्वत्तेने हुसेनपेक्षां कमी योग्यतेचा असला, तरी तो राजकीय बाबतींत हुसेनपेक्षां अधिक योग्यतेचा होता. त्याच्याजवळ हुसेन मुराररावांची जी नालस्ती करीत असे, तिचा त्याच्या मनावर मुळींच परिणाम झाला नाहीं, असें नाहीं. पण तो हुसेनला त्याच्या बोलण्याचा आपणांवर परिणाम झाला असें मुद्दामच दर्शवीत नसे. हेतु हा कीं, तुझ्या बोलण्याचें

मला महत्व वाटतें, किंवा त्याचा माझ्या मनावर परिणाम होतो, असें जर आपण हुसेनला दर्शविलें, तर त्याला अधिक उत्तेजन येऊन, तो वाटेल त्या गोष्टी जुळवून सांगेल. व त्यामुळें खरें कोणतें, खोटें कोणतें हें बरोबर समजणार नाहीं; आणि मग अर्थात्च आपणांकडून मुराररावांच्या बाबतींत कांहीं अन्याय घडेल, तो न घडावा. बादशहा त्या बाबतींत औदासीन्य दाखवीत असे; तरी हुसेननें आपला प्रयत्न मुळींच सोडिला नाहीं. 'येनकेन प्रकारेण' बादशहाचें मन मुराररावांविषयीं कलुषित करावयाचें, असा त्याचा पक्का निश्चय होता. आणि ह्मणूनच त्यानें आज धोंडोपंतांस बादशहाकडे आणिलें होतें. बादशहानें हुसेनच्या वरील प्रश्नास उत्तर दिलें, 'व्हायचें असेल मुराररावांस राजा. मला नाहीं त्याबद्दल येवढी फिकीर वाटत ! कोण धोंडोपंत आहे, त्याला ह्मणावें घरीं चालता हो.'

'वाः सरकार ! माझी—वजिराची—आपणांजवळ हीचकां पत ? छे कृपा करून आपण—माझ्याकरितां तरी—धोंडोपंतांस, आंत येऊं द्यावेंच. कोण आहेरे तिकडे ? जा. धोंडोपंत ह्मणून एक गृहस्थ बाहेर आहेत, त्यांना आंत घेऊन ये.'

बादशहाचीही धोंडोपंताशीं बोलण्याची इच्छा होती. ह्मणून त्यानें हुसेनचा निषेध केला नाहीं. थोडक्याच वेळांत सर्वांगाला घाम सुटलेले, आणि लटलट कांपणारे धोंडोपंत आले आणि हस्तद्वय रुमालांत गुंडाळून, बादशहाच्या चरणीं तीनदा प्रणिपात करिते झाले ! बादशहा अतिशय रागीट मुद्रा करून ह्मणाला, 'कायरे, ए, काफर, तूं येथें कशाला आलास ?'

धोंडोपंत गडबडले ! बादशहाच्या क्रुद्ध मुद्रेशिवाय त्यांस कांहींच दिसेना. ते मागचें पुढचें सर्व साफ विसरून गेले ! वाघाच्या जाळींत सांपडलेल्या मनुष्यासारखी त्यांची स्थिति झाली ! इतक्यांत हुसेन त्यांस दम देऊन ह्मणाला, पंत, असे घाबरलां कां ? तुह्मांला जें सांगावयाचें तें स्पष्ट सांगून टाका. मनोदेवतेला जें योग्य वाटतें, तें सांगावयास माणसानें कधींही भिऊं नये !'

हुसेनच्या बोलण्यानें धोंडोपंतास बराच धीर आला. हुसेननें घरीं पढविलें होतें, तेंच त्यांनीं अडखळत अडखळत बादशहास सांगितलें. बादशहानें तें जरी लक्ष्य देऊन ऐकिलें, तरी हुसेनला त्यानें ऐकिलें न ऐकिलेंसेंच दाखविलें ! नंतर धोंडोपंतांस त्यानें तुह्मी मुराररावाचे कोण, मुरारराव

राजा झाला, तर तुह्मांस बरें वाटेल कीं नाहीं, तुह्मी मुराररावासंबंधीं जें सांगितलें, तें केवळ सांगावयास कांहीं हरकत ह्मणून सांगितलें, कां त्याच्या विषयीं मनांत कपट धरून सांगितलें ? वगैरे अनेक प्रश्न केले. धोंडोपंतांनीं-हीं योग्य वाटलीं तीं उत्तरें भीत भीत दिलीं. सुदैवानें, तीं उत्तरें हुसेनच्या हेतूला साधक अशीं होतीं; निदान बाधक तरी नव्हतीं.

त्यानंतर कांहीं वेळ गप्पा मारून, हुसेन धोंडोपंतासह घरीं जावयास निघाला. वाटेनें तो धोंडोपंतांशीं फारसें बोलला नाहीं; त्यानाही त्याच्याशीं बोलावयास कारण नव्हतें. आपण खोटें बोललों खरें, पण त्यायोगानें मुराररावांचें हित होईल, निदान अहित तर खास होणार नाहीं; अर्थात् आपण खोटें बोललों, हें कांहीं बदकृत्य केलें नाहीं. अशा तऱ्हेचे विचार धोंडोपंतांचें मनांत घोळत होते. नुकत्याच पाहिलेल्या बादशाही ऐश्वर्याचेंही ते मनांत-त्यामनांत आश्चर्य करीत होते. हुसेन तर खोल विचारांत मग्न झाला होता. धोंडोपंताकडून आपण बादशहास आपली इच्छित गोष्ट सांगविली, तर त्याच्या मनावर कांहीं तरी परिणाम झालाच पाहिजे. अशी हुसेनची पक्की खात्री होती. परंतु बादशहाच्या बोलण्यावरून किंवा चेहऱ्यावरून, त्याच्यावर परिणाम झालेला दिसला नाहीं; ह्यामुळे हुसेन खिन्न, व कांहीं अंशीं निराशही झाला. वाटेनें तो ह्याच गोष्टी-बद्दल विचार करीत चालला होता. आपल्या बोलण्याचा बादशहावर परिणाम कां होऊं नये ? आपलें बोलणें त्याला खोटें वाटलें किंवा वाटतें ह्मणून ? असें ह्मणावें तर इतर प्रत्येक गोष्टींत आपण सांगूं त्यावर बादशहा विश्वास ठेवितो. मग ह्याच गोष्टींत असें कां ? आपल्या अंतःकारस्थानाचा बादशहास मागमूस लागला, ह्मणून तो आपलें ऐकत नाहीं ह्मणावें, तर अशा तऱ्हेचा मागमूस लागल्यावर बादशहा आपणांकडे वजिरी ठेवणारच नाहीं; आणि नेहमींप्रमाणें आपणांस सन्मानही देणार नाहीं. पण ज्याअर्थी त्यानें ती आपणांकडे ठेविली, व नेहमींप्रमाणें आपणास सन्मानही तो देतो, त्याअर्थी त्याला आपणांस शंका येते त्याप्रमाणें मागमूस लागलेला नसावा. बरें, मुरारराव त्याला प्रिय आणि मान्य आहे ह्मणून तो आपलें ऐकत नाहीं ह्मणावें, तर आपणही त्याला मुराररावाइतकेंच प्रिय व मान्य आहोत. तशांत मुरारराव तर विजातीय आणि; आपण सजातीय. आपलें बोलणें त्याला अधिक विश्वास्य

वाटले पाहिजे. शिवाय मुरारराव येथें नाहीं, त्यामुळें त्याच्याविषयीं आपण जे बोलतो त्याविरुद्ध खरी स्थिती जी आहे ती बादशहास कळणें शक्य नाहीं. मग त्याच्या मनावर आपल्या भाषणाचा मुरारराबाच्या बाबतींत परिणाम कां होत नाहीं ? ह्याचें हुसेनला मोठें गूढ पडलें. बराच वेळ विचार केल्यावर त्याला हे गूढ बरेंच उकललें ! बादशहाच्या मनावर आपल्याला इष्ट तो परिणाम खास झालेला आहे. एरव्हीं तो रोज आपली मुरारराबाबद्दलची चर्पटपंजिरी—जरी मधून मधून आपणास झिडकारतो—तरी तो अगदीं साग्र ऐकून घेतोच. तशी ऐकून घेतां ना. परिणाम झालेला तो बोलून किंवा चिन्हांनीं दाखवीत नाहीं. येवढच. बाकी तो झालेला आहे. असा विचार मनांत येऊन आजपर्यंत चालविलेला क्रम ह्यापुढही तसाच किंबहुना अधिक जारीनें चालवावयाचा, असा हुसेनने मनांत निश्चय केला ! आणि हा निश्चय कशारीतीनें व नेटानें पाळावयाचा, ह्याबद्दल बेत करीत असतां, तो घरीं जाऊन पोहोंचला. धोंडोपंतही वर सांगितलेल्या विचारांतच हुसेनच्या घरीं—कारण ते सध्यां तेथेंचें रहात असत—जाऊन पोंचले. असो.

मुराररावांच्या स्वारींतील वृत्त, बादशहास वारंवार जासुदांकडून कळत असे. आतापर्यंत त्यात अपयशाची किंवा कांहीं वाईट गोष्टीची वार्ता नस . त्यामुळं, बादशहास आनंद होत असे. हुसेननें मुरारराबांची नालस्ती व ,र-ण्याचा क्रम सोडिला नव्हताच. उलट त्यानें तो अगदीं ज ।रीनें चालविला. त्याचा परिणाम बादशहावर पुष्कळच झाला. हुसेन —आपलें शुभ इच्छिणारा हुसेन— पूर्ण स्वामीभक्त हुसेन- — रोज उठल्यासुटल्या मुरारराबाची निंदा—तीही आपण वारंवार धिःकार . करीत असता, व तो स्वतःही मुरारराबाची खरी योग्यता जाणत असत ।ं—करितो, तींत अगदींच तथ्य नसेल असें नाहीं. हुसेन तक्रार करित' , त्याप्रमाणे मुराररावास इच्छा असणें सहाजीक आहे; आणि तो आपली . इच्छा पूर्ण होण्याकरितां खटपट करीत असेल, किंवा करणार असेल, हें शक्य आहे. असें बादशहास वाटूं लागलें. आणि आपण ह्याचा योग्य वेळीं प्रतिकारही केला पाहिजे, असें त्याच्या मनांत आलें. व तो कसा क ,रावा ह्याबद्दल तो स्वतःशीं रोज विचार करूं लागला.

इतका परिणाम बादशहावर झाला खरा पण हुसेनचें , जिव्हायंत्र पुढं पढं

मुराररावावर इतका भडिमार करूं लागले कीं बादशहास त्याचा अगदीं त्रास आला ! आणि खरेंच: केवळ निंदाच करण्याची इच्छा धरून, केलेलीं भाषणें किंवा लिहिलेले लेख कोणाही मनुष्यास विषप्रमाणें त्याज्य आणि किळसवाणें वाटतात, याचा अनुभव हे महाराष्ट्र वाचकहो, आपणांस नुकताच आलेला आहे. सर्व भारतवासीयांस पूज्यतम असलेल्या एका अधिकारी पुढाऱ्यावर ' मुंबई-पुण्याच्या लुंग्यासुंग्या दिवट्यांनीं ' जो भडिमार केला. त्या स्वयंतेजोराशी महात्म्यावर त्यांनीं जे अनेक खोटेनाटे आरोप केले त्याच्या मुळाशीं निंदा करण्याचाच हेतु होता असें ह्मणावयास काय हरकत आहे ? वास्तविक त्या भारतमातासुपुत्र तिलकानें आज पावशतक जी अविरत देशसेवा केली तिच्या कांहीं अंशानें तरी वर लिहिलेल्या पत्रांच्या विद्वान संपादकांनीं—मग त्यांना मारखाच प्रमाणानें इष्ट वाटणाऱ्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक वगैरे पैकीं एकाही बाबतींत ह्मणाना— केली आहे काय ? ' आहे ' असें उत्तर क्वचित्‌च येईल. त्यांना पूज्य वाटणाऱ्या विशिष्ट पुढाऱ्यांची त्यांनीं तरफदारी करावी. त्याला कोण आड येणार आहे? पण आपल्या पक्षाच्या पुढाऱ्याचें स्तोम माजविण्याकरिता, विरुद्ध पक्षाच्या पुढाऱ्यांची निंदा करणें, ह्याला नीचपणा ह्मणूं नये, तर काय ह्मणावें ? आणि ह्या नीचपणाचें फळ देण्याचा बहुजन समाजानें निश्चय केला, तर त्यांत नवल काय ? ह्या प्रासंगिक विषयावर लिहून, लेखणीला शीण देण्याची आह्मांस इच्छा नाहीं. तथापि निंदाप्रचुर लेखाचा व भाषणाचा कसा परिणाम होतो, हें स्पष्ट करण्याकरिता, वरील गोष्टीचा थोडक्यांत उल्लेख केला आहे (याबद्दल वर लिहिलेल्या पत्रांच्या संपादकांस त्यांच्या अंगी सारासारविचारशक्ति व सौजन्य असल्यास राग येणार नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे.)

असो. वर लिहिलेल्या पत्रांतील निंदाप्रचुर लेखांनीं समाजास जशी किळस उत्पन्न झाली आहे तशीच बादशहासही हुसेनच्या निंदाप्रचुर भाषणांनीं झाली. तो एक दिवस त्रासून हुसेनला ह्मणाला, ' हुसेन तूं आपला काम करीत जा, कांहीं का करीना मुराररराव ! मला वाटल्यास मी त्याचा बंदोबस्त काय करावयाचा तो ! ' तरी पण त्यावरही एक दोन दिवस हुसेननें आपला लघळपणा सोडिला नाहीं ! परंतु त्यानंतर मात्र यक्षिणीची

कांही फिरली ! हुसेननें आपला क्रम अविरत सोडून दिला. येवढेंच नव्हे तर, 'मुरारराव आतां ताळ्यावर आले ! स्वामिभक्तिचें महत्व आतां त्यांच्या लक्ष्यांत पूर्ण आलें आपण विचार करीत होतों तो वाईट होता. असें त्यांना हल्लीं वाटत असावें, असें त्यांच्या खाजगी पत्रांवरून, व इतर कांहीं गोष्टीवरून दिसतें.' असेही उद्गार तो बादशहाजवळ काढूं लागला ! बादशहास त्याबद्दल आश्चर्य वाटलें. पण त्यानें त्याबद्दल फारसा विचार केला नाहीं. हुसेनच्या तें पथ्यावरच पडलें ! असो.

एके दिवशीं दुपारीं बादशहा राजवाड्यांतील एका महालांत बसला असता, हुसेन घाई घाईनें तेथ आला. आल्याबरोबर त्यानें तेथें जे बादशहाचे सेवक वगैरे होते, त्यांस बाहेर जावयास सांगितलें. त्यांनीं शिपायांनीं वजीरसाहेबांची आज्ञा मुकाट्यानें पाळली ! मग हुसेननें दोन पत्रें खिशांतून काढून बादशहाजवळ दिलीं. त्यांपैकीं एक पत्र मुररावांचें असून, 'आपण वजिरी देण्यासाठीं त्वरेनें बोलाविलें. म्हणून मी तिकडे यावयास निघालों आहे. लवकरच येतों.' अशा अर्थाचा मजकूर त्यांत होता. दुसरें पत्र कुतुबशहाचें होतें. त्यांत खालील आशयाचा मजकूर होता; 'मुररावास वजीर करावें. त्यांना अहंमदनगरची वजिरी मिळवून देण्याचें आम्ही अभिवचन दिलें आहे. आमच्या लिहिण्याप्रमाणें न केल्यास कठीण जाईल !'

हीं दोनहीं पत्रें हुसेन वजीर असल्यानें आधीं त्याच्याच हातीं पडलीं. हुसेनजवळ बादशाही शिक्का मोर्तब असल्याकारणानें त्याला सरकारी पत्रें पाठविण्याचा व आलेलीं पत्रें फोडून पाहण्याचा अधिकार होता. वरील दोन पत्रें त्यानें आधीं फोडून पाहिलीं, व त्यांतील मजकूर आपल्या मनाप्रमाणेंच आहे, असें पाहिल्यावर त्यानें तीं बादशहाला दाखवायास आणिलीं !

बादशहा तीं पत्रें वाचून फार आश्चर्यचकित झाला ! त्याला ह्या दोन पत्रांची संगती कशी लावावी हें कळेना! तो पत्राकडे पहात असतां म्हणाला 'हुसेन, ह्या पत्रांवरून मुरररावाचें कुतुबशहाकडे कांहीं संधान असावें, असा एकवेळ मला संशय येतो !'

'नुसता संशयच येतो. माझी तर खात्री झाली आहे, कीं, मुरारराव राजद्रोही होऊन मोंगलाकडे गेले !'

' पण तसें असतें, तर त्यानें पत्र नेहमींप्रमाणें नम्रतेनें लिहिलें नसतें ! त्यांत कुतुबशाहाचेंच कांहींतरी कपट असावें ! '

' नाहीं. नाहीं. हें सर्व कारस्थान मुराररावांचेंच आहे. मी तें सर्व जाणिलें आहे. प्रथम मला सांगा, कीं, आपण वजिरी देण्यासाठीं मुराररावांस येथें बोलाविलें होतें कां ? '

' मुळींच नाहीं. माझ्या अपरोक्ष तूं पाठविलें असशील, तर कोण जाणें ! '

' वा: ! असें कधीं तरी करीन कां ? हें पहा ! माझ्या मताप्रमाणें मीं जें जाणिले तें असें. येथील बहुतेक सैन्य आपण मुराररावांबरोबर मोहिमेवर पाठविलें. तेथें गेल्यावर त्यांच्या मनांत एक भयंकर विचार आला ! तो हाच कीं, आपणांस पदच्यूत करून गादी बळकावयाची ह्यासाठीं त्यांनीं तेथेंही पुष्कळ सैन्य जमा केलें. पहिल्या पहिल्यानें आपल्या जवळचे सर्व सैन्य घेऊन, अहंमदनगरावर चाल करावी व तेथें असलेल्या सर्व सैन्याचा पराभव करून पातशाही हस्तगत करावी असा त्याचा विचार असावा. परंतु, असें केल्यानें आपल्या वडिलांच्या नांवास काळिमा लागून आपलाही दुर्लौकिक होईल; त्यायोगानें बादशहा झाल्यावरही प्रजा आपल्यावर संतुष्ट रहाणार नाहीं; येवढेंच नव्हे, तर त्रासही देईल, असा विचार मनांत घेऊन त्यांनीं कुतुबशाहाकडे संधान लावलें असावें ! शेवटपर्यंत विजय मिळत असतांही मुरारराव नर्मदेपलिकडे गेले नाहींत, व कुतुबशहाच्याही वाटेला गेले नाहींत ह्याचें कारण तरी हेंच ! कुतुबशहानें, आपल्याजवळ हल्लीं जें पत्र आहे तें पाठवावें, म्हणून त्याला मुराररावांनीं नवीन जिंकलेला सर्व मुलूख देऊन टाकिला, अशीही खात्रीलायक बातमी मला लागली आहे ! तिच्यासंबंधी अधिक चौकशी मी करीत आहे ! कुतुबशहाकडून धमकी आली म्हणजे, स्वतःची दुर्बळता लक्ष्यात आणून आपण मुकाट्यानें त्यांना (मुराररावांस) वजीर करण्याचें कबूल कराल असें त्यांना वाटलें. आतां, वजीर व्हावयास म्हणून मुरारराव सर्व सैन्य घेऊन यथें येतील; आणि आपण वजिरी देत नाहीं अशी कंडी पिकवून, आपलें बरें वाईट करून, बादशहा होतील ! लोकांनांही मुराररावांस फारसा दोष देतां येणार नाहीं ! व देतां येत असला तरी आपल्या जातीचा (हिंदू) बादशहा म्हणून ते त्याबद्दल फारसें लक्ष्यांत घेणार नाहींत !

मुसलमान लोक हिंदूंच्या संख्येच्या मानानें थोडेच आहेत. त्यामुळें त्यांच्या तोबारोषाची मुराररावास कांहींच भीति नाहीं ! मुराररावांनीं पत्र नेहमींप्रमाणें नम्रपणानें लिहिले तें मुद्दामच ! कारण, त्यांनीं तें उद्धटपणानें लिहिलें असतें तर संतापानें आपण तें इकडे येईपर्यंत हजारों लोकांचें सैन्य उभारिलें असतें—आपल्या शब्दाला मान देणारे असंख्य लोक हल्लीं राज्यांत आहेत. हा अनर्थ टळावा—आपणांस ' मुराररावांचा वजिरी मिळविण्याशिवाय कांहीं तरी हेतू आहे ' असा संशय येऊं नये, ह्मणूनच त्यांच्या पत्रांतील भाषा नम्र ! '

हुसेनचे हे सर्व तर्कट खोटें होतें, हें सांगावयास नकोच ! आणि जरी तें खरें मानिलें, तरी त्यांत कांहीं कांहीं अशा शंका येण्याजोग्या होत्या कीं, त्यांना हुसेनच्यानें उत्तरही देतां आलें नसतें ! परंतु, बादशहा सुस्थितीवर नसल्यामुळें, त्यानें कांहीं शंका काढिल्या नाहींत, व त्याला आल्याही नाहींत ! तो उसासा टाकून ह्मणाला, ' एकंदरींत मनुष्यजात हरामखोर हेंच खरें ! ' मग बराच वेळ विचार करून, तो ह्मणाला, ' हुसेन, आतां असें कर. सध्यां परचक्र आलें आहे. आमचें अर्धें अधिक सैन्य मोहिमेवर गुंतलें आहे. ह्मणून आह्मांला नवीन सैन्य उभारणें आहे. तरी ज्याची ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं सरकारसेवा करण्याची इच्छा आहे, त्यांनीं पंधरा दिवसांचे आंत येथें हजर व्हावें ' अशा दवंड्या गांवोगांव पिटीव. मात्र मुराररावांचें पारिपत्य करण्याची ही खटपट आहे असें कोणास कळूं देऊं नको ! कारण, त्यायोगें, मुराररावाचे पुष्कळ आंधळे भक्त व हितचिंतक आपल्या राज्यांत आहेत; ते आपल्याविरुद्ध खटपट करावयास चुकणार नाहींत ! आणखी असें कर. चांगले हुषार व चतुर लोक पाठवून, मुरारराव्यांस येथें पकडून आणण्याची व्यवस्था कर. मात्र मुराररावाच्या जिवाला धक्का पोंचतां कामा नये ! '

' सरकार मुरारराव शूर आहेत. त्यांना कपटानें पकडणाराशीं दोन हात केल्याखेरीज ते रहाणार नाहींत ! त्यामुळें, त्यांच्या जिवाला धक्का पोंचणें अपरिहार्य आहे.—असो ह्मणा. होतां होईल तों, त्यांना जिवंत पकडून आणण्याचीच मी तजवीज करितों. ' इतकें बोलून हुसेन घरीं गेला. घरीं गेल्यावर तो हुजऱ्यास ह्मणाला, ' करीम, कादर, अबदुल व मिरान,

ह्या चौघांस घेऊन ये.' हुजऱ्या गेला व थोड्याच वेळानें त्या चौघांस घेऊन आला. हुसेननें हुजऱ्यास बाहेर जाण्यास सांगितलें; व तो त्या चौघांबरोबर पुष्कळवेळ कुजबुजला. शेवटीं ते होकारार्थी माना डोलवून चालते झाले. हुसेनही मिशीवर ताव देऊन विचार करीत पडला!

प्रकरण १८ वें.

मारेकरी.

दुसऱ्या दिवशीं मुरारराव अहंमदनगरी जावयास निघणार होते. विजयगड येथील फौजेतील प्रत्येक शिपायास त्याबद्दल फार वाईट वाटत होतें. मुराररावां-सारखा म्होरक्या आपणांस सोडून चालला हें पाहून, आतां लढाईत कांहीं मजा राहिली नाहीं असें सर्व सैन्यास वाटूं लागलें! मुराररावांस तर वाईट वाटतच होतें. लढाई म्हणजे त्यांना अतिशय प्यार! लग्नसमारंभाचें सौख्य युद्धसौख्यापुढें कांहींच नाहीं अशी त्यांची समजूत! त्यामुळें अहंमदनगरीं परत जावयाचें—आणि तेंही युद्धाचा कांहीं निकाल न करितां—त्यांच्या फार जिवावर आलें! तरी पण मनाची समजूत कशीतरी करून, त्यांनीं परत जाण्याचा बेत नक्की केला. परत जावयास निघण्याचे आदले दिवशीं, विजयगड येथील छावणींत एक मोठा दरबार भरला. त्या दरबारांत मुराररावांनीं सर्व सैन्यास वीररसपरिपूर्ण उपदेश केला; आणि निजामशाहीसाठीं आपलें तनमनधन अर्पण करा—मीही तसेंच केलें आहे, व पुढेंही करीन, असें कळकळीनें सांगितलें. त्याच रात्रीं सर्वांच्या आग्रहावरून, कलावंतिणींचा नाच पहा-वयास ते बसले. त्यावेळीं सर्व छावणींत सरदार लोकांनीं उत्तम रोषणाई केली. मुरारराव नाच पहात बसले असतां, सात आठ मनुष्यें त्यांच्या निजावयाच्या तंबूच्या दोन कनातींमध्यें शिरलीं. तंबूच्या दाराजवळील

पहारेकरी त्यावेळीं अगदीं बेसावध असल्यामुळे त्यांना हा प्रकार कळला नाहीं ! एका जाणत्या पहारेकऱ्यास कांहीं संशय येऊन, दुसऱ्या पहारेकऱ्यांस समजूं न देतां, तो मुकाट्यानें त्या दोन कना-थींच्या मध्यें डोकावून पाहूं लागला ! तेव्हां त्याला एकानें खसकन् आंत ओढिलें, व त्या बिचाऱ्यास ओरडण्यासही संधी न देतां त्याचें शीर धडा-पासून वेगळें केलें ! अर्थात्‌च हाही प्रकार पहारेकऱ्यांस समजला नाहीं ! असो. सुमारें तीनचार घटका बसून मुराररावांनीं नाच पाहिला. नंतर ते आपल्या बिछान्यावर येऊन निजले. अतिशय विचारांच्या श्रमानें ह्मणा, किंवा रामगडाहून छावणी हालविल्यापासून रोज होणाऱ्या श्रमामुळें ह्मणा, त्यांना लवकरच गाढ झोंप लागली ! कांहीं वेळानें, दोन कनाथींमध्यें लपून बसलेल्या इसमांनीं तंबूची आंतली कनाथ हळूच फाडून तंबूंत प्रवेश केला. ते सर्व मुराररावांच्या बिछान्याभोंवतीं उभे राहिले. त्या सर्वांच्या हातांत नागव्या तरवारी चमकत होत्या ! त्या इसमांपैकीं एक जण हळूच बोलला, ‘ अरे करीम ! त्यांना झोंप लागली आहे ! ’

‘ अरे चूप ! ’ करीम नाकावर बोट ठेऊन हळूंच ह्मणाला, ‘ कादर तूं अगदीं बेअक्कल आहेस ! हं मिरान्, वाट कशाची पहातोस ? लगाव ! ’

मिरान मुराररावांच्या उशाशीं होता. करीमच्या इशारतीबरोबर त्यानें तरवार उचलली, व मुराररावांच्या डोक्यावर नेम धरून, दाणकन् खालीं आपटली ! पण कर्मधर्मसंयोग ! ती तरवार मुराररावांच्या डोक्यावर न पडतां गादीवरच एका बाजूस पडली. तिच्या आवाजानें मुरारराव‌ांस जाग आली. ते डोळे उघडून पहातात तोंच त्यांच्या अंगावर सगळीकडून वार बसूं लागले. पण सर्वांग लेपानें गुरफटलेलें असल्यामुळें त्यांस कांहीं इजा झाली नाहीं. त्यांचें फक्त डोकें व तोंड उघडें होतें. तेंही त्यांनीं झटकन् पांघरुणानें झांकून घेतलें ! हे मारेकरी कोण. ह्याचा आपण अपराध तरी काय केला. आणि हे ह्यावेळीं येथें आले कसे, ह्याबद्दल त्यांना तर्कच होईना ! आणि तर्क करीत बसण्यास वेळ तरी कोठें होता ? आतां आपलें कसें होईल, अशी त्यांना धास्ती बसली. मरणावांचून आपली सुटका होणें नाहीं अशी त्यांची खात्री झाली. आतां हे सर्व मिळून आपलें पांघरूण ओढून घेतील, आणि एका क्षणात आपणांस

परलोकीं धाडतील; ह्याबद्दल त्यांना तिळमात्र शंका राहिली नाहीं ! ते पहारेकऱ्यांस मोठमोठ्यानें आरोळ्या मारूं लागले. हें पहातांच, संतापून मारेकऱ्यांनीं त्यांच्या अंगावरील पांघरूण जोरानें ओढून दूर फेकून दिलें ! त्याबरोबर चित्त्यासारखी उडी मारून मुराररावांनीं दोघां मारेकऱ्यांच्या गळ्यांस बळकट मिठी मारून; त्याना जमिनीवर पाडिलें. आणि त्यांपैकीं एकाची तरवार हिसकून घेऊन ते क्रुद्धदृष्टीनें इतर मारेकऱ्यांकडे पाहूं लागले. त्या मारेकऱ्यांस त्यांची भीति वाटली नाहीं पण काहींसें आश्चर्य बरीक वाटलें ! त्यामुळें ते किंचित्काळ जागच्याजागींच उभे राहिले. मुराररावांचा आरोळ्यांचा सपाटा चालूलाच होता. ते मारेकरी मुराररावांस पुन्हां वार करावयास सरसावले. इतक्यांत बाहेरून मुराररावांचे पहारेकरी धांवत आले, व तंबूंत दगा झालेला पाहून ते मारेकऱ्यांची कत्तल करूं लागले. दोनचार मारकरी पळून गेले. बाकीचे सगळे तेथें मरून पडले. मुरारराव त्या दोघां-मारेकऱ्यांच्या अंगांवरून उठले; व त्यांच्या पहारेकऱ्यांनीं त्या दोघांस निजधामास पाठविलें. मुराररावांच्या पाठीस एक जबर जखम लागली होती. तिच्या असह्य वेदना होऊन ते बिछान्यावर पडले व पहारेकऱ्यांस ह्मणाले, कायरे, मी किती हांका मारिल्या तुह्मांला ? एकही ऐकूं नाहीं आली ? '

' सरकार ! आह्मी आमच्या ठिकाणावरच नव्हतों, तर आह्मांला आपल्या हांका ऐकूं येणार कशा ? आपल्या छावणींत कांहीं वेगळाच प्रकार झाला आहे, त्याबद्दल विचारपूस करीत आह्मी फिरत होतों. पण नजाणों—आपल्या जिवाला कोणी इजा करील, ह्मणून लवकरच परत आलों. तों आपल्या हांका ऐकूं आल्या ह्मणून लागलींच आंत आलों. '

' पण हे मारेकरी कोणाचे, आणि येथें आले तरी कसे ? ' ' कोणाचे होते कोणास ठाऊक ! आपण नाच पहावयास गेलां तेव्हांच ते येथें लपून बसले असावेत. आह्मी त्यावेळीं अगदीं गाफील होतों — क्षमा असावी धनी साहेब !

मुरारराव कांहीं न बोलतां तळमळत पडले. त्यांना त्यांच्या लहान मोठ्या जखमांच्या वेदनांमुळें कांहीं सुचेना. हें पाहून त्यांच्या सेवकांनीं ओल्या फडक्यांनीं त्यांच्या सर्व जखमा बांधून टाकिल्या. तेव्हां त्यांना जरा बरें वाटलें. ते एकदम आठवल्यासारखें करून ह्मणाले, ' मवां तुह्मी

काय ह्मणालांत बरं ? 'छावणींत कांहीं निराळच प्रकार झाला' ह्मणून ह्मणालात ना ?—काय—काय प्रकार झाला पाहूं ? असें ह्मणून ते धावतच तंबूबाहेर गेले. बाहेर उभे राहून, त्यांनीं जो देखावा पाहिला, तो खरोखरच आश्चर्यकारक होता ! छावणींत जिकडे तिकडे पळापळी धराधरी चालली होती. डेरे राहुट्या जळत होत्या. ओरडा ओरडी चालली होती. मधून मधून तरवारींचा खणखणाटही ऐकूं येत होता.

मुरारराव आश्चर्यानें थक्क झाले ! एका रात्रींत इतकी बदललेली स्थिती पाहून त्यांच्या डोक्यांत विचारांची गर्दी झाली. त्याची ही स्थिती पाहून त्याचे चाकरलोक ह्मणूं लागले, 'सरकार ! विचार कशाचा करितां आतां ? चला आमच्या खांद्यावर बसून. नाहीं तर आपल्याही जिवावर बेतेल.'

'अरे, पण हें आहे तरी काय ?'

'सरकार ! आपलें सैन्य गैरसावध पाहून कुतुबशहाच्या कांहीं मोठमोठाल्या टोळ्यांनीं छावणीवर हल्ला केला. आपले निम्याहून अधिक लोक मेले. कांहीं जळाले. कांहीं घायाळ झाले. बाकीचे पळून गेले. कुतुबशहाच्या टोळ्याही परत गेल्या. आता कांहीं लुटारू लोक मात्र छावणींत फिरत असून जे कांहीं दीन दुबळे लोक छावणींत आहेत, त्याना त्रास देत आहेत ! चला आपण आता आधीं.'

'ह्मणजे ? अशी पराजयाची वार्ता बादशहाला कळविण्यास जावयाचें ? अशा काळ्या तोंडानं बादशहाजवळ जावयाचें ? वा—'

'सरकार, आतां दुसरा इलाजच नाहीं. शत्रूच्या टोळ्या तर केव्हांच चालत्या झाल्या. आतां लढणार कोणाशीं ? आणि त्या टोळ्यांचा पाठलागच करावयाचा असला, तरी आपणाजवळ सैन्य आहे कोठें ? तशांत तुह्मांला स्वतःला कितीतरी जखमा झाल्या आहेत—ही पाठीची जखम तर फारच भयंकर आहे. तुह्मी लढणार तरी कसें ?'

'पराजित होऊन बादशहाजवळ जावयाचें ?' असा प्रश्न मुरारराव स्वतःला तीनतीनदां करूं लागले. त्याच्या जखमांतून होणारा रक्तस्राव अजून बंद झाला नव्हता. त्यांचें सर्व अंग अतिशय तापलें होतें. त्यांना वारंवार घेरी येत होती. त्यांचें भान नाहींसें झालें असें ह्मटलें असतांही चालेल ! 'पराजित होऊन बादशहाजवळ जावयाचें ?' असा प्रश्न स्वतःलाच-

करावयाचा, आणि त्या प्रश्नाच्या उत्तरादाखल स्वतःच निर्दोष्यंजकरीतीनें हसावयाचें असा प्रकार त्यांचा बराच वेळ चालला! हें पाहून, त्यांच्या चाकरांपैकीं एकानें विशेष विचार न करितां, त्यांना उचलून आपल्या पाठीशीं घेतलें, आणि ' चलारे. ते होऊन कांहीं छावणी सोडून कोठें येणार नाहींत. आपणच त्यांना, त्यांचें कांहींएक न ऐकतां नेलें पाहिजे ' असें बाकीच्यांस ह्मणून चालूं लागला. ते लोकही त्याच्याबरोबर निघाले.

वाटेनें त्यां पैकीं प्रत्येकानें मुराररावांस आपल्या पाठीशीं घेतलें. छावणी पासून सुमारें दहा कोस चालून गेल्यावर ते थांबले. जवळच एक डोंगर होता त्यावर त्यांनीं मुराररावास नेलें. त्यांच्यापैकीं एकानें डोंगरावरून एक वनस्पती आणिली, आणि ती वाटून मुराररावांच्या जखमांत भरली. कांहींवेळानें त्यांच्या जखमांतून रक्त वहाणें अगदीं बंद झालें. त्या स्वामीभक्त सेवकांनीं डोंगरावरील एका झाडाखालीं वाळलेला बराच पाला गोळा करून त्यावर आपल्या अंगावरील धोत्रें अंथरलीं आणि त्यावर मुराररावांस निजविलें. त्यांनाही चांगली झोप लागली. सुमार एक प्रहरानें ते जागे झाले. ते निजले होते तोंपर्यंत त्यांच्या सेवकांनीं जवळच्या खेड्यांतील एका ब्राह्मणास शिधा देऊन, स्वयंपाक करावयास सांगितला, व तें अन्न त्याच्याकडून वर आणविलें. त्या ब्राह्मणाला त्याच्या श्रमाबद्दल यथायोग्य मोबदला देण्याच मुराररावांच्या चाकरानीं कबूल केल्यामुळें त्यानेंही वर येण्याबद्दल फारशी कुरकुर केली नाहीं! असो.

झोंप झाल्यावर मुराररावानीं डोंगरावरील तळ्यावर आपली स्नानसंध्या आटोपली. नंतर त्या ब्राह्मणासह भोजन आटोपून जवळच त्यांचे चाकरही जेवीत होते त्यांच्याशीं ते बोलत बसले. त्यावेळीं त्यांनीं आपल्या चाकरास आपण पुढें काय करणार तें सांगितलें. ते ह्मणाले, ' गोसाव्यास अवश्य तितक्या सर्व वस्तू मला आणून द्या. मी आतां गोसावी होऊन, आधीं सप्तशृंगाला जाईन. तेथच लातान्यास माझा शंकर ह्मणून मित्र आहे, त्याला बोलावीन. मग आह्मास काय बेत करावयाचा तो करूं. असें काळें तोंड मी बादशहाला दाखविणार नाहीं! कुतबशहाच्या सैन्याची धुळधाण करून, विजयगड येथें त्याच्या सैन्यानें जो प्रकार

केला, त्याचें सव्याज प्रायश्चित्त त्याला देऊन, मग मी बादशहाजवळ जाईन! तोंपर्यंत जाणार नाहीं.'

'सरकार! मग गोसाव्याचा वेष कशाला पाहिजे?'

'मला कोणी ओळखूं नये म्हणून. मला माझ्या नेहमींच्या पोषाखांत पुष्कळ लोक ओळखतील, आणि 'काहो, पराभव कशानें झाला' इत्यादि प्रश्न करून पुरे पुरेसें करतील त्यापेक्षा मी कुतुबशहाचा पुन्हां पराभव करीपर्यंत, मी जिवंत आहे कीं मेलों, हे देखील लोकांस न कळलेलें चांगलें!'

'मग आम्हांसही गोसावी झालें पाहिजे!'

'छे. छे. तुम्ही आतां आपापल्या घरीं जा. आज तुम्ही माझ्यावर जे उपकार केले ते कदाचित् माझ्यानें न फिटले तरी ईश्वराच्या येथें ते रुजू आहेत, अशी खात्री असूं द्या. मला जर माझें पूर्व वैभव लाभलें, तर मी तुम्हांला खास बोलावीन; आणि तुम्हीही आलेंच पाहिजे.'

ह्यावर ह्या गोष्टीसंबंधीं कोणी कांहीं बोललें नाहीं. सेवकांनीं राख, दाढी, वाकड्या आकाराचा सोटा, झोळी, वगैरे जिनसा आणून मुराररावांस गोसावी—बैरागी बनविलें. नंतर मुराररावांस सप्तशृंगाच्या वाटेला लाऊन, त्यांनीं त्यांचा मोठ्या कष्टानें निरोप घेतला. मुराररावांसही अशा स्वामीनिष्ठ सेवकांस सोडतांना किती वाईट वाटलें असेल ह्याची ज्यांच्यापदरीं स्वामीनिष्ठ सेवक असतील, त्यांनाच कल्पना होईल. असो. मुराररावांस ठार मारावयास आलेले मारेकरी दुसरे कोणी नसून हुसेनच्याच सेवकमंडळांतील चौघे होते, हें वाचकांच्या लक्षांत आलें असेलच!

प्रकरण १९ वें.

प्रियमित्रांची भेट.

सुमारें दहा दिवसांनीं मुरारराव सप्तशृंगला येऊन पोहोंचले. ' आपला पराभव झाला ' हा विचार शल्यासारखा त्यांच्या अंतःकरणास टोंचीत होता. उगीच आपण त्यावेळीं आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांस रोषणाई, नाच वगैरे करावयास परवानगी दिली. आपण काय असे मोठे बादशहा लागून गेलों आहोत, तर आपल्यासाठीं रोषणाई करण्याची आपण परवानगी द्यावी ! त्यावेळीं सैन्यांतील मोठमोठ्या अधिकाऱ्यांनीं परवानगी देण्याची आपणास गळ घातली हें खरं. पण आपण परवानगी द्यावयाची नव्हती. असे समारंभ करण्याची परवानगी दिली, कीं, सैन्य गाफील झालेंच, आणि शत्रूचें फावलेंच ह्मणून समजावें— पण आपण हें त्याच दिवशीं कसें विसरलों ! जयावर जय. विजयावर विजय. आज हा प्रांत मिळाला. उद्यां तो हातीं लागला. अशी आपली नेहमींची स्थिती असल्यामुळें, आपण व आपलें सैन्य किती आनंदांत होतें त्या आनंदावर ह्या शेवटच्या प्रसंगानें विरजण तर पडलेंच पण दुष्कीर्तीचाही लाभ झाला ! इत्यादि पश्चातापकारक विचार त्यांच्या मनांत येत होते. व ह्या विचारांचा कड निघून गेल्यावर, बरें आहे. पाहून घेऊं. येवढ्यानेंच काय झालें. आतां कांहींही करून बरेंचसें सैन्य गोळा करावयाचें. कुतुबशहाचा पूर्ण पराभव करावयाचा. पहिल्यापेक्षाही अधिक मुलूख सर करावयाचा. आणि मग बादशहाला तोंड दाखवयाचें एक जगदंबेची कृपा असली साह्याला ह्मणजे झाल. इत्यादि उत्साहाचे विचारही त्यांच्या मनांत येत होते. आपणांस मारेकरी कोणी घातले, व कशासाठीं घातले, ह्याबद्दल मात्र त्यांना उलगडा होईना ! ज्यानें आपणास मारेकरी घातले त्याचें आपण फार अनहित केलें असलें पाहिजे. पण आपण कोणाचें अनहित केलें—कधीं कोणाला दुखविलें, हें त्यांना मुळींच आठवेना. कुतुबशहानें मारेकरी घातले ह्मणावें तर त्यानें प्रत्यक्ष आपल्या सैन्यांतील टोळ्याच

आपणांवर घातल्या होत्या. मग त्याला मारेकरी पाठविण्याचें काय कारण? बर, टोळ्या पाठविल्यानें मी मरेनच अशी त्याला खात्री नसल्यामुळें, त्यानें मारेकरी घातले ह्मणावें तर त्याचें आपलें कांहीं व्यक्तिशः वैर नाहीं! त्याचें फक्त आपणाशींच वैर नसून, सगळ्या निजामशाहीशींच आहे. मग तो आपणालाच कशाला मारेकरी घालील? त्याला हें ठाऊक नसेल कां कीं मी मेलों, तर माझ्या जागीं दुसरा येईल, आणि माझें काम पुढें चालवील! छे. मारेकरी दुसऱ्याच कोणी माणसानें पाठविले असावेत; किंवा खुद्द त्या मारेकऱ्यांचाच मजकडून कांहीं अपराध झाला असेल, ह्मणून ते ठार मारावयास आले असतील. अशी शेवटीं मनाची समजूत करून, ह्या जिवावरील प्रसंगांतून सोडविल्याबद्दल ते परमेश्वराची स्तुती करूं लागले. सप्तशृंगगडावर आल्यावर ते तावडतोब जिवाजीपंतांच्या घरीं गेले. आपणांला गोसावीवेषांत पाहिल्यावर सासुरवाडची मंडळी आपणांस काय ह्मणतील, इंदिरेला किती नवल वाटेल, हलगर्जीपणानें पराभव करून घेतला ह्मणून जिवाजीपंत कदाचित् नांवेंही ठेवितील, इत्यादि विचार सासुरवाडीस जातांना मुराररावांच्या मनांत आले. जाऊन पहातात, तों जिवाजीपंतांच्या घरास कुलूप! मुराररावांस वाटलें कीं जिवाजीपंत नाशिकला रहावयास गेले असावेत. त्यांनीं गडावर चौकशी केली, तेव्हां त्यांस कळलें कीं, जिवाजीपंतांस सरकारांतून सहकुटुंब नजरकैदेत घालण्यांत आलें आहे. कारण, त्यांनीं बादशहास एक खरमरीत पत्र लिहिलें व 'आपण माझ्या मुलीला पळविलीत' असा बादशहावर आरोप केला. इंदिरेसंबंधीं चौकशी केली तेव्हां असें कळलें कीं मुराररावांनीं बोलाविलें असें निमित्त करून, धोंडोपंतांनीं इंदिरेस अहमदनगरीं नेलें. त्यावेळीं 'तुकाराम' नांवाच्या मुराररावांच्या चाकरानें जिवाजीपंतांस सांगितलें कीं धोंडोपंत इंदिरेला बादशहाकडे नेत आहेत. पण तें जिवाजीपंतांस खरें वाटलें नाहीं. पुढें त्यांना अहमदनगरीं इंदिरेचा तपास लागला नाहीं. त्यामुळें संतापून त्यांनीं बादशहास पत्र लिहिलें. ह्यावरून इंदिरा बादशहाच्या जनानखान्यांत असावी!

ह्या दोन बातम्या ऐकून मुरारराव पुन्हां दुःखसमुद्रांत निमग्न झाले. खिन्नपणानें ते गडावरील जगदंबेच्या देवळाच्या पायऱ्या चढूं लागले. चढतांना ते स्वतःशीं ह्मणाले, 'हर! हर! बादशहानें इंदिरेला

नेली, ही गोष्ट शेवटीं खरीच ठरली ना ! हुसेनच्या चाकरानें मागें ज तुकारामास सांगितलें तें खोटें ह्मणावयाचें तर ! त्यानें माझें समाधान व्हावें ह्मणूनच तें सांगितलें असेल झालें ! बिचाऱ्या जिवाजीपंतांस आणि लक्ष्मीबाईस ह्यातारपणीं हें केवढें दुःख आणि हें दुःख देण्यास कारण मी ! इंदिरेचें सौंदर्य, भोळेपंतांचा भोळसरपणा, आणि ह्या मुसलमानलोकांची विलासप्रियता व पापाबद्दल तिळभरही नसलेली भीती, ह्या सर्व गोष्टी पूर्ण माहीत असतां मी इंदिरेबद्दल बेफिकिर राहिलों, हा माझा केवढा अपराध !'

मुरारराव देवीच्या देवळांत जाऊन बसले. ते अगदीं काहून गेले होते. इंदिरा बादशहाच्या जनानखान्यांत गेली, जिवाजीपंत सहकुटुंब बंदींत पडले, आपलाही चमत्कारीक रीतीनें पराभव होऊन आपण फक्त फटिंग बनलों, एकंदरींत आपली शक्य तितकी दुर्दशा झाली. आतां पुढ काय करावयाचें ? 'जिवाजीपंतांस, त्यांच्या पत्नीस व मुलीस सोडून द्या' अशी बादशहास विनंती करावी, तर विनंती करण्यास आपणांस तोंड कोठें आहे ? बादशहानें इंदिरेस खरीच नेली असली तर तो, आपणांस जगांतून नाहींसें करण्याची वाटच पहात असेल. आपण विनंती करावयास जावें, आणि बादशहानें आपणांवर कांहीं तरी आरोप आणून सुळीं द्यावें ! मग आपल्या विनंती करण्याचा उपयोग काय ? आपणांस विजय मिळता तर नव्हती येवढी काळजी. पण आतां करावें तरी काय ? हें मुराररावांस समजेना ! शेवटीं बराच वेळ ते स्वस्थ बसले. देवीकडे पहात असतां भक्तीचा उमाळा येऊन, त्यांनीं खाली दिलेलें पद ह्मटलें:--

॥ पद ॥

वंदन तुजसि असो ॥ जगदंबे ॥ वंदन तुजसि असो ॥ ध्रु० ॥
गौरी, काली, हैमवतीश्वरि, गिरिजे, अंबे, नमन असो तुज ॥ १ ॥
शिवे, भवानी, उमे, मृडानी, सर्वमंगले, नमन असो तुज ॥ २ ॥
दुर्गे, पार्वति, मेनकात्मजे, देवी, अपर्णे, नमन असो तुज ॥ ३ ॥
कात्यायनि, चंडिके, अंबिके, शर्वाणि, माते नमन असो तुज ॥ ४ ॥

हें पद ह्मणून, दीन मुद्रेने देवीच्या मुखाकडे पहात ते ह्मणाले, 'जगदंबे ! काय माझी ही स्थिती ! मी असा तुझा काय अपराध केला—'

मुराररावांचें बोलणें पुरें होण्यापूर्वीच, तेथें एक व्यक्ती उपस्थित झाली, व रागानें ह्मणाली, ' अपराध ! स्वाभिमान, स्वजात्याभिमान, आणि स्वदेशाभिमान सोडून, म्लेंच्छ राजाची सेवा करितोस, ह्यापेक्षां कोणता अपराध अधिक घोर आहे ! '

आवाजावरून आणि आकृतीवरून मुराररावांनीं त्या व्यक्तीस तात्काळच ओळखिलें. ' कोण ? शंकर ? ' असे ह्मणून ते त्या व्यक्तीस आलिंगन द्यावयास उठले. त्याबरोबर शंकरराव (ती व्यक्ती शंकररावच होतें) ओरडून ह्मणाले, ' दूर हो. मी सांगतों तसें करण्याची शपथ घे; मग माझ्या अंगाला हात लाव ! '

' कशाची शपथरे बुवा ! '

' की, महाराष्ट्रावरील यवनांची सत्ता नाहींशी करून, हिंदूंची सत्ता पुन्हां स्थापित करण्याचा मी आमरण प्रयत्न करीन. हं ह्मण घे बाबासाहेबांची शपथ ! '

वेडा आहेस झालें ! '

शंकरराव चिडून ह्मणाले, हा देश ज्यांच्या हक्काचा, त्यांना त्याचा पूर्ण उपभोग घ्यावयास मिळावा, ह्मणून इच्छिणारा मी वेडा ! आणि येथलें राज्य घेऊनच्या घेऊन, येथील लोकांस छळणाऱ्यांची कायावाचामनें करून सेवा करणारा तूं शहाणा ! '

' बरें बुवा. तूं शहाणा. मी वेडा. मग तर झालें ? '

' वेड्यांनीं शहाण्यांच्या सांगण्याप्रमाणें करावें. अर्थात् तूंही मी सांगतो त्याप्रमाणें कर. '

' बरें. तें असूं दे आतां. तूं असा गोसावी काय ह्मणून झालास ? '

' तूं शपथ घेतल्यावांचून, मी कांहींएक सांगणार नाहीं ! '

' कां उगीच त्रास देतोस रे ? ' मुरारराव त्रासून ह्मणाले, ' मी कांहीं शपथ घेणार नाहीं ! तुला सांगावयाचें असल्यास सांग; नाहीं तर राहिलें ! ' असें ह्मणून ते दिव्याकडे पहात बसले.

शंकरराव मुराररावांच्या तोंडापुढें उभे राहून ह्मणाले, ' अहो सात्विक मूर्ती ! आपली बायको कुठें आहे सांगा पाहूं ! '

' बादशहाच्या जनानखान्यांत आहे असें मला नुकतेंच कळलें ! '

' काय नुकतेंच कळलें ? इंदिरा मुक्तीच गेली ? '

' नाहीं. ती पूर्वीच गेली. त्यावेळीं तुकारामानें मला तिच्या जाण्याची बातमीही कळविली ! पण हुसेनच्या चाकरानें इंदिरा पुन्हां गडावर गेली म्हणून सांगितल्यामुळें मी स्वस्थ होतो. पण आज तुकारामानें पहिल्यानें सांगितलेली गोष्टच खरी आहे म्हणून समजलें ! '

' शाबासरे हुसेन ! कावा पण कावा ! मुरारराव, इंदिरेला हुसेनखानानें दिवसाढवळ्या आपल्या घरीं नेली. बादशहाच्या जनानखान्यांत ती नाहीं ? '

' मला वाटतच होतें कीं बादशहा असें करणार नाहीं ! '

' बरें आतां त्याचें स्तोत्र नका गावयास लागूं ! सगळे एकाच माळेचे मणी आहेत ! ' असें म्हणून शंकररावांनीं त्यांच्याकडे स्वार व भिल्ल आल्यापासून कमलेला हुसेनच्या घरीं पोंचवीपर्यंत घडलेली सर्व हकीकत विस्तारानें सांगितली. नंतर ते म्हणाले, ' अहंमदनगराहून मी निघालों तुझ्याकडे यावयास. पण मध्येंच वाट चुकून वऱ्हाडांत गेलों. वाटेंत एका ठिकाणीं मला चोरांनीं गांठून, माझे कपडे, पैसे, व कांहीं किरकोळ दागिनें होते ते सर्व लुबाडून घेतले. मग मी गोसावी बनलों. विंध्याद्रींतील एका अरण्यांतून जात असतां एक वाघ विव्हळत पडला असून, एक मनुष्य जवळच बेशुद्ध होऊन पडला आहे असें मला आढळलें—' पुढें जी हकीकत शंकररावांनीं सांगितली ती सोळाव्या प्रकरणांतील गोसाव्याच्या हकीकतीशीं तंतोतंत जुळत होती. अर्थात् सोळाव्या प्रकरणांतील गोसावी शंकररावच होते हें सांगावयास नकोच ! ती हकीकत सर्व सांगून, ते पुढें म्हणाले, " मी मग रामगडास आलों. तेथें कळलें कीं, छावणी विजयगडास गेली. मी विजयगडास आलों. तेथें छावणीची नासधूस झालेली दिसत होती. तुझा तपास करूं लागलों, तेव्हां एकानें सांगितलें कीं, ' मुरारराव सप्तशृंगला गेले. ' म्हणून मी तावडतोब इकडे आलों. '

' मग हें सगळें हुसेनचें कृत्य आहे म्हणावयाचें ? '

' शंका आहे कीं काय ' असें म्हणून शंकररावांनीं दोन तीन कागद काढिले, व ते मुराररावांच्या हातांत देऊन ते म्हणाले, ' वाच '

त्यांपैकीं एक कागद वाचून मुरारराव म्हणाले, ' हे तर हुसेननें कुतुबश-

हास पाठविलेलें पत्र. हें तुजजवळ कसें राहिलें ? तूं ह्मणालासना कीं, मी कुतुबशहाजवळ हुसेनचें पत्र दिलें ह्मणून ! '

' अरे हो. तुला मघली एक गोष्ट सांगावयास विसरलोंच. कुतुबशहाच्या छावणीच्या अलीकडे कांहीं अंतरावर एक खेडेंगांव होतें. तेथें दक्षिणी ब्राह्मणाचें एकच घर होतें. त्या ब्राह्मणाच्या गयावया करून, आणि पुष्कळ बडबड करून, त्याच्या कडून एक स्वाराचा पोषाख मिळविला, व स्वार बनून कुतुबशहाच्या छावणींत गेलों. गोसाव्याच्या सोंगानें गेलों असतों, तर दादही लागली नसती ! त्या ब्राह्मणाच्या घरींच हुसेनच्या ह्या तुझ्या हातांत असलेल्या अस्सल पत्राची नक्कल केली. ती नक्कल कुतुबशहास दिली, आणि हें अस्सल पत्र पुराव्यासाठीं जवळ ठेविलें ! '

वाचकहो ! कुतुबशहास मिळालेल्या पत्रांत हुसेनची चेपटीची सही कां नव्हती. हें आतांतरी आपल्या लक्ष्यांत आलें कां ?

नंतर मुराररावांनीं दुसरा कागद वाचिला.* तो वाचून, ते फारच आश्चर्यचकित झाले ! ' ह्या आज्ञापत्राखालीं माझी सही ! ' ते त्या सहीकडे आश्चर्यानें पहात ह्मणाले, ' मला नाहीं आठवत मी अशीं आज्ञापत्रकें प्रसिद्ध केलीं ह्मणून ! '

' अरे, तीं पत्रकें हुसेननेंच प्रसिद्ध केलीं, नांव मुद्दामच तुझें घातलें, हें त्या हुसेनच्याच पत्रावरून सिद्ध नाहीं कां होत ? '

' हीं दोनहीं पत्रें पुराव्याचें काम उत्तम बजावतील ! शंकर, हुसेनची करामत खरी हं पण ! त्यानें प्रत्येक पत्रांत ' गडावरून धोंडोपंतांचें इंदिरेसह खुशाल असल्याचें पत्र आलें आहे ' ह्मणून बिनदिक्कत लिहावें ! मला वजिरी घेण्यासाठीं परत येण्याचा हुकूमही हुसेननें बादशहास नकळतच पाठविला असावा ! हा पहा तो ! ' असं ह्मणून मुराररावांनीं झोळींतून एक कागद काढून शंकररावाजवळ दिला. शंकररावांनीं तो वाचल्यानंतर कांहीं वेळ दांत ओंठ करकरून चावले ! मग ते मुराररावांस ह्मणाले, ' बरें. आतां पुढें काय करावयाचें ? '

' आतां बादशहाजवळ जाऊन, ह्या पत्रांच्या सहाय्यानें हुसेनला अपराधी ठरवावयाचें ! '

' हुसेन अपराधी ठरला, तरी बादशहा त्याला कडक शिक्षा करील, असें

तुला वाटतें कां ?—तें कांहीं नाहीं. तो करो अगर न करो. आपल्याला हुसेनला, त्याच्या ह्या गैरकृत्याबद्दल भयंकर प्रायश्चित्त दिलें पाहिजे. आणि तें कसें द्यावयाचें, हें मी ठरविलें देखील आहे! हुसेनचें कातडें सोलून काढून, त्याच्या शरीरावर मिठाचें पाणी दिलेले कोरडे ओढिले पाहिजेत, समजलास ! त्यानें इंदिरेला पळवून नेलें, ही गोष्ट लक्षांत आहेना ?— आणखी दुसरें माझें असें ह्मणणें आहे कीं, निजामशाहीचा संबंध इतःपर तूं सोडिलासच पाहिजे !

' तेवढें बरीक आपल्याच्याने होणार नाहीं ? '

' मुरारराव ! तुला लाज नाहीं वाटत असें ह्मणावयास ? अरे, खुद्द तुझी बायको भरदिवसा पळविली— '

' हुसेननें पळविली— त्याचा सूड घ्यावयाचाच आहे ! पण ह्यांत निजामशहानें काय केलें ? त्या बिचाऱ्यावर काय ह्मणून रोष ? '

' तो परका ह्मणून ! ह्या देशावर राज्य करण्याचा त्याला काय अधिकार आहे ? '

' ज्याच्यांत सामर्थ्य असेल तो करील ! तुम्हीं मुसलमान लोकांस पहिल्यानेंच आपल्या देशांत कां येऊं दिलें ! ' ' तुमच्यासारख्या देशद्रोही लोकांचा त्यावेळीं सुकाळ झाला, ह्मणून मुसलमानांस आयतेच फावलें ! ' ' मग हल्लीं देशद्रोही लोक नाहींत—पुष्कळ नाहींत, असें तूं समजतोस कीं काय ! अरे, भाकरीच्या चतकोर तुकड्यासाठीं लांगूलचालन करणारे, आपल्या देशबांधवांच्या विरुद्ध खोट्या नाट्या चहाड्या करून, पोटाची खळगी भरणारे, स्वहितापुढें देशहित तुच्छ मानून पशुतुल्य वर्तन करणारे, आणि आपल्या देशबांधवांस छळून परकी राजाकडून त्याबद्दल मानमरातब मिळविणारे, हजारों नराधम आपल्या देशांत हल्लीं आहेत. ह्यांची संख्या शून्य होणें तर कधींच शक्य नाहीं; पण निदान ती पुष्कळच कमी तरी झाल्याखेरीज आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळणें अतिशय दुरापास्त आहे. '

' पण अशा देशबुडव्यांच्या संख्येपेक्षां, देशभक्तांची व स्वातंत्र्येच्छूंची संख्या हल्लीं पुष्कळ पटीनें अधिक आहे. त्यामुळें ह्या देशद्रोह्यांचें फारसें चालणार नाहीं ! ' ' असें कोठें झालें आहे ? पातेलेंभर दुधाला दूषित करावयास विषाचा एकच बिंदू पुरेसा होतो ! शिवाय सध्यां मुसलमानांची

सद्दी जोरावर आहे. तिचा जोर कमी झाला, ह्मणजे त्यांचा नाश होण्यास कितीसा वेळ लागणार आहे ?'

'पण त्यांच्या सद्दीचा जोर कमी करणें आपल्याच हातांत आहे ! '

'हें ह्मणणें चुकीचें आहे. त्यांच्या दुराचारांमुळेंच त्यांच्या सद्दीचा जोर कमी होईल. ह्याबद्दल मी तुला एक गोष्ट सांगतों. पूर्व जन्मींच्या पुण्याईमुळें, एका मनुष्यास अपार वैभव प्राप्त झालें, त्यामुळें मत्त होऊन तो पापाचरण करूं लागला, आणि दीनदुबळ्या लोकांस फार त्रास देऊं लागला. तेव्हां ते एका साधूकडे जाऊन ह्मणूं लागले, ' महाराज, ईश्वर पाप्यांस दंड करितो, आणि पुण्यवानांचें संरक्षण करितो, असें आपण नेहमीं ह्मणतां. पण आह्मांला तर उलटच प्रकार आढळतो. ' असें ह्मणून त्यांना तो गृहस्थ कसा छळतो, आणि पापाचरण करीत असतांही, त्याची कशी भरभराट होत आहे, हें त्यांनीं त्या साधूला निवेदन केलें. तेव्हां तो साधू ह्मणाला, ' बाबांनो, पूर्व पुण्याईनें त्याला ऐश्वर्य लाभलें. त्याचा पुण्य-संचय तर कधींच संपला. तरीपण त्याच्या पापांचा घडा अद्याप पूर्ण भरायाचा राहिला आहे. तो ज्यादिवशीं भरेल, त्या दिवसापासून त्याच्या मागें दुःख लागलेंच ह्मणून समजा. ' आणि साधूच्या ह्मणण्या-प्रमाणेंच झालें. त्या मनुष्याची स्थिती पुढें फारच शोचनीय झाली. ही गोष्ट मुसलमानांस चांगली लागूं पडते. जसजसे ते अधिका-धिक जुलूम करतील, तसतसा त्यांच्या सद्दीचा जोर कमीकमी होत जाईल. तो इतका कीं, त्यांच्या मतानें क्षुद्र असलेला मनुष्य सुद्धां त्यांचा नाश करूं शकेल ! शंकर आजपर्यंत मी तुझी शेकडोंवेळां समजूत घातली, तरीही तुझें आपलें पूर्वीप्रमाणेंच ! '

' काय करूं रे ! ह्या दुष्टांचें एकेक कृत्य पाहिलें, ह्मणजे अंगाची अगदीं लाही होऊन जाते; आणि ह्यांची खोड पक्कीच मोडण्याचें मनांत येतें. पण तूं असा नेहमीं हिरमोड करितोस ! '

' मी तो विचार करूनच करितों. मी विचार करून सांगितलेली गोष्ट करावयास बादशहादेखील मागें घेत नाहीं ! मग माझ्या सांगण्याप्रमाणें करावयास तुला कां येवढें जड पडतें ? दरूर ध्यालेल्या इसमाप्रमाणें मी कांहींतरी सांगत नाहींना ? हिंदुपदपातशाहीचें रम्य चित्र तुझ्या डोळ्यांपुढें

आहे. पण तें जोंपर्यंत तुझ्या डोळ्यापुढेंच आहे. तोंपर्यंतच त्याची तुला मजा वाटेल! हिंदुपदपातशाही करण्याचा प्रयत्न तूं करूं लागलास, ह्मणजे तुझ्या मार्गांत इतक्या अडचणी येतील कीं, गोंधळून जाऊन, ' स्वराज्य-संपादनाचा काळ अद्याप आला नाहीं ' असेंच तुला ह्मणावें लागेल ! '

ह्यावर शंकरराव कांहीं बोलले नाहींत. ते स्वतःशींच विचार करीत बसले. मुराररावांसही आपल्या दुस्थितीचें स्मरण होऊन, ते देवीची करुणा भाकीत स्वस्थ बसले. बराच वेळ अशा स्थितींत गेल्यावर पुढें काय करावयाचें तें उभयतांनीं ठरविलें. पुढें त्यांनीं काय केलें, हे वाचकांस कळणारच आहे. त्यावरून त्यांनीं काय ठरविलें असेल, हें त्यांस कळून येईलच ह्मणून, आतां ह्या दोघां मित्रास सोडून, त्यांनीं इंदिरेची हाल हवाल पहावयास चलावें !

प्रकरण २० वें.

इंदिरेची हालहवाल.

हुसेन मोठा युक्तिवान होता ! इंदिरा एकाएकीं आपणांस वश होणार नाहीं, हें तो समजून होता. आपण आईबाप, कुळगोत, ह्यांच्यातून बाहेर पडलों. नवऱ्याला अंतरलों. अनोळखी ठिकाणीं येऊन पडलों. असें इंदिरेस वाटून, ती दुःख करीत रहाणार. तिच्या दुःखाचा पहिला कढ—अर्थात् तो फार तीव्र असणार—निघून जाईपर्यंत आपण तिच्या दृष्टीसच पडावयाचें नाहीं, असा हुसेनचा निश्चय होता. पहिल्याच दिवशीं त्यानें तिला धोंडोपतांकडून असें कळविलें कीं, तुला सर्व जन्म येथेंच घालवावा लागणार ! अशी सर्व व्यवस्था करून सुमारें दहा दिवसांनीं तो इंदिरेच्या दिवाणखान्यांत गेला. त्याला पाहिल्याबरोबर इंदिरा अतिशय संतप्त झाली. तिचे डोळे लाल झाले. तो ओंठ चावूं लागली. तिची ती तऱ्हा पाहून

हुसेन ह्याला, तितकाच आश्चर्यचकीत झाला ! आपल्यावर इंदिरा फिदा होईल, अशी त्याला मोठी आशा होती. पण ती आतां मावळून गेली ! बरें, फिदा नाहीं झाली, तरी आपण तिला मुक्त करावें ह्मणून ती दीनपणा धरील--काकळूत करील--पायां पडेल--रडेल अशी त्याची खात्री होती. पण ती आज निखालस चुकीची ठरली ह्मणून हुसेनला आश्चर्य वाटलें ! त्याच-प्रमाणें, अशा बंदिवासांतही इंदिरा आपल्यावर दांतओठ चावीत आहे, हें पाहून, त्याला तिच्या वीरपत्नीत्वाबद्दल आणि पातिव्रत्याबद्दल कौतुक, आदर आणि भय उत्पन्न झालें ! आपण आलों, तसें बाहेर निघून जावें, असें त्याला वाटलें ! तरीपण, ज्या इंदिरेचा आपणांस ध्यास लागला होता, ती वरीं आणली असतां, आपले मनोरथ पूर्ण करण्यास कचरणें, अगदीं अयोग्य होय, असें मनांत आणून तो तेथेंच उभा राहिला. तो माधुर्यपूर्ण वाणीनें ह्मणाला, ' इंदिराबाई ! आपणांस येथें कशासाठीं आणिलें, हें आपणांस माहित आहे काय ? '

इंदिरा पुढें कांहीं बोलली नाहीं. तो ह्मणाला, ' आपणांस वाटलें असेल कीं, मी आपणांस माझ्याशीं बळजबरीनें विवाह करण्यास आणिलें ह्मणून ! पण तसें कांहीं नाहीं. माझें नशीब चांगलें असलें, तर माझे गुण व रूप हेच तुह्मांला माझ्याशीं विवाह करण्याचा मोह पाडितील ! मला इतकेंच सांगावयाचें कीं, आपणांस येथें आणण्याचा माझे मित्र मुरारराव ह्यांनींच मला आग्रह केला ! त्यांनीं मला पत्र लिहिलें कीं, ' इंदिरेस हरप्रयत्न करून, तुह्मी आपल्या वाड्यांत आणवा. मी जर जगलोंवांचलों, तर तिला पुन्हां सुख देईन. पण ह्या लढाईंत जर माझा अंत झाला, तर तूं हुसेनशीं पुन-र्विवाह कर, असा तिला माझा निरोप सांगा. आह्मां हिंदुलोकांत पुनर्विवाह स्त्रियांचेच तेवढे करीत नाहींत, ह्याबद्दल मला फार वाईट वाटतें ! इंदिरेस अजन्म सुख मिळावें अशी माझी इच्छा आहे. मी ह्या लढाईंत मेलों, तर इंदिरा जन्मभर दुःखांत रहाणार. तसें होऊं नये, अशी माझी इच्छा, मला आमच्या चालीरीतींची पर्वा नाहीं ! ' तिच्यापुढें मुराररावांच्या लिहिण्याप्रमाणें, मी तुह्मांला येथें आणविलें. तुह्मी इतर कोणत्याही सबबीनें येणार नाहीं, ह्मणून, मुरारराव येथें आले आहेत, असें कळविलें. धोंडोपंतांस मुराररावांचें हें पत्र आवडणार नाहीं, ह्मणून मी

त्यांना मुद्दाम हे न कळवितां, तुमच्याबद्दल त्यांचें मन कलुषित केलें, व त्यांच्याकडूनच आपणांस आणविलें! तुह्मी पतिव्रता आहांत, ह्या बद्दल माझी खात्री पुरी आहे. मुरारराव जिवंत आहेत, तोंपर्यंत, तुह्मी त्यांच्या-वरच प्रेम ठेवावें, हें मला अगदीं पसंत आहे. पण कदाचित् त्यांचें कांहीं बरें वाईट झालें, तर—दव करो आणि असें न होवो!—त्यांची जी इच्छा, कीं तुह्मी माझ्याशीं पुनर्विवाह करावा, ती पूर्ण केलीत, ह्मणजे आपल्या त्यांच्यावरील प्रेमाचें सार्थक झालें. तसा प्रसंग बहुतकरून येणार नाहीं ह्मणा. कारण, मुराररावांस अद्याप विजयच मिळत आहेत!' असें ह्मणून हुसननें कांहीं वेळ इंदिरेच्या सुंदर, परंतु, म्लान मुखकमलावर नजर लावली. नंतर तो बाहेर निघून गेला.

इंदिरेला त्याच्या ह्या लांबलचक बोलण्याचा अर्थ कळेना. हा तर तिक-डच्या सांगण्यावरून तुह्मांला येथें आणिलें ह्मणून मला ह्मणतो आणि धोंडो-पंत ' तुला तुझ्या गैरवर्तनाचें प्रायश्चित्त द्यावयास आणिलें ' ह्मणून ह्मणाले. ह्याच्या सांगण्याप्रमाणें धोंडोपंतांस ह्यानें खरा हेतु सांगितला नाहीं, हें खरें मानिलें, तरी तिकडून ह्याला असें पत्र येईल कां? छे कधींच नाहीं येणार! त्यांच्या पहिल्या पत्रांत मला नीतीनें वागण्याचा सुंदर उपदेश केलेला होता, तेच हुसेन सांगतो तसें लिहितील, हे संभवतच नाहीं! अशी स्वतःची खात्री करून घेऊन, इंदिरा पुढें विचार करूं लागली. विचारांतीं तिनें ठरविलें, कीं, हुसेनचें हे सगळं कपट आहे. त्या पत्राची हकीकत हुसेननेंच बनविली आहे. कांहीं दिवसांनीं हा मला खरं ह्मणा, खोटें ह्मणा, मला असें सांगेल कीं, तिकडे बरें वाईट झालें. आतां आपण तिक-डची इच्छा पुरी करावी, हें बरें! हे सर्व ढोंग मी ह्या नीचास वश व्हावें, ह्मणून आहे झालें! असा विचार मनांत येतांच ती ह्मणाली, ' कपट कर-णाराची पहिल्यापहिल्यानें मोठी सरशी होते, हें खरें आहे. तरी पण शेवटीं त्याची फजिती होऊन सत्पक्षाचा विजय होतो, अशीही माझी खात्री आहे!' असें ह्मणून ती स्वस्थ बसली.

कमला नुकतीच हुसेनच्या घरीं आली होती. पण तिला नेहमीं आमि-नेच्या सान्निध्यांत रहावें लागत होतें. त्यामुळें, तिचा व इंदिरेचा बोल-ण्याचा योगच आला नाहीं. इंदिरेस माहित होतें कीं, कमला आमिनेच्या

सन्निध मुद्दामच रहाते; आणि मुद्दामच आपणाशीं फारसें बोलत नाहीं. त्यामुळें तीही कमलेशीं बोलण्याची उत्सुकता दाखवीत नसे. अर्थात् आज हा घडलेला प्रसंग तिला कमलेला सांगतां आला नाहीं. असो. पुन्हां दहा पंधरा दिवस हुसेन इंदिरेच्या दृष्टीस पडला नाहीं. नंतर एके दिवशीं तो खिन्नवदन करून, इंदिरेजवळ आला, आणि डोळे पुसून ह्मणाला, ' इंदिराबाई ! मनुष्याला कोणत्यावेळीं काय बुद्धि सुचेल, ह्याचा नेमच नाहीं. मुरारराव शत्रूला फितुर होतील, असें कोणाच्या स्वप्नांत तरी आलें होतें कां ? पण तें घडून आलें. मुराररावांस काय बुद्धि झाली कोण जाणे, ते आपले मोंगलांस जाऊन मिळाले. बादशहा संतापला. मुराररावांस पकडून आणण्याचा त्यानें हुकुम केला आणि तसें झालें असतें, तरी बरें झालें असतें ! त्यांचें एकदां दर्शन तरी झालें असतें. पण आतां कशाचें दर्शन काणी दुष्टांनीं त्यांचा खून केल्याची बातमी आजच आली आहे ! हाय–हाय– ' असें ह्मणून हुसेन उसासे टाकूं लागला.

हुसेननें दुःखाची जरी अतिशयोक्ती दाखविली, तरी त्याला मुळींच दुःख झालें नव्हतें, असें मात्र नाहीं. त्यानें मुराररावांचा खून करण्यासाठीं निर्दयतेनें करीम, कादर, अबदुल, मिरान, ह्या चौकडीला तिच्या अनुयायांसह नुकतच पाठविलें होतें. ती चौकडी अद्याप परत आली नव्हती. तरी तिनें आपलें काम बरोबर बजाविलें असेल, अशी हुसेनची खात्री होती. आणि ह्मणूनच त्याला कांहींसें वाईट वाटत होतें. बरोबरच आहे. माणूस कितीही जरी दुष्ट असला, तरी कामधेनूस ठार करितांना, अमृत जमिनीवर ओतून देतांना, किंवा कल्पवृक्ष जमीनदोस्त करतांना, त्याला वाईट हें वाटलेंच पाहिजे.

हुसेनचें तें साभिनय दुःख पाहून इंदिरेची स्थिती फारच चमत्कारिक झाली. हुसेन असें कधींतरी सांगणार, हें तिला माहितच होतें. पण तो ह्मणतो तें खरें कीं, खोटें, ह्याचा तिला निर्णय होईना. नुकतच एकीकडे भेटून कमलेनें तिला सांगितलें होतें, कीं, ' तूं दुःख करूं नकोस. लवकरच सुटका होईल. ' ह्यावेळेस इंदिरेला तें आठवलें. ती मनांत ह्मणाली, ' सुटका होईल सगळें होईल पण ज्यांच्या सहवासांत जन्म घालवावयाचा ते ह्या जगांत आहेत कीं, नाहीं ? ते जिवंत नसले तर मी सुटलें न सुटलें सार-

खोच ! कारण मला मृत्यू हा यावयाचाच ! मग काशी क्षेत्रांत मेलें काय नि ह्या बंदिवासांत मेलें काय, एकच !' हुसेनचें बोलणें आपणांस मुळींच खरें वाटत नाहीं, असें दर्शवीत, ती स्तब्ध बसली. हुसेन उसासे टाकून, हाय हाय करीत बाहेर गेला. वाईट बातमी चांगल्या बातमीपेक्षां अधिक खरी वाटते. निदान मनाला चटका तरी लावते. इंदिरेच्या मनालाही चटका बसला. 'मन चिंती तें वैरी न चिंती' ह्या ह्मणीस अनुसरून तिच्या मनांत अनेक कुकल्पना आल्या ! ती बिछान्यावर अस्ताव्यस्त पडली. कांहीं वेळानें आमिना कमलेसह तेथें गप्पागोष्टी मारावयास आली. आमिनेनें इंदिरेस 'कांहीं दुखतें का' ह्मणून प्रश्न केला. इंदिरेनें 'सर्वांग ठणकतें आहे' असें सांगितलें. दुःखानें काळवंडलेली इंदिरेची मुद्रा पाहून, कमलेच्या हृदयांत भडभडून आलें. ती एकदम गंभीर विचारांत मग्न झाली !

* * *

पण येथें कमलेचीही मागील हालहवाल पाहिली पाहिजे. कमलेनें आल्यापासून साखर पेरण्याचा धंदा चालविला. आपल्या विद्येनें आमिनेला व गोड बोलण्यानें हमीदेला तिनें अगदीं मोहवून टाकिलें. तिच्या वांचून त्या दोघींस करमेनासेंही झालें. आमिनेनें हुसेनजवळ तिची फार स्तुती केली. त्यामुळें त्यालाही तिजबद्दल आदर उत्पन्न झाला. कित्येकवेळां त्याचा व तिचा बोलण्याचा समय येई, त्यावेळीं ती त्याला इतकीं भारदस्त उत्तरें देई, कीं, ही बाई असामान्य आहे, अशी त्याची समजूत झाली ! कमलेबद्दल त्याला कामवासनाही उत्पन्न झाली असती. पण तिनें हुसेनला आपला धर्मबंधु मानलेला भाऊ—ह्मटलें, ह्मणून बचावले ! शिवाय इंदिरेचें स्वरूप इतकें सुंदर होतें, कीं, त्याच्या योगानें हुसेन जखडल्यासारखा झाला होता. इंदिरेशिवाय जगांत कोणी सुंदरस्त्री—आपल्या उपभोगाजोगी स्त्री असेल, ही कल्पनाच त्यानें सोडून दिली होती ! कमला इंदिरेची जिव्हाळ्याची मैत्रीण असेल अशी शंका त्याला, किंवा त्याच्या बहिणीला व स्त्रीला स्वप्नस्वप्नांतरींही आली नाहीं ! असो. 'माझें सर्वांग ठणकत आहे' असें इंदिरेनें ह्मटल्यावर कमला अतिशय कळवळली, व विचारांत मग्न झाली ! थोड्यावेळानें आपला कळवळा अत्यंत अल्प प्रमाणांत दाखवून ती आमिनेला ह्मणाली, 'जरा इकडे या पाहूं !'

असें ह्मणून ती दिवाणखान्यांतून बाहेर गेली. आमिनाही तिच्या मागोमाग गेली. मग कमलेनें विचारिलें, ' कांहो ही बाई आहे तरी कोण ? '

आमिनेनें सर्व हकीकत सांगितली. मात्र आपल्या भावाची बाजू तिनें बरीच सांवरून धरली ! कमला ह्मणाली, ' असे कां ? मोठी अभागी बाय-कोच ह्मणायची ती ! हुसेनखामासारखा सुंदर, शूर व विद्वान् वजीर भजनीं लागला असतां अजूनही वश होत नाहीं, तेव्हां अभागीच नाहीं तर काय ? मी तर लागलींच वश झालें असतें; पण हुसेननीं मला सखी बहीण मानली ह्मणून इलाज नाहीं ! बरें पण हुसेन साहेबांनीं परवानगी दिली, तर मी त्या बाईला वश करून देतें. चला. हें काम केवळ हुसेनसाहेबांकरितां मी करितें. विचारा बरें त्यांना हें कबूल आहे कां ? '

आमिना हुसेनला विचारावयास गेली. त्यानें आनंदानें परवानगी दिली. कमलेच्या विनोदपूर्ण आणि मोहक भाषणाचा परिणाम इंदिरेवर बराच होईल असें त्याला वाटलें ! कमलेला नेहमीं इंदिरेजवळ असण्याची परवानगी मिळाली !

कमळा लागलींच इंदिरेजवळ गेली. तिनें युक्तीनें आमिनेला घरांत लावून दिली ! एक शेगडी पेटवून इंदिरेजवळ तिनें ठेविली. इंदिरेचें सर्वांग खरोखरच दुखत होतें. तिनें हात पाय वगैरे शेकून घेत-ल्यानें, तिच्या वेदना बऱ्याच कमी झाल्या. नंतर दिवाणखान्याचें दार बंद करून, कमला ह्मणाली, ' इंदिरे, असें कशानें ग झालें एकदम ? तुझें अंग फार कढत लागतें आहे. हींव वाजतें कां तुला ? '

' हो. आतां मी चांगलीच अजारी पडणार असें दिसते ! ' असें ह्मणून, हुसेन येऊन काय ह्मणाला, तें सर्व तिनें कमलेला सांगितलें. कमला ह्मणाली ' त्याचें काय ऐकतेस ? तिकडून जातेवेळीं मला बजावून सांगणें झालें की, ' मी येईपर्यंत धीर सोडूं नका ! मी मुराररावास घेऊनच येतो. ' इंदिरे, तिकडचा स्वभाव किती निग्रही आहे, हें तुला माहितच आहे. तिकडून खुद्द येऊन सांगणें झाल्याखेरीज मी तर कशावर भरंवसा ठेवणार नाहीं, नि तूंही ठेऊं नकोस. '

इंदिरेला बराच धीर आला. कमला आपल्याजवळ अहोरात्र रहाणार, हें

पाहून तिला जो आनंद झाला, तो काय सांगावा ! तसाच आनंद कमले-सही झाला होता !

दुसऱ्या दिवशीं कमलेनें आमिनेकडून हुसेनला ' इंदिरा अजारी पडली आहे; हकिमास विचारून औषधें पाठवा. दुखण्यांतून उठल्या-वर ती आपलीच आहे ' असा निरोप पाठविला. त्याप्रमाणें हुसेननें व्यवस्था केली. इंदिरेस रोज हींव ताप येऊं लागला. कमला काळजीग्रस्त झाली. ' जय सप्तशृंग निवासिनी अंबे, इंदिरेस लवकर बरी कर ' अशी विनंती करून वारंवार ती नवस करूं लागली.

प्रकरण २१ वें.

गोसाव्यांनीं पकडिलें.

अहमदनगर आणि विजापूर ह्या दोन राज्यांच्या सरहद्दीवरील दाट अरण्य. एक घोडेस्वार दवडत दवडत नुकताच ह्या अरण्यांत शिरला होता. सगळ्या अरण्यांत सोयीची आणि मोठी वाट घोडेस्वार जीवरून चालला होता तीच. दुसऱ्या वाटांनीं एका माणसाला देखील जपून चालावें लागत असे, मग घोडेस्वार तर राहोच. इतक्या त्या अरुंद, पुसट व कंटकाच्छादित होत्या. घोडेस्वाराची वाट इतर वाटांपेक्षां कांहींशीं बरी होती. तो स्वार अगदीं घामाघूम झाला होता, तरीही घोडा दामटीतच होता. पुष्कळ पुढें गेल्यावर, आपल्या वाटेवर पुढें दोन गोसावी चालत आहेत असें त्याला दिसलें. तरीही त्यानें आपला वेग कमी केला नाहीं. अगदीं जवळ गेल्यावरही, ते गोसावी एकीकडे होत नाहींत, हें पाहून आपणांस लवकर वाट मिळावी म्हणून, आणि अधिकाराचाही प्रभाव दाखवावा म्हणून, तो स्वार मोठ्या ऐटीनें ' अरेए गध्यांनो, एकीकडे व्हा, नाहींतर मराल ' असें ओरडला. त्याबरोबर एक गोसावी चवताळून, त्याच्यावर चालून गेला, व त्यानें त्याच्या घोड्याचा लगाम धरून, त्याला थांबविलें. मग त्या स्वाराला एक गुद्दा मारून, तो रागानें म्हणाला, ' कोणालारे म्हणतोस गद्धा ? ' दुसरा गोसावी स्तब्ध उभा होता. त्याच्याकडे पाहून स्वार म्हणाला, ' संभाळ

तुझ्या ह्या जात भाईला ! नाहीं तर अत्तां ह्याचे दोन तुकडे करून टाकीन ! मी हुसेनखान वजिराचा नोकर आहे. सरकारी कामासाठीं विजापुरास जात आहे.' हें त्याचें बोलणें ऐकून दोघेही गोसावी चपापले. स्वारास वाटलें कीं, वजिराचें नांव ऐकून ह्यांची घाबरगुंडी उडाली ! तो ताठ्यानें ह्मणाला, 'चला व्हा दूर. मी आतां पुन्हां परत येईन तों पर्यंत माझ्या घोड्यासाठीं दाणा घेऊन या !'

हें ऐकून पहिल्यानें गुद्दा मारणारा गोसावी संतापानें ह्मणाला, 'आह्मी तुझ्या बापाचे नोकर वाटतों !' असें म्हणून स्वाराला मारावयास तो सरसावला. परंतु त्याला दुसऱ्या गोसाव्यानें थांबविलें, आणि तो स्वाराला ह्मणाला, 'विजापूरची फौज तर तुमच्या राज्यांत आली देखील ! मग तूं विजापुरास काय ह्मणून चाललास ?'

स्वाराच्या मनांत त्यांशीं बोलावयाचें नव्हतें. पण त्यांनीं त्याची वाटच आडविली ! त्याला दुसरीकडूनही जातां येईना ! त्यामुळें तो त्रासून ह्मणाला, 'मूर्खा ! फौज आली म्हणून बादशहा आला कीं, काय ? तो अजून विजापुरासच आहे ! तुह्मां गोसावड्यांना तें काय कळणार ! मला घाई आहे जाण्याची. मुकाट्यानें जाऊं देतां कीं कांहीं बक्षिशी पाहिजे ?' ह्यावर दुसरा गोसावी म्हणाला, 'बरें बुवा ! नको सांगूं. पण तूं मुळीं सरकारी स्वार नाहींसच ! 'मी सरकारी स्वार' असे लोकास सांगून फसविणारा तूं एक भामटा आहेस झालें!'

'काय मी भामटा ? हा पहा लखोटा तुझ्या बापानें मजजवळ दिला आहे !' असें म्हणून तो एक लखोटा दाखवूं लागला. त्याबरोबर पहिल्या गोसाव्यानें त्याच्या हातावर इतक्या जोरानें रट्टा मारिला, कीं, तो लखोटा स्वाराच्या हातांतून खालीं गळून पडला ! तो उचलून, तो गोसावी धूम पळत सुटला. व कांहीं अंतरावर जाऊन ओरडला, 'अहो वजिराचे सेवक ! रडा आतां !' स्वार घोड्यावरून खालीं उडी टाकून, व हातांत समशेर घेऊन त्या गोसाव्याच्या मागें लागला. पण तो त्याला सांपडेना ! तें अरण्य जणूं त्या गोसाव्याच्या पूर्ण माहितींतलें होतें, असा तो वाकडा तिकडा पळत होता. स्वारही ठोकरा खात, पडत धडपडत, झाडांस टकरा देत, ओरडत ओरडत, त्याच्या मागें धांवत होता. इकडे हा गोसावी आपल्या जाग्यावरूनच ती मौज

पहात हंसत होता ! स्वार आपण ज्याच्या पाठीस लागलों, तो तर सांपडत नाहींच; मग ह्याला तरी धरून ठेवा ! असा विचार करून, ह्या उभ्या असलेल्या गोसाव्याकडे येऊं लागला ! आतां त्याला धरणार, इतक्यांत तो गोसावी एका गलेलठ्ठ झाडावर स्वारीसारखा चढून, उंच जाऊन बसला, व स्वाराकडे पाहून खदखदां हसूं लागला ! स्वार झाडावर चढूं लागला. पण त्याला चढतां येईना. जेमतेम तीन चार हात तो चढला. पुढें त्याला वरही चढतां येईना व खालींही उतरतां येईना ! झाडाच्या बुंध्यापासून जवळच कांटे होते, त्यामुळें उडी मारण्याचाही त्याला धीर होईना ! अशा स्थितींत पळून गेलेला गोसावीही जवळ येऊन, हंसत ह्मणाला, ' अहो मादरचोदाचे सेवक, अहो सरकारी स्वार ! चढा चढा वर. संकोच कां ? मी येऊं कां खाविंदांच्या मदतीला ? ' तो स्वार अतिशय ओशाळला. काय करावें हे त्याला सुचेना ! त्याने बराच वेळ त्या बुंध्याला चिकटून रहाण्याचा प्रयत्न केला. पण शेवटीं हातपाय सुटून, खालील गोसाव्याकडून ' हुर्यो 'चा मान घेतां घेतां स्वारी कोलमडून खालीं पडली ! सर्वांगांत कांटे शिरून, तो रक्तबंबाळ झाला. त्याच्या कंबरेचें हाड मोडून, तो विव्हळूं लागला. तेव्हां खालचा गोसावी आपलें हंसें आंवरून, जागींच उभा राहिला. वरच्या गोसाव्यानें झटकन् खालीं उतरून त्या स्वारास उचलून वाटेवर आणून ठेविलें, व तो आपल्या सोबत्यास ह्मणाला, ' बा ! अशावेळीं त्याची उपेक्षा करावी वाटते ? त्यानें आपला अपराध थोडाच केला आहे ? '

मग त्या दोघांनीं मिळून, त्या स्वारास नजीकच्या गांवांतील एका वैद्याच्या घरीं नेऊन ठेविलें. मग त्या गांवाबाहेरच एका आंबराईत असून, ज्यानें स्वारापासून लखोटा उपटला होता त्या गोसाव्यानें उतावळेपणानें तो लखोटा फोडिला; आणि तो मोठ्यानें वाचूं लागला. तो लखोटा हुसेननें विजापूरच्या बादशहास धाडिला होता. त्यांतील महत्वाचा मजकूर असा: ' आपण आपलें बलाढ्य सैन्य आह्मांवर पाठविलें. आपला जय होणार, हें तर अल्लानेंच ठरविलें आहे. पण माझी एक विनंती ऐकावी. आमचे बादशहा खरे मुसलमान नाहींत. ते स्वतःला मुसलमान ह्मणवितात व हिंदूप्रमाणें वागतात ! महंमद पैगंबरानें आपणां मुसलमानांस सद्धर्मप्रसार करण्याची

आज्ञा केली. त्याप्रमाणें आपण वागतों पण आमचे धर्मद्रोही बादशहा त्याच्या उलट वागतात. म्हणून, त्यांना पदच्युत करून, व स्वतः बादशहा होऊन, स्वधर्मप्रसार करण्याचा मी संकल्प केला आहे. मी सर्व सैन्याचा अधिपति बनून आपल्याशीं लढावयास येईन, व एत्यावेळीं सर्व सैन्याला स्वस्थ रहाण्याचा हुकूम करीन. तेवढ्यांत आमच्या बादशहास आपण कैद करावें, किंवा मारून टाकावें. असें सर्व बिन बोभाट झालें, तर मी आपणांस निजामशाहीच्या दक्षिण सरहद्दीवरील मुलूख देऊन टाकीन!' इत्यादि इत्यादि.

हा मजकूर ऐकणारा गोसावी पराकाष्ठेचा रागावला! तो संतापानें म्हणाला, 'मी जिवंत असेपर्यंत बादशहाच्या जिवास धक्का देऊन, निजामशाही बुडविण्याची कोणाची छाती आहे पाहूं!'

यानंतर बराच वेळ त्यांनीं कांहीं बेत केला. मग ते दोघेही अहंमदनगरच्या वाटेस लागले!

प्रकरण २२ वें.

कैद झालें.

मनसूरअली बादशहाची सध्यां कोण गडबड उडून गेली होती! विजापूरचें परचक्र आलें होतें. विजापूरचें सैन्य अहंमदनगरच्या राज्यांत शिरून तळ देऊन देखील राहिलें होतें! विजापूरचें सैन्य प्रचंड होतें. त्या प्रचंड सैन्याशीं ज्याला टक्कर द्यावयाची, त्या अहंमदनगरच्या सैन्याची स्थिती कशी होती? अहंमदनगरचें बहुतेक सैन्य मुराररावाबरोबर उत्तरेकडे गेलें होतें; त्याचा फडशा उडाला! राहिलेलें सैन्य जरी कसलेलें व हुषार होतें, तरी विजापूरच्या सैन्याच्या मानानें तें फारच थोडें होतें. तेंही प्रांतोप्रांतीं वाटलें गेलें होतें. तें सर्व एकत्र करावें, तर राज्यांत अव्यवस्था होण्याची भीति! अशी स्थिती असल्यामुळें, अहंमदनगरचा बादशहा फार विवंचनेंत पडला होता. तो बलाढ्य असल्यामुळें, त्याच्यावर स्वारी करावयास आजपर्यंत कोणी धजला नव्हता! पण त्याच्या सैन्याची उत्तरेकडे जी वाताहत झाली, ती

पाहून विजापुरच्या बादशहाला स्फुरण चढलें; आणि अहमदनगरच्या बादशहाचा पराभव करून, त्याचा मुलूख आपल्या ताब्यांत घेऊं; तें न साधल्यास त्याच्याशीं अशा तऱ्हेचा तह करूं, कीं, त्यामुळें त्याचा आज जो सर्वत्र दरारा बसला आहे, तो कमी होईल, असा विचार करून त्यानें निजामशाहीवर स्वारी केली. आजपर्यंत आपला कधींच व कोठेंही पराभव किंवा नाचक्की झाली नव्हती. परंतु आतां तसें होण्याचा फार संभव आहे, हें पाहून, वृद्ध मनसूरअल्लीला फार वाईट वाटलें ! हुसेन त्याला ह्मणूं लागला, ' खाविंद, आपण काळजी कां करितां ? आहे ह्या सैन्यानेंच, आपण विजापूरच काय, पण सर्व हिंदुस्थान जिंकून टाकूं ! ' अशी वल्गना करण्यांत हुसेनचा कांहीं हेतु असेल, असें बादशहास मुळींच वाटलं नाहीं ! कितीही ज्ञान प्राप्त होवो, तरुणपणीं मनुष्य अविचारीच असावयाचा. त्याच्या अविचारीपणापुढें त्याचें ज्ञान, विद्या, शहाणपण वगैरे सर्व लटपटतें. ह्मणूनच हुसेन अविचारानें वल्गना करीत आहे, असें बादशहाला वाटलं. पण हुसेनचा हेतु कांहीं निराळाच होता ! बादशहान सैन्य वाढवावं, हें त्याला बरें वाटत नव्हतें. तें तो वल्गनांच्या द्वारे व्यक्त करूं लागला. पण बादशहानें त्याला एकच उत्तर दिलें कीं, ' हुसेन ! तुला मजपेक्षां कमी अनुभव आहे. ह्मणून ह्या बाबतींत मला तुझी सल्ला नको. मला जें योग्य दिसेल, तें मी करीन ! ' ह्यावर हुसेन काय बोलणार ! तो स्वस्थ बसला. ' आपल्या सैन्यांत नवीन लोकांची भरती करावयाची आहे, ह्या करितां सर्व राज्यांत तशी द्वाही फिरीव. हजारों लोक सैन्यांत न आले, तर तूं द्वाही फिरविली नाहींस असें मी समजेन. विचार कर. ' असंही बादशहानें हुसेनला बजावून सांगितलें !

एके दिवशीं बादशहा असाच विवंचनेंत बसला असतां, द्वाररक्षकानें त्याला एक चिठ्ठी आणून दिली. तींत फक्त एक कविता लिहिलेली होती. ती अशी:—

माता जरी शिशुवरी बहुरुष्ट झाली ।
संतप्त त्याजवरि हो जरि बाप वाली ॥
दोघें पुन्हा शिशुस प्रेमभरें वहाती ।
तुह्मी तसें नृपवरा ! मज घ्याच हातीं ॥ १ ॥

कविता वाचून, बादशहा विस्मित झाला ! कोणावर तरी आपली अव-

कृपा झाली असावी, म्हणून त्यानें ही चिठ्ठी पाठविली, असें बादशहास वाटलें ! पण कविता करून पाठविणाऱ्या अशा कोणा विद्वानावर आपली इतराजी झाली, हें त्याला आठवेना ! मुरारराव म्हणावा, तर तो शत्रूकडेच गेला आहे. त्याला आपल्या मर्जी गैरमर्जीची आतां काय परवा ! दुसऱ्या कोणावर आपली इतराजी झालेली आठवत नाहीं. हें पाहून बादशहानें चिठ्ठी पाठविणाराला आपल्याजवळ आणण्याचा हुकूम फर्मावला. थोडया वेळानें हुजऱ्यानें एका गोसाव्यास आणून त्याच्या पुढें उभें केलें ! बादशहानें गोसाव्यास प्रश्न केला, ' कायरे, ही कविता तूं लिहिलीस का ? '

' होय सरकार ! '

' पण ही लिहिण्याचें कारण काय ? तुजवर माझी अवकृपा झाली आहे ? होय सरकार ! '

' मला नाहीं वाटत झाली असेलसें ! बरें पण तुझें नांव काय ? तो गोसावी एकदम आपली दाढी काढून म्हणाला ' मुरारराव ! ' ते खरेंच मुरारराव होते ! त्यांना बादशहानें तेव्हांच ओळखिलें. शत्रूपक्षाकडे वळलेला मुरारराव आपण होऊन इकडे आला कसा, ह्याचें बादशहास गूढ पडलें ! त्याचवेळीं त्याला निजामशाहीवर हल्लीं आलेल्या संकटाची, व असलीं अनेक संकटें आलीं असतां, पूर्वी चतुर साबाजी व महंमदखान ह्या द्वयीनें तीं कशीं नाहींशीं केली ह्याबद्दल त्याला आठवण झाली. चतुर साबाजी व महंमदखान ह्यांच्याप्रमाणेंच मुरारराव व हुसेनखान हे दोघे मिळून प्रयत्न करतील, तर हल्लींचें हें संकट तेव्हांच नष्ट होईल, असेंही त्याला वाटलें. पण हे घडणें शक्य नाहीं, हें पाहून, त्याला फार वाईट वाटलें ! मुरारराव व हुसेनखान ह्या दोघांवर बादशहाचें पोटच्या मुलांइतकें प्रेम होतें ! कोणा एकावरही कमी किंवा ज्यास्त नव्हतें ! त्यामुळें, शत्रूपक्षाकडे गेला असें समजत असतांही, मुराररावांस पहातांच, त्याला एकदम आलिंगन द्यावें असें बादशहास वाटलें ! पण त्यानें आपली इच्छा मोठ्या कष्टानें दाबली ! मुराररावांस तर बादशहास पाहून जो प्रेमा आला, तो वर्णूंच नये ! जाऊन एकदम बादशहाचे चरण धरावेत, असें त्यांना वाटलें. पण बादशहा कदाचित् रागावेल, म्हणून ते तसेच उभे राहिले.

बादशहाचें मन मुराररावांविषयीं पुष्कळ कलुषित झालें होतें.

त्यामुळें जरी त्यांना पहातांच त्याला आदर व प्रेम उत्पन्न झालें, तरी कांहीं वेळानें तें बरेच कमी झालें! मोंगल सेनापतीने मुराररावास प्रथम लालूच दाखवून आपलेंसें करून घेतले असावे व कार्य झाल्यावर त्याला हांकून दिलें असावें, म्हणूनच तो गोसावी होऊन भटकत भटकत इकडे आला, असा बादशहानें तर्क केला! व मुरारराबास त्याच्या फितुरीच्या पापाबद्दल लवकरच शासन मिळालें, ह्याबद्दल त्याला कांहींसा आनंद झाला! तो ह्मणाला, 'मुरारराव! तूं येथें कशाला आलास?'

आपला पराभव झालेला ऐकून बादशहास आपला राग आला आहे, ह्मणूनच तो आपणांस असा प्रश्न करीत आहे, एरव्हीं करणार नाहीं, असें वाटून, मुराररावांस वाईट वाटलें! त्यांनीं उत्तर दिलं, 'हुसेनखान विश्वास ठेवण्यास योग्य नाहीं, हें सांगण्याकरितां!'

बादशहास आश्चर्य वाटलें! हे दोघे एकमेकांचा द्वेष करितात असें त्याच्या आज लक्ष्यांत आलें! तो ह्मणाला, 'तो असो अगर नसो. तूं बरीक विश्वासास पात्र नाहींस, अशी माझी खात्री झाली आहे!'

मुरारराव दुःखानें म्हणाले, 'कशावरून सरकार?'

'पुन्हां कशावरून म्हणून विचारितोस? कुतुबशहाच्या सहाय्यानें मला पदच्युत करण्याचा बेत तुझा नव्हता? सैन्य सोडून परत यावयास कां निघाला होतास?'

'आपला हुकूम आला म्हणून!'

'मी हुकूम पाठविला होता? खोटें बोलावयास कांहीं शरम नाहीं वाटत?'

आतां मुराररावांच्या डोक्यांत चक्क उजेड पडला. हुकूम बादशहास न विचारितां हुसेननेंच पाठविला असेल, असें जें त्यांना गडावर वाटलें, तेंच खरें आहे, असें त्यांना आतां आढळून आलें! हुसेनचें सर्व कारस्थान त्यांच्या लक्ष्यांत आलें. ते किंचित् रागानें ह्मणाले, 'सरकार! हुसेनखानानें मजविषयीं आपला पूर्ण गैरसमज केला आहे. मी शत्रूस मुळींच फितूर झालों नाहीं!'

एकपक्षीं बादशहास मुरारराबांचें बोलणें—त्यांत सत्याचें तेज

स्पष्ट दिसत होते- खरें वाटलें ! पण त्यांच्या फितुरीबद्दल अनेक पुरावेही जवळ असल्यामुळें, बादशहास त्याचें बोलणे खरें आहे, असे ह्मणवेना ! तो स्तब्ध बसला. हे पाहून मुरारराव ह्मणाले, ' बरं माझें राहो ! पण आपण हुसेनखानावर विश्वासून—निदान ह्या लढाईचे वेळीं तरी राहूं नये अशी माझी विनंती आहे ! '

' हुसेन वजीर आहे. त्याच्यावर मला विश्वास ठेविलाच पाहिजे. तूं काय ह्मणून त्याच्यावर विश्वास न ठेवण्यास सांगतोस ? '

' तो ऐनवेळीं आपला घात करील ! '

' कशावरून ? ' पुराव्याचीं कागदपत्रें सर्व बादशहास दाखवावीं, असें मुराररावास वाटलें. पण तीं शंकररावाजवळ राहिल्यामुळें त्यांचा नाइलाज झाला ! ते ह्मणाले, ' आपला माझ्या शब्दावर विश्वास नाहीं काय ? '

बादशहा निष्ठुरतेने ह्मणाला, ' नाहीं. '

' मग मला ह्यावेळी शब्दापेक्षा अधिक पुरावा देता येत नाहीं. असो. मी जातों आता. जातेवेळी पुन्हा विनंती करितो कीं, हुसेनखानावर विश्वास ठेऊं नका. ' असें ह्मणून ते जाऊं लागले. बादशहा गंभीरपणानें ह्मणाला,

' मुरारराव, तुला आतां परत जाता येणार नाहीं. येथेंच कैदेंत राहिले पाहिजे ! '

' ठीक आहे. पण मला हुसेनखानाच्या ताब्यात देऊं नका. तुह्मी माझे हाल हाल करून प्राण घ्या ! पण हुसेनच्या ताब्यांतील नजरकैदही नको ! सरकार ! चतुर साबाजीपंतांवरील प्रेमास स्मरून, तुह्मी मला ह्यावेळी येवढी भिक्षा घालाच ! '

' बरें आहे. तुझ्या विनंतीप्रमाणेंच करितो ! '

असे ह्मणून मुराररावांस कैद करण्याचा हुकूम बादशहानें सोडिला ! लागलीच मुराररावास श्रृंखलाबद्ध करण्यात आलें !

प्रकरण २३ वें.

युद्धाची तयारी.

मुराररावांस कैद केलें. तरी त्यांचे ते रागाचे व कळकळीचे शब्द बादशहा विसरला नाहीं ! ‘ हुसेनखानावर विश्वास ठेऊं नका ’ हेच ते उद्गार. बादशहा त्याबद्दल विचार करूं लागला. मुरारराव असें कां ह्मणाले बरें ? ते कळकळीनें बोलले, ह्यांत शंका नाहीं. पण तें खरें कशावरून समजावें ? हुसेनच्या मनांत ऐनवेळीं आपला घात करावा, असें असेल, असें त्याच्या बलानांवरून आणि आपण आपल्या बाजूस बळकटी आणण्याचा प्रयत्न करीत असतां, तो वारंवार अडथळे आणितो, ह्यावरून संभवतें ! पण तो आपला घात करावयासाठींच ह्या गोष्टी करितो, असें तरी कसें ह्मणावें ? कारण, त्याची आपणांवर मुराररावांइतकीच भक्ती आहे आहे. शिवाय, तो अननुभविक असल्यामुळें, आपल्या बेतांत अडथळा आणतो, असेंही ह्मणतां येईल ! आणखी, मुराररावानें त्याच्यावर जो दोषारोप केला, त्याबद्दल त्याच्याजवळ पुरावेही नव्हते ! त्याअर्थी हे दोघे द्वेषानं एकमेकांस दोष देतात, अशी बादशहानें स्वतःची खात्री करून समजूत करून घेतली ! तथापि, आतां कोणाचें कांहींएक न ऐकतां, आपल्याच मताप्रमाणें जें काय करावयाचें तें करूं, असा त्यानें निश्चय केला ! इतक्यांत तेथें हुसेन आला. तो मुजरा करून बसल्यावर बादशहा त्याला ह्मणाला, ‘ हुसेन, मला आतां असें कळलें आहे, कीं, मुरारराव मोंगलास फितूर झाला नसून, त्याला माझा परत येण्याविषयींचा हुकूम खरोखरच मिळाला होता ! ’ बादशहानें मुरारराव आला असून, त्याला आपण कैद केलें आहे, हें हुसेनला मुद्दामच कळविलें नाहीं ! हुसेन मनांत दचकला. पण तें बादशहाच्या लक्ष्यांत न येऊं देतां, तो ह्मणाला, ‘ मुरारराव फितूर झाले नसले, तर आनंदाची गोष्ट आहे ! पण मला नाहीं वाटत ते झाले नसतील ह्मणून. हुकूम मी पाठविला नाहीं; तुह्मीही पाठविला नाहीं. मग तो जाणें शक्य तरी आहे कां ?— हा पहा, मुराररावांच्या फितुरीचा आणखी एक पुरावा. ’ असें ह्मणून, हुसेननें एक कागद बादशहाच्या हातांत दिला. बादशहानें तो कागद वाचून, आपल्याजवळ ठेविला

व तो पुढें ह्मणाला, ' बरे, हे असूं दे आतां एकीकडे. ह्याबद्दल विचार करण्यास आता वेळ नाहीं.–तूं राज्यात द्वाही फिरविली कीं नाहीं, माझ्या-सांगण्याप्रमाणें ? '

' सैन्यांत हजारो लोक नवीन येत आहेत, हेंच आपल्या प्रश्नास माझें उत्तर ! '

' बहोत अच्छा ! '

' खाविंद ! माझी एक इच्छा पुरवावी ! '

' कोणती ? '

' धाडयाशा सैन्यावरच अप्रतीम शौर्य गाजवून अपूर्व जय मिळवि-ण्याची माझी हौस होती. पण ती आपणास आवडली नाहीं ! असो. आतां तरी आपल्या सर्व सैन्याचें आधिपत्य मला देऊन, माझें युद्धकौशल्य पहावें अशी माझी विनंती आहे. ' बादशहा विचारांत पडला. ह्या युद्धात त्याला स्वतःला आधिपत्य घ्यावयाचे होते. यामुळें त्याचे मन द्विधा झालें. शिवाय त्याच्या मनात असा विचार आला, कीं स्वतः आधिपत्य घेऊन, आयत्या-वेळेस शत्रूस मिळण्याचा तर हुसेनचा बेत नसेल ? पण हुसेनचा बोलते-वेळींचा विनय व लडिवाळपणा लक्षात आला, तेव्हा बादशाहाच्या मनातून हा विचार लागलींच गेला ! तो ह्मणाला, ' हुसेन, मी तुझें युद्धकौशल्य पाहिलें नाहीं कीं काय ? '

' पाहिलें आहे सरकारानीं पुष्कळदा ! पण अशी आणीबाणीची वेळ असतां, युद्ध कौशल्य दाखविलेले मला आठवत नाहीं ! '

' बरं तर मी तुझी विनंती मान्य करितो. पण तूं इमानानें वागशील ना ? '

आपण एखादें कृत्य गुप्तपणें केलेंलें असलें, आणि त्याचा यत्किंचितही संबंध जर दुसऱ्याच्या बोलण्यांत किंवा कृतींत सहज येऊन गेला, तर त्याला आपले कृत्य समजलें कीं काय ! अशी आपणांस धास्ती पडते ! तशीच धास्ती हुसेनला पडली ! तथापि, बादशहाला जर आपलें गुप्तकृत्य कळलें असतें, तर त्यानें आपणाला सैन्याचें आधिपत्य देण्याचें कबूलच केलें नसतें; इतकेंच नव्हें, तर त्याबद्दल तो आपणाला कडक शासन करावयासही उद्युक्त झाला असता. पण तसें कांहीं झालें नाहीं. अर्थात

त्यांना कांहीं कळलें नाहीं, असा विचार एक क्षणभर करून, तो हंसत म्हणाला,
' हः आईबापांशीं इमानानें वागण्यास का कोठें पुत्राला सांगत असतात ? '

बादशहा हंसत म्हणाला, ' हो. एखादे असतात दिवटे चिरंजीव ! त्यांना सांगावें लागतें ! '

' पण मी तसा नाहीं, हें माझे वडील--महंमदखान--अजूनहीं स्वर्गांतून देखील सांगतील ! ' असें हंसत हंसत बोलून, हुसेन बादशहाची परवानगी घेऊन, घरीं गेला.

हुसेननें मघां दिलेला कागद बादशहानें पुन्हां वाचला. हुसेननें मुरारराव्यांच्या सहीचीं जीं आज्ञापत्रकें खानदेशांत काढिलीं होतीं, त्यांपैकीं हें एक होतें. बादशहास वाटलें कीं, हें पत्र मुराररावांस दाखवून, त्याच्या फितुरीचे माप त्याच्या पदरांत टाकावें ! पण मग त्यानें असा विचार केला, कीं वजिरीसंबंधीं मुरारराव व हुसेन ह्यांचीं किंवा राज्यप्राप्तीसाठीं फक्त मुराररावांचीं कांहींतरी कारस्थानें चाललीं आहेत. तीं ह्या गडबडीच्या वेळीं आपणांस चांगलीं उमगणार नाहींत म्हणून, हें परचक्राचें वावटळ शांत होईपर्यंत आपण मुराररावांस हुसेनला न कळूं देतां हल्लीसारखेंच कैदेंत ठेवावें. मग जिकडे तिकडे स्थिरस्थावर झाल्यावर ह्या गोष्टीचा आपण यथेच्छ खल करूं व सत्य शोधून काढूं.

असो. थोडक्याच दिवसांत अहंमदनगरचें सैन्य विजापूरच्या सैन्यायेवढें झालें ! मनसूर अल्लीची लोकप्रियता आणि दरारा जबर ! ' सैन्यांत लोकांची भरती करावयाची आहे. पगार व बक्षिसें मुबलक मिळतील ! करितां प्रत्येक सशक्त माणसानें ह्या आणिबाणीच्या प्रसंगीं शत्रूंशीं लढावयास यावें. ' असे त्याचे जाहिरनामे व दवंडया कळतांच हजारो लोक सैन्यांत येऊं लागले ! तशांत मनसूरअल्ली स्वतः लढाईस येणार आहे, असें त्या लोकांस कळलें. त्यामुळें त्यांच्या उत्साहास पारावर नाहींसा झाला ! त्याकाळीं कवाईत वगैरे कांहीं नसे ! तरवारीशीं फक्त काम ! कापाकापीचा धंदा ! त्यामुळें वेळप्रसंगीं कोणत्याही बादशहास वाटेल तितकें सैन्य उभारितां येई. आतां, अशारीतीनें उभारिलेल्या सैन्यांत फंदफितुरी फार माजत असे, व सेनापती मरून पडला, कीं, हें शत्रूपेक्षां जरी अधिक असलें, तरी दाही दिशांस फांकून, पळून जात असे, तथापि

कित्येकवेळां याचा फार उपयोग होत असे. याची सोंग्या पाहूनच कित्येक वेळां शत्रु गर्भगळित होत असत ! असो.

अहंमदनगरचें---ऐनवेळीं बनलेलें---प्रचंड सैन्य विजापूरच्या सैन्याच्या अलीकडे दहाबारा कोसावर तळ देऊन राहिलें ! त्यांत खुद्द मनसूरअली बादशहा, वजीर हुसेनखान, कैद केलेले मुरारराव (हे सैन्यांत आहेत असें बादशहाखेरीज कोणास माहित नव्हतें !), दरबारांतील सर्व सरदार, कित्येक प्रांतांचे सुभेदार व त्यांचे हस्तक, अशी थोरथोर मंडळी होती !

निजामशहा स्वतः लढाईस आला हें ऐकून, विजापूरचा आदिलशहाही स्वतः आपल्या सैन्यांत आला ! अहंमदनगरच्या सैन्याप्रमाणेंच त्याच्याही सैन्यांत थोरथोर लोक होते.

प्रकरण २४ वें

इंदिरेची सुटका.

इंदिरा आजारी पडली, येथपर्यंत तिचा वृत्तांत वाचकास माहित आहेच. तिचा तो आजार बराच विकोपाला गेला. ती पुन्हां सुधारण्याचें लक्षण दिसेना. आपण केलें काय, आणि झालें काय. असे हुसेनला होऊन गेलें ! इंदिरेच्या औषधांची तजवीज करण्यांत त्याचा पुष्कळ वेळ मोडे. इंदिरा वास्तवीक एकही औषध घेत नसे. पण कमला हुसेनला रोज कांहींतरी औषधांची यादी देत असे ! तीं औषधें चाकरांकडून आणवून, व त्यांच्याकडूनच तयार करून, त्याला तीं इंदिरेकडे पाठवावीं लागत असत. त्यामुळें तो कंटाळून गेला ! इंदिरेला औषध न देणें, हें आपणांस उचित नाहीं, असे त्याला वाटत होतें. आणि तिला जीं औषधें द्यावयाचीं तीं आपण स्वतः पाहून दिलीं पाहिजेत. चाकरावर सोंपवून उपयोग नाहीं---कारण, ते हयगय करावयाचेच ! अशी त्याची खात्री होती ! म्हणून इंदिरेला औषधें पाहून देण्याचा त्रास तो स्वतः सोशीत असे ! तशांत वजीर झाल्यामुळें, त्याला दरबारचें कामही अधिक पहावें लागत असे. आणखी कारस्थानांमुळें तर त्याला स्वस्थता कशी ती मिळेना ! त्यामुळें, इंदिरेचा आजार कमी

एकदांचा बरा होतो, असें त्याला झालें होतें ! कमला ही त्याची स्थिती जाणून होती, व ह्मणूनच ती त्याला ज्यास्त त्रास देत असे ! तथापि, इंदिरेची ती दुर्धर स्थिती पाहून, कमलेचें अंतःकरण कळवळून जात असे. तिनें तिला शक्य तितकी इंदिरेची शुश्रूषा चालविली. इंदिरा तर त्या आजारानें व दुःखानें अगदीं क्षीण झाली होती. तिचा गौरवर्ण चेहरा फिकट पडला. डोळे खोल गेले. गालांची पुष्टता कमी झाली. ती अगदीं कृश झाली. हींवतापाच्या भयंकर व असह्य वेळेखेरीज, ती बरी असे, पण अगदीं स्वस्थ पडून राही. कमलेशीं देखील बोलत नसे. आमिना व हमीदा ह्या दोघींसही त्याबद्दल फार वाईट वाटलें ! पण करितात काय ? हुसेनसाठीं त्यांनीं आपल्या नैसर्गिक कोमलतेस फांटा दिला होता ! इंदिरा प्रथम प्रथम औषध घेत नसे; पण कमलेच्या अत्याग्रहापुढें तिचें कांहीं चालेना. तेव्हां ती एक औषध घेऊं लागली. बरेच दिवस अशा स्थितींत गेल्यावर इंदिरेच्या प्रकृतीस किंचित् आराम वाटूं लागला. ती कमलेशीं बोलूं लागली. कमलाही तिला आमिनेनें केलेले जिन्नस दाखवून, लहानपणच्या गोष्टी काढून, आपण कधीं कधीं पाहिलेल्या चमत्कारिक गोष्टी सांगून, अहंमदनगरी शंकररावांनीं केलेल्या सोंगाच्या बतावण्यांचें वर्णन करून, किंवा मुराररावांच्या थोरपणाचें कौतुक करून रिझवूं लागली.

एके दिवशीं इंदिरा दुःखानें कमलेस ह्मणाली, ' कमले ! तिकडचें दर्शन होणें माझ्या नशिबांत आहे कीं नाहीं, कोण जाणें ! '

' अग खचित होईल ! मुरारराव भावजींला भेटावयास जाणें झालें, तें अजून परत येणें झालें नाहीं ! त्या अर्थी दोघांची भेट झाली असावी ! इंदिरे, तूं जेव्हां तेव्हां मला विचारीपणा कमी, ह्मणून हिणवितेस पण तुझ्या ह्या अविचारास मी काय ह्मणावें ? ' असें ह्मणून कमला इंदिरेचे अश्रू पुसूं लागली.

कमलेला मिठी मारून इंदिरा ह्मणाली, ' तूं जर येथें नसतीस, तर मी कधींच प्राणत्याग केला असतां ! '

' मोठा शहाणपणाच केला असतास ! इंदिरे, तूं मुळींदेखील काळजी करूं नकोस ! मुरारराव अगदीं सुखरूप आहेत, असें मला एका विश्वासू

माणसाकडून कळलें आहे. त्याचें नांव तुकाराम. तो धोंडोपंतास उद्देशून शिव्या देत रस्त्यानें चालला होता. मला आश्चर्य वाटून, मी त्याला जवळ हांक मारून ' मुराररावांचें कसें काय आहे ' असें विचारिलें. तो मला प्रथम सांगेना. पण मी माझें खरें नातें सांगितल्यावर तो ह्मणाला, ' आजपर्यंत लढाईंत मुराररावाची सरशीच होत आहे. कांहीं कमीज्यास्त झालें तर सांगावयास येईन. "

' जगदंबा अशीच तिकडे सुखांत ठेवो ! कमले, तूं माझ्याकरितां कष्ट सोशितेस, तें एक असो. पण शंकर भावजीस बरीक माझ्याकरितां उगीच त्रास सोसावा लागत आहे. मी त्यांच्या सुखाआड आलें ! ' ' असें ह्मणू नकोस ! तुझी हकीकत ऐकून मी जेव्हां निरर्थक रुदन करूं लागलें, तेव्हां ह्मणायचें झालें, ' मला दुःख झालें नाहीं, असें कां तूं समजतेस ? माझें इंदिरेवरील प्रेम तुझ्यापेक्षां तिळभर देखील कमी नाहीं ! ' शिवाय भावजींचा व त्यांचा जीव अगदीं एक नाहीं का ? '

इंदिरेचें बरेंच समाधान झालें ! त्याच दिवशीं तेथें हुसेन आला. पण इंदिरेचें दुखण्यामुळें क्षीण व निस्तेज झालेलें शरीर पाहून, त्याला तिचा किंचित् वीट उत्पन्न झाला ! खरें प्रेम दिसून येतें, तें अशाच प्रसंगीं ! खऱ्या प्रेमास रूपाची पर्वा नसते. रूप चांगलें असो, वा वाईट असो, खरें प्रेम अचल असतें ! खोट्या प्रेमास रूपाची किंवा इतर कांहीं गोष्टींची जरूर असते. तें रूप किंवा त्या गोष्टी कमी किंवा नाहींशा झाल्या, कीं तें प्रेमही संपुष्टांत आलें, ह्मणून समजावें ! इंदिरेचें तें बदललेलें स्वरूप पाहून, हुसेन बोवांचें प्रेमही कमी झालें ! पूर्वी तिच्या चिंतनांत त्यांना जो आनंद होत असे, तो आतां प्रत्यक्ष तिच्या दर्शनानेंही होईनासा झाला ! इला आपल्या वाड्याबाहेर लाऊन द्यावें, असें त्याला वाटूं लागलें. पण कोणाकडे लावावें, हें त्याला कळेना ! त्यानें धाडिलेल्या मारेकऱ्यांच्या तडाख्यांतून मुरारराव सुटल्याची बातमी त्याला नुकतीच लागली होती. ते आतां परत इकडे येणारच. मग त्यांनां इंदिरेसंबंधीं वर्तमान कळून, ते आपला सूड घेण्याचा घाट घालणारच ! अशावेळीं इंदिरेस सोडणें घातक आहे, असें त्याला वाटलें. सध्या इला येथेच ठेवावें, व हरप्रयत्न करून हिचें मन

वळवावे. ह्मणजे सर्वच ग्रंथ आटोपला, असा वेष करून तो इंदिरेस ह्मणाला, ' तुह्मी इतकें वाईट कां वाटून घेतां बरें ? नीट खातपीत जा. लागेल तें मागून घ्या. येथें कोणीही तुमची अवज्ञा करणार नाहीं. येवढेंच नव्हे, तर मीही आपल्या सेवेस तत्पर आहे ! ' इतकें बोलून तो बाहेर गेला. तो कमलेस बाहेर हांक मारून ह्मणाला, ' कसेंही करून इंदिरेचें मन वळवा—अगदीं लवकर कळवा. तिच्यावर बलात्कार करण्याची माझी इच्छा नाहीं ! कारण त्यांत कांहींच अर्थ नाहीं. '

' मी मजकडून होईल तितकें करीत आहे. बहुतकरून कार्यसिद्धी लवकरच होईल ! ' असें उत्तर देऊन कमला आंत आली. तिनें इंदिरेला हुसेन काय ह्मणाला, तें सांगितलें. ' बलात्कार ' शब्द ऐकतांच इंदिरा विलक्षण रीतीनें हांसली !

आणखी कांहीं दिवस गेले. अधींच हुसेनच्या मागें अतिशय कामें ! तशांत आतां विजापूरचें परचक्र आलें होतें. त्यामुळें त्याला नेहमीं बादशहाजवळ मसलती करीत बसावें लागूं लागलें ! घरीं येण्यास देखील त्याला फुरसत मिळेनाशी झाली. अर्थात् इंदिरेकडे सध्यां त्याचें विशेष लक्ष्य नव्हतें. अशा स्थितींत, एके दिवशीं कमला हुसेनच्या दाराशीं उभी असतां, तिनें दांत ओंठ चावीत चाललेला एक गोसावी पाहिला. ह्याच दिवशीं बादशहाजवळ एक गोसावी आला व तो शेवटीं मुरारराव ठरून, कैदेंत पडला ! असो. त्या गोसाव्यास पहातांच कमला दचकली ! तिनें त्याच्याकडे पुष्कळवेळ निरखून पाहिलें, व तिला त्याची ओळख पटलीसें दिसलें ! तो गोसावीही रामनामाचा घोष करीत तिच्याजवळ आला. देवडीवरच्या लोकांनीं भिक्षा घातल्यावर त्यानें सर्वांस अंगारे दिले. कमलेच्याही पदरांत त्यानें मूठभर अंगारा टाकला, व आशीर्वाद देतदेत स्वारी चालती झाली ! तो घेऊन कमला हंसतहंसत इंदिरेजवळ गेली. तिला आनंदित झालेली पाहून इंदिरा किंचित् हंसत ह्मणाली, 'कशाचा येवढा आनंद झाला बाई ? '

कमलेनें तिला गोसाव्याची सर्व हकीकत सांगून, त्यानें दिलेला अंगारा तिच्या हातावर टाकिला. त्यांत एक कागदाची चिटोरी होती. ती काढून आश्चर्यानें इंदिरा ह्मणाली, ' हें ग काय ह्या अंगाऱ्यांत ? '

' काय ह्मणजे ? कागद ! '

' पण तो कशाचा आहे ? '

' वाच, ह्मणजे कळेल ! '

इंदिरेनें मनांत तो कागद वाचला, व ती हंसली ! त्याबरोबर कमला ह्मणाली, ' मोठयानें वाचशील कीं नाहीं ? मला नको का समजायला त्यांत काय आहे तें ? '

' कांहीं नको कळायला ! '

' वा. मी बरी ऐकेन ? चिठ्ठी आणावी आह्मी नि वाचावी तुह्मी, हा कोठला न्याय ? '

इंदिरा तिच्या हातांत चिठ्ठी देऊन ह्मणाली, ' बरें, ही घ्या. तुह्मी वाचा. अशा रुसूं नका. ! '

' आणि तूं वाचलीस तर झिजशील वाटतें ? '

कमलेनें वास्तवीक ती चिठ्ठी वाचली होती. पण तिला ती इंदिरेकडून वाचवावयाची होती ! शेवटीं तिच्या आग्रहावरून इंदिरेनें ती वाचली. तींत एक श्लोक होता, तो असा:—

नका काळजी बाळगूं अंतरांत ।
मुरारी-हराला धरा मानसांत ॥
भवानें जरी फार संत्रस्त झालां ।
तरी मुक्तिदात्या विलोका हराला ।

हा श्लोक वाचीत असतां ' मुरारी ' हा शब्द इंदिरेला लज्जेमुळें वाचितां येईना ! पण कमलेनें तिची पाठच पुरविली. ' तूं तो श्लोक अगदीं सरळ कोठेंही न अडखळतां वाचलाच पाहिजे ' असा तिनें हट्टच धरिला ! तेव्हां इंदिरेनें तो सरळ वाचला. मग कमला हंसून ह्मणाली, ' अह्मग बाई ! ह्यांत लाजण्याजोगें तें काय आहे ? गोसाव्यानें श्लोक केला आहे. तो तुला व मला हरिहराला भजा ह्मणून सांगतो आहे त्यांत लाजायला काय झालें ?

' मग कमले ! शेवटच्या चरणांत त्यानें ' विलोका हराला , म्हणून कां बरें लिहिलें आहे ? '

' बरोबर आहे. तो सांबाचें दर्शन घ्या, त्याला स्मरा, असें सांगत आहे. '

' फक्त सांबालाच ? '

' अग सांब काय व हरि काय, सगळे एकच ! '

' मग दुसऱ्या चरणांत त्यानें हरि आणि हर ह्या दोघांचीं नांवें कां बरें आणिलीं ? कां तेवढ्या चरणापुरतेच हरि व हर एक नाहींत. असें समजलें पाहिजे ? '

कमला निरुत्तर झाली ! इंदिरा तिला हंसत म्हणाली,

' बाकी त्या गोसाव्याला तुझ्याबद्दल काळजी खरी ! '

' ती कशी ? '

' तुला तो श्लोक सरळ म्हणतां येईल, अशी त्यानें रचना केली म्हणून ! '

वाचकहो ! तो गोसावी कोणी खरा गोसावी नसून शंकररावच होते, हें आतां आपल्या लक्ष्यांत आलेंच असेल ! ह्या श्लोकावरून त्यांनीं ' मी तुह्मांला सोडवावयास येत आहे ' असें अस्पष्टपणें दिग्दर्शित केलें होतें. तें इंदिरा व कमला ह्या दोघींच्याही लक्ष्यांत आलें ! आणि ह्मणूनच त्या श्लोकावर येवढी टीका झाली !

ती चिठ्ठी वाचल्यापासून, व कमलेनें स्वतः शंकररावांस पाहिल्यापासून त्या दोघींसही फार उल्हास आला. इंदिरेला तर कुडींत प्राण आल्यासारखें झालें ! कमला थोडीशी विनोदी स्वभावाची होती. तिनें ती चिठ्ठी मुद्दाम हुसेनला दिसेल, अशा ठिकाणीं टाकली ! हुसेननें ती घेऊन वाचली. हुसेनला मराठीचें ज्ञान उत्कृष्ट होतें आणि जर कमलेचा व इंदिरेचा संबंध त्याला माहित असता, तर त्यानें त्या चिठ्ठींतील आशय सहज जाणिला असता. पण तशी स्थिती नव्हती, ह्यामुळें, हा कोणातरी साधूचा उपदेश आहे, ह्यापलीकडे त्याला कांहीं विशेष वाटलें नाहीं ! ह्मणून, तो ती चिठ्ठी टाकून, बाहेर जाऊं लागला. हें पाहून, कमला स्वतःशींच, पण जरा मोठ्यानें ह्मणाली, ' कांहीं असो. सुचना देऊन जात आहोंत. चोरून मारून तर जात नाहीं ? ' ह्यांतील ' सूचना ' व ' चोरून मारून ' हे शब्द हुसेनला स्पष्ट ऐकूं येऊन, आश्चर्यानें त्यानें आपली नजर कमलेकडे वळविली ! कमला झटकन् तेथून निघून गेली. हुसेनही कमलेच्या त्या शब्दांचा विचार करीत घराबाहेर पडला. पण लवकरच दुसऱ्या गोष्टींबद्दल विचार त्याचें मनांत येऊन, तो ही गोष्ट विसरला !

ह्यावरही कांहीं दिवस गेले. येवढ्या अवधींत इंदिरा व कमला ह्यांस असें होऊन गेलें कीं, कधीं आपली सुटका होते ! पिंजऱ्यांतील

पक्षी किंवा तुरुंगांतील निरपराधी कैदी सुटकेबद्दल जसे अत्यंत उत्सुक असतात तशा त्या दोघी झाल्या होत्या ! आतां हुसेन नुकताच बादशहाबरोबर युद्धास गेला होता. त्याच्या वाड्यांत आतां सर्व बायकामंडळींच होती, असें ह्मणावयास हरकत नाहीं. त्याचा खाजगी कारभारी व हुजरे वगैरे जरी त्याच्या घरीं होते तरी त्या सर्वांस आमिनेच्या सांगण्याप्रमाणें वागण्याचा सक्त हुकूम होता ! आमिनेच्या मनांत इंदिरेला आतां सोडून द्यावें, असें आलें, कारण ही स्त्रीहत्या आपल्या बंधूच्या माथ्यावर यावी, हें तिला बरें वाटत नव्हतें ! पण पतिनिष्ठ हमीदेला असें करणें योग्य वाटेना ! इंदिरेला आणण्यांत हुसेनचा कांहीं तरी राजकीय हेतु आहे, अशी तिची पक्की समजूत झाली होती. त्यामुळें इंदिरेला आपण सोडिल्यास, न जाणों, हुसेनच्या कार्यांत कांहीं अडथळा येण्याचा संभव आहे असें तिला वाटलें. ह्मणून हुसेनच्या आज्ञेशिवाय आपण कांहीं करूं नये असा आमिनेजवळ आग्रह धरिला ! आमिनेसही तिचें ह्मणणें बरोबर वाटलें. त्यामुळें इंदिरा वाड्यांत तशीच राहिली. कमला बरीक आतां नेहमीं आमिना व हमीदा ह्यांजजवळ राहूं लागली ! ती इंदिरेशीं बोलेनाशीही झाली !

हुसेनला युद्धाला जाऊन दोन दिवस झाल्यावर, त्याच्या वाड्यांत एक गृहस्थ आला. ' आमिनेजवळ माझें कांहीं काम आहे. ' असें तो हुसेनच्या कारभाऱ्याला ह्मणूं लागला. कारभाऱ्यानें आमिनेला त्या गृहस्थाकडे आणिलें. त्या गृहस्थाला पाहिल्याबरोबर आमिना ह्मणाली, ' कमलाबाईच्या यजमानांचे तुह्मी दिवाणच ना ? कमलाबाईला तुह्मीच येथें आणून घातलें होतें, नाहीं बरें ? '

' आपण बरोबर ओळखिलें ? मी आमच्या यजमानांच्या आज्ञेवरून, बाईसाहेबांस न्यावयास आलों आहे. त्यांच्याच बरोबर एक बाई—काय त्यांचें नांव पहा—अगदींच अवघड आहे बुवा—आठवतच नाहीं— अरे हो ! आठवलें आतां ! त्यांचें नांव इंदिराबाई ! आहेत कां कोणी येथें इंदिराबाई ? त्यांनाही न्यावयाचें आहे ! '

त्यांना न्यावयास तुह्मांला कोणीं सांगितलें ? ' आमिना आश्चर्यानें ह्मणाली.

' आमचे धनीसाहेब व हुसेनसाहेब, ह्यांची ह्या स्वारींत फारच दोस्ती

जमली आहे ! आमचे धनी आतां आपल्या जहागिरीच्या गांवीं जाणार आहेत. त्यांनीं आमच्या बाईसाहेबांस घेऊन जाण्याचा बेत हुसेनसाहेबांस कळविला, तेव्हां ते ह्मणाले, ' दोस्त, येवढें आमचें काम करा ! आमच्या येथें इंदिरानामक स्त्री आमच्यावर आषक्त होऊन राहिली आहे ! तिला तूर्त कांहीं दिवस तरी आपल्या गांवीं ठेवा. कारण, सध्यां ती अजारी असल्यामुळें, आह्मांला उगीच त्रास होत आहे. ' वजीरसाहेबांचें बोलणें कोण नाकारणार आहे ? आमच्या धनीसाहेबांनीं तें मुकाट्यानें कबूल केलें. व त्यांनीं मला ' त्या दोघींसही घेऊन ये ' असा हुकूम केला. '

हुसेनचा कारभारी आश्चर्यतेनें ह्मणाला, ' अहो पण हुसेनसाहेबांचा लेखी हुकूम दाखविल्याखेरीज आह्मी इंदिरेला कसें पाठवावें ? '

' असा प्रश्न मला कोणी तरी विचारील असें त्याचवेळीं मला वाटलें, व मी तें आमच्या धनीसाहेबांजवळ तसें बोलूनही दाखविलें ! जवळच वजीरसाहेब कांहीं कामांत गुंतले होते. त्यांनीं हें ऐकलें वाटतें ! ते एकदम ओरडून ह्मणाले, ' अरे जा. जावयाचें नसलें ह्मणजे असे तर्क वितर्क सुचतात ! कामांनीं आमचे प्राण इकडे कठांशीं आले आहेत. आणि ह्यांस लेखी हुकूम लागतात ! माझा नुसता निरोप कळण्याचा अवकाश, कीं, माझ्या कारभाऱ्यानें निरोपाप्रमाणें केलेंच ह्मणून समज ! ' मी लागलींच आलों, आपल्याकडे. ' असें ह्मणून दिवाण ' हुसेनसाहेबांचे कारभारी कोठें आहेत ? ' असें त्या कारभाऱ्यासच विचारूं लागला ! कारभारीबोवा तर जे खुशालले ते कांहीं विचारूंच नका ! ' अहो, मीच तो कारभारी ' असें ह्मणून तो इंदिरेस खालीं आणावयास गेला ! इंदिरा आपल्या घरांतून जाणार, ह्मणून आमिनेस फार आनंद झाला, ह्मणून तिनें कारभाऱ्यास इंदिरेला आणावयास जातें वेळीं हटकलें नाहीं ! तितक्यांत कमला व हमीदा बाहेर आल्या. कमलेला पाहिल्याबरोबर दिवाणसाहेब दांत विचकून, लुब्रेपणानें ह्मणाले, ' बाईसाहेब ! चलाचला. बाहेर मेणा आणिला आहे ! ' कमलेला इतकें हंसूं लोटलें कीं, तें तिला आवरेना ! ती हंसत हंसतच ह्मणाली, ' आणिला कां ? बरें झालें ! ही पहा मी निघालेंच ! ' असें ह्मणून ती आमिनेजवळ निरोप घ्यावयास गेली. तिचें तें हंसूं पाहून, आमिनेला नवल वाटलें ! तरी पण हिला परत घरीं जावयाचा आनंद झाला

आहे, अशी तिनें स्वतःची समजूत करून घेतली. कमलेला निरोप देते वेळीं, आमिनेस व हमिदेस फार वाईट वाटलें. कमलेसही बरेंच वाईट वाटलें. ती निघणार, इतक्यांत कारभाऱ्याच्या मागोमाग इंदिरा खालीं आली! आमिनेनें हमीदेला ‘ इंदिरा ही कमला बाईबरोबर जावयाची आहे ’ असें ह्मणून दिवाणजी आल्यापासून घडलेला सर्व प्रकार सांगितला. हमीदेनें इंदिरेस पाठविण्यास पुष्कळ आढेवेढे घेतले, (कारण, तिला दिवाणाच्या बोलण्यांत खरेंपणा वाटेना !) पण आमिनेनें बराच वेळ समजूत केल्या-वर, शेवटीं तिनें इंदिरेस जाऊं देणें कबूल केलें ! इंदिरा आपल्या-बरोबर येणार हें आमिनेच्या तोंडून ऐकून, कमला ह्मणूं लागली, ‘ मी साफ सांगतें. ही बाई माझ्या येथें नको ! ’ पण कमलेला आमिनेनें, कारभाऱ्यानें, व दिवाणानें मोठ्या मिनतवारीनें समजूत घातली !

इंदिरेनें आपणांस अत्यंत दुःख व भय वाटत आहे, असें दाखविलें. पण आमिनेनें तिचें कसेंबसें सांत्वन केलें ! व इंदिरेचें सामान आमिनेनें चाकराकडून मेण्यांत ठेविलें. [illegible] हमीदेचे पुन्हां पुन्हां निरोप घेऊन मेण्यांत बसल्या व तो चालू झाला ! मेणा गेल्यावर हमीदेनें स्वतःशी उद्गार काढिले, ‘ तिकडच्या लेखी हुकुमावांचून इंदिरेला सोडिलें आहे ! काय होईल तें होवो ! ’

मेण्यांत बसून जात असतां, मार्गांत कमला इंदिरेस हंसत ह्मणाली, ‘ हुसेनच्या घरीं मघां एक नाटक झालें. त्यांत सगळ्या सोंगांनीं आपापलीं कामें बरोबर बजावलीं ! एकंदर तीन सोंगें होतीं, नाहीं बरें ? ’ इंदिरा नुसती हंसली. मेण्याबरोबर चालत असलेले दिवाणरूपी शंकरराव ह्मणाले, ‘ पण त्यावेळीं एका मूर्ख सोंगानें, कारण नसतां अतिशय हंसून, सर्व नाटकाचा बेरंग करण्याची वेळ आणिली होती ! परंतु, प्रेक्षकजन भोळ-सर असल्यामुळें कसें तरी निभावलें ! ’

प्रकरण २५ वें.

धोंडोपंतांचा पश्चाताप.

सर्व गोष्टी झाल्या ! पण धोंडोपंतांची काय कथा ? ती जाणण्यास वाचक फार उत्सुक झाले असतील. करितां आतां तीच सांगावी, हें बरें !

ज्या एका मोहनास्त्राच्या योगानें धोंडोपंतांचें मन लोहचुंबकाप्रमाणें आकर्षिलें गेलें होतें, तें अस्त्र म्हणजे आमिना ! ह्याच अस्त्राचा प्रयोग करून हुसेननें धोंडोपंतांस वेडें केलें होतें ! धोंडोपंतांच्या अंगीं जर खरा शहाणपणा (ते आपणास शहाणेच समजत असत !) असतां, तर त्यांना हुसेनचें सर्व कपटजाल कळलें असते. जर त्यांना हुसेनचें कपटजाल कळतें, तर हुसेनला आपल्या कार्यांत बरेंच काठिण्य आलें असतें. निदान इंदिरेला तरी सहसा दुःख भोगावें लागलें नसतें. पण ह्या सर्व ' जर तर ' चें मूळ शहाणपण. तेंच जर धोंडोपंतांच्या ठायीं नव्हतें तर ह्या सर्व गोष्टींचा दोष त्यांना देऊन काय उपयोग ?

हुसेननें, अगदीं पहिल्यानें, ' इंदिरा---मुरारराव तुमच्या वाईटावर आहेत, ' असे जेव्हां धोंडोपंतांच्या मनांत भरवून दिलें, तेव्हां त्यांना त्या दोघांचाही आतोनात तिटकारा आला. इंदिरेबद्दलचा त्यांचा तिरस्कार बरेच दिवस होता ! पण मुराररावांबद्दलचा फार दिवस टिकला नाहीं. इंदिरेला हुसेनच्या येथे आणिल्यावर, ' झाले तें झाले, आतां बरीक मुरारराव्यांच्या विरुद्ध काम करावयाचें नाहीं ' असा त्यांचा दृढ निश्चय झाला होता. इंदिरेला आपल्या घरीं आणण्याचे जे कठीण व नाजुक काम, ते धोंडोपंतांकडून पार पाडल्यावर, त्यांना प्रत्यक्षपणे मुराररावांच्या विरुद्ध कामें सांगण्याचे हुसेनलाही विशेष प्रयोजन पडले नाहीं. तो इंदिरा आपल्या घरीं येऊन पोंचल्याबरोबरच त्यांना रामराम ठोकणार होता. पण आपण तसें केलें असतां, धोंडोपंत मुराररावांजवळ जाऊन इंदिरेची हकीकत सांगतील; त्यामुळें, पुढील कारस्थानें तर आपणांस करितां येणारच नाहींत, पण सध्यांच जिवंत रहाण्याची देखील मुष्कील पडेल, अशी

त्यावेळीं त्याला भीती पडल्यामुळे, त्यानें धोंडोपंतांस आपल्याजवळच ठेविलें!

इंदिरेवर पहिल्यापहिल्याने धोंडोपंतांचा फार राग असे, त्यामुळे, तिला आपण हुसेनच्या घरी आणिलें हें बरे केलें, असें त्यांस वाटत असे. पण हुसेनच्या येथील तिचें वर्तन पाहून (ते हुसेनच्याच घरीं रहात असल्यामुळें ती त्यांच्या दृष्टीस कधीं कधीं पडत असे) त्यांचा तिजवरील राग पुष्कळ कमी झाला. पुढे पुढे तर इंदिरेला हुसेनच्या घरीं आणिल्याबद्दल त्यांना पश्चात्तापही होऊं लागला! कमलेला ते ओळखीत नव्हते. नाहींतर तिच्या सहाय्याने इंदिरेला मुक्त करण्यासही ते कदाचित् सिद्ध झाले असते. पण तशी स्थिती नसल्यामुळें, 'झालें ते झालें' असें ह्मणून, पश्चात्ताप करण्यापलीकडे त्याच्यानें कांहीं झालें नाहीं!

हुसेनने धोंडोपंतांस ते आपल्या घरीं असतां, मोठ्या नोकरीची, द्रव्याची व आमिनेची आशा लावून ठेविली होती. त्या आशेवर ते कालक्रमणा करीत होते. पुढे काहीं दिवसांनीं, मुरारराव आपल्या मारेकऱ्यांच्या हातून निसटले, ही बातमी ऐकून हुसेन अतिशय खिन्न व विचार मग्न झाला. कर्मधर्मसंयोगाने त्याचदिवशीं धोंडोपंतांसही उचल घ्यावीशी वाटून, ते हुसेनजवळ जाऊन ह्मणाले, 'आता निराळे घरदार करून आमिनेसह रहावं, असे माझ्या मनांत फार आलें आहे. तरी— '

पण हुसेननें त्यांना पुढें बोलूंच दिलें नाहीं! आधींच तो त्रासला होता. तो धोंडोपंतांच्या ह्या बोलण्याने फार संतापला, व म्हणाला, 'बस्, धोंडोपंत! अतःपर आमिनेसंबंधीं एक अक्षरही उच्चाराल तर खबरदार. मी आजपर्यंत तुम्हांला केवळ फसवीत आलों, हें मी तुम्हांला आज स्पष्ट सांगतों. आता मोठी नोकरी, द्रव्य, आमिना, सर्व विसरा! ह्यापुढे माझ्या घरचा उंबरठाही चढण्याचे कारण नाहीं!'

धोंडोपंत स्तंभितच झाले. हुसेन कां संतापला हे त्यांना कळेना! मुराररावांविरुद्ध हुसेनचीं कारस्थानें चाललीं असून, त्यांपैकीं एकाचा शेवट त्याला प्रतीकूल असा झाल्यामुळें, तो संतापला आहे, हें त्यांना कसें समजणार! हुसेनच्या संतापाचें कारण शोधून काढण्याचा त्यांनीं बराच प्रयत्न केला. त्याच्या बहिणीबद्दल आपण बोलल्यामुळें, त्याला राग आला

असावा, असें त्यांना [illegible] वाटलें. पण तसें ह्मणावें, तर मागें तिजविषयीं [illegible] काढिल्या असतां हुसेन रागावला नाहीं, हें लक्ष्यांत घेऊन, हुसेनच्या संतापाचें कारण कांहीं तरी दुसरेंच आहे, असा त्यांनीं तर्क केला ! ते असे आश्चर्यानें विचार करीत उभे असतां, हुसेन त्यांना पुढें ह्मणाला, ' तुह्मी असें नका समजूं कीं, मी रागाच्या भरांत कांहीं तरी बोललों; हा रागाचा भर गेला ह्मणजे मी पुन्हां पहिल्यासारखें बोलूं लागेन, ह्मणून ! मी पूर्ण विचार करूनच तुह्मांला सांगितलें आहे ! '

धोंडोपंत आश्चर्यानें, निराशेनें, व संतापानें तत्क्षणींच हुसेनच्या घराबाहेर पडले. व्यर्थ आपण हुसेनवर विश्वास ठेविला, असें त्यांना झालें ! हुसेननें आपणांशीं आजपर्यंत जी सलगी ठेविली, ती वरवरच ! त्याच्या अंतर्यामींचा हेतू कांहीं निराळाच असावा. तो पूर्ण झाला असेल, ह्मणूनच त्यानें आपणांस हांकून दिलें, असें वाटून आपल्या मूर्खपणाचा त्यांना पश्चात्ताप झाला. ' पोरगा रूपानें व स्वभावाने चांगला आहे. सांगितलेलें [illegible] नेमें. त्यांत त्याची बुद्धी [illegible] त्याचा [illegible] अगदीं तारिफ करण्याजोगी आहे. पण आपण होऊन एखादी गोष्ट करण्याची, किंवा दुसऱ्यानें एखादी गोष्ट करावयास सांगितली असतां, ती गोष्ट योग्य कीं अयोग्य आहे, [illegible] अक्कल त्याला बिलकूल नाहीं ! ' असें लोकांजवळ आपल्या [illegible] बाळासाहेब (चतुर सावाजी) नेहमीं बोलत असत, हें ह्यावेळीं धोंडोपतास आठवलें. ह्या [illegible] बोलण्यातील आपल्या स्तुतीचा भाग मात्र आजपर्यंत त्यांनीं लक्ष्यांत ठेविला होता ! परंतु, तें बोलणें [illegible] खरें होतें, असें आज त्यांना वाटलें ! हुसेनच्या घरांतून बाहेर निघाल्यावर ' आता पुढें काय करावयाचें ' हा त्यांना प्रश्न पडला. ह्यापुढें सर्व जन्मभर मुराररावांस तोंड दाखविणें अगदींच अयोग्य निदान इंदिरा हुसेनच्या घरीं आहे, तोंपर्यंत मुराररावापुढें जाणें, हें त्यांना व आपल्यालाही त्रासदायक होणार. मग आतां जावें कोठें, ह्याजबद्दल ते बराचवेळ विचार करीत राहिले. ह्यापुढें कोठेंतरी अरण्यांत जाऊन रहावें, असा त्यांनीं बेत केला. पण तितक्यांत त्यांना आमिनेची आठवण झाली. तिला एकदां अखेरचें विचारून यावें. जर तिचें आपणांवर खरें प्रेम असेल,

तर ती अशा प्रसंगींही आपल्या सहवासांत रहाण्यास कबूल होईल, अशी धोंडोपंतांस आशा उत्पन्न झाली! ह्मणून अरण्यांत जाण्याचा बेत आमिनेशीं एकदां तरी भाषण होईपर्यंत तहकूब करावा. ती आपणांबरोबर रहाण्यास कबूल झाली, तर निराळें घरदार करण्याची तजवीज करूं. कबूल न झाली, तर अरण्याचा मार्ग सुधारूं. असा बेत ठरवून धोंडोपंत अहंमदनगरींच रहात असलेल्या आपल्या एका स्नेह्याच्या घरीं जाऊन राहिले, व आमिनेशीं गांठ पडण्याची संधी केव्हां येते, ह्याची वाट पाहूं लागले!

धोंडोपंत अहंमदनगरींच रहात आहेत, ही गोष्ट हुसेनला तेव्हांच कळली. पण त्यानें त्याबद्दल मुळींच फिकीर केली नाहीं. एकाच गोष्टी-करितां तो आजपर्यंत धोंडोपंतांस सोडीत नव्हता. ती गोष्ट हीच कीं, धोंडोपंत मुराररावांजवळ जाऊन, त्यांची आपल्या अयोग्य वर्तनाबद्दल क्षमा मागून, त्यांना इंदिरेसंबंधीं सर्व हकिकत निवेदन करतील; त्यामुळें सहाजि-कच आपणांला त्रास होऊन, आपलीं कारस्थानें वगैरे जागच्याजागींच रहा-तील; अशी गोष्ट घडूं नये, ह्मणून हुसेननें धोंडोपंतास आजपर्यंत लालचावण्या दाखवून, आपल्या घरीं ठेविलें होतें. परंतु, आतां मुरारराव आपल्या मारेक-ऱ्यांच्या हातून सुटल्यामुळें व त्यांच्या सैन्याचा विध्वंस झाल्यामुळें (तो होणार हे हुसेनास पक्कें माहीत होतें) ते इकडे येतील; मग सहजच त्यांना इंदिरेची हकीकत समजल्यावांचून रहाणार नाहीं. मग आतां धोंडो-पंतांची तरी अजेंडे कशासाठीं करा! असें मनांत आणूनच हुसेननें धोंडो-पंतांस घालवून दिलें. संतापाच्या भरांत कांहींतरी वेडेपणा करणारांपैकीं हुसेन नव्हता! त्यानें आतां अशीं नवीन कारस्थानें करण्याचा बेत केला कीं, त्यामुळें मुराररावच अपराधी आहेत, असें जगास वाटावें, निदान हुसेन अपराधी आहे असें तरी कोणाला कळूं नये! असो.

कांहीं दिवस गेले. हुसेन अहंमदनगरींच असल्यामुळें, आमिनेची एकांतीं गांठ घेण्यास धोंडोपंतांची छाती झाली नाहीं. पुढें, हुसेन स्वारीवर गेला, असें त्यांस कळलें! तेव्हां आमिनेची गांठ घेण्यास ही उत्तम संधी आहे, असें मनांत आणून, दुसऱ्याच दिवशीं ते हुसेनच्या वाड्यांत गेले. सुदैवानें आमिना त्यांना एकटीच भेटली.

धोंडोपंतांस पाहिल्याबरोबर सरळस्वभावी आमिनेनें त्यांस 'या बसा.' ह्मणून त्यांचें स्वागत केलें! त्यांच्या दुर्दैवी जिनगानीबद्दल तिला फार कींव यत असे. ती त्यांना पाहिल्याबरोबर दुणावली! त्यामुळें तिच्या चेहऱ्यावर खिन्नता स्पष्ट दिसूं लागली. दुसऱ्याचा चेहरा पाहून, त्याची मनोवृत्ती अमुक असावी, असा आपण तर्क करितों. तो पुष्कळदां खरा ठरत असताही, कधीं कधीं अगदींच उलट ठरतो. तसें ह्यावेळी धोंडोपंतांचें झालें! आमिनेनें केलेला आदर व दाखविलेली दुःखितचर्या पाहून त्यांनीं तिच्या त्यावेळच्या मनोवृत्तींच्या अगदीं उलट असा तर्क बांधिला. आपल्याबद्दल खरं प्रेम इला आहे, ह्मणून इनें आपला आदर केला! एरव्हीं केलाच नसता. वास्तविक इच्या भावानें मला हांकून दिलें ह्मणून ही देखील माझा अनादर करावयाची! पण इनें ज्याअर्थीं आपला आदर करण्यांत उत्सुकता दाखविली, त्याअर्थीं हिचें आपणांवर प्रेम आहेच. असा त्यांनीं पहिला तर्क केला! तिच्या खिन्नतेचें कारण, त्यांनीं असें अनुमानिलें कीं, आपल्या सहवासाची हिला उत्कट इच्छा असताही, भावाची परवानगी नसल्यामुळें, व भावास न जुमानितां आपल्या इच्छेप्रमाणें केलें, तर लोक आपली निंदा करतील ह्या भीतीमुळें आपणांस आपली इच्छा पूर्ण करितां येत नाहीं, ह्याबद्दल हिला वाईट वाटत असावें! असे त्यांनीं तर्क केल्यामुळें, हरप्रयत्न करून, हिचें आज मन वळवूंच अशी त्यांना उमेद आली. ते ह्मणाले, 'आमिने! आज मी तुला तुझ्या मनांत काय आहे, तें विचारावयास आलों आहे. तुझ्या प्रातीच्या आशेवर मी मुरारावांचें देखील अनहित करावयास चुकलों नाहीं. स्पष्ट सांग. तूं मजबरोबर रहाण्यास कबूल आहेस कीं नाहीं? –

'धोंडोपंत! नाहीं असें तर मी स्पष्टच सांगणार आहे! पण '—

'पण बीण कांहीं नको. नाहीं म्हणतेसना? ठीक आहे. तेंच मला पाहिजे होतें. आतां अधिक कांहीं सांगूं नकोस. असें ह्मणून धोंडोपंत जाऊं लागले. आपला तर्क अगदीं चुकीचा ठरला ह्याबद्दल त्यांना वाईट वाटलें. एका घटकेपूर्वी त्यांस आलेली उमेद आतां बरीच खचली! आमिना जरा मोठ्यानें ह्मणाली, ' हं हं, धोंडोपंत, हें काय? माझें थोडें ऐकाल तर बरं!'

धोंडोपंत कष्टानें पण आशेनें पुन्हां जागींच बसले ! तेच बोलूं लागले, ' मला माहित आहे, तूं काय सांगणार आहेस तें ! पण त्या वेदांताच्या गोष्टी मला नकोत. पण आमिने ! तुला स्पष्ट विचारितों, मी काय कुरूप आहे ? '

' मी कोठें ह्मणतें पण तसें ! '

' मग ? माझ्यांत शौर्य कमी आहे ? '

' नाहीं. '

' मला हवे तितके पैसे मिळविण्याची अक्कल नाहीं, असें तुला वाटतें ? '

' कोण ह्मणतं असें ? '

' मी तुला सुख देणार नाहीं ? '

' द्याल. '

' मग आतां आणखी काय पाहिजे ? रूप, शौर्य पैसे मिळविण्याची करामत, सुख देणें, वगैरे गोष्टींची मजजवळ कमतरता नाहीं, असें तूंच कबूल केलेंस ! आतां ह्याशिवाय कोणत्या गोष्टी तुला माझ्यांत कमी आढळतात त्या तरी सांग ? '

' कोणत्याच कमी नाहींत, तर सांगूं तरी काय ? '

' मग तूं माझा मनोरथ (तुझाही असेलच) कां पुरवीत नाहींस ? तुला लोकापवादाची भीती वाटत असेल, तर ती सोडून दे. '

' मी लोकांना मुळींच भीत नाहीं ! '

' मग काय ? भावाला भितेस ? त्याला भिण्याचें कारण नाहीं ! मदनव्यथा किती भयंकर असते, ह्याची त्याला कल्पना असल्याखेरीज त्यानें इंदिरेला आणली ? त्याला– '

' पण मी त्यालाही भीत नाहीं ! '

' मग काय ह्मणून, कशासाठीं, काय कारणानें तूं माझी इच्छा पूर्ण करीत नाहींस ? ' धोंडोपंत जमिनीवर मुठी आपटीत ह्मणाले.

' त्याचें कारण इतकेंच कीं, मला तशी इच्छा नाहीं ! '

आमिनेच्या ह्या उत्तरानें धोंडोपंतांची उमेद पार खचली ! तिला भावाची परवानगी नसल्यामुळेंच तिचें आपणांवर खरें प्रेम असतांही, आपल्याबरोबर रहाण्यास धाडस होत नाहीं. ही जी त्यांची आजपर्यंतची

समजूत, ती साफ चुकीचीच नव्हे, तर अत्यंत मूर्खपणाची ठरली! त्यांना आमिनेच्या प्राप्तीची आशा राहिली नाहीं. तथापि आणखी थोडासा प्रयत्न करून पहावा, ह्मणून ते ह्मणाले, ' तुला इच्छा कां बरें नाहीं? मी परधर्मीय ह्मणून तुला आवडत नाहीं?'

' असें कांहीं नाहीं. पण लहानपणापासून मला ईश्वर सेवेची भारी आवड. त्यामुळें—'

' मग मी कोठें तुला ह्मणतों कीं ईशसेवा करूं नकोस ह्मणून!'

' पण नीट ऐकून तर घ्याल? मला कीं नाहीं हा संसार मुळींच आवडत नाहीं! जगांत केवळ संसारिक सुखदुःखें उपभोगण्यास आपण जन्मलों नाहीं. ज्यानें आपणांस उत्पन्न केलें. त्याची सेवा करणें, व त्यानें निर्माण केलेल्या आश्चर्यकारक वस्तूंबद्दल विचार करण्यांत रममाण होणें, हेंच योग्य आहे, अशी माझी समज आहे.'

' असें सगळेच जर करूं लागले, तर सृष्टीक्रम तरी कसा चालेल?'

' सर्व कांहीं चालतें. ज्यानें सृष्टीच निर्माण केली, त्याला सृष्टीक्रम चालविणें काय कठीण आहे? पण जाऊं द्या! तें तुह्मांला पटणार नाहीं! मी येवढेंच सांगते कीं, तुमच्या हल्लींच्या वयाला तुमची ही इच्छा बरोबर दिसत नाहीं.'

' कां बरें दिसत नाहीं? मी केवळ तुझ्याचसाठीं आजवर अविवाहित राहिलों ना? लग्न एक करूं नये ह्या वयांत! पण खऱ्या प्रेमाला लग्नाची-ह्या बाह्योपचाराची—गरजच काय आहे?'

' हे पहा थोडोपंत! मी सेनापती महंमदखानांची मुलगी. वजीर हुसेनखान ह्याची बहीण. तुमची माझी योग्यता सारखीच आहे काय? बरें असली ह्मणून समजा. तरी वजिराच्या बहिणीनें तुमच्यासारख्या एखाद्या मनुष्याजवळ राख ह्मणून रहाणें चांगलें दिसतें कां? मी तुह्मांला स्पष्ट सांगते, कीं माझ्या सहवासाचा नाद तुह्मी सोडून द्या. आणखी माझें बहिणीच्या नात्यानें असें सांगणें आहे, कीं ह्मी आता ईश्वराच्या भजनांत, व निजामशाहीसाठीं झटण्यांत आपला काळ घालवा. ह्मणजे तुह्मांला मुक्ती व कीर्ती ह्यांचा तरी लाभ होईल!'

' तें सांगायास गुरू पुष्कळ आहेत जगांत!'

'तरीही तुमची वृत्ती पालटत नाहीं, हे लक्षण कशाचें बरें ?'

'असेल कशाचें तरी ! मला नाहीं त्याची जरूर. पण आमिने ! तूं माझी इच्छा पुरवून मला जीवदान दिल्याचें श्रेय खरेंच घेत नाहींस कां ?'

'नाहीं. मला ह्यापलीकडे अधिक कांहीं सांगतां येत नाहीं. धोंडोपंत ! तुमची इच्छा जर इतकी तीव्र असेल, तर तुम्हीं आता कुटुंब करून, प्रपंच-सुख भोगावे, हेंच बरें !'

'तसे करण्याची जर माझी इच्छा असती, तर मी आलोंच असतों कशाला येथे ? आमिने ! तुझ्यासाठीं वाटेल त्या गोष्टी करितों; पण माझा हेतु पुरव.'

'माझ्यासाठीं करावयास कांहीं गोष्टीही नाहींतनी, तुमचा हेतु पुरविण्याची मला इच्छाही नाहीं !'

'तूं इतकी निष्ठुर आहेसना ? तुला माझी दया नाहींच येतना ?' धोंडोपंत अश्रूंनीं भरलेले आपले डोळे पुशीत ह्मणाले, 'आमिने, उगीच मीं तुझ्या प्राप्तीची आशा धरली. साध्वी इंदिरा ! हरहर ! मला हें आतां कळून आलें ! त्या बिचारीच्या जन्माचें म्यां मातेरं केलें. मुराररावांस सोडून, तुझ्या निर्दय भावाची कांस धरली. माझ्या पापांचीं—स्वामीद्रोह, साध्वीद्रोह, आत्म-द्रोह, ह्या अक्षम्य पापाचीं फळें कितीतरी कडू आहेत ! आणि तीं मला किती काळ भोगावीं लागतील, राम जाणें !' असें ह्मणून धोंडोपंत, जावयास निघाले ते जात असतां 'धोंडोपंत, कुटुंब करून प्रपंचात पडा. नाहींतर देवाच्या सेवेंत आयुष्य कंठा' पण जिवाचें कांहीं भलतेंसलतें करूं नका.' असें आमिनेनें त्यांना कळकळीनें सांगितलें. धोंडोपंत तें ऐकलें न ऐकलेंसें करून घराबाहेर पडले. ते जात असतां आमिना एकसारखी त्यांच्याकडे पहात होती. ते दिसेनासे झाल्यावर तिला एकदम कांहीं आठवण होऊन तिनें एका हुजऱ्यास हांक मारून, त्याला धोंडोपंतांस आग्रहानें आपल्याजवळ आणण्यास सांगितलें. तो लागलीच बाहेर गेला, व कांहीं वेळानें धोंडोपंतास घेऊन आला. धोंडोपंत दुःखित व त्रासिक स्वरानें आमिनेला ह्मणाले, 'आमिने, कशाला आतां मला उगीच पुन्हां पुन्हां त्रास देतेस ? माझी आतां पक्की खात्री

झाली आहे, कीं, कल्पांतींही तूं माझें ह्मणणें कबूल करणार नाहींस! व ह्मणून, मलाही तुझ्या उपदेशाची जरूर नाहीं.'

'पंत! मी तुह्मांला माझा उपदेश ऐकण्यासाठीं नाहीं बोलाविलें बरं! मलाहो काय अधिकार तुह्मांला उपदेश करण्याचा?—असो. पण जरा थांबा. मी आत्तां येते.' असें ह्मणून आमिना आंत गेली. आमिनेच्या सौजन्याची तारीफ करीत, परंतु, तिचा आपला संबंध आपल्या इच्छे प्रमाणे घडून येत नाहीं, ह्मणून खेद करीत, धोंडोपंत स्वस्थ उभे राहिले. कांहीं वेळानें आमिना एक मोठी किनखापी थैली ह्मतांत घेऊन आली. ती धोंडोपंतांस देण्यासाठीं पुढे करून, ती ह्मणाली, 'धोंडो-पंत! केवळ मजमुळें तुह्मी मुरारराव्यांच्या घराला अंतरलात. आतां ह्यापुढें तुह्मांला कांहींच आधार नाहीं. ह्यासाठीं ह्याथैलीचा स्वीकार करा. हींत पांच हजार मोहरा आहेत. ह्या तुह्माला जन्मभर पुरतील असें नाहीं. तरी पण ह्यांच्यामुळें तूर्त कांहीं दिवस तरी तुह्मांला कांहीं अडचण पडणार नाहीं!'

धोंडोपंत थैली न घेतां ह्मणाले, 'आमिने! दर्जानं किंवा श्रीमंतीनें मी जरी तुझ्या बरोबरीचा नसलों तरी परमेश्वर कृपेनें, मला खाण्याची भ्रांत पडली आहे, असें कधींही घडणार नाहीं. आणि बेताचे खावयास असले, ह्मणजे त्यांतच माझा संतोष आहे. मला तुझ्या ह्या मोहरांची मुळींच जरूर नाहीं! असें ह्मणून, आमिनेच्या मनोहर मुखकमलाकडे किंचित्काळ आपली नजर लावून, धोंडोपंत आमिनेचें कांहींएक न ऐकतां ताबडतोब बाहेर चालते झाले. अनेकतऱ्हेचे विचार करीत ते आपल्या स्नेह्याच्या घरीं गेले. विचारांतीं, आतां अरण्यवास पतकरावा, हेंच चांगलें, असें त्यांनीं ठरविलें. तो दिवस आपल्या स्नेह्याच्या घरीं त्यांनीं कसातरी काढिला. दुसरे दिवशीं कोठतरी ते जावयास निघणार होते. कोठें जावयाचें हें देखील त्यांनीं रात्रीं ठरवून ठेविलें. दुसरा दिवस उजाडला. सुमारें एक प्रहर होईपर्यंत, त्यांनीं आपलीं नित्यकर्में उरकलीं. नंतर ते जावयास निघाले. शहारांतील कांहीं रस्ते ओलांडिल्यावर, सरकारी कैदखान्याजवळ कांहीं मनुष्यें उभीं असलेलीं धोंडोपंतांनीं पाहिलीं. तीं सर्व त्यांच्या ओळखीचीं होतीं. शंकरराव, तुकाराम, जिवाजीपंत व लक्ष्मीबाई, हींच तीं मनुष्यें होत. धोंडोपंत त्या चौघांपासून जवळच, पण त्यांना न दिसेल

अशा तजविजीनें उभे राहिले. त्यांनां खालील संवाद ऐकूं आला. ' ' औं ! तुही इकडे कोणीकडे ? ' तुकाराम आश्चर्यानें ह्मणाला.

' मी हा सहज जात होतों, तों तूं व हे जिवाजीपंत मला दिसलेत ह्मणून मी इकडे आलों. ' शंकरराव ह्मणाले.

'असे कां ?— आतां मी माझी हकीकत सांगतो, ती ऐका. धोंडोपंतांनीं इंदिराबाईला अहमदनगरी नेलें, ही बातमी कळविण्यासाठीं मी धनीसाहेबांकडे गेलों. तेथेच हुसेसखानाच्या एका चाकराकडून इंदिराबाई गडावर परत गेल्या, असें कळले. मग मला एक पत्र देऊन धनीसाहेबांनीं मला गडावर जावयास सांगितलें. गडावर आल्यावर इंदिराबाई अहंमदनगरींच आहेत, असें मला कळलें. ह्मणून मी येथें आलो. हुसेनखानाच्या दारावरून एके दिवशीं जात असतां, त्याच्या दाराशींच मला कमळाबाई भेटल्या. (त्यांनींच मला त्यांचें नाव, व इंदिराबाईशीं असलेलें त्यांचें नातें सांगितलें. शिवाय मीही त्यांना मागें एकदां पाहिले होतें.) '

' कोण ? आमची कमळा ? ' जिवाजीपंत आश्चर्यानें ह्मणाले. हो. तो प्रकार तुह्माला माहीत नाहीं. इंदिरेला बादशहानें नेलें नसून, हुसेनखानाने पळविलें होतें. असे ह्मणून शंकररावांनीं त्यांना इंदिरेची हकीकत थोडक्यांत सांगितली. व शेवटीं इंदिरेची सुटका आपण दिवाणाच्या वेषानें केली, हही त्याना सांगितलें..

त्याबरोबर आनंदून जाऊन लक्ष्मीबाई ह्मणाल्या, ' माझी इंदिरा सुटली ? कमलाही येथेंच आहे ? मग त्या दोघींची माझी भेट करून द्याना तेवढी ? '

' थांब थोडावेळ जिवाजीपंत आपल्या पत्नीस ह्मणाले. मग ते तुकारामाला ह्मणाले , ' सांग रे बुवा तुझी हकीकत पुढें ! '

तुकाराम ह्मणाला, ' मी कमलाबाईस धनीसाहेबांची खुशाली सांगितली, व विशेष काहीं घडल्यास पुन्हां सांगावयास येईन, असेंही सांगितलें नंतर इंदिराबाईची खरी हकीकत धनीसाहेबांस कळवावी, ह्मणून अहंमदनगर सोडून मी निघालो. जातां जातां गडावरही गेलों. तेथें असें कळलें कीं, जिवाजीपंत सहकुटुंब बंदींत पडले. मग मीं असा विचार केला कीं, ह्या दुःखाच्या बातम्या सांगून धनीसाहेबांस काळजींत पाडण्यापेक्षां, अहंमदनगरीं जाऊन, होईल तितकें करून, इंदिराबाईस व त्यांच्या आईबापांस सोडवावें, व मग धनीसाहेबांकडे जावें, हें बरें. असा विचार करून मी

येथें आलों. पण जिवाजीपंत सरकारी हुकुमावरून कैद झालेले. आणि बाईसाहेब तर खुद्द त्या यमाच्या घरांत! त्यामुळें कांहीं डाळ शिजेना! शेवटीं ही जी नवीन लढाई सुरू झाली आहे, हिचा फायदा घेऊन, मी कैदखान्यावरील पहारेकऱ्यांस ह्मटलें कीं, 'जिवाजीपंत फार शूर आहेत. ह्मणून बादशहानें त्यांस ताबडतोब आणविण्याचा तोंडी सक्त हुकूम पाठविला आहे. त्यांना जर तुह्मी सहकुटुंब न सोडाल तर नाहक सुळीं जाल! सध्यां तिकडे प्रसंग आणीबाणीचा आहे!' माझें हें धाकाचें बोलणें ऐकून, त्या पहारेकऱ्यांनीं ह्या दोघांस मुकाट्यानें सोडिलें! आतां मी इंदिराबाईला कसें सोडवावें, ह्याचाच विचार करीत होतों!'

शंकरराव ह्मणाले, 'पण आतां तसा विचार करण्याचें कारणच नाहीं. तुकाराम, तूं आतां लक्ष्मीबाईला मुराररावाच्या वाड्यांत घेऊन जा. तेथें इंदिरा आहे.'

'ठीक आहे' असें ह्मणून तुकाराम जाऊं लागला. तितक्यांत जिवाजीपंत ह्मणाले, 'माझ्या इंदिरेला पळविल्याचा आरोप मी बादशहावर करीत होतों पण तो अगदीं चुकीचा होता, असें मला आतां कळून आलें! मला त्याचवेळीं कित्येकदां वाटलें कीं, बादशहा असें करणार नाहीं ह्मणून. तें असो. पण शंकरराव बादशहावरील रागाच्या भरांत, मी तुकारामाबरोबर आनंदानें बाहेर आलों खरा. पण मला आतां त्याबद्दल वाईट वाटतें! मी सहकुटुंब पुन्हां बंदींत रहातो. बादशहाला न कळत बाहेर येणें, हें अगदीं अप्रशस्त होय. सरकारी हुकुमाचा अनादर करणें मला आवडत नाहीं!'

हें जिवाजीपंतांचें बोलणें ऐकून शंकरराव अंतर्यामी फार संतापले! पण जिवाजीपंत त्यांचे सासरे असल्यामुळें, त्यांना आपला संताप प्रकट करितां येईना! ते बाह्यात्कारीं शांतपणें ह्मणाले; 'तुह्मांला कैद करण्याचा हुकूम बादशहानें पाठविला नसून, बादशहास न विचारितां हुसेननेंच पाठविला आहे, असें मला कळलें आहे. मग तुह्मांला तो मोडावयास काय हरकत आहे?'

पण जिवाजीपंत ऐकेनात! सरकारी शिक्कामोर्तब ज्याअर्थीं त्या हुकुमावर होतें, त्याअर्थीं तो पाळला पाहिजे. मग तो बादशहा पाठवो कीं, हुसेनखान धाडो! असें त्यांचें ह्मणणें पडलें. शेवटीं शंकररावाच्या, तुकारामाच्या व खुद्द लक्ष्मीबाईच्या अत्याग्रहावरून, जिवाजीपंतांनीं आपला

हेका सोडून दिला. मात्र मी आतां लढाईत जाऊन बादशहाची सेवा करणार--म्हणजे त्यांचेतर्फे लढणार, असें त्यांनीं .खडखडीत सांगितलें ! शंकररावांनीं तें कबूल केलें, व ते स्वतःही जिवाजीपंतांबरोबर निघाले. तुकाराम मुलींच्या भेटीला उत्सुक झालेल्या लक्ष्मीबाईस घेऊन मुराररावांचें घरीं गेला.

वर लिहिलेला संवाद जरी हळूंहळूं चालला होता, तरी धोंडोपंतांस तो सर्व ऐकूं आला ! सर्व संवाद झाल्यावर धोंडोपंतांनीं धांवत जाऊन जिवाजीपंतांचे व मग शंकररावांचे पाय घट्ट धरिले !

प्रकरण २६ वें.

लढाईचा पूर्वरंग.

धोंडोपंत तेथें अवचित उपस्थित झालेले पाहून, जिवाजीपंतास व शंकररावास फार आश्चर्य वाटलें, व धोंडोपंताबद्दल त्यांना अत्यंत तिरस्कारही उत्पन्न झाला. ते दोघेही धिःकारदर्शक मुद्रेनें धोंडोपंताकडे पाहूं लागले, त्यामुळें तर धोंडोपंत अतिशयच लाजले. उजव्या पायाच्या आंगठ्यानें जमीन कोरीत, व तिकडे आपली शून्यदृष्टी लाऊन, ते स्तब्ध उभे राहिले. त्यांना पाहिल्याबरोबर शंकररावास त्यांच्याबद्दल जितका तिरस्कार उत्पन्न झाला होता, तितकीच त्यांना आतां त्यांची दीन व भांबावलेली मुद्रा पाहून कींव आली. जिवाजीपंतांस त्यांचा जितका तिटकारा आला तितकाच संतापही आला. पण धोंडोपंत त्यांच्या सोयऱ्याधायऱ्यांपैकीं असल्यामुळें, त्यांना आपला संताप व्यक्त करून दाखविण्याचा जिवाजीपंतास धीर झाला नाहीं ! ते शांतपणानें ह्मणाले, ' धोंडोपंत, चांगला माझा गळा कापलांत ! तुह्मी माझ्या पोरीला न्यावयास आलां, तेव्हां तिनें तुमच्याबरोबर यावयास किती हरकती घेतल्या. पण मी तिची कशीतरी समजूत घालून, तिला तुमच्याबरोबर धाडिली. पण धोंडोपंत ! तुह्मांला हें शोभलें कांहो ? '

जिवाजीपंतांनीं हे उद्गार अगदीं शांतपणानें काढिले. पण हे उद्गार व ते

काढितांना जिवाजीपंतांनीं केलेली मुद्रा, ही इतकी मर्मभेदक होती कीं, धोंडोपंतांच्या हृदयाचें पाणीपाणी होऊन गेलें ! ते डोळ्यांत अश्रु आणून जिवाजीपंतास ह्मणाले, ' मामासाहेब ! क्षमा करा. मीं जें केलें तें किती भयंकर व अश्लाघ्य कृत्य होतें ह्याबद्दल, माझी पूर्ण खात्री होऊन चुकली आहे. खरोखर, त्यावेळीं माझ्या सारासारविवेकबुद्धीला काय विकार झाला होता, कोण जाणें !—पण आतां मला त्याबद्दल पूर्ण पश्चात्ताप झाला आहे. आतां माझें आपणांजवळ-आणि शंकरराव, तुमच्याजवळही-इतकेंच मागणें आहे कीं, झाल्या गोष्टीबद्दल मला आतां क्षमा करून, मजवर पूर्ववत् कृपा असूं द्यावी. मुराररावाला जर माझा पश्चात्ताप कळला, तर तेही मला क्षमा केल्यावांचून खास रहाणार नाहींत.

धोंडोपंतांच्या ह्या बोलण्याचा जिवाजीपंतावर फारसा परिणाम झाला नाहीं. त्यांचा धोंडोपंताबद्दलचा तिरस्कार व संताप अद्यापही कायम होता ! पण शंकररावांची बरीक धोंडोपंतास पश्चात्ताप झाला आहे, अशी खात्री पटली. शंकररावांचा धोंडोपंताशीं पुष्कळ परिचय होता, त्यामुळें धोंडो-पंतांच्या भोळसर स्वभावाची त्यांना मुराररावाइतकीच ओळख होती. हुसेननें धोंडोपंतास चकविलें. धोंडोपंतानीं जाणूनबुजून कांहीं अपराध केला नाहीं. आपली चूक आतां त्यांच्या लक्ष्यांत आली. त्यामुळें त्यांना फार पश्चात्ताप झाला आहे, ह्याबद्दल शंकररावांस काडीभरही संशय राहिला नाहीं ! ते धोंडोपंतांचें सांत्वन करण्याच्या उद्देशानें ह्मणाले, ' धोंडोपंत, झालें तें झालें. त्याबद्दल आतां विषाद करून काय उपयोग ? ' विनाशकाले विपरीत बुद्धि ' ही व्हावयाचीच. युधिष्ठिरादि समंजस लोकांसही ती झाली, मग तुमचा आमचा काय पाड ? ह्मणून ह्मणतो, जें झालें त्याबद्दल आतां व्यर्थ खेद करूं नका. असो. पण ह्यावेळीं तुह्मी येथें कोठून आलांत ? व चाललां आहांत तरी कोठे ? ' ' जातों झाले कोठेंतरी ! मला ह्या जगाचा अगदीं वीट आला आहे आतां. ह्मणून कोठें तरी अरण्यांत जाऊन, आयुष्याचे उरलेले चार दिवस ईश्वराच्या भजनांत तरी घालवावेत, असा मी बेत केला आहे. गोकर्णमहाबळेश्वरी- ' शंकररावांनीं धोंडोपंतास पुढें बोलूं दिलें नाहीं, ते मध्येंच ह्मणाले, ' छे, छे. धोंडोपंत, असें करूं नका. मुरारराव तुमच्या भेटीसाठीं कोण उतावळा झाला आहे ! तो मला ह्मणाला, ' धोंडोपंत माझें कितीही

अकल्याण करोत, त्यांची वडील बंधूप्रमाणें मी नेहमीं सेवाच करीत राहीन!' धोडोपंत, तुमची ही बदललेली स्थिती पाहून, त्याला किती आनंद होईल ह्मणून सांगूं? तुह्मीही—'

इतक्यांत जिवाजीपंत मध्येंच ह्मणाले, 'हो. शंकरराव, तुह्मांला एक गोष्ट विचारावयाची राहिलीच! मुरारराव हल्लीं कोठें आहेत?'

'आज सात आठ दिवस झाले, तो बादशहाकडे गेला आहे. अजून परत कां आला नाहीं कोण जाणे!'

'ह्मणजे? बादशहाकडे ते कसे गेले? मघां तुह्मीं ह्मणालांतना कीं तुह्मी दोघेही गोसावी बनलांत ह्मणून?'

'हो..गडावरून आह्मी गोसाव्यांच्याच रूपांनीं निघालों. अहंमदनगरीं न येतां थेट सातान्यांस जाण्याचा आमचा बेत होता. त्याप्रमाणें चाललो असतां गरडीच्या रानांत आह्मांला एक स्वार भेटला. त्याच्याशीं बराच वेळ हुजत घालून, आह्मीं हें पत्र मिळविलें! हुसेनखानानें विजापूरच्या बादशहास पाठविलेलें हें पत्र आहे.' असे ह्मणून शंकररावांनीं एक पत्र जिवाजीपंतांचे हातीं दिले. एकविसाव्या प्रकरणात एका स्वाराजवळून दोन गोसाव्यानीं हुसेनचें पत्र काढून घेतलें, अशी कथा आली आहे. ते व हें पत्र एकच होते! आतां कियेक वाचक आह्मास असा प्रश्न करितील, कीं, 'एकविसाव्या प्रकरणांत उल्लेखिलेलें पत्र शंकररावाजवळ कसें आलें?' त्याला येवढेंच उत्तर, कीं, एकविसाव्या प्रकरणांतील दोन गोसावी मुरारराव व शंकरराव हेच होते! दुसरे कोणी नव्हते! असो. पत्र वांचून, जिवाजीपंत आश्चर्यानें व रागानें इतकेंच ह्मणाले, 'वाहवा जी हुसेनखान!'

शंकरराव पुढे ह्मणाले 'ह्या पत्रांतील मजकूर ऐकून, मुराररावाचे पित्त खवळलें! 'मी आतां बादशहाकडे जातो' असेंच तो ह्मणूं लागला! मी पुष्कळ आढेवेढे घेतलें. पण तो ऐकेना! शेवटीं निरुपायानें मीही त्याच्याबरोबर आलो. 'अरे पण नीट पोषाख करून तर जाशील?' असें मी येथें आल्यावर त्याला ह्मटलें. पण 'आतां पोषाख कोठें पहात बसूं? सध्यां एकेक पळ लाखाच्या ठिकाणीं आहे. गोसावीरूपानें गेल्याबद्दल माझ्यावर बादशहा खास रागावणार नाहीं! त्याला पुढील संकटाची बातमी आधीं दिलीच पाहिजे, व मी ती देणार!' असें उत्तर

देऊन, व इंदिरेची योग्यकाळीं सुटका करण्यास मला बजावून, तो चालता झाला ! '

' शाबास आहे त्यांची ! ' जिवाजीपंत हर्षानें ह्मणाले, ' शंकरराव, आपणां स्वामीभक्त पुरुषांना अशावेळीं असेंच करणें योग्य आहे ! '

शंकररावांच्या कपाळास आंठ्या पडल्या ! ' मसणांत गेली ती परकीय स्वामीवरील भक्ती ! ' असें संतापानें मनांतल्यामनांत पुटपुटून, ते मोठ्यानें ह्मणाले, ' पण तो गेला तो गेलाच ! अद्याप त्याचा पत्ता नाहीं. मग बाद-शहानें त्याचें काय केलें, नकळे ! '

' शंकरराव, तुह्मांला अशी कशी शंका येते ? माझी खात्री आहे कीं, बादशहा अन्यायानें त्यांच्या केंसासही धक्का लावणार नाहीं ! बादशहानें त्यांना बहुधा स्वारींत नेलें असेल. आपण गेलों ह्मणजे कळेलच ! '

' मलाही असेंच वाटतें. आतां आपण—हे धोंडोपंत देखील—लढा-ईच्या ठिकाणीं जाऊं ह्मणजे झालें ! खरें कीं नाहीं धोंडोपंत ? '

शंकररावांच्या तोंडून मागील एकंदर हकिकत ऐकल्यामुळें, हुसेन किती कपटी व भयंकर मनुष्य आहे, हें धोंडोपंतांच्या पूर्ण लक्ष्यांत आलें होतें. सात्विक मुराररावांची मूर्ति त्यांचे डोळ्यांसमोर उभी राहिली. ती पहातांच धोंडोपंतास इतका प्रेमाचा उमाळा आला कीं, मुरारराव जर खरोखरीच तेथें असते, तर कित्येक घटकांपर्यंत धोंडोपंत त्यांना आलिंगन देऊन रहाते ! पण मुरारराव जवळ नव्हते, व धोंडोपंतास तर त्यांना भेटण्याची फारच इच्छा झालेली ! त्यामुळें, त्यांनीं शंकररावांच्या ह्मणण्यास आपली संमती दिली.

त्यादिवशीं ते त्रिवर्ग अहंमदनगरींच राहिले. एकमेकांच्या पुन्हां भेटी झाल्यामुळें, इंदिरा, कमला, लक्ष्मीबाई, जिवाजीपंत, शंकरराव, व तुकाराम ह्यांना आपापल्या ठिकाणीं जो आनंद झाला, तो वर्णन करणें कठीण आहे. त्यात वरील मंडळीला वाईट वाटण्याजोगी गोष्ट येवढीच होती, कीं, त्यांच्यांत मुरारराव नव्हते. पण ते सुखरूप असतील, बादशहा त्यांचें कांहीं वाईट कर-णार नाहीं, अशी स्वामीभक्त जिवाजीपंतांनीं पुनः पुन्हां खात्री केल्यामुळें, त्यांच्याबद्दल इंदिरा व शंकरराव ह्यांच्याशिवाय कोणास काळजी वाटत नव्हती. इंदिरा तरी आपल्या पतीबद्दल आपणांस काळजी लागली आहे,

असें कोणासही दर्शवीत नव्हतीच; पण तिला काळजी लागली होती खास! व तशी काळजी लागणें अपरिहार्यही होतें. तो नोडगा बादशहा मुरारराबांचा निर्दयपणें प्राण घेईल--कांहीं कमी करणार नाहीं, अशा विचारानें शंकररावांचा जीव तर एकसारखा खाली वर होत होता! असो.

युद्धसंग्रामासाठीं दोन्ही पक्षांची कशी जय्यत तयारी होऊन राहिली, हें मागें सांगितलेंच आहे. अहंमदनगरच्या राज्यांतील रांजणगांव नामक खेड्याच्या ईशान्येस अहंमदनगरच्या सैन्याची छावणी पडली असून, आग्नेयीस विजापूरच्या सैन्याचा तळ पडला होता. दोन्ही छावण्यांमध्यें सुमारें बार कोसांचें अंतर होतें. मध्यें--डोंगर, टकड्या, नद्या किंवा नाले फारसे नसून, लांबच लांब पसरलेलीं सपाट मैदानें मात्र पुष्कळ होतीं. येथेंच उभय-पक्षांची लढाई व्हावयाची होती.

रांजणगांवाजवळ छावण्या पडल्यापासून, सुमारें पंधरा दिवस दोन्हीही पक्षाकडे फारशी गडबड झाली नाहीं; व येवढ्या मुदतींत नांव घेण्यासारखी एकही लढाई झाली नाहीं. फक्त लहान लहान टोळ्यांच्या क्षुल्लक कारणांव-रून उद्भवलेल्या लहान मोठ्या मारामाऱ्या बरीक दररोज चालत असत. पण असें फार दिवस चालणें शक्य नव्हतें. कारण, अहंमदनगरच्या बादशहास, आपल्या मुलुखाची नासाडी होऊं नये, म्हणून, ह्या आगंतुक शत्रूस होताहोईतों लवकर हांकून लावण्याची उत्कट इच्छा होती. उलटपक्षीं, ह्या युद्धास फार दिवस न लागतां, लवकरच एक-दांचा कांहीं सोक्षमोक्ष होऊन जाईल तर बरें होईल, असें शत्रूस वाटत होतें. कारण, जर दिवसगत लागली, तर आपण निजामशाहीच्या मुलुखांत अगदीं आंत शिरलों असल्यामुळें, अर्थात् आपलें राज्य आपणांपासून बरेंच दूर राहिल्यामुळें, आपली रसद बंद होऊन, आपला नाश होण्याचा बळकट संभव आहे, अशी त्यांस भीति वाटत होती! ह्याप्रमाणें दोन्ही पक्ष लढण्यास एका पायावर तयार असल्यामुळें, त्यांच्यांत लवकरच भयंकर लढाई सुरू होणार, असें दिसत होतें.

निजामशहानें हुसेनला आपल्या सैन्यावर मुख्य नेमून, त्याचा हुकूम सर्वांनीं पाळावा, अशी सर्व लष्करांत ताकीद फिरविली. मुरारराव कैद झाले असून ते ह्या रणभूमीवर आले आहेत, हें हुसेनला मुळींच माहीत

नव्हतें ! ह्या लढाईंत आपल्या मनोदयानुरूप सगळें घडून आलें, तर, मुरारराव जरी जिवंत सुटला आहे, तरी त्याच्यापासून आपणांला काडीमात्र भय नाहीं. येवढेंच नाहीं, तर कोणाचेंही भय किंवा भीड धरण्याची आपणांस मग जरूर नाहीं. मग आपण नानाप्रकारच्या विलासांचा यथेच्छ उपभोग घेऊं, अशा आनंदकारक मनोराज्यांत हुसेन गर्क झाला होता ! असो. मनसूरअल्ली निजामशहानें लढाईचा दिवस मुक्रर केला. त्या दिवशीं अहंमदनगरच्या सैन्यानें लढाईची जय्यत तयारी केली. ही बातमी ऐकून विजापूरचें सैन्यही लढावयास सिद्ध झालें. थोड्या वेळानें दोन्हींही सैन्यें समरांगणावर जाऊन ठाकलीं ! विजापूरच्या बादशहानें आपलें सर्व सैन्य एक करून, तें अर्धवर्तुलाकार उभें केलें. त्या सैन्याचीं दोन्हीं टोकें पुढें आलीं असून, मध्यभाग वक्र होऊन मागें हटला होता. शत्रूस तोंड देणारी जी पहिली रांग, ती अत्यंत शूर, राकट व युद्धकुशल लोकांनीं भरली होती. व तशीच मागीलही कित्येक रांगांपर्यंत व्यवस्था केली होती !

इकडे हुसेनही आपल्या सैन्यासह शत्रूसमोर उभा राहिला होता . पण त्यानें आपलें सैन्य त्या समयाला अनुसरून व्यवस्थेनें आणि टापटिपीनें उभें करावें, तसें न करितां, गांगरल्यासारखें करून तो स्वस्थ उभा राहिला ! वस्तुतः तो गांगरला नव्हता. आपण गांगरलों. असें दाखविण्यांत त्याचा हेतू हाच कीं, कांहीं वेळ तरी अहंमदनगरच्या सैन्यानें किंकर्तव्य होऊन स्वस्थ रहावें, व तेवढया वेळांत आपण पूर्वी सुचविल्याप्रमाणें, विजापूरच्या बादशहाने मनसूरअल्लीस शह देऊन कैद करावें. (हुसेननें विजापूरच्या बादशहास काय पत्र पाठविलें, हे वाचकांस एकविसाव्या प्रकरणांत कळलेंच आहे. त्याचे उत्तर हुसेनला मिळालें नाहीं व तें मिळण्याची त्याला अपेक्षाही नव्हती. कारण, एका विजापुरी मसलतगाराने त्याची (हुसेनची) अशी खात्री केली होती, कीं, बादशहा आपल्या सुचनेप्रमाणें निःसंशय वर्तन करील.) पण विजापूरच्या बादशहास हुसेनचें पत्र पोहचलेंच नव्हतें त्यामुळें त्याला हुसेनची रणांगणावरील कृती पाहून अत्यंत आश्चर्य वाटलें; परंतु, ती आपल्याला फायदेशीर आहे, हें लक्ष्यांत आणून, त्यानें मोठया उल्हासाने हुसेनच्या सैन्यावर तीरांचा मारा सुरू केला !

इतकावेळ मनसूरअल्ली निजामशहा स्वस्थ उभा राहिला होता. पण त्याला आतां तटस्थ रहावेना ! तो पुढें घुसला, व शत्रूंचा मारा चालला असतांही मोठ्या प्रयासानें त्यानें आपलें सैन्य अर्धवर्तुळाकार उभें केलें. ह्मणजे आपल्या सैन्याचीं दोन टोकें मागें हटवून, मध्यभाग फुगवून तो त्यानें थेट शत्रूशीं भिडविला. हुसेनला त्यानें सैनिकांस उत्तेजन देण्याकरितां, सर्वांच्यापुढें उभें केलें. युद्धाचा प्रसंग पाहून हुसेनच्या अंगांत फारच वीरश्री संचरली ! पण मोठ्या कष्टानें त्यानें ती आवरली ! तो स्वतःही मन लावून लढेना, व सैन्यासही उत्तेजन देईना ! लढाईचें तर तोंड लागलेलें. बादशहा मनसूरअल्ली कांहीं लोकांनिशी दूर राहून, हा प्रकार पहात होता. त्याला हुसेनच्या ह्या मेषपात्र वर्तनाचा अत्यंत तिटकारा आला. ! त्यानें हुसेनला निरोप पाठवून, खुणा करून, वगैरे अनेक रीतींनीं, असें न करण्याबद्दल फर्माविलें ! पण हुसेनचें ऐकतो कोण ? शत्रूची तर सरशी होऊं लागली ! तेव्हां निरुपायानें बादशहा पुढें आला व सैन्याला उत्तेजन देऊं लागला. हुसेनही विजापूरच्या बादशहावर तो आपल्या सांगण्याप्रमाणे अद्यापही करीत नाहीं, ह्मणून रागावला होता ! त्यानें बादशहास पुन्हां दूर उभें रहाण्याची विनंती केली, व तो स्वतः आतां सेनापतीचें काम उत्कृष्टरीतीनें बजावूं लागला ! ह्याचा निजामशहास फार आनंद झाला. अहंमदनगरच्या सैन्यास अवसान येऊन, तें उत्तमरीतिनें लढूं लागलें. थोडक्यांच वेळांत विजापूरचें सैन्य माघार घेऊं लागलें. तें पाहून अहंमदनगरचें सैन्य पुढें पुढें सरकूं लागलें ! मनसूरअल्ली आनंदानें हुसेनची व आपल्या सैन्याची वाहवा करूं लागला !

आपलें सैन्य मागें हटत आहे, हें पाहून, विजापूरचा बादशहा फार खवळला ! त्याच्या मनांत काय आलें असेल, तें असो; तो आपल्या अगदीं निवडक अशा थोड्या लोकांसह एकदम थेट मनसूरअल्लीवरच चाल करून गेला ! हुसेनला वाटलें कीं, तो हें आपल्या सूचनेचें स्मरण होऊन, त्याप्रमाणें करीत आहे ! ह्मणून त्यानें लढाईचें निशाण एकदम खालीं पाडलें, व लढाई बंद करण्याचें निशाण उभारिलें. बादशहा मनसूरअल्ली सखेदाश्चर्यानें तिकडे पहात आहे, तोंच विजापूरचा बादशहा आपल्या बराच नजीक आला आहे, असें त्याला आढळले ! तो बिचारा गोंधळून गेला. आधीं

जाऊन हुसेनची खरडपट्टी काढून, आपलें सैन्य पूर्ववत सिद्ध करावें कीं, विजापूरच्या बादशहास तोंड द्यावें, ह्याबद्दल त्याचा निश्चय होईना! आधीं हुसेनकडे जावें, तर विजापूरचा बादशहा कदाचित् मध्येंच आपली इतिश्री करील. बरें हुसेनकडे न जातां विजापूरच्या बादशहाला तोंड द्यावें, तर तिकडे विजापूरचें सैन्य आपल्या युद्धपराङ्मुख सैन्यावर चढाई करून जय मिळवील. तेव्हां काय करावें, ह्याचें त्याला कांहीं वेळ गूढ पडलें! शेवटीं मनांत कांहीं निश्चय करून, त्यानें आपल्याजवळच्या एका तिरंदाजाजवळून तीरकमठा घेतला, आणि विजापूरच्या बादशहावर नेम धरून, एक तीर सोडिला तो त्या बादशहास न लागतां, त्याच्या घोड्याच्या मानेला चाटून गेला. हें पाहून मनसुरअल्लीनें अतिशय त्वरा करून, विजापूरच्या बादशहावर लागोपाठ चार पांच तीर सोडिले. विजापूरच्या बादशहाला ते सगळे थोडेबहुत लागलेच; पण त्यांतील एक त्याच्या फारच मर्मी लागून तो घायतळ येऊन घोड्यावरून खालीं पडला.

त्याबरोबर त्याच्या बरोबरच्या लोकांपैकीं एकानें त्याला आपल्या घोड्यावर घेतलें, व शत्रू कदाचित् आपल्यावर चालून येतील, ह्या भयानें, ते लोक त्वरेनें आपल्या सैन्यांत जाऊं लागले. तें पाहून बादशहा मनसूरअल्लीनें त्या लोकांच्या मागें न लागतां, तो हुसेनकडे जावयास निघाला. लढाई संपण्याचें आधींच किंवा पूर्ण जय मिळाला नसतांही, हुसेननें लढाई बंद करण्याचा हुकूम दिलेला पाहून अहंमदनगरचें सैन्य फारच चकीत झालें. हुसेन आज कांहीं तरी अंमल करून आला असावा, असें त्याचे सैनिक परस्परांस ह्मणूं लागले! तथापि, हुसेनचा हुकूम मान्य करणें भाग आहे, असें मनांत आणून, त्यांनीं लढणें बंद केलें. शत्रूपक्षास अर्थातच अधिक जोर येऊन, त्यानें अहंमदनगरच्या सैन्याशीं लगट करून, निकराचा मारा सुरू केला. तरीही हुसेन लढण्याची परवानगी देईना. त्यामुळें त्याच्या सैन्याची दाणादाण होऊं लागली. बादशहा मनसूरअल्ली संतापानें तांबडा लाल झाला. त्यानें हुसेनजवळ जाऊन व त्याला असंख्य शिव्या देऊन, लढाईचें निशाण उभारण्याची आज्ञा केली. पण हुसेननें तिकडे लक्षच दिलें नाहीं. बादशहा स्वतः निशाण उभारावयास गेला, पण निशाणरक्षक हुसेनचे भक्त असल्यामुळें, ते निशाण देईनात. काय करावें, हें बादशहाला

सुचेना ! हुसेनची पक्की समजूत झालेली कीं, विजापूरचा बादशहा आपल्या संकेताप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करीत आहे ! तो त्याला सुलभ व्हावा म्हणून हुसेननें युद्ध बंद केलें. तरीही विजापूरचें सैन्य आपल्याशीं लढतच आहे, हें पाहून त्यास आश्चर्य व दुःख वाटलें ! पुढें काय करावें–काय केलें असतां आपला इष्ट हेतू सिद्धीस जाईल; ह्याचा विचार करीत, बादशहाच्या, किंवा सैनिकांच्या रागाला न जुमानतां, तो स्वस्थ उभा राहिला !

अहंमदनगरच्या सैन्याची अशी स्थिती असतां, विजापूरचें सैन्य लढतच होतें ! कांहीं वेळानें विजापूरचा बादशहाही सावध झाला, व आपल्या जखमा नीट बांधवून, पुन्हां लढाईला उभा राहिला. त्याला पाहून, हुसेननें एक स्वार त्याच्याकडे ' आमच्या बादशहावर चालून या ' असें त्याला सांगण्यासाठीं पाठविला व आपल्या सैन्याला डाव्याबाजूस वळण्याचा हुकूम दिला. मनसूरअल्लीला वाटलें कीं, हुसेननें कांहीं तरी पोक्त विचार करून हा हुकूम दिला असावा. म्हणून, त्यानेंही हुसेनवरचा राग गिळून, डाव्याबाजूस वळण्यास आपली संमती दिली. परंतु, शत्रूच्या इतकावेळ मिळालेल्या मारामुळें त्याचें सैन्य अगदीं जेर होऊन गेलें होतें. त्यांतील जवळजवळ निम्में सैन्य पळून गेलें होतें ! राहिलेल्या निम्म्या सैन्यांतीलही अर्धेअधिक सैन्य निरुपयोगी झालें होतें. जें थोडें दमदार सैन्य अद्यापि तेथें शिलक होतें, तें हुकूम मिळाल्याबरोबर ताबडतोब डावीकडे वळलें व पुढील आज्ञेची वाट पाहूं लागलें. तरीही हुसेन लढावयास आज्ञा देईना ! तेव्हां बादशहा ' लढाई सुरू करा ' असें आपल्या सैन्यास ओरडून सांगूं लागला. शत्रूंनींही अहंमदनगरच्या सैन्याकडे तोंड वळवून मारा सुरू केला. अहंमदनगरचें सैन्य बादशहाच्या हुकुमावरून लढूं लागलें. त्यामुळें हुसेन बादशहावर संतापला. तितक्यांत त्यानें विजापूरच्या बादशहाकडे पाठविलेल्या स्वाराला कोणी ठार केलें, असें त्याला दिसलें, त्यामुळें तर तो पिसाळल्यासारखें करून बादशहावर चालून गेला. कित्येक स्वामिभक्त वीर बादशहाच्या पुढें होऊन हुसेनशीं लढूं लागले ! बादशहाही क्रोधांध झाला. त्यानें जवळच्या एका मनुष्याला सांगितलें, ' आत्तांच्या आत्तां छावणींत परत जा. माझ्या खाजगी तंबू शेजारीं एक हिरवा तंबू आहे. त्यांत

मुरारराव आहे. त्याला ह्मणावें ' छावणींत एक हजार सैन्य प्रसंगीं उपयोगीं पडावें, ह्मणून ठेविलें आहे, तें घेऊन ताबडतोब इकडे ये ' असें ह्मणून बादशहानें मुराररावावरील पहारेकऱ्यास दाखविण्याकरितां, आपला अंगरखा काढून त्या मनुष्याजवळ दिला. तो मनुष्यही अत्यंत वेगानें गेला. इतक्यांत बादशहाच्या पुढें होऊन लढणाऱ्यांचें निवारण करून, हुसेनही बादशहाजवळ प्राप्त झाला. आपली तरवार सरसावून बादशहा हुसेनला क्रोधानें ह्मणाला, ' हरामखोरा ! मी ह्मातारा झालों, ह्मणून तुला हार जाईन, असें समजूं नकोस. ' असें ह्मणून बादशहा हुसेनशीं लढूं लागला. हुसेनही त्याच्याशीं लढूं लागला ! त्या दोघांपासून थोडया अंतरावर बादशहाचे लोक व हुसेनचे लोक एकमेकांशीं लढत होते. हा चमत्कार पाहून शत्रूकडील लोक आश्चर्यचकित झाले. लढणें सोडून ते ह्यांची मजा पाहूं लागले. शेवटीं त्यांच्या बादशहानें विश्रांतीसाठीं छावणींत जाण्याचा हुकूम दिल्यामुळें, ते परत जाऊं लागले.

ज्या समरांगणावर अहमदनगरच्या आणि विजापूरच्या सैन्यांमध्यें लढाई व्हावयाची, तेथें अहमदनगरच्या सैन्याची अपसातच लढाई सुरू झाली, ही गोष्ट किती शोचनीय ह्मटली पाहिजे ?

प्रकरण २७ वें.

लढाईचा उत्तररंग.

ह्या शोचनीय गोष्टीचा परिणाम निजामशाहीला चांगलाच भोवला असता ! विजापूरचा बादशहा आपल्या छावणींत परत गेला, तो अहमदनगरच्या सैन्यांत अपसात यादवी सुरू झाल्यामुळें आनंद पावून ' बरें झालें ! सुटलों ! ' असा विचार मनांत येऊन, परत गेला नव्हता ! असा विचार त्या दिवशीं त्याच्या मनांत येण्याचें कांहीं कारण नव्हतें ! त्या दिवशीं, शत्रुपक्षांत यादवी सुरू होईपर्यंत, त्याला पूर्ण विजय जरी मिळाला नव्हता, तरी, त्याचा पराजयही झाला नव्हता; येवढेंच नव्हें, तर त्याच्या सुदैवानें, हुसेननें त्यादिवशीं जें विचित्र

वर्तन केलें त्यामुळें, त्याची शेवटपर्यंत सरशीच होत गेली ! मग तो शत्रुपक्षाचा पूर्ण पराभव न करितां, आपल्या छावणींत परत कां गेला ! असा प्रश्न उद्भवतो. हा प्रश्न, वाचकहो ! तुह्मांलाच उद्भवला आहे, असें समजूं नका. विजापूरच्या बादशहाच्या हुकूमावरून परत जाणाऱ्या त्याच्या सैन्यांतील पुष्कळ लोकांसही हा प्रश्न उद्भवला; आणि त्यांतील ज्याच्यावर बादशहाची विशेष मेहेरबानगी होती, अशा एका लष्करी अधिकाऱ्यानें नम्रपणें बादशहास वरील प्रश्न विचारिलाही !

बादशहानें त्यास उत्तर दिलें, ' लढूं द्या. अहंमदनगरचा बादशहा आणि त्याचा वजीर, ह्यांना आपापल्या अनुयायांसह परस्परांशीं लढूं द्या. ह्मणजे आपोआपच त्या दोघांचा व त्यांच्या लोकांचा नाश होईल. तोंपर्यंत आपण विश्रांति घेऊं—आपलें सैन्य पुष्कळ दमलें भागलें आहे, तेव्हां त्याला विश्रांतीची जरूरच आहे. मग विश्रांति घेण्याची अशी सोन्यासारखी संधी आली असतां, ती आपण कां दवडावी ? आपसांत लढून आपल्या शत्रुसैन्याचा नाश झाला, आणि तोंपर्यंत आपलें सैन्यही ताजेंतवानें झालें, ह्मणजे आपण थेट अहंमदनगरला जाऊं, व तें शहर काबीज करूं.'

तो लष्करी अधिकारी पुन्हां नम्रतेनें ह्मणाला ' पण सरकार ! आतां जर नेट धरून थोडावेळ आपण शत्रूशीं लढलों, तर मला वाटतें, आपणांसच जय मिळेल ! '

' जय आपणांसच मिळेल, असें खात्रीपूर्वक ह्मणतां येत नाहीं ! कारण, आपण त्यांच्यावर हल्ला केला असतां, ह्या तिसऱ्याशत्रूचा आधीं मोड केला पाहिजे, मग आपण आपसांत लढूं, ह्या विचारानें ते कदाचित् एकत्र होऊन आपणांशीं लढूं लागतील, ते लोक आपल्या लोकांपेक्षां कमी शूर आहेत, असें नाहीं; अर्थात ते एकत्र झाल्यावर त्यांचा पराजय करणें बरच जड जाईल. आता ते लोक थोडे आहेत, ह्मणून, तुह्मी ह्मणाल कीं, आपणांसच जय मिळेल. पण आपलें सैन्य इतकें थकलें आहे कीं, ते अहंमदनगरच्या नांवाजलेल्या थोड्याशा सैन्यावर देखील जय मिळवील, अशी मला खात्री वाटत नाहीं. ह्मणून ह्मणतों, शत्रूंच्या आपसांतील लढाईचा सोक्षमोक्ष काय तो एकदांचा होऊन जाऊं द्या. समानशूर असल्यामुळें अहंमदनगराधीश आणि त्याचा वजीर ह्या दोघांचाही आपापल्या लोकांसह

नाश होईल; बरें, कदाचित् एकापक्षाचा नाश होऊन, दुसरा जिवंत राहिला, तरी, त्याला जिंकणें फारसें कठीण जाणार नाहीं ! '

ह्यावर कोणी कांहीं बोललें नाहीं. विजापूरचें सर्व सैन्य आपल्या छावणींत परत गेलें.

इतक्या अवधींत, ज्याला रणभूमीवर अहंमदनगरच्या बादशहानें आपला अंगरखा देऊन मुराररावांस आपला निरोप कळविण्यास सांगितलें होतें, तो मनुष्य अहंमदनगराच्या छावणींतील बादशहाच्या तंबूजवळ जाऊन पोहोंचला. थोडावेळ इकडे तिकडे पहात उभा राहिल्यावर, बादशहानें सांगितलेला मुराररावांचा तंबू त्यानें ओळखिला. त्या तंबूच्या द्वाराजवळ जाऊन, तेथील पहारेकऱ्यांस त्यानें बादशहाचा हिरवा अंगरखा दाखविला, आणि मुराररावास बंधमुक्त करण्याचा बादशहानें मला हुकूम दिला आहे, असें तो त्यांना अधिकारानें सांगूं लागला.

पहारेकऱ्यांनीं ताबडतोब त्याला सलाम केला, व आंत जाऊन मुराररावांस शृंखलामुक्त करून, ते त्यांना बाहेर घेऊन आले. त्या मनुष्यानें मुराररावास बादशहाचा निरोप सांगून, बरोबर आणिलेला बादशहाचा अंगरखा त्यांच्या स्वाधीन केला. मुराररावांनीं तो अंगरखा घेऊन, मोठ्या भक्तीनें आपल्या मस्तकावर ठेविला ! मग ते ' छावणींत असलेलें हजार लोकांचें सैन्य कोठें आहे ? ' असें त्या निरोप सांगणाऱ्या मनुष्यास विचारूं लागले. तो त्यांना आपल्या समागमें यावयाची विनंती करून, त्या सैन्यावरील मुख्य अधिकाऱ्याकडे घेऊन गेला, आणि त्यानें त्या मुख्य अधिकाऱ्यास बादशहाचा निरोप–हुकूम–कळविला. त्याबरोबर त्या अधिकाऱ्यानें मुराररावास मुजरा केला, त्यांना लष्करी पोषाख व शस्त्रें आणून दिलीं, आणि ' ह्यांचा हुकूम सर्वांनीं पाळिला पाहिजे ' अशी आपल्या सैन्यांत द्वाही फिरविली. मुराररावांनीं लागलीच लष्करी पोषाख चढवून, त्या सैन्यासह समरांगणाकडे कूच केलें. सुमारें अर्धा कोस गेले, तो त्यांना शंकरराव, धोंडोपंत, आणि तुकाराम हे त्रिवर्ग लढण्याच्या तयारीनें चालत असलेले दिसले. मुराररावांनीं आनंदानें शंकररावांस हाक मारिली. धोंडोपंतास पाहून त्यांची मति गुंग झाली ! पण बादशहाकडे जाण्याची घाई असल्यामुळें धोंडोपंत कसे, कोठून व कां आले, हे समजून घेण्याची त्यांना इच्छा झाली

नाहीं. धोंडोपंतही लज्जित मुखानें शंकररावांच्या मागोमाग मुरारराव जवळ आले. मुराररावास रणांगणावर जाण्याची घाई असल्यामुळें, ते थांबले नाहींत. चालतां चालतां त्यांनीं तुकारामास 'इतके दिवस कुठें दडी मारिली होतीस रे बोवा ?' असा प्रश्न केला. प्रश्न केला खरा, पण उत्तर मिळावेंच अशी त्यांची इच्छा दिसली नाहीं, ह्मणून तुकाराम कांहीं बोलला नाहीं. कांहीं वेळानें शंकरराव मुराररावास ह्मणाले, 'मला सोडून तूं बादशहाकडे गेल्यावर, मी तडक घरीं गेलों, व पुढें काय करावयाचें, ह्याचा विचार केला. कांहीं विचार ठरला, त्याप्रमाणें मी केलें आणि जगदंबेनें त्यांत मला यशही पण दिलें. इंदिरा व कमला हुसेनच्या घरांतून सुटल्या असून, हल्लीं आपल्या घरीं सुखरूप आहेत. जिवाजीपंत व लक्ष्मीबाईही आतां बंदिमुक्त झाल्या आहेत. तूं वास्तवीक बादशहाकडे गेलास, त्याचदिवशीं परत यावयाचा. पण तुझा पत्ता नाहीं ! शेवटीं आह्मीं सगळेजण छावणींत— आलों. आह्मी तुझा पुष्कळ तपास केला पण शोध लागेना. अखेरीस तपासाचें काम आह्मां तिघांवर सोंपवून, जिवाजीपंत लढाईंत शिरले.— आपली स्वारी इतके दिवस होती तरी कुठें ?'

मुराररावांचें ध्यान सगळें बादशहावर आलेल्या प्रसंगाकडे लागलें होतें. त्यांचे डोळे रणांगणाकडे होते. त्यांच्या सर्व गात्रांची शक्ती त्यांच्या डोक्यांत, डोळ्यांत, आणि पायांत एकवटली होती ! त्यामुळें त्यांची इतर इंद्रियें अगदीं बधिर झालीं होतीं. अर्थात्, शंकररावांचें भाषण त्यांनीं मुळींच ऐकिलें नाहीं. मग ते त्यांच्या शेवटच्या प्रश्नाला उत्तर कोठून देणार ! मुरारराव कांहीं बोलत नाहींतसें पाहून, शंकररावही पुढें बोलेनातसें झाले. कांहीं वेळानें, ही सर्व मंडळी, ताज्या दमाच्या सैन्यासह समरभूमीवर जाऊन थडकली ! तेथें जाऊन पहातात, तो शत्रूसैन्याचा ठिकाण नसून, हुसेन व बादशहा आपापल्या अनुयायांसह परस्पराशीं निकरानें लढत आहेत ! मुराररावांनीं आपलें सर्व सैन्य एकाठिकाणीं व्यवस्थेनें उभें केलें, व ते स्वतः बादशहाकडे धांवले. बादशहा व हुसेन ह्यांचें द्वंद्वयुद्ध चालूं होतें. दोघांसही लहान मोठ्या जखमा झाल्या होत्या. हुसेनशीं स्वतः लढण्याच्या ईर्षेमुळें, 'आह्मां दोघामध्यें कोणींही येऊं नये' असा बादशहानें हुकूम फर्मावला होता. पण आतां तरण्या हुसेनशीं लढतांलढतां,

म्हातारा बादशहा थकला ! हुसेनचे सपाट्याचे वार त्याला आतां ढालीवर घेतां येईनातसे झालें. तो हुसेनवर एकसारखे वार करीत होता, पण त्यांत जोर मुळींच नव्हता ! कांहीं वेळानें हुसेनच्या जबर वारामुळें त्याच्या हातांतील ढालतरवार खालीं गळून पडली. त्याला वाटलें कीं, आतां निःसंशय आपलीं शंभर वर्षे भरलीं ! तरी तो डगमगला नाहीं ! दांत ओंठ खात जागींच उभा राहिला. आतां आपल्या एका वारावर आपल्या पुढील सर्व महत्वाकांक्षांची मदार आहे, हें मनांत आणून, हुसेननें आपलें शस्त्र सरसावलें तरी पण आपल्यावर अनंत उपकार करणारा बादशहा, आणि तोही निःशस्त्र उभा असलेला पाहून, हुसेन सपाट्यासरशीं वार करावयास कचरला ! परंतु, हा विचार ह्यावेळीं उपयोगाचा नाहीं, असें लागलींच मनांत आणून, त्यानें अतिशय आवेशानें, बादशहाच्या मानेवर अनुलक्षून, वार केला. पण, केवढी आश्चर्याची गोष्ट ! एका धिप्पाड व्यक्तीनें मध्यें घुसून तो वार आपल्या ढालीवर झेलला ! हुसेन आश्चर्यानें त्या व्यक्तीकडे पाहूं लागला. ती व्यक्ती मुरारराव आहेत, हें पाहून त्याला अतोनात आश्चर्य वाटलें, व त्याच्या तोंडचें पाणी पळालें ! आपलीं शंभर-वर्षे भरलीं; अशी आतां त्याची खात्री झाली ! मुराररावांचें अप्रतीम शौर्य त्याला माहीत होतें; व एरव्हीं आपण जरी त्यांच्या बरोबरीला टिकलों, तरी पण ह्यावेळीं, आपण पुष्कळ थकलों असल्यामुळें, आपल्याच्यानें त्यांच्याबरोबर टिकाव धरवणार नाहीं, अशी त्याची पूर्ण खात्री झाली ! तो विचारशून्य व क्रियाशून्य असा एक क्षणभर उभा राहिला ! तेवढ्या वेळात, एका मनुष्यानें हुसेनची कंबर धरून, त्याला वर उचलिलें, आणि हुसेनचे अनुयायी त्याच्याशीं झटापट करीत असतांही, त्यानें हुसेनला बादशहाच्या मागें नेऊन उभें केलें ! बादशहा आणि मुरारराव मागें वळून आश्चर्यानें त्या मनुष्याकडे पाहूं लागले. त्याला ओळखून मुरारराव मोठ्यानें म्हणाले, ‘ कोण ? जिवाजीपंत ? ’ तो मनुष्य म्हणाला, ‘ होय, तोच मी ! ’ बादशहा म्हणाला, ‘ सुभेदार जिवाजीपंत, लढाईला येण्याबद्दल हुकूम पाठविला, तेव्हां तुम्ही आला नाहीं. असो. आतां वेळेवर तरी आलात. बांधा, जखडा, त्या मातागमन्याला, काफराला, हरामखोराला ! ’ बादशहा संतापानें वेडा झाला. तो हुसेनला वेड्यावाकड्या शिव्या देऊं लागला. जिवाजीपंतांनीं धोतरानें

हुसेनचे हातपाय पक्के बांधिले, व त्याला बळकट धरून, बादशहाच्या पुढील हुकुमाची ते वाट पहात उभे राहिले. हुसेनचे अनुयायी बादशहाच्या अनुयायांपेक्षां प्रथमपासूनच कमी होते; व आतांतर, त्यांतील पुष्कळ मेल्यामुळें, फारच थोडे राहिले होते. तरी पण ते जिवावर उदार होऊन लढत होते. हुसेनला चिवाजीपंतांनीं उचलून नेल्यावर तर त्यांनीं बादशहाच्या लोकांवर भयंकर हल्ला केला. पण बादशहाच्या पुष्कळ लोकांपुढें तो निष्फळ झाला व हल्ला करणाऱ्यांपैकीं बहुतेकजण मरून व जखमी होऊन पडले ! राहिलेल्या थोडक्या लोकांस हुसेन ' पळून जा ' असे ओरडून व खुणाकरून सांगूं लागला. तेव्हां त्यांनीं त्याप्रमाणें केलें. पण पाठलाग करणाऱ्या बादशहाच्या लोकांपासून बिचारे सुखरूप सुटले नाहींत !

आतां बरीक तेथें सर्वत्र शांत झालें. सेवकांनीं तयार करून दिलेल्या बैठकीवर बादशहा बसला. मुरारराव कांहीं अंतरावर उभे होते. जिवाजीपंतही हुसेनला धरून उभे राहिले होते. बादशहा जिवाजीपंतास ह्मणाला, ' सुभेदार तुह्मी माझ्यासारखेंच ह्मातारे आहांत. तें तरुण कारटें, तुमच्या हातावर केव्हां तुरी देईल, हे तुह्मांस कळणार देखील नाहीं. ह्मणून तुह्मी व्हा दूर.—मुरारराव, आतांपासून हुसेनला मी तुझ्या स्वाधीन करितों. त्याला नीट संभाळ, व मी हुकूम करीन, त्यावेळीं त्याला माझ्या पुढें हजर कर. समजलास ? त्याच्या जिवाला कांहीं अपाय झाल्यास, किंवा तो तुझ्या हातून सुटून पळून गेल्यास मी तुला सुळीं देईन ! जा. त्याच्यासुद्धा आतां माझ्या नजरेआड हो. '

मुरारराव हुसेनला घेऊन छावणीकडे जाऊं लागले. त्यांच्याबरोबर शंकरराव, धोंडोपंत, तुकाराम व आणखी वीसपंचवीस लोक होते. ते हुसेनसह छावणींतच रहाणार होते. पण शंकररावांच्या सल्यावरून ते अहंमदनगरीं आपल्या घरीं जाऊन राहिले. हुसेनला त्यांनीं बोलून किंवा कृतीनेंहि दुखविलें नाहीं. त्याच्यावर त्यांची सक्त देखरेख मात्र होती !

हुसेनखानासह मुराररावांस लावून दिल्यावर, बराच वेळ बादशहा समरभूमीवरच बसला होता. तो अगदीं खिन्न व संतप्त झाला होता. जिवाजीपंताखेरीज तो कोणाशींही बोलत नव्हता व त्यांच्याशीं तरी आपल्या जखमा कितपत भयंकर आहेत, ह्याविषयींच त्रोटक रीतीनें

बोलत होता. जिवाजीपंत त्याच्या जखमा बांधून, त्याची शुश्रूषा करीत बसले होते.

कांहीं वेळानें बादशहाचा एक प्रमुख गुप्त हेर त्याच्या जवळ आला व मुजरा करून त्याला ह्मणाला, खाविंद, विजापूरचा बादशहा आपल्या सैन्यासह आपल्या राज्यांत परत जावयास निघाला. अर्धीअधिक मजल गेला देखील असेल. हुजूरची व वजीर साहेबांची चकमक संपल्यावर थेट अहंमदनगरीं जाण्याचा त्याचा बेत होता. पण आपलें एक हजार सैन्य अजून शिल्लक आहे हें ऐकून त्याला काय वाटलें कोण जाणें, तो एकदम परत जावयास निघाला ' अहंमदनगरचें सैन्य आपल्यामागें लागलें, तर मात्र आपण त्याला तोंड देऊं, व कसेंही करून आपल्या मुलुखांत जाऊन पोहोंचूं ! ' असें तो आपल्या एका सरदाराजवळ ह्मणाला. सरकार ! त्याला अजूनही आपला दरारा आहे, अशी माझी खात्री झाली ! '

एकंदर हकिकत ऐकून, बादशहाला किंचित् आश्चर्य व किंचित् अभिमान वाटला. ' आपला दरारा ' हा शब्द ऐकून बरीक तो जरा चमत्कारिक हंसला. थोडावेळ त्यानें विचार केला, व मग आपल्या सर्व सैन्यासह तो छावणींत परत गेला. एक दोन दिवसांनीं त्यानें आपली छावणी मोडिली, व सर्व सैन्यासह तो अहंमदनगरीं जाऊन दाखल झाला. विजापूरच्या सैन्याच्या पाठलागास त्यानें आपलें सैन्य धाडिलें नाहीं.

' अहंमदनगरचें हजार सैन्य अजून शिल्लक आहे ' व तें लढण्यासाठीं रणभूमीवर आलें आहे ' अशी बातमी ऐकल्याबरोबर, मोठें सैन्य जवळ असतांही, विजापूरचा बादशहा स्वदेशीं परत गेला, ह्याचें कारण मनसूरअल्ली निजामशाहाचा पूर्वीपासून बसलेला दरारा, हे वाचकांस सांगावयास नकोच !

प्रकरण २८ वें.

हुसेनविरुद्ध पुरावे.

घरीं नेल्यावर मुराररावांनीं हुसेनखानास शब्दांनीं किंवा कृतीनें दुखविलें नाहीं, हें मागील प्रकरणीं सांगितलेंच आहे. घरीं त्यांनीं त्याला मोकळेंच सोडिलें होतें, नेहमींप्रमाणें कालक्रमणा करण्याची त्यांनीं त्याला पूर्ण मुभा दिली होती. त्याची व त्याच्या बहीण-बायकोची भेट सुद्धां त्यांनीं होऊं दिली ! परंतु, हुसेननें आपल्या दुःखित बहिणीचें व बायकोचें पुष्कळ समाधान करून, ' तूर्त कांहीं दिवस आपल्या घरीं स्वस्थ रहा ! ' असें सांगितलें. त्यांनीं बिचाऱ्यांनीं त्याप्रमाणें केलें. अशा बिकट स्थितींत सुद्धां हुसेनची वृत्ती नेहमींप्रमाणेंच कां दिसते-तींत काडीमात्र बदल कां दिसत नाहीं, हें गूढ त्यांनाच काय, पण मुराररावाखेरीज कोणालाही फारसें उकललें नाहीं. मुराररावास विचारांतीं हुसेनचें त्यावेळचें अंतरंग पूर्ण कळलें होतें. स्वतःचा, बादशहाचा व निजामशाहीचा हितशत्रू, म्हणून त्यांचा हुसेनवर पुष्कळ राग होता. परंतु तो राग शब्दांनीं प्रगट करण्याचा, किंवा कृतीनें भोंवविण्याचा नीचपणा उदारमनाच्या मुराररावांनीं एकदांही केला नाहीं ! त्यांनीं हुसेनच्या दर्ज्याप्रमाणें त्याची बरदास्त ठेविली होती. मात्र हुसेनला आपल्या वाड्याबाहेर जाण्याची त्यांनीं परवानगी ठेविली नव्हती. येवढेंच नव्हे, तर हुसेन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करील, ह्या भीतीनें, त्याच्या हालचालीवर कडक नजर ठेवण्याचा हुकूम त्यांनीं आपल्या तुकाराम आदिकरून विश्वासू व हुषार नोकरांस दिला होता ! हें पाहून हुसेन आपल्या मनांत म्हणाला, ' वेड्या मुराररावा ! मी आत्महत्या करूं नये, म्हणून तुझा हा येवढा खटाटोप ! पण मी आत्महत्या करीनच कशाला ? एका कार्यांत अपयश आल्याबरोबर, किंवा नाचक्की झाल्याबरोबर, आत्महत्या करूं लागल्यास, माझ्या सारख्या महत्वाकांक्षी पुरुषाला, अंतिमसाध्य साधीपर्यंत अनेक जन्म घ्यावे लागतील !

थोडक्याच दिवसांत बादशहा भरदरबारांत माझी फटफजीती करील,

आणि सुळीं देण्याची किंवा दुसरी एखादी प्राणघातक भयंकर शिक्षा मला देईल, हें मी जाणून आहे. तशा रीतीनें मरण आलें तरी तें मला पतकरलें, पण मी आत्महत्या करणार नाहीं! कारण, काय नेम सांगावा, बादशहाची दयावृत्ति त्याला कदाचित् हद्दपारी-सारखी किंवा तुरुंगांत ठेवण्यासारखी सौम्य शिक्षा मला देण्यास भाग पाडील! मी जर आत्महत्या केली, तर मला हा लाभ कोठून मिळणार! आत्महत्या केली नाहीं तर मात्र मला हा लाभ मिळ-ण्याचा संभव आहे. आणि हा जर मिळाला तर मी माझ्या कारस्थानांच्या योगानें इच्छित हेतु सिद्धीस नेईनच नेईन! माझा अंतिमहेतु सिद्धीस गेला म्हणजे जे लोक परवांच्या दरबारांत माझी फजीती करतील, किंवा केलेली पहातील, तेच शेवटीं, 'आपली योग्यता निःसंशय अवर्णनीय आहे; मागें आपल्यावर भलताच आळ येऊन, विनाकारण आपला छळ झाला!' वगैरे बोलून माझी स्तुति करितील! ज्याचा शेवट चांगला, तें सर्वच चांगलें असें लोकांस दिसतें, हें मला पक्कें ठाऊक आहे! अर्थात् ह्या फजितीची व निंदेची पर्वा बाळगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आणि मी ती बाळगीतही पण नाहीं! आतां कदाचित् बादशहानें सुळाची वगैरे शिक्षा दिलीच, तरी कांहीं फिकिर करण्याचें कारण नाहीं. कारण, महत्वाकांक्षा सिद्धीस नेण्याचा मार्ग फार कठीण आहे. ह्या मार्गांत शिरल्यावर मरण केव्हां येईल, ह्याचा कांहीं नियम नाहीं. मग मरणाची भीति धरून ह्या मार्गांतून चालणें म्हणजे पाण्यांत राहून माशांशीं वैर करणेंच नव्हे काय? त्याचप्रमाणें ह्या मार्गांतून चालतांना नाचक्कीची पर्वा करणेंही योग्य नाहीं! मग नाचक्की होईल, म्हणून मी आत्महत्या काय म्हणून करीन? छे! छे! मुरारराव! तूं मला मित्रत्वाच्या नात्यानें आत्महत्या करण्याचा उपदेश जरी केलास तरी देखील मी ती करावयाचा नाहीं! येवढेंच नाहीं तर, झाल्या किंवा पुढें होणाऱ्या प्रकाराबद्दल मी विषाद देखील मानणार नाहीं. कारण, मी जें केलें, किंवा करणार होतों, असल्या, कामांत क्षुल्लक चूक जरी झाली, तरी हल्लींच्या सारखील प्रसंगाप्रमाणें प्रसंग यावयाचाच!'

प्रियवाचकहो! हुसेनच्या वरील उद्गारांवरून, मुराररावांच्या घरीं, त्याची वृत्ती नेहमींप्रमाणेंच कां होती, ह्याची तुह्मांला सहज अटकळ झाली असेल.

हुसेनच्या चेहऱ्यामोहऱ्यावरून, व चालचलणुकीवरून मुराररावांनींही अशीच अटकळ बांधिली होती.

मुराररावांच्या येथें हुसेन जरी नित्याप्रमाणें मजेनें दिवस घालवीत होता, तरी आपल्या एकंदर कारस्थानांत चूक कोठें झाली, ह्याचा एकसारखा तलास लावण्याचा प्रयत्न करण्यावांचून त्याच्यानें राहवलें नाहीं. मुराररावांच्या घरीं इंदिरेस व कमलेस पाहून, आश्चर्यानें त्यानें ह्या येथें कशा आल्या, ह्याची पूसतपास केली. जेव्हां त्याला त्यांच्या येथें येण्यासंबंधाचा खरा प्रकार कळला—कमलेचा व इंदिरेचा कांहीं संबंधही असलेला कळला, आणि ओघाओघानें शंकररावांचीही हकिकत कळली, तेव्हां 'आपण मुराररावांचा जिवलग दोस्त जो शंकरराव, ह्याचा, त्याचें मुरारराववरील प्रेम आपणांस माहित असतांही, कांहीं बंदोबस्त केला नाहीं—आपणांला त्याचें स्मरणच झालें नाहीं—ह्यामुळें बऱ्याच अंशीं आणि आपण पाठविलेल्या मारेकऱ्यांच्या हातून मुरारराव सुटले, ह्यामुळेंही बऱ्याच अंशीं, आपलें पहिलें (मुराररावाविरुद्ध) कारस्थान फसलें ' अशी त्याची खात्री झाली ! आपण बादशहाविरुद्ध विजापूरच्या बादशहाकडे केलेलें कारस्थान कां फसलें; हें मात्र त्याला समजेना ! ज्या स्वाराच्या हातीं आपण विजापूरच्या बादशहाकडे पत्र पाठविलें, त्याला आपण, ' तूं आतां परत आला नाहींस, तरी चालेल. पत्रांत लिहिल्याप्रमाणें वागण्याचा बादशहास अत्याग्रह कर, व त्याच्याबरोबर त्याच्या इकडच्या मोहिमेंत ये ' असें नीट समजावून सांगितलें. ह्यामुळें तो स्वार आपल्याकडे आला नाहीं. अर्थात् त्याच्याकडूनच कांहीं चूक झाली, असें बराच वेळ हुसेनला वाटेना ! ' विजापूरचा बादशहाच भित्रा व मूर्ख ! त्यानेंच ह्या चालत आलेल्या लक्ष्मीला पाठ दिली झालें ! ' असें हुसेन मनांत ह्मणूं लागला ! पण लागलींच, ' आपणतरी आपल्या लिहिण्याप्रमाणें विजापूरचा बादशहा करीलच ह्या खात्रीनें, वास्तविक तो कबूल झाला आहे कीं नाहीं, हें लढाईच्या अगोदर आपणांस कळण्याची तजवीज कां केली नाहीं ? ' असाही प्रश्न त्यानें स्वतःला केला. आणि आपण ही तजवीज केली नाहीं, हीच आपली ह्या दुसऱ्या कारस्थानांतील चूक होय, असें त्यानें ठरविलें. याचप्रमाणें विजापूरचा बादशहा आपल्या लिहिण्याप्रमाणेंच करील, अशी निष्कारण खात्री झाल्यामुळें त्याच्या बरोबर

आपला स्वार लढाईंत आला कीं नाहीं, ह्याचा सुद्धां आपण शोध केला नाहीं, ही ह्या कारस्थानांतील आपली दुसरी चूक, असें हुसेननें ठरविलें. आपला स्वार लढाईंत होता कीं नाहीं, ह्याबद्दल पुष्कळ विचार केल्यावर, तो लढाईंत नव्हता, असें त्याला वाटलें. कांहीं तरी आकस्मिक, अनिवार्य कारणामुळें आपला विश्वासू स्वार विजापूरच्या बादशहाजवळ जाऊन पोंहों-चला नाहीं, हेंच आपलें कारस्थान फसण्याचें कारण, अशी त्याची खात्री झाली. तथापि, मघाच्या दोन ढोबळ चुका जर आपल्याकडून झाल्या नसल्या, तर केवळ ह्या शेवटच्या व मुख्य कारणामुळेंच, झाला हा प्रकार झाला नसता. आपलें कारस्थान फसल असतें. पण त्याबद्दल आतांच्या सारखा बोभाटा झाला नसता, व बादशहाकडून आपणांस आतां जी शिक्षा मिळेल, ती मिळण्याचा प्रसंग आला नसता, असें हुसेन स्वतःशी ह्मणूं लागला ! '

येणेंप्रमाणें बाहेरून शांतपणें, पण आंतून भूत, वर्तमान, भविष्य स्थितीचा विचार करीत हुसेन मुराररावांच्या घरीं रहात होता !

आमिना व हमीदा हुसेनला भेटावयास मुराररावांच्या घरीं आल्या, तेव्हां इंदिरा किंवा कमला ह्यांपैकीं कोणीही त्यांच्या दृष्टीस पडलें नाहीं, त्यामुळें त्या येथें आल्या असतील, असें त्यांच्या स्वप्नींही आलें नाहीं. हुसेनला तें सर्व कळलें असून, त्यानें तें आपल्या बहिणीला व बायकोला मात्र कळविलें नाहीं ! पुढें त्यांना तें आपोआपच कळेल, असें त्याला वाटलें.

बादशहा अहंमदनगरीं आला, तरी पुढें काय करावयाचें ह्याचा त्याला उमज पडेना ! हुसेनच्या कृतघ्नपणावांचून दुसरी गोष्टच त्याच्या मनांत घोळेना ! दुष्ट व भयंकर हुसेन आपल्यापुढें उभा राहून आपल्याशीं लढत आहे, ह्या देखाव्यांवाचून त्याच्या डोळ्यांस कांहींच दिसेना. ' बादशहा ' ह्या दृष्टीनें त्याची स्थिति मोठी शोचनीय झाली होती. समरांगणावरील प्रकार झाल्यानंतर, हुसेनच्या कित्येक भक्तांनीं अहंमदन-गरच्या राज्यांत, बादशहाबद्दल नाहीं नाहीं त्या कंड्या पिकवून, ' हुसेन निर्दोषी आहे. तो चांगला कौशल्यानें लढाई देण्याचा प्रयत्न करीत असता, बादशहा विनाकारण त्याच्या जिवावर उठला, ' असा गैरसमज करून दिला होता ! विजापूरच्या बादशहासारख्या निजामशाही बाहेरील

लोकांस मनसूरअल्ली बादशहाचा जरी पूर्वीप्रमाणेंच दरारा वाटत होता, तरी खुद्द त्याच्या राज्यांत त्याचा वचक बराच कमी झाला होता. बादशहाजवळ हजार दीड • हजार सैन्यापेक्षां अधिक सैन्य नसल्यामुळें नवीन उत्पन्न झालेल्या चोर व लुटारूंचा बंदोबस्त त्याच्याच्यानें होईना. त्यामुळें प्रजाही त्याच्यावर नाखूष होऊं लागली. बादशहाची मनःस्थिती नीट नसल्यामुळें, व त्याचा धाकही बराच कमी झाल्यामुळें, मुलकीखात्यांत सुद्धां अंदाधुंदी माजण्यास आरंभ होऊं लागला ! बिचारा बादशहा गोंधळून गेला ! शेवटीं, ' आतां मुराररावांच्या सल्ल्याप्रमाणेंच करावयाचें ' असा त्यानें बेत केला. त्याला स्वतःला ही सर्व स्थिती मोडितां आली नसती, असें नाहीं. पण आतां त्याचें मन ठिकाणावर नसल्यामुळें, त्याला मुराररायांची मदत घेणेंच इष्ट वाटलें. त्याप्रमाणें त्यानें मुराररावांस आपणांकडे बोलाविलें.

हुसेनचें कपटवृत्त अथपासून इतीपर्यंत जाणण्याची अतिशय उत्कंठा असल्यामुळें, मुरारराव आल्यावर बादशहानें त्यांना प्रथम ' हुसेन कपटी आहे—त्याच्यावर तुह्मी विश्वास ठेऊं नका ' असें ह्या लढाईच्या पूर्वी तूं मला सांगत होतास, नाहीं ? तें तुला कसें कळलें, तो सर्व प्रकार मला खराखरा सांग. ' असें ह्मटलें. मुराररावांनीं एकंदर सर्व हकीगत सांगून, हुसेनचें पहिल्यापासूनच आपणाशीं गुप्त वैर कसें होतें, त्यानें कपट करून आपल्या पत्नीला कशी पळवून नेली, कारस्थानाचा स्फोट होईल, ह्मणून त्यानें जिवाजीपंतांस सहकुटुंब बंदींत कसें घातलें, त्यानें बादशहाला न कळत वजीरी घेण्यासाठीं परत येण्याचा सरकारी हुकूम कसा पाठविला, आपल्या नांवाचीं हस्तपत्रकें जिकलेल्या मुलुखांत कशीं गुप्तपणानें वाटविलीं, कुतुबशहाकडे त्यानें कसें कारस्थान केलें, पुढें विजापूरच्या बादशहाकडेही संधान लावून बादशहाचा नाश करण्याचा कसा घाट घातला, पण सुदैवानें त्याचें पत्र हातीं लागल्यामुळें, तो घाट कसा फसला, इत्यादि गोष्टी बादशहास नीट समजाविल्या.

ह्या एकंदर हकिकतीचे पुरावे व जीं हुसेननें वेळोवेळीं पाठविलेलीं पत्रें, तींही मुराररावांनीं बादशहापुढें सादर केलीं.

एकंदर हकीकत ऐकून, व त्या हकिकतीचीं सत्यत्वदर्शक पत्रें पाहून,

बादशहा भयचकित झाला ! हुसेन इतका भयंकर मनुष्य असेल, असें त्याला कधींही वाटलें नव्हतें ! मुराररावांच्या पत्नीचें हलकटपणानें वर्णन करण्यांत, मुरारराव येईपर्यंत स्वतःकडे वजिरी घेण्यांत, ' आपल्याहुकुमाप्रमाणें मी येतों ' असें मुराररावांचें पत्र आलें, त्यावरून त्यांचा राज्यापहाराचा हेतू आहे, अशी आपली खात्री करण्यांत, कुतुबशहाकडून धमकावणीचें पत्र आणवून मुराररावांच्या नीचहेतूबद्दल आपणांस शंकाही न उरूं देण्यांत, बावळट घाडोपंतांकडून आपल्या हेतूला अनुकूळ अशी मुराररावांसंबंधीं माहिती सांगविण्यांत, मुराररावांस पकडून आणण्यासाठीं आपले लोक पाठविण्याची परवानगी घेण्यांत, आणि शेंवटीं रांजणगावच्या लढाईंत सेनाधिपत्य घेण्यांत हुसेनचे अंतर्हेतु किती दुष्ट व भयंकर होते, व ह्या प्रत्येक गोष्टीच्या मुळाशीं त्यानें रचिलेल्या कारस्थानांच्या झाडांचीं मुळें, आपल्या अज्ञानरूपी विपुल पाण्यामुळें, किती खोल जाऊन पसरलीं होतीं, हें आज बादशहाच्या लक्ष्यांत येऊन, आपलें राज्यमंदीर ह्या झाडांच्या मुळ्यांच्या संसर्गामुळेंच डळमळत आहे (ह्मणजे राज्यांत बरीच बेबंदशाही माजली आहे) अशी त्याची खात्री झाली; व ह्याबद्दल हुसेनला भयंकर शासन देण्याचा तो विचार करूं लागला. कांहीं वेळ विचार करून, तो मुराररावांस ह्मणाला, ' आपण आतां एक दरबार भरवूं. त्यांत हुसेनवर—

१ हुसेननें एका निरपराधी साध्वीची इज्जत घेण्याचा प्रयत्न केला,

२ त्यानें मला—बादशहाला—न विचारितां सरकारी शिक्कामोर्तबांचा उपयोग केला,

३ त्यानें निजामशाहीच्या एकनिष्ठ अशा सुभेदारास—जिवाजीपंतांस—विनाकारण त्रास दिला,

४ तो दोनदां शत्रूंस फितूर झाला,

५ त्यानें मला पदच्यूत करण्याचा घाट घातला.

असे पांच आरोप ठेवून, त्याला भयंकर शिक्षा करण्याचा माझा विचार आहे ! त्याच्याबद्दल मला आतां मुळींसुद्धां प्रेम राहिले नाहीं ! '

मुरारराव ह्मणाले, ' सरकार, मी फक्त माझ्यापुरता विचार केला, तर मला असें ह्मणावें लागेल, कीं, आरोप ठेवण्याच्या व दरबार भरविण्याच्या

भानगडींत न पडतां, हुसेनला एकदम परलोकास धाडावें. मी त्याचा शत्रू आहे—त्यानेंच मला आपला शत्रु मानला—तेव्हां मी असा सल्ला देईन, हें सांगावयास नकोच ! पण हल्लीच्या एकंदर परिस्थितीकडे पाहून हुसेनवर आरोप ठेविले पाहिजेत व त्याला शिक्षा केली पाहिजे, असें मी आपला हितचिंतक सेवक ह्या नात्यानें सांगतो. '

' मग कोणते आरोप ठेविले पाहिजेत, व काय शिक्षा दिली पाहिजे, असें तुला वाटतें ? '

' आपण जे आरोप ठेवूं पहातां, त्यांतील पहिला तर मला मुळींच इष्ट वाटत नाहीं. कारण, त्यासंबंधीं हुजूर, आणि अशी चारचौघे, ह्यांच्याशिवाय कोणालाही कांहीं माहिती नाहीं. ती माहिती आरोप ठेविल्यामुळें सर्वांस होईल. तशी माहिती होऊन माझी पत्नी लोकचर्चेचा विषय होऊन रहावा, हें मला बरं वाटत नाहीं. तशांत माझी पत्नी हुसेनच्या घरीं भ्रष्ट झालेलीही नाहीं, तेव्हां ती गोष्ट झाली इतक्यावरच आटोपावी, हें बर. त्याबद्दल ईश्वर हुसेनला शिक्षा दिल्यावांचून रहाणार नाहीं, अशी माझी बालंबाल खात्री आहे. दुसरा आणि चौथा आरोप हुसेनवर ठेवणें, ह्मणजे सरकाराविषयीं कलुषित झालेल्या बहुजनसमाजाला, ' सरकार मूर्ख आहेत; हुसेननें येवढीं कारस्थानें केलीं— कारस्थानें करणें मनुष्यस्वभावास अनुसरून आहे—पण सरकारास त्यांचा मागमूस सुद्धा लागला नाहीं ! ' अशाप्रकारचे निंदास्पद प्रलाप काढण्याची परवानगी देणें होय ! तिसरा आरोप ठेवणे पहिल्या आरोपाप्रमाणेंच मला इष्ट वाटत नाहीं. कारण, त्यांतही माझ्या घरच्या कांहीं गोष्टी बाहेर येतील. आतां राहतां राहिला पांचवा आरोप. तो मात्र हुसेनवर ठेवावा. व लोकांस खरा वाटावा, ह्मणून सर्वांस हुसेनचें हें विजापूरच्या बादशहाकडे धाडिलेलें स्वदस्तुरचें पत्र दाखवावें. हुसेनच्या ह्या गुन्ह्याचें स्वरूप अत्यंत भयंकर दाखविण्यांत यावें. आणि सरतेशेवटीं हुसेनला त्याच्या अपराधाची क्षमा करावी. ह्मणजे त्याचे दोस्त व भक्त स्वस्थ रहातील ! आणि इतर लोकांसही आपली ही दया पाहून, आपल्याविषयींची त्यांची पूज्यबुद्धि पुन्हां प्रज्वलित होईल ! बादशहा ! ह्मणाला, ' तूं जें बोलतोस, तें सर्व मुत्सद्दीपणाचें आहे, हें मला कबूल आहे. व त्याप्रमाणें मी करीनही. पण तूं शेवटीं जी गोष्ट सांगितलीस, ती मात्र मी मुळींच

ऐकणार नाहीं ! हुसेनला मी कडक शिक्षा करणार ! मग त्याचे दोस्त संतापोत, किंवा लोक मला दुष्ट समजोत ! ज्यानें आपल्या महत्त्वाकांक्षारूप अग्नीनें मला—बादशहाला— त्याच्या देवाला ह्मणावयास काय हरकत आहे ? चटका देण्याचा प्रयत्न केला, त्याला मी आपल्या क्रोधाग्नींत पार जाळून टाकीन, कधीं सोडणार नाहीं ! '

' तें सर्व खरें. पण आपण आपल्या भोंवतालच्या परिस्थितीकडे नीट लक्ष्य द्या. ' कडवा ? मुसलमान ' ' खरा मुसलमान ' ह्मणून हुसेन नांवाजला आहे. त्यामुळें अल्पकाळांत लोकमत वदलूं शकणाऱ्या मुसलमान धर्माधिकाऱ्यांस तो फार प्रिय आहे. सरदार-दरकदार मंडळींतही त्याच्याबद्दल फार आदर वास करीत आहे. लोकांपैकीं कोणी त्याच्या विद्वत्तेमुळें, कोणी शौर्यामुळें, कोणी दानधर्म-रूपीं औदार्यामुळें व कोणी तर त्याची कीर्ति ऐकूनच, हा कोणी तरी असामान्य पुरुष आहे, असें मानितात. अर्थात् वर वर पहाणाऱ्या ह्या लोकांस अशा महत्पुरुषाला शिक्षा देण्यांत बादशहाचीच कांहींतरी चूक झाली असली पाहिजे, असें वाटणार ! व ह्या गोष्टीचा फायदा—तुह्मी सर्व धर्मांस सारखाच मान देतां, ह्यामुळें जे तुमच्यावर रुष्ट आहेत, जे तुह्मांला खरे मुसलमान ह्मणत नाहींत—ते मुसलमान धर्माधिकारी तावडतोब घेतील आणि हुसेन स्वधर्माप्रमाणें वागत होता, हें बादशहाला पहावत नव्हतें, ह्मणून त्याच्यावर कांहींतरी कुभांड रचून, बादशहानें त्याला विनाकारण शिक्षा दिली ! असें सरकारास नकळत सांगत सुटतील ! शिवाय सरदार मंडळीस तो मान्य व प्रिय असल्यामुळें त्याला क्षमा करावी असा ते आपणांस जोराचा आग्रह करितील. इतक्या सरदारांच्या विरुद्ध जाणें फार कठिण आहे. ह्मणून ह्मणतो—' मुराररावांचें बोलणें पुरें होण्याच्या आधींच बादशहा ह्मणाला, ' मुारराव ! सगळे लोक, सगळे धर्माधिकारी, सगळे सरदार ह्यांना हुसेनच प्रिय आहे, हुसेनबद्दलच त्यांना पूज्यबुद्धी आहे, माझ्या किंवा तुझ्याबद्दल नाहीं, असें तू ह्मणतोस कीं काय ? ' ' तसें नाहीं खांविंद ! पण सर्व राज्यांत हुसेनच्या भक्तांनीं आपल्याबद्दल अनेक बाईट साईट बातम्या पसरविल्या आहेत, त्यांतच राज्यसंबंधीं कामांच्या हल्लींच्या अव्यवस्थेची भर पडली आहे, त्यामुळे आंधळ्याजनसमाजांत आपल्या बद्दलची पूज्यबुद्धी बरीच कमी झाली आहे—'

'तें कांहीं असो. मी हुसेनला शिक्षा देणार!'

'सरकारापुढें बोलण्याची माझी काय प्राज्ञा? पण सरकारास माझी येवढी सविनय प्रार्थना आहे कीं, हुसेनला शिक्षा द्यावयाचीच तर थोडीतरी सौम्य देण्यांत यावी. त्याचा प्राण घेऊं नये! हल्लींच्या परिस्थितीला हेंच योग्य करणें होय.'

बादशहा थोडावेळ स्वस्थ बसला, व मग म्हणाला, 'तुझा फारच आग्रह आहे, तर मी हुसेनला हद्दपारीची सौम्य शिक्षा देतों. आणि ती मी देणारच! आतां मी ह्या बाबतींत तुझें मुळींच ऐकणार नाहीं. बस ठरला बेत. आजपासून पंधरा दिवसांनीं दरबार भरवावयाचा. त्याची योग्य ती तयारी करण्याचें काम मी तुजवर सोंपवितों.'

इतकें बोलणें झाल्यावर मुरारराव आपल्या घरीं गेले. पंधरा दिवसांनीं ठरल्याप्रमाणें दरबार भरला. दरबारचा मंडप इतका शृंगारला होता कीं, तो देवद्राच्या सभामंदिराप्रमाणें भासत होता! प्रांतोप्रांतींचे सुभेदार, जहागिरदार, इनामदार, सावकार, शेतकरी, व्यापारी, वगैरे लोकांस दरबारास त्या दिवशीं येण्याबद्दल आमंत्रणें करण्यात आलीं, व त्याप्रमाणें पुष्कळ लोक आलेही! दरबाराबाहेर निजामशाहीचें सर्व सैन्य व्यवस्थेनें उभें राहिलें होतें. अहंमदनगरच्या एकुणएक लोकांस दरबारास येण्याची त्या दिवशीं परवानगी असल्यामुळें, पुष्कळच लोक आले होते. दरबार गच्च भरला! शेवटीं असंख्य लोकांचे मुजरे घेत घेत मुराररावासह बादशहाची स्वारी सिंहासनाजवळ आली. मुरारराव स्वस्थानापन्न झाले, व बादशहा उच्च सिंहासनावर विराजमान झाला. हुसेनला आधींच तेथें आणिलें, व त्याच्या दर्जाला योग्य अशा ठिकाणीं—मुराररावांच्या जवळच त्याला बसविण्यांत आलें होतें. त्याच्या अंतःकरणांत जरी धागधूग होत होती, तरी बाहेरून त्यानें अगदीं गांभीर्य धारण केलें होतें!

बादशहा जरी वृद्ध होता, तरी त्याची वाणी अद्याप खणखणीत होती. खणखणीत व आवेशपूर्ण वाणीनें त्यानें हुसेनवर 'आपल्याला पदच्युत करण्याचा प्रयत्न करून, त्यानें राजद्रोह केला' असा आरोप ठेविला; व त्या पत्राच्या (विजापूरच्या बादशहाकडे हुसेननें पाठविलेल्या पत्राच्या) सहाय्यानें, आपण हुसेनवर ठेविलेला आरोप अगदीं खरा आहे, असें त्यानें

सिद्ध केलें. व ह्या अपराधासाठीं हुसेनला वास्तविक फार भयंकर शिक्षा करावयास पाहिजे, पण त्याच्या वडिलांनीं आजन्म एकनिष्ठपणें निजामशाहीची जी सेवा केली, ती लक्ष्यांत घेऊन, त्याला हद्दपारीची शिक्षा करण्यांत येत आहे, व आजपासून पंधरा दिवसांच्या आंत त्यानें निजामशाहीच्या बाहेर गेलें पाहिजे. तेवढ्या मुदतींत जर तो निजामशाही बाहेर गेला नाहीं, तर त्याला पकडून अतिशय भयंकर शिक्षा देण्यांत येईल. अंगावरील कपड्यांखेरीज करून, व बायकांच्या अंगावरील दागिन्याखेरीज करून, हुसेनची सर्व मालमत्ता आतांच्या आतां जप्त करण्यांत येईल. तिच्यावरील त्याचा हक्क आतां सुटला, असें त्यानें (बादशहानें) जाहीर केलें. मग कांहीं वेळानें दरबार बरखास्त झाला.

शिक्षा ऐकल्यावरही हुसेननें आपल्या मुद्रेवरील गांभीर्य व ओंठावरील स्मित हास्य ढळूं दिलें नाहीं. तरी पण ' प्राणावरचें शेपटीवरच गेलें ' ह्या म्हणीप्रमाणें, आपणास प्राणांताची शिक्षा न मिळतां सौम्य शिक्षा मिळाली, म्हणून त्याला मनांत फारच आनंद झाला. त्या आनंदाच्या भरांत ' जिवंत तर सुटलों. आतां बादशहाला व मुराररावास मी चांगलाच चमत्कार दाखवीन ! ' असें तो मनांतच म्हणाला.

दरबारांत झालेल्या प्रकाराबद्दल लोक नानारीतींनीं बोलूं लागले. कोणी हुसेनास दोष देऊन बादशहाच्या औदार्याची तारीफ करूं लागले. कोणी हुसेनचीच अधिक तारीफ करूं लागले; आणि कोणीतर हुसेनला ' इतकी सुद्धां शिक्षा मिळाली नसती, पण मुराररावांनीं बादशहाचे कान फुंकले असावेत, म्हणूनच हुसेनला इतकी शिक्षा मिळाली, ' असेंही म्हणूं लागले ! असो, अशा रीतीनें ज्याला जें वाटलें, तें तो जरी बोलत होता, तरी बादशहाचें वैभव, सामर्थ्य व कर्तबगारी, अजून पूर्ववतच आहे, अशी मात्र प्रत्येकाची खात्री झाली !

प्रकरण २९ वें.

उपसंहार.

हुसेनला शिक्षा केल्यावर, कांहीं दिवसांनीं बादशहानें मुराररावास वजीर केलें. वजीर झाल्यावर मुरारराव्रांनीं राज्य कारभारांत पुष्कळ सुधारणा केली. त्यांनीं अहंमदनगरचें कायमचें एक मोठें सैन्य तयार केलें. नंतर, त्याचे भाग पाडून, निजामशाहींतील राजकीयदृष्ट्या महत्वाच्या ज्या जागा होत्या, तेथें कमी अधिक प्रमाणानें तें लष्कर ठेविलें. मग त्यांनीं मुलकीखात्याकडे लक्ष्य दिलें. साबाजीपंत व मलिकंबर ह्यांनीं जमीनसाऱ्याची जी पद्धत प्रचारांत आणिली होती, तिचाच अवलंब मुराररावांनीं केला. सुभेदार, कारकून, व पाटील कुळकर्णी, ह्यांस त्यांच्या कामांच्या मानानें वेतनें ठरविण्यांत आलीं. बरड जमिनी नीट तयार करून, त्यांत लागवडी करणारास उत्तेजन देण्यांत आलें. सर्वत्र शेतांस पाण्याचा पुरवठा होईल अशा तजविजी करण्यांत आल्या. त्याचप्रमाणें न्यायखात्यांतही सुधारणा करण्यांत आली. कोणत्याही गांवीं खटला प्रथम त्या गांवच्या पंचांकडे, तेथें बरोबर निकाल न लागल्यास, तो गांव ज्या प्रांतांत असेल, त्या प्रांताच्या सुभेदाराकडे, आणि तेथेही समाधानकारक निकाल न लागल्यास बादशहाकडे जावा, असा कायदा झाला. लोकांच्या कल्याणाकडे व शांततेकडे पूर्ण लक्ष्य देण्यांत आलें. लष्करी जोरामुळें दरोडेखोरांचा त्रास अजीबात नाहींसा झाला! जे दणगट लोक पोटासाठीं चोऱ्या किंवा लूटमारी करीत असत, त्यांना युक्तीनें वळवून सरकारी सैन्यांत नोकऱ्या देण्यांत येऊं लागल्या. लोकांत कलाकौशल्य व धंदे ह्यांचा फैलाव होण्यासाठीं कल्पक लोकांस उत्तेजन देण्यांत येऊं लागलें. सारांश 'नवी विटी, नवें राज्य' ह्या म्हणीप्रमाणें 'नवा वजीर, नवें राज्य' झालें! आतां हें सर्व करण्यांत, बादशहाच्या खजिन्यांत जेवढी शिलक होती, तेवढी सर्व खर्च झाली, हें खरें. पण त्याला नाइलाज होता. राज्याच्या सुव्यवस्थेकरितां ती खरचणें भाग होतें. तथापि, इच्छिल्याप्रमाणें राज्यव्यवस्था झाल्यावर, थोडक्यांच वर्षांत पूर्वी इतकी शिल्लक खजिन्यांत

पडण्याची आशा होती. व ती सफळही झाली! मुरारराव वजीर झाल्या-वर थोडक्याच वर्षांत निजामशाहींत ' काठीला सोने बांधून खुशाल फिरावें (तेव्हां लोकांजवळ सोनेंही पुष्कळ होतें, हल्लींप्रमाणें सोन्याचें दुर्भिक्ष नव्हतं!)—अशी स्थिति प्राप्त झाली!

इंदिरेस घरीं प्रथम पाहिल्यावर ' ही हुसेनच्या घरीं भ्रष्ट झाली नसेल कशावरून? ' अशी कुशंका मुराररावास आल्यावांचून राहिली नाहीं! व ती त्यांनीं एकदां दोनदां अप्रत्यक्षपणे शंकररावास बोलूनही दाखविली. शंकररावास तिचें समाधान करितां आलें नाहीं. तरी कमलेनें व धोंडोपंतांनीं आणाशपथा वाहून व हुसेनच्या घरची इंदिरेची दिनचर्या व निकृष्ट शरीरप्रकृती ह्यांचं खरें वर्णन सांगून, मुराररावांची शंका निवारण केली. धोंडोपंतांनीं डोळ्यांत अश्रु आणून, ' मुरारराव! इंदिरा साध्वी आहे. मी तिचा विनाकारण छळ करविला. तुह्मी तिच्याबद्दल मुळींच शंका घेऊं नका, ' असें ह्मटलें, तेव्हां तर मुराररावांची शंका पूर्णपण फिटली. धोंडो-पंतावर त्याचा पहिल्यापासूनच मोठा भरंवसा! तशांत त्यांनीं गहिंवरून वरील उद्गार काढिले, मग मुराररावांची शंका फिटली ह्यांत नवल तें काय?

कृतकर्माबद्दल धोंडोपंतास त्यांचं मन एकसारखं खात होतं. मुरारराव किंवा त्यांच्या घरचं कोणीही मनुष्य, ह्यांच्या दृष्टीस पडण्याचें धोंडोपंतांच्या जिवावर येई. ह्मणून, ते बहुतकरून अगदीं एकांतांत बसत असत. मुरार-रावापुढें जाण्याचा प्रसंग आला ह्मणजे एकदम ते मुराररावांचे पाय घट्ट धरून व त्यांवर डोकें ठेवून, कृतकर्माबद्दल मुराररावांची क्षमा याचीत व इंदिरेच्या किंवा कमलेच्या पातिव्रत्याबद्दल मुळींच संशय न घेण्याबद्दल विनवीत. त्यांची ही स्थिति पाहून मुराररावास फार वाईट वाटे! ते ह्मणत, ' धोंडोपंत, झालें तें झालें. त्याबद्दल तुह्मी आतां कां उगीच वाईट वाटून घेतां? तुह्मी केलं त्यांत तुमचा अपराध नव्हता. माझ्या दुर्दैवानेंच तुह्मांला तशी बुद्धी दिली! तथापि शेवट चांगला झाला. आतां तुह्मी मुळींच ती गोष्ट लक्ष्यांत आणूं नका. ' तथापि येवढ्यानें धोंडोपंतांचें समा-धान होत नाहीं, असें स्पष्ट दिसे. मुरारराव वजीर झाल्यानंतर, कांहीं दिव-सांनीं, एके दिवशीं सकाळीं, धोंडोपंत घरांत नाहींत, असा बोभाटा झाला! मुराररावांनीं स्वतः सर्व घर शोधिलें, शहरही शोधिलें, पण पत्ता लागला

नाहीं. सर्व महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं मुराररावांनीं मनुष्यें पाठवून धोंडोपंतांचा शोध करविला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. वडिलांपासून आपल्या घरीं रहात असलेले धोंडोपंत नाहींसे झालेले पाहून, दुःखित झालेल्या मुराररावास शंकरराव ह्मणाले, ' ते कोठेतरी अरण्यांत किंवा डोंगरावर किंवा क्षेत्रांत जाऊन राहिले असावेत खास. त्यांचा पूर्वीच तसें करण्याचा बेत होता, पण तुझी क्षमा मागण्याकरितां, व तुझें पूर्ववैभव पुन्हां तुला मिळतें कीं नाहीं, हें पहाण्याकरितांच ते इतके दिवस घरीं राहिले. आतां तूं त्यांचा शोध करण्याच्या भानगडींत पडूं नकोस. कारण त्यांचा जरी शोध लागला, तरी ते परत येणार नाहींत. ते आतां ईशसेवेंत आपलें आयुष्य घालवितील.'

धोंडोपंत नाहींसे झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं, जिवाजीपंत लक्ष्मीबाईसह नाशकास, आणि शंकरराव कमलेसह साताऱ्यास निघून गेले. अहंमदनगरीं फक्त मुरारराव आणि इंदिरा, दोघेच राहिले. एकदम सर्व नात्याचीं मंडळी आपल्या गांवीं गेल्यामुळें कांहीं दिवस त्या दोघांसही चैन पडलें नाहीं. नाशिकजवळील ' जानोरी ' गांवची पुष्कळशी जमीन जिवाजीपंतास इनाम होती. ती, इंदिरेच्या लग्नांत, आंदण ह्मणून जिवाजीपंतांनीं ज्या जमिनी मुराररावास दिल्या, त्यांत होती. पुढें तुकारामाची एकनिष्ठ सेवा पाहून, मुराररावांनीं ती जमीन तुकारामाच्या नांवावर करून दिली. तुकाराम नेहमीं मुराररावाजवळ असल्यानें, त्याला ह्या इनामाचा फारसा उपभोग घेतां आला नाहीं. तरी पण त्याच्या वंशजांनीं त्या इनामाचा भरपूर उपभोग घेतला!

बादशहानें शिक्षा दिल्यावर दरबारांतून हुसेन बाहेर पडला. त्याचे भक्त त्याच्या मागोमाग चालले. आपल्या घरीं न जाता हुसेन ' मलिकसाहेब' नामक एका वृद्ध सरदाराच्या घरीं जाऊन राहिला. (ह्या सरदाराचा व हुसेनचा बराच घरोबा असून, त्याच्या तृतीय पत्नीशीं—तिला मलिकसाहेब प्रेमानें ' नूरजहान ' असें ह्मणत—हुसेनचा गुप्तपणें वाईट संबंध होता! ह्याच सरदाराचा मुख्य दिवाण रामचंद्रपंत ह्मणून एक तरुण व हुषार ब्राह्मण होता. त्याच्या पत्नीचें माहेर नाशकास असून, तिची व इंदिरेची बरीच ओळख होती. रामचंद्रपंत पत्नीसह आपल्या यजमानाच्याच वाड्यांत रहात असे. त्याची पत्नी पुष्कळदां इंदिरेकडे जात असे. व इंदिराही कधींकधीं तिच्या

कडे जात असे. अशीच एकदां दोनदां इंदिरा तिच्या घरीं गेली असतां, तितकेवेळां ती हुसेनच्या दृष्टीस पडली, व हुसेननें तिच्यावर डोळा ठेविला. पुढें काय झालें, हें आमच्या वाचकांस सांगावयास नकोच !) मलिकसाहेबांच्या घरीं येण्यासाठीं त्यानें आपल्या बहिणीला व बायकोला बोलावणें पाठविलें. त्याप्रमाणें त्या आल्या. हुसेनची फजीती झालेली व त्याला शिक्षा झालेली ऐकून, त्यांना फार दुःख झालें; पण हुसेननें गोड शब्दांनीं त्यांचें समाधान केलें. दुसरे दिवशीं आपला जनानखाना, आपलें विश्वासू 'सेवकमंडळ' आणि राहिले साहिले चाकर नोकर ह्यांच्यासह हुसेन निजामशाहीच्या बाहेर जावयास निघाला. पंधरा दिवसांच्या आंत हुकमाप्रमाणें निजामशाहीच्या बाहेर तो पडला ! तो जातेवेळीं त्याचे भक्त फार हळहळले !

समाप्त

विवाह विभ्राट.

मकरांदातून प्रसिद्ध झालेलें.

(दोन अंकीं प्रहसन)

लेखक.

कै० बा० न० भावे.

प्रकाशक.

न० ना० पटवर्धन. यानीं

वाई मोदवृत्त छापखान्यांत छापिलें.

किंमत ४ आणे.

प्रकाशकाचे दोन शब्द.

प्रस्तुत पुस्तक श्रीयुत बाबू अमृतलाल बोस, मॅनेजर " स्टार थिएटर " यांच्या बंगालींतील ' विवाहविभ्राट ' पुस्तकाचें भाषांतर आहे. सदहू पुस्तक लहान तर खरेंच, परंतु आपणामध्यें हुंडे घेण्याच्या जबर चालींना थोडासा आळा घालण्याच्या हेतूनें लिहिलें आहे. स्वतःची अगदीं निकृष्टस्थिति असतां केवळ एक दोन परीक्षा पास झाल्यानें मुलाचे लग्नाच्या वेळीं आईबापास हुंड्याची हाव कशी सुटते, व वधुपक्षाची वरपक्षाकडून वेळोवेळीं कशी मानहानी होत असते वगैरे गोष्टींचें हें एक चित्र आहे.

कै० बा० न० भावे. यांनीं मरणापूर्वी थोडेच दिवस आधीं हें पुस्तक लिहिलेलें आजपर्यंत प्रसिद्ध होण्याचें राहिलें होतें. कै० भावे यांची बरीच पुस्तकें लोकप्रिय आहेत. ही त्यांची शेंवटची कृती होय.

प्रकाशक.

विवाह विभ्राट.

प्रथम अंक.

प्रथम गर्भांक.

(गोपिनाथ बाबूच्या घराची बाहेरली खोली-गोपिनाथ सरकार व चंद्रनाथ चक्रवर्ती बसले आहेत.)

चंद्र०—तर आतां हे पैसे सुद्धां घराच्या गहाणांतच लागूं करून दे. नुसत्या खतावर ठेवण्याची माझी सोय नाहीं.

गोपी०—आणखी फार तर दीडमहिना दम धरा. इतके दिवस गेले तसे आणखी थोडे दिवस. आतां घटक येण्याची वेळ झाली आहे. हो गोलकुंडच्या मन्मथ मित्राची मुलगी बारा वर्षांची झाली आहे. आतां ज्यास्त दिवस ठेवण्याची त्याची सोय नाहीं. माझ्या शर्ती त्याला कबूल केल्याच पाहिजेत.

चंद्र०—मुलाच्या लग्नाच्या सबबीवर किती दिवस मला चाळविणार तें कळत नाहीं. शिवाय लग्न झालें तरी काय अशी राजाची संपत्ति मिळणार आहे. कीं, ज्याच्या योगानें सर्व कर्ज फिटेल. कर्ज काढलें नाहीं असा एक देखील सावकार तुह्मीं बाकी ठेवला नाहीं दोनशे लोकांनीं मला विचारलें कीं तुह्मी आपल्या पैशाबद्दल काय केलें ? तुह्मी गप्प आहांत ह्मणून आह्मी कांहीं बोलत नाहीं.

गोपी०—आपली गोष्ट ऐकणार नाहीं असा एक तरी मनुष्य आपल्या मोहोल्यांत सापडेल कां ? सर्व लोकांना असेंच थोडे दिवस थांबायला सांगा. लग्नाच्या तिसरे दिवशीं सर्व पैसे चुकवून देईन.

चंद्र०—तुह्मी तर मौलक. कुलिनाची मुलगी तर मिळविली पाहिजे. मग असा काय पैसा मिळणार आहे कीं, ज्यानें सर्व कर्ज फेडतां येईल. माझें ह्मणणें ऐका. उगीच व्याज कां वाढवितां. घर सोडून द्या ह्मणजे झालें.

गोपी०—घर सोडून देऊं ? वाः, एल. ए. पास होईपर्यंत जर तुह्मी दम धरतां तर आणखी एक घर विकत घेतलें असतें. आतां काय कुलीन

मर्यादा राहिली आहे? कॉलेज सर्टिफिकीट हें अलीकडे कुलीनपणाच्या ऐवजीं आलें आहे. कुलीन, सभ्य वगैरे प्रकार पहाणें जाऊन एम्. ए. बि. ए. पहाणें त्याच्या ऐवजीं आलें आहे. हें पक्कें ध्यानांत असूं द्या कीं मी किती जरी रक्कम मागितली तरी ती देणें त्याला भाग आहे. कारण मुलीचें लग्न तर त्याला केलेंच पाहिजे.

चंद्र०— काय हा कसायाचा धंदा! तुह्मा कायस्थांची ही दुष्ट चाल हळूं हळूं ब्राह्मणांच्याहि घरांत घुसूं लागली.

गोपी०— ज्यापासून विलक्षण लाभ त्याला कां दुष्ट चाल ह्मणायची?

चंद्र०— आपल्याला एखादी मुलगी असती ह्मणजे समजतें.

गोपी०— असती तर तिचाही खर्च मुलाच्या सासऱ्याकडून घेतला असता. ह्याचवेळीं चापून घेतला असता!

चंद्र०— सरकार महाशय किती सज्जन गृहस्थ आहेत.

गोपी०—ह्यांत दोष कसला?

चंद्र०—आपला दोष नाहीं, ब्रह्मदेवाचा दोष. डोळ्यावर कातडेंच ओढून करायचें कीं नाहीं.

गोपी०—डोळ्यावर कातडं ओढल्याशिवाय व्यवहार चालावयाचा नाहीं. व्याज घ्यायच्या वेळीं आपण काय कमी करतां?

चंद्र०—तसें तर खरेंच. पण दिलेल्या कर्जावर व्याज घेणें व मुलाच्या लग्नाचे पैसे घेणें हें सारखेंच कां?

(घटक येतो.)

घटक—कल्याण असो. अरे हे छोटे बाबू येथेंच बसले आहेत. नमस्कार छोटे बाबू, तब्येतबिब्येत तर ठीक आहेना?

चंद्र०—नमस्कार, नमस्कार, पण तुह्मी इकडे कोणीकडे?

घटक—वायु व कुलोपाध्याय ह्यांना कोठें मज्जाव आहे कीं काय?

चंद्र०— कुलाचार्य नव्हे सर्टिफिकिटाचार्य. सरकार महाशय ह्मणत होते कीं आतां कुलबिल सर्व गेलें व त्याच्या जागीं सर्टिफिकिटें (परिक्षा) आलीं.

गोपी०—चंद्रबाबू आमचे फार स्नेही. त्यांच्याशी ब्राह्मण व कायस्थ हा भेद आह्मी मानीत नाहीं.

घट०—ते मोठे लोक पडले. त्यांचा आमच्यावर भारी लोभ. लग्नाबद्दलच्या सर्व अटी मी ठरवून आलों आहे. मन्मथ बाबूंचा सर्व प्रकारं रुकार आहे.

गोपी०—रुकार तर असलाच पाहिजे. असा परीक्षा पास झालेला मुलगा आहे कोठें ? पण देण्याघेण्याचा काय ठराव आहे ?

घट०—अंगावर घालायचे दागिने तर सर्व देतातच. पाटल्या, गोठ, तसेंच बाजूबंद, वेळा, शिवाय बिंदीबिजोरा—

गोपी०—मुलगी अंगापिंडानें मोठी आहे कीं काय ?

घट०— आहे आपली सडपातळच. वर्ण काळासावळा पण तोंडावरचें तेज काय विचारावें. तिच्यावर इतक्यांतच लग्नकळा आली आहे.

गोपी० — तर मग दागिन्याचा हिशेब नको. कारण दागिने तिच्या आंगाला ठीक होणार नाहींत. सर्वत्र ठोकूळ तोळ्यांचाच हिशेब बरा.

चंद्र०— महाराज आपण काय ह्मटलें. हें करणें कायस्थब्राह्मणाच्या घरांत शोभेल कां ? ही हलक्या लोकांतली चाल !

गोपी०— ह्मणून तर त्यांच्या घरांत लक्ष्मी वास करते आहे. पैशाच्या संबंधांत हलक्या लोकांचीच चाल चांगली. ह्मणून काय देणें तें तोळ्यांच्याच हिशेबानें दिलें पाहिजे.

घट०— हाँ, हाँ, "महाजनो येन गतः स पन्थाः" हलके लोकच आपले महाजन. लग्नाच्या संबंधांत आमच्या ज्या रीति आहेत त्याच लोकांनीं मानल्या पाहिजेत "कर्मणा बाध्यते बुद्धि" ह्मणून घटकाच्या तन्त्रानेंच सर्व झालें पाहिजे. तर मग तोळ्याच्याच हिशेबानें काय पाहिजे.

गोपी०—शंभर तोळे सोनें असल्याशिवाय मुलीच्या अंगाचे सर्व दागिने व्हायचे नाहींत. तर शंभर तोळे सोने धरा.

घट०—छे, हें फार होतें. हें कसें निभावणार. तुमच्या फायद्याच्या अटी ठरविण्याला मी आपल्याकडून कसूर करणार नाहीं, पण पाहिलें पाहिजे ना. फार ओढून धरलें तर सोयरिक मोडेल कदाचित्.

गोपी०—बरें रूपें दोनशें तोळे, नको एकशें पंचाहत्तर, पण इतक्याची देखील जरूर नाहीं. दीडशें धरा. आपल्या गृहस्थांच्या बायका बूट मोजे तर घालीत नाहींतच मग पायांतले दागिने नकोत कां ? पायांत

सोन्याचे दागिने घालण्याची चाल नाहीं. पूर्वापार ही भिकार चाल चालत आहे ती आपणाला पाळलीच पाहिजे. ह्यावर आपलें काय ह्मणणें ?

चंद्र०—या कामी मुसलमानांची वहिवाट चालू करणें प्रशस्त.

गोपी०—मुसलमान लोक पायांत सोन्याचे दागिने घालतात कां ?

चंद्र०—असें ऐकतों.

गोपी०—तें जाऊं द्या. त्याची जरूर नाहीं. एखाद्याला जास्त छळणें मला पसंत नाहीं. शंभर तोळे सोनें अठराच्या भावानें धरलें तर अठराशें रुपये झाले. व तोळ्यामागें दलालीचे दोन रुपयेप्रमाणें दोनशें झाले. मिळून दोन हजार रुपये झाले. व रुप्याचे दीडशें रुपये. त्यांत हीण वगैरे पण मरो ते. व दलालीचें एक रुपयाप्रमाणें दीडशें. एकूण तेवीसशें झालें.

घट०—बरें पण दागिन्याचे रुपयेही पण रोखच घेणार कां ?

गोपी०—नाहींतर काय ? अलीकडे बाजारांत दागिने कोण करितों. सोनार तेथून सर्व चोर. चांगल्या मालांत हीण घालून सर्व बिघडून टाकतात. मग जर बाजारांत ते दागिने पुन्हां विक्रीला काढले तर अर्धीही किंमत येण्याची मारामार ह्मणून नगदच चांगलें. नगदाला कांहीं तोट्याची भीति नाहीं.

चंद्र०— मग दलाली कशाला धरली ?

गोपी०— एवढें मुद्दां कळेना ना ! समजा दागिने केले असते तर घाची लागती कीं नाहीं किंमत. मग सोनाराला देण्यापेक्षां जावयाला दिलेली काय वाईट ! ह्यांत त्यांचा नफा आहे कीं नुकसान. घटक महाराज, आपलें काय ह्मणणें आहे.

चंद्र०— ज्या दिवशीं मुलगी झाली त्याच दिवसापासून त्यांच्या लग्नाला प्रारंभ झाला.

घट०— छोटे बाबू, कन्यादान व गौरीदान दोन्हीं सारखीच. यांत खर्च करणें ह्मणजे मोठें भूषण. हा एक प्रकारचा दुगात्सव आहे.

चंद्र०— पण त्यांतलें बलीदान मात्र फार कठीण. तुमच्या तोंडीं मंत्र व सरकार महाशयांचें हातीं खांडा. पण घाव मात्र सावधपणानें घाला. नाहींतर सर्वच फसेल.

गोपी०—घटकमहाराज मला सर्व समजलें. आमचे ह्यांच्याशीं नात-

याचें नातें पडलें ह्मणून खूप थट्टा करून घेताहेत. (स्वगत) ह्यानें फार तोंड सोडलें आहे. ह्याचे पैसे देऊन टाकले ह्मणजे ह्याच्या ह्या उपरोधिक बोलण्यांतून सुटेन.

घट०—बरें तर मग किती धरले ?

गोपी०— हो, हे झाले तेवीसशें आतां बिंदीबद्दलचा विचार नाहीं कां ? ह्या दिवसांत जडावाचा दागिना खरेदी करणें ह्मणजे—पैसे पाण्यांत टाकणें. पण आपल्या हिशेबानें धरलें तर अडिचशे रुपये धरा. एकूण साडेपंच-विसशे. मला हिशेबबिशेब कांहीं समजत नाहीं. बरें आतां पुतळ्याच्या माळेचें काय धरावें बरें !

चंद्र०— गोपिनाथबाबू, तुह्मी हें मांडलें आहेत तरी काय ! आपलें हें कृत्य ह्मणजे त्या संभावित गृहस्थाच्या गळ्यावर सुरी ठेवण्यासारखें आहे. पाहिजे तर मी थोडें व्याज सोडतों पण त्याला आतां छळूं नका. मन्मथ मित्र कोण तो मला ठाऊक आहे इतके पैसे देण्याची त्याची ऐपत नाहीं.

घट०—हें पहा आपलें ह्मणणें मला बरोबर दिसत नाहीं शिवाय मला तुह्मी व ते दोघेही सारखेंच. मला दोघांकडेही पाहिलें पाहिजे.

गोपी०—दहा ठिकाणीं शोध करून पहा, एल. ए. पर्यंत अभ्यास झालेला मुलगा ह्याहून स्वस्त्यांत कोठें मिळेल ? सांगितलें एवढें कबूल असेल तर मजकडे या. मुकाट्यानें पतकरा आपलें.

घट०—पण त्यांनीं कबूल केलें पाहिजे ना ? मन्मथबाबूची संपत्ति ह्मटली ह्मणजे एक राहतें घर व शंभर रुपये पगार. हें सर्व आपल्याला माहीत आहेच.

गोपी०—तर पुतळ्याच्या माळेचे आडिचशें धरा. घटकाभर बरोबर आडिचशें. पलंग व बिछान्याची कांहीं जरूर नाहीं. कारण ठेवायला जागा आहे कोठें ? बरें, रुप्याचीं भांडीं घेतलीं तर त्याला चोराची भीति. ह्मणून तुमचेंच ह्मणणें मला कबूल. फार कांहीं नको दोहोंबद्दल सातशें रुपये धरा. मिळून बरोबर पसतिसशें झालें. आतां फक्त नगदीं पांचशें राहिले.

चंद्र०—झालें, संपलें. चार हजार रुपये रोख. ह्मणजे घर विक-ण्याची पाळी.

गोपि०— अलीकडे मुलीचें लग्न करणें ह्मणजे काय हलकें काम आहे ? ही किंमत आजची आहे. आणखी सहा महिन्यांनीं मुलगा पास झाला

ह्मणजे दुप्पट द्यावे लागतील. शिवाय माझीही सध्यां ओढ आहे जास्त दिवस थांबायला मला सवड नाहीं. ह्मणून मी आपला अर्ध्यांतरच कबुल आहे.

घटक—हें पहा, मी तुह्माला सर्व सांगतों. मित्र महाशयांशीं माझा घटक या नात्यानेंच केवळ संबंध नाहीं. आह्मी त्यांचे पिढीजात आश्रित. ते व मी एकाच गांवचे राहणारे. मग चार हजारांपेक्षां तुह्मी कांहीं कमी नाहींच कां करणार?

गोपी०—नाहीं. तसें करून भागायचें नाहीं. शिवाय मी जरी राजी असलों तरी मुलगा कबुल करावयाचा नाहीं, व त्याची आईही कबूल करणार नाहीं. तिनें सांगितलें आहे कीं, नन्दलालच्या बायकोकडून जर दहा हजाराहून कमी रुपये आले तर तिला बिलकूल सुख देणार नाहीं. मोलकरणीसारखें काम करायला लावीन.

घट०—तर त्यांना बोलवा येथें. त्यांच्या समोरच सर्व ठीक होऊंद्या. "स्त्री बुद्धिर्दुष्कला दीप" स्त्रियांच्या बुद्धिनें दोन्ही कुळांचा नाश व शिवाय पोरीच्या कपाळीं सततचा त्रास.

गोपी०—त्याची भीति नको. ती दाराच्या आडून सर्व ऐकते आहे. यांतली एखादी गोष्ट तिला पसंत पडली नसती तर तिनें दार वाजविलें असते. आमचें असें ठरलें होतें.

घट०—तर मग चार हजार रुपये आपण घेणार?

गोपी०—हो, शिवाय मुलाकरितां सोन्याचें घड्याळ, सोन्याची सांखळी हिऱ्याची आंगठी व सोन्याचा चष्मा.

घटक०—चष्मा!

गोपी०—मग काय मुलानें नुसत्या डोळ्यानें कालेजांत जावें!

घट०—त्यांच्या डोळ्याला कांहीं विकार आहे कीं काय?

गोपी०—तुह्माला कांहीं माहिती आहे? एल. ए. ची विद्या इतकी सूक्ष्म आहे कीं, चष्म्याशिवाय स्पष्ट दिसत नाहीं.

चंद्र०—तो सर्वांगसुंदर आहे. मग त्यांत एवढेंच गौण कशाला!

गोपी०—काय ह्मटलें, सांगा सांगा पाहूं? मी ह्मातारा झालों आहे, ह्मणून काय काय नवीन गोष्टी निघाल्या आहेत त्या मला ठाऊक नाहींत, व आहेत त्या आठवत नाहींत.

चंद्र०—एक सोन्याचें शेंपूट. त्याच्या भारानें तोलबील आऊं नये ह्मणून संभाळायला एक हावें.

घट०—हं: ह: ह: !

गोपी० - तुह्मां नव्या लोकांना काय काय लागतें तें तुमचें तुह्मीच जाणें. (स्वगत) सोन्याचें शेंपूट खरेंच देतात कां ?

घट०—बरें, मग त्याबद्दल काय धरतां ?

गोपी०—त्याबद्दल नगदी नको. कारण त्या सर्व वस्तु नन्दलालाला अवश्य पाहिजेत. फुलशय्येबद्दल नगदींत आणखी दोनशे रुपये घाला.

घट०—हें सर्व मित्र महाशयांनीं कबूल केलें तर जावई पहावयास येण्याचा दिवस नक्की करून येईन.

गोपी०—जावयाला काय पाहायचें आहे. त्याचा फोटो आहे तो घेऊन जा व एक सर्टिफिकिटाची नक्कल देईन.

घट०—अं हं, शुभ कार्यातल्या ज्या चाली आहेत त्या झाल्याच पाहिजेत. ते आशीर्वाद करून जातील व तुह्मीही आशीर्वाद करून या ह्मणजे झालें.

गोपी०—मी आपला येथूनच आशिर्वाद करतों. त्यांना ज्या दिवशीं वाटेल त्या दिवशीं त्यांनीं येऊन पाहून जावें. आणखी काय. मात्र सकाळींच यावें ह्मणजे आमच्या उद्योगधंद्याला अडचण यायची नाहीं.

घट०—पण लग्नाचा करार तर आपणांला स्वत: जाऊन लिहिला पाहिजे.

चंद्र०— मला वाटतें करार एखाद्या वकिलाकडून लिहून घ्यावा तें चांगलें.

गोपी०—(स्वगत) यांचे ह्मणणं केवळ खोटें नाहीं. (उघड) पण अशी चाल कोठें आहे ? बाकी त्यानें काम मात्र पक्के होईल.

चन्द्र०—एकदा रीतीप्रमाणें स्टांपावर करार करून घेऊन स्टांप रजिस्टर केला ह्मणजे तो कोणाजवळही गहाण ठेऊन कर्ज काढता येईल.

घट०—छोटे बाबू , लग्नाचे वकील, मुखत्यार सर्व आह्मी. शिवाय मन्मथबाबू जें काय ठरवितील तें बरोबर पाळतील. मरदाचें वचन व हत्तीचा दांत हीं दोन्हीं आंतून बाहेरून सारखीं.

चंद्र०—सरकार महाशय, तर हें काम सोडूं नका. करार लिहिण्या-

लिहिण्याबद्दल लागणारा खर्चेही सोडूं नका. तीं बाबसुद्धां लहान नाहीं. हातांत सुरी धरलीच आहे तर ती चालवून चालवून प्राण घ्या. मी आतां जातो. आफिसची वेळ झाली. घटक महाराज, पैसे द्यायच्या वेळीं मला खबर द्या. माझे पुष्कळ पैसे ह्यांच्याकडे राहिले आहेत.

(जातो)

गोपी०—(स्वगत) ह्याचे पैसे एकदां देऊन टाकले ह्मणजे चांगलें उट्टं काढीन. मग पाहीन कसा छद्मी बोलतो तें. (उघड) देणें आहे ह्मणून तर नेहमीं त्रास सोसावा लागतो. घटक महाराज तुह्मी खरें सांगा संसारांत कोणाला नाहीं कर्ज काढावें लागत ?

घट०—यांत काय संशय. मला देखील आमच्या जमीदाराची बरीचशीं बाकी देणें राहिली होती, ती गतवर्षीच्या लग्न सराईत देऊन टाकली. आतां हें मात्र ध्यानांत असूंद्या कीं, लग्न ठरलें ह्मणजे तुम्ही मला खुश केलें पाहिजे. तुम्हाला इतके पैसे दिल्यावर माझी बिदागी तिकडून होण्याची आशा नको.

गोपी०—चार हजारावर जें कांहीं जास्ती ठरवाल त्यांतलें निम्में तुमचें.

घटक—त्यावर कांहीं मिळालें तर घटकाची बिदागी. मग आटोपलेंच.

गोपी०—तसें नव्हे. तुमचे जें काय वाजवी आहे तें तर मिळेलच पण त्याहून ज्यास्त मिळालें तर वाईट कीं काय ?

(स्त्री येते)

स्त्रीः—मला सांगा माझा इतका अपमान करविण्याचें कारण काय. मी तुमच्या येथें नोकरी करायला आलें ह्मणून मला कांहीं मान अपमान नाहीं कीं काय ? हें काय हें ? ही कसली चाकरी ?

गोपी०—काय झालें तरी काय तुला बडबडायला. सांग तर खरी. कोणी कांहीं बोललें कीं काय ?

स्त्रीः—बोलायची कांहीं बाकी राहिली आहे कीं, काय ? आणखी कांहीं बोलायचें उरलें असलें तर तुम्ही बोलून घ्या. नाहींतर हे घटक महाराज बसले आहेत त्यांना तरी बोलायला सांगा. बोला, बोला, महाराज माझ्या सारख्या गरीब बिचारिला जर बोलला नाहीं तर तोंड सोडायला दुसरी जागा कोठली मिळायला.

घट:—माझ्यावर कां उगीच राग. मी कशाला तुला बोलायला बसलों आहे. मीं कधीं तुला पाहिली देखील नाहीं.

झी: —पहाल कशाला. गरीबाकडे पाहिलें तर जसें कांहीं यांचे डोळे फुटतात.

गोपी०— अग गप्प बैस. हे घटकमहाराज ह्यांच्याशीं कां वटवट करीत बसली आहेस.

झी०—घटक असले ह्मणून काय झालें. मला कांहीं लग्न करायचें नाहीं ह्मणून त्यांची भीति. सर्वांनींच आपल्या मला शिव्या द्याव्या कीं काय?

गोपी०—तुला कोण काय बोललं तें तर सांग.

झी०—कोण नाहीं बोललें? सर्वजण बोललें. तो आपला लाडका, कवडी-चुंबक, कपाळकरंटा मोदी. आग लागो त्याच्या दुकानाला.

गोपी०—त्या मोद्याच्या तोंडीं लागायला तूं यावेळीं गेली होतीस कशाला?

झी०—तोंडीं लागायला गेले होते! तो माझा बरोबरीचा कीं नाहीं ह्मणून गेले होते तोंडीं लागायला. मी भ्रमाचा भोपळा कशाला फोडूं. सगळ्या गांवाचें आपल्याला कर्ज आहे माहीत नाहीं. पोराचें लग्न झालें ह्मणजे पैसे देऊन टाकीन ह्मणून सर्वांना थापा देता. लोकांनीं आतां उधार द्यावें तरी किती दिवस. मोद्यान छान केलेंन. तो जें काय बोलला तें मला नव्हे तुह्मालाच. मी काय आपली मोलकरीण, मला कशाला बोलेल.

गोपी:—झालें तें छान झालें. तो मलाच बोलला. तूं आतां घरांत जा कशी.

झी:—घरांत जाऊन खायचें काय. घरांत घांसभर देखील अन्न नाहीं, सर्पण संपून गेलें आहे. डाळ तांदूळाची तर गोष्टच काढायला नको.

गोपी:— (स्वगत) ही मोलकरीण तर मोठी हलकट आहे. (उघड) पण तूं सर्व संपवून टाकीपर्यंत मला कांहीं बोलली नाहींस ती. तीसुद्धां तशींच! तीही कांहीं बोलली नाहीं.

(मोदी येतो.)

झी:—हा पहा येथें देखील आला. आतां येथें शिव्या देणार कीं काय. जा, मर शिंच्या, काय हा याचा दांडगेपणा!

मोदी:—काय गे ए हडळी, अशी रागावलीस कां?

झी:– हडळ, हडळ, तुझी आई बहीण हडळ. मी जाते आपली घरांत आणि सांगते बाईसाहेबांना हे असले कसले यजमान ह्मणून. मला येथें येऊन चौदा पंधरा वर्षें झालीं. मोठमोठ्याच्या घरीं मी नोकरी केली पण मला असं कोणीं बोललें नव्हतें. माझ्या गावीं माझ्या भावाची पुष्कळ शेतीवाडी आहे. तिथ नुसत्या भीठभाकरीला तर पंचाईत नाहींना ?

(झी जाते.)

गोपी:—काय रे, चिमणदास, डाळ तांदूळ देत कां नाहींस ?

मोदी:—द्यावे कोठून सांगा, आज दीडवर्ष मी आपल्याला माल देत आलों पण आपल्याकडून दिवाळीला देखील एक पैसा मिळाला नाहीं.

गोपी:—आता काहीं हरकत नाहीं. फार झाले तर कार्तिक महिना वाट पहा. मार्गशीर्षांत ६।९।१०।१५ हे चारच लग्नाचे मुहूर्त आहेत, त्यांपैकीं कोणाच्या ना कोणच्या तरी मुहूर्तावर लग्न होईलच. हे पहा हे घटक महाराज येथेच बसले आहेत. मग तुला आगाऊ दोनशें रुपये देईन म्हणजे तर तुझं काहीं ह्मणणं नाहींना.

मोदी:—तुमच्या मुलाची एक परीक्षा पास झाली तेव्हांपासून हे वायदे चालले आहेत, त्याला दीडवर्ष होत आलं. मला नाहीं वाटत आपली एवढी मोठी मागणी कोणी कबूल करीलसें.

गोपी:—करीलच पाहिजे. आतां पूर्वींची स्थिती नाहीं. पूर्वींच्या दीडपट आता पैसे येतील. पूर्वी मुलाची एकच परीक्षा झाली होती.

मोदी—मग आता दीड परीक्षा पास झाली कीं काय ?

गोपी:—आता तर एल. एची परीक्षा देणार.

मोदी:—पसे मिळतील तेव्हा खरे.

गोपी:—हे घटक समोरच बसले आहेत. त्याना विचार पाहिजे तर. बाहेरून जर पैसे येणार आहेत तर घरातले कशाला घालवूं ?

घट:—मी कामाला हात घातला आहे तुह्मी आपले आता बेफिकिर रहा. मार्गशीर्ष महिन्यात सर्व ठीक होईल. मी तुमचा जामीन. मग तर झालं.

गोपी:—नगद पैसे मिळाले असें तूं समज. पैसे तुझ्या पेटींत आहेत. जा, काय सामान सुमान लागेल तें पाठवून दे.

मोदी०—बरें, देतो. नाहीं देत ह्मणून कधीं ह्मटलें ?

गोपी०—रोख पैसे मिळाले ह्मणून ह्याला किती आनंद झाला आहे, पाहिला ना. जा, जा, तूं पण सामान देशील ना ?

मोदी०—हो, हो, काय आज्ञा आहे.

गोपी०—आज्ञा कसली, जा तूं आतां.

मोदी०—पण आपण दिलेलं वचन ध्यानांत आहे ना ?'

घट०—जास्त बोलण्याची जरूर नाहीं. वेद मिथ्या होतील पण ह्या घटकाच्या बोलण्यांत फरक व्हायचा नाहीं.

मोदी०—जातों तर मी, जयगोपाळ.

घट०—तुझें कल्याण होवो. जा तूं खुशाल.

(मोदी जातो.).

घट०— मीही आतां जातो.

गोपी०—हो वेळ बराच झाला. मी ही आता स्नान करतों. हे पहा तुह्मी आमच्या घरच्यासारखे. ह्याह्याचे कानावर मात्र ही गोष्ट जाऊं देऊं नका. मी तुह्माला नगद पन्नास रुपये बिदागीबद्दल देईन.

घट०—हिकडल्या गोष्टी तिकडे व तिकडल्या हिकडे सांगून आमचा धंदा कसा चालेल. आपण बेफिकीर असा. आता मी जातों. आपलें कल्याण असो. पण बिदागीबद्दल जे काय आपण सांगितलें तें ध्यानात आहे ना ?

गोपी०—हो, हो, पक्कं ध्यानांत आहे. कांहीं काळजी करूं नका..

(दोघे जातात).

द्वितीय गर्भांक.

(विलासिनीची बसण्याची खोली.
विलासिनी कारफर्मा व मिष्टर सिंह.)

सिंह.—गतवर्षी मी येथून जाण्याच्या पूर्वी थोडे दिवस माझें असा अनुमान होतें कीं आपण उमाचरण गुप्त यास सुखी कराल.

बिला:—आपलें अनुमान ठीक होतें. उमाचरणबाबूशी लग्न करण्याचें बहुतेक ठरलें होतें परंतु त्याची आई मेल्यावर तो गळ्यांत उत्तरी घालून अनवाणी हिंडूं लागला. तेव्हां अशा असभ्य गृहस्थाशीं कसें लग्न करावें तुह्मीच सांगा.

सिंह:—उघडें अंग ? अनवाणी पाय ! लेडी समोर ? Horrible.

बिला:—Shocking !

सिंह:—आपले यजमान काय उद्योग करतात ?

बिला:—पहिल्यांदा टीचरी करीत असे, आतां एक प्रेस काढून दिला आहे. हल्लीं कामिनी भट्टाचार्य इचा नवरा व हे दोघे मिळून एक बंगाली वर्तमानपत्र काढतात. व शिवाय घरातलें संसाराच काम बघतात.

सिं:—आपल्यासारखी स्त्री मिळाली हे मोठेंच त्यांचे नशीब. बरं, पण आपण एम, ए. करितां कोणतें विषय घेतले आहेत.

बिला:—physics. आपल्या स्त्रियांना शास्त्रीयविषयांचे ज्ञान नसल्यानें आपला देश धुळीस मिळाला आहे. मला वाटतें विलायतेंत पुष्कळ स्त्रिया शास्त्रिय विषय शिकत असतील नाहीं. ?

सिंह—पुष्कळ. अंडर ग्रऊंड रलवेचें एंजिन ड्रायव्हर, फायरमनसुद्धां स्त्रियाच आहेत. शास्त्रीयविषयाचें ज्ञान स्त्रियांच्या हातीं गेल्यानें इतकी सुधारणा झाली आहे कीं गाडी चालत असता खुशाल झोप घ्यावी.

बिला०—पार्लमेंटात स्त्रीसभासद किती आहेत ?

सिंह—तीन आहेत. प्राईम मिनिस्टरची चुलती एक व दोन आयरिश मेंबर. ह्या हिंदुस्थानच्या वतीनें फार भांडत असतात.

बिला०—आपण किती दिवस तेथें होता ?

सिंह—अँ. जाऊन परत येईपर्यंत सुमारें दहा महिने.

बिला०—एम. ए. परिक्षा दिल्यावर एकदां जावें असं माझ्या मनांत आहे.

सिंह०—जा, जा, जरूर जाच. तिथच एम. ए. ची परीक्षा द्या.

बिला०—नेटिव्ह स्त्रिया तेथें गेल्या तर साहेब लोक त्यांचें कांहीं आदर आतिथ्य करतात कां ?

सिंह०—हातावर झेलतात. जा, जाच तुह्मी. You will be a curiosity there ! ओः ! आपणाला तेथें खायला व बसायला देखील

फुरसत मिळणार नाहीं. Tea there , Dinner here, picnic abroad , yatching, skating, Riding, Driving, Sight-seeing, आज काय Crystal palace उद्या काय Vanx Hall, Holiday every day शिवाय Presents ! Rings, Brooches, Dresses a-la-paris व आपल्याला Barrister होता येईल. शिवाय सिव्हिल सर्विसमध्यें ही enter करता येईल. हल्लीं आपलें वय एकोणीस वर्षांचें आहे नाहीं का ? जा, आणि परीक्षा द्याच. आजपासून तेथल्या रीतिभातींची practic सुरू ठेवा. आपण गाऊन वगैरे का घालीत नाहीं ? गाऊन घातला म्हणजे आपण मोठ्या छान दिसाल.

विल०— ह्या ड्रेसानें मी काय वाईट दिसते ?

सिंह:—वाईट ! Angel ! Angel ! But I'll prefer you an English Angel to a native Angel.

(गौरीकान्त कारफर्मा येतो).

विलास:— Well Gour Dear, काय खबर आहे ? या, मी तुह्मांला मि० सिंह ह्यां introduce करते. Mr. Sing My old friend, Mr. Karfarma my dear husband.

गौरी:—मोठा आनंद झाला. आपलें नांव ऐकतांच स्नेह जडला. आपण केव्हां आलांत ?

सिंह—This day week. आज दिवस आठवडा.

गौरी—आपण कोणती लाईन घेतली होती ?

सिंह—Surgeon, Phigsician, Accoucher, M. B. L. R. C. P. L. R. C. S. (Ediu), late clinical clerk Rotunda, Lying in Hospital, Member obstrical society London &c., &c., &c,

गौरी—वा: वा: वा: ! मोठें आश्चर्य. नुसत्या दहा महिन्यांत आपणांला कितीतरी टायटल्स मिळाल्या. मला वाटतें आपल्याला फार परीक्षा द्याव्या लागल्या असतील.

सिंह-Nothing of the Kind विलायतेंत आमच्यासारख्या मनुष्याची परीक्षा देण्याची इच्छा नसली तर compel करून insult करीत नाहींत.

आमच्या इंग्लिश Manners पाहिल्या कीं, आह्मी विद्वान आहोंत असें ते समजतात. फी दिली कीं लागलीच respectable समजून डिग्री देतात. माझी जर चांगली प्रॅक्टिस् जमली तर एम्. डी. मधून ओव्हरलँड मेल ची डिग्री आणविण्याचा माझा विचार आहे.

गौरी— आपण आपल्या घरींच राहतां ना?

सिंह—नाहीं, घरीं कपडे काढायला सांगतात, भात खायला सांगतात म्हणून मी 5-1 गौरस्थान लेनमध्यें राहतों.

गौरी—Excuse me पण कपडे काढायला हरकत काय?

विला—Husband-husband-

सिंहः— Don't mind Mrs. Karfarma विलायतेहून परत आलों तेव्हांच मीं निश्चय केला कीं ह्या विषयासंबंधानें लोकांना enlighten करावयाचें. Mr. Karfarma ना काय माहीत. ते मला वेडे म्हणतील पण म्हणोत बिचारे. पण एवढें खास समजा कीं अशी एक वेळ येईल कीं त्यावेळीं whole world चा हाच dress होईल. सुएजच्या कालव्या ओलांडला कीं हाच dress.

गौरीः—परंतु Asia त-

विलाः—Shut up; तुमचें पत्र निघालें कां?

गौरीः—हो. लास्ट प्रूफ पाहून आलों. बा, छान गोष्ट आठवली. आजकाल वर्तमानपत्रांत विलायतची बातमी असली म्हणजे त्याचा फार खप होतो. सबब जर आमच्या पत्राकरितां विलायतची तारीख घालून तेथील हकीकतीचीं पत्रें लिहाल तर आमच्यावर भारी उपकार होतील.

सिंहः —Mr. Karfarma आपण आहांत आमच्या dearst friend विलासिनी कारफर्म्याचे husband आपल्यावर उपकार करणें माझें आद्य कर्तव्य. परंतु, there is one draw bock. एक वर्षभर विलायतेंत राहिल्यानें (मराठी) बंगाली मी बहुतेक विसरून गेलों आहे. आपल्याशीं बोलतो आहे ह्मणजे काय मोठ्या कष्टानें. त्यांतून लिहिणें ह्मणजे मात्र माझ्या शक्तीबाहेरचें काम आहे. पण एक काम मी करीन. मजजवळ फार दिवसांची एक published old diary आहे, ती मी आपल्याकडे पाठवून

देईन. त्याची date बदलून translate करून घ्या ह्मणजे exactly suit होईल.

गौरी:—Thank you, आपला फार अभारी आहे.

सिंह:—Nothing-nothing-don't mention.

विला:—तिसराप्रहरच्या खाण्याची काय व्यवस्था केली आहे !

गौरी:—आपणाला काय पाहिजे ते सांगा. करून देतो.

विला:—विशेष कांहीं नको. मी आज लवकरच खाऊन फिरायला जाईन. आज आमच्या "पुरुषदमन" सभेचा auniversary. रात्रीं परत येईन कां नाहीं तें सांगतां येत नाहीं. तुमचें स्वतःचे खाण्याचे मग करा. माझ्याकरितां एक plate sago-pudding व चार cutlets पाठवून द्या. पण खबरदार त्या दिवसच्यासारखे करपऊं नका.

गौरी—कोळशाची आंच बरोबर समजत नाहीं.

विला०—What a stupid ! this dear husband of mine is as stupid Mr, sing as as as-

सिंह—What d'ye ! call it-

विला०—हो अगदीं बरोबर; मी तुह्माला हजारदां सांगितले कीं माझ्या फुरसतीच्या वेळीं मजजवळ बसून तास तास सायन्स लेक्चर ऐका ह्मणून. पण तें काठलें तुमच्या हातून व्हायला. हीटूची थीअरी ठाऊक नाहीं मग स्वैपाक कसा करणार ?

गौरी—तर मग एक शास्त्रीय विषयाचें बंगाली (मराठी) पुस्तक विकत घेऊन द्या. तुमचे ग्यानो मला समजत नाहीं.

विला०—ग्यानो समजत नाहीं ? दोन साध्या गोष्टी ध्यानांत राहत नाहींत, व थर्मामेटरचा यूस् समजत नाहीं. शंभर डिग्री सेंटिग्रेड हा बॉयलिंग पॉइन्ट. दोनशे डिग्रीवर सरसूचें तेल पटतें. १२५ किंवा १३० डिग्री उष्णतेवर अन्न चांगलें शिजतें. सायन्स शिकलं ह्मणजे बर्फाच्या उष्णतेनें देखील शिजवितां येते.

गौरी—बर्फाची उष्णता ! बर्फ ! बर्फ !

विला:—हो हो, बर्फ ज्याला आईस ह्मणतात ते. विचार करतां करतां डोकें तापलें ह्मणजे मी जे डोक्यावर ठेवतें किंवा कॉलरा झाला ह्मणजे

तुह्मी खातां तें बर्फ हम्फ्रे डेव्हींच्या मतें बर्फाचे दोन तुकडे एकावर एक घांसले ह्मणजे एक प्रकारची उष्णता उत्पन्न होते. थोडक्याच दिवसांत मी सायन्सांत एम-ए होणार आणि माझ्या हजबंडला हीटूची पद्धत माहीत नाहीं.

(नंदलाल येतो)

नंदः—गुड डे मि. कारफर्मा, नमस्कार मिसेस् डिटो.

सिंहः-आपली खुशी असेल तर-

नन्दः—व्हेरी गुड्, व्हेरी गुड्, एस्क्यूज मी. नीलरतन बाबू, मला वाटतं. मि. सिंह मी आपल्या घरीं गेलो होतो, तेथें कळले कीं आपण आपल्या बंगल्यावर आहांत, ह्मणून तेथें गेलो, तो आपल्या मिसेस् कारफर्मा च्या घरीं गेला आहात असें आपल्या बबर्जीनें सांगितलें ह्मणून येथें आलों.

सिंहः—मी नून टाइम ला घरीं असलो तरी घरी नाहीं असं समजावं. आपलें काय काम आहे ?

नन्द—विलायतेंतली काहीं माहिती विचारायला आलो आहे. बरें, आपण दहा महिने तेथें होता, दहा महिन्यात अगदीं साहेबासारखे होता येते ?

सिंह—चांगली इन्टेलेक्ट् असली ह्मणजे येते.

नन्दः—आपणाला सांगतो कीं मी यंदा एल, ए च्या परिक्षेला बसणार आहे. पण तेथेंच जाऊन परीक्षा दिली तर चालायचें नाहीं कां ?

सिंहः—आपली विलायतेस जाण्याची इच्छा आहे कीं काय ?

नंदः—इच्छा ? जाणारच.

सिंहः—पण आपल्या वडिलांचा रुकार आहे कां ?

नन्दः—जरूर. ह्याशिवाय दुसऱ्या कोणच्या सत्कार्याला वडिलांचं अनुयत मिळायचं आहे ?

सिंह—पण पैशाची व्यवस्था कशी करणार ?

नन्दः— ती बाबानींच केली आहे. एक ठिकाणीं बहुतेक ठरलें आहे.

सिंहः— वडिलांचें मत नाहीं आणि पैशाची व्यवस्था ते करणार हें कसें ?

नंद०— त्यांनीं माझें लग्न ठरविलं आहे. त्याचे चारपांच हजार रुपये येतील.

विला०—लग्न करणार ! मुलगी कशी काय आहे ? एखादी परीक्षा पास झालेली आहे कीं नाहीं. कोणत्या पद्धतीनें लग्न करणार ?

नंद०—त्यासंबंधानें मला कांहीं माहीत नाहीं. बाबांनीं पैशाची सर्व व्यवस्था ठीक केली आहे. ते पैसे माझ्या हातीं येण्याची वाट पाहतों आहें.

विला०—मुलगी कशी आहे हें ठाऊक नाहीं ? दिसते कशी ? तुमच्याहून मोठी आहे कीं लहान आहे ? शिकणें सवरणें किती झालें आहे. स्वतः घरसंसार चालवील कीं नाहीं. ह्यापैकीं कांहीं ठाऊक नाहीं. मग पहा जुन्या अपवित्र चालीप्रमाणें लग्न होईल आणि मग पश्चात्ताप करावा लागेल.

नंद:—पहा, मी एका धोंड्यानें तीन पक्षी मारणार आहे. एक समाज शासन, दुसरें पितृशासन व तिसरें श्वशुरशासन. व आमचे बाबा केवळ आपल्या फायद्याकरितां एका जनावराशीं माझें लग्न लावणार आहेत व आमचे श्वशूरही त्याला अनुमत देत आहेत सबब त्या दोघांची ही खोड मोडणार, व समाजही हें सर्व पाहून विन्ध्याचलासारखा स्वस्थ घोरत पडला आहे त्याला जागे करणार. व रुपये हातीं पडले कीं लग्न नल् ॲन्ट व्हॉइट ठरवून टाकणार.

विला:—पण मग पोरीची वाट काय ?

नन्द:—दुसरे हजारों बॅचलर्स आहेत त्यांपैकीं तिला जो आवडेल त्याच्याशीं तिनें विवाह करावा. मला हिंदू लेडीजपेक्षां युरोपियन लेडीज फार आवडतात. त्यांचा वर्ण व्हाईट असून डोळे कसे मांजराच्या डोळ्याप्रमाणें घारे असतात.

सिंह:—हें काम आपण अवश्य कराच. ह्यांत जर कांहीं पातक असलें तर विलायतच्या यात्रेनें त्याचें क्षालन होईल. विलायतेस जाण्याला उपयोगीं पडणारे पुष्कळ गुण आपल्या अंगीं आहेत. हॅट व कोट आपणाला चांगली शोभतात. यू उइल् मेक ए कॅपिटळ जॉन बुल.

नन्द:—तें पाहतां येईल. एकदां हिंदुस्थान सोडून दूर गेलो ह्मणजे मला बंगाली ह्मणण्याची कोणाची प्राज्ञा आहे. बरें, पण बंगाली विसरून जायला काय उपाय करावा ?

सिंह:—तीच तर, काय ती मख्खी. पहिल्यांदा पॅसेंज तर एँगेज करा मग एखादे वेळीं त्यांतलें रहस्य प्रायव्हेटलीं मी आपणाला सांगेन.

नन्द:—पण हा आपल्या सारखा आंगाचा वास कोठून आणावा ?

सिंह:—तोही आपतां येईल.

विला:—नन्दबाबू, आपण विलायतेला गेला ह्मणजे आपली ' चादर निवारिणी ' सभा कोण चालवील ?

नंद:—आमच्या खालच्या वर्गातले सर्वच विद्यार्थी त्या कामाला लायख आहेत. त्यांतून कोणीना कोणी तरी चालवील. विलायतेहून परत आलों ह्मणजे चादरशी काय पण ' भात कापड निवारिणी ' सभा काढीन.

विला:—गौर, तुह्मी हें ऐकत काय बसलां ? स्वैपाकघरांत जा व कांहीं चुलीच्या उद्योगाला लागा. तुह्माला कांहीं समजत नाहीं. भ्रांतिवटा सारखे पाहत काय बसलांत ?

गौरी:—हा चाललों. (स्वगत) खूप सायन्टिफिक बायको मिळाली आहे. ही बायको नव्हे पोलीस आहे.

(गौरीकान्त जातो)

सिंह:—आपला हजबंड फार चमत्कारिक आहे.

विला:—पतीचा प्रधानगुण ह्मटला ह्मणजे स्त्रीभक्ति. जो पति स्त्रीभक्ति करीत नाहीं तो व्यभिचारी. किंवा पुरुषवेश्या; व मला जर आपल्या पतीला दाबांत ठेवतां आलें नाहीं तर माझ्या ह्या हाय् एज्युकेशनचा फायदा काय ?

नंद०—आणि आमचे बाबा एका मूर्ख मुलीशीं माझे लग्न करणार आहे. लाजून उभी राहील. चार थपडा मारल्याशिवाय तोंडांतून शब्द निघायचा नाहीं. गायला येत नाहीं, नाचायला येत नाहीं, व जगांत काय चाललें आहे त्याची बातमी नाहीं. असली स्त्री काय कामाची ?

सिंह—तर आतां आपण जा. आतां माझी प्रांटीस मेडिकल ऍडव्हाईस देण्याची वेळ झाली. दवाखान्यांत जाऊन बसलें पाहिजे.

विला०—आतां चाललाच कां आपण ! पुन्हां कधीं गांठ ?

सिंह—जेव्हां आपल्या मर्जीस येईल तेव्हां.

विला:—Fie, flatterer.

सिंह:—Then call your mirrer by that name.

विला:—मी उद्यां संध्याकाळीं आपली भेट घेण्यास येईन. आपण घरींच असाल ना ?

सिंह:--At home and alone, we will have a cup of

tea and sweet tete-a tete, now good bye. (shakes hand) Now Nand Babu, come to me any morning जी जी इनफार्मेशन लागेल ती सर्व देईन.

नन्द:—नुसती इनफर्मेशन् ! माझी सर्व तयारी आपणालाच करून दिली पाहिजे. मी आजपासूनच सुरी, कांटा व शेकत बसण्याचा अभ्यास सुरू करतो.

सिंह:—फार चांगलें फार चांगले;

(सिंह जातो)

नन्दबाबू, एकून आपण आतां विवाह करणार ?

नन्द:—विवाह ! आपल्यासारखी ग्राज्युएट स्त्री मिळेल तर गौरबाबूचें काय नशीब !

विला: —कां आपल्याला जेलसी झाली की काय ?

नंद०—कोणाला नाहीं होणार ? मी विलायतेहून परत येईपर्यंत आपण जर मिस् राहतां तर !

विला०—विवाहित असेल तीच विधवा होईल.

नंद०—गाड्, असा दिवस कधीं येईल !

विला०—आपण सायन्स शिकता आणि गॉड्चें नांव घेतां हें काय ? आपला परमेश्वरावर विश्वास आहे ?

नंद०—राम ! ते नांव काढूं नका. तें आपलें सहज तोंडीं आलें. ज्या दिवशीं ग्यानो विकत घेतला त्याच दिवशीं गॉड नाहीं अशी खात्री झाली. त्यावर आज तोंडांतून तो शब्द निघाला. आतां आपणांला जास्त तसदी देत नाहीं.

विला: —तसदी कसली, कांहीं नाहीं. पण जाण्याचे पूर्वी एकदां भेटाल ना ?

नन्द: —भेटल्याशिवाय कसा जाईन. आपण आपला एक फोटो मला दिला पाहिजे.

विला:—तेथें किती तरी स्त्रिया दृष्टीस पडतील माझा फोटो नेऊन काय करणार ?

नन्द:—आपण एकदां गाऊन चढविला ह्मणजे कोणती स्त्री आपल्या तोंडीला उतरेल. बरें आतां गुडबाय.

(नन्दबाबू जातो)

विला:—बहारी—

(बहारी येतो)

बेहारी: -बाईसाहेब,

विला:—बाबू काय करताहेत.

बेहारी—मसाला वाटताहेत.

विला:—माझा खाना लवकर घेऊन यायला सांग मी हमामखान्यांतून जाऊन येतें.

दोघे जातात

तृतीय गर्भांक.

गोपीनाथ बाबूंचें घर.

गोपीनाथ सरकार.

गोपी०— चार हजार दोनशें नगद, चार हजार दोनशें जरी झाले तरी त्यांतले शिलक किती उरणार ? चार हजार एका बाजूला राहूं द्या. बाकी उरले दोनशें; त्यांतून लग्नाचा खर्च. अंगाला लावायला हळद, व्याह्यांना मेजवानी, नान्दी व उपाध्याय पुरोहिताची दक्षणा . व वाजंत्र्यांची मजुरी व व्याह्यांच्या गांवीं जाऊन येण्याचा खर्च हें सर्व पन्नासाच्या आंत उरकायचें नाहीं. घटकाला पन्नास देईन असें सांगितलें आहे पण इतके देणार नाहीं. पंधरा देऊं व फारच घिसघिस केली तर वीस ह्मणजे हद्द. मिळून झाले सत्तर. बाकी उरले एकशेंतीस. ह्मणजे कांहींच नाहीं. ह्यांत नुसता मोदी देखील भागावयाचा नाहीं. व चंद्रनाथाकडून घर सोडवायचें ह्मणजे व्याज व मुद्दल मिळून तेराशे रुपयांवर होईल.

(स्त्री येते)

स्त्री:—धोबी आला आहे, कांहीं कपडे द्यायचे आहेत ?

गोपी:—तेराशेच भरा—

झी:—मग तरवा यायला सांगूं ?

गोपी:—गहाणाचे दागिने सोडवायला किती बरें लागतील. ते धरा सातशें.

झी:—हिशेबाची कसली गुणगुण चालली आहे. माझें बोलणें ऐकलें नाहीं वाटतें.

गोपी:—काय ह्मटलेंस ?

झी:—विशेष कांहीं नाहीं. ह्मटलें आज तारीख कोणची ?

गोपी:—आज तेविसावी तारीख. हें तर उघड उघड दोन हजारावर जाऊं लागलें.

झी:—आतांच काय त्याचें—आतां देतां ?

गोपी:—काय देऊं ?

झी—इतका वेळ झाल्यावर विचारतां काय देऊं ह्मणून.

गोपी—बोल बया, झटपट काय तें. माझी तब्येत सध्यां ठीक नाहीं. माझें डोकें ठिकाणावर नाहीं.

झी:—ऊं ! तर आतांच पैशाची पिशवी हातीं पडली कीं काय ? धोबी आला आहे, कांहीं कपडे द्यायचे आहेत कां धुवायला ? तो पगार मागतो आहे.

गोपी:—तर कपडे बिपडे कांहीं द्यायचे नाहींत. अंगातले कपडे अद्याप चांगले स्वच्छ आहेत.

झी:—बरें, पण पगार ?

गोपी:—लग्नाचे तिसरे दिवशीं सर्व चुकवून देईन.

झी:—जळ्ळया लग्नाचा तिसरा दिवस कधीं येणार तेंच कळत नाहीं. त्याची वाट पाहतां पाहतां डोळे पांढरे होतील.

गोपी:—जा मर शिंचे, पोराच्या लग्नाच्या कामांत असें अभद्र भाषण ?

झी:—हें कसलें पोराचें लग्न. हा पोराचा सौदा. मुलगी पाहिली नाहीं, घर पाहिलें नाहीं. नुसता पैसा. आमच्या गरिबाच्या घरांत असें कोणीं केलें तर वाळींत टाकतील.

(झी जाते)

गोपी०—ह्या मोलकरणीला सोडून चालायचें नाहीं. हिचा बराच पगार देणें बाकी आहे व शिवाय सगळ्या गांवाचें देणें आहे. सावकार लोकांचा

तगादा चालूच आहे. सावकारांपैकीं दोन मेले तर नाहीं चालायचें? पण ते कोठले मरायला! त्यांना आलें आहे मार्कंडेयाचें आयुष्य.

(गिन्नी येते.)

हें बघ ए, लोकांचें देणें देऊन टाकल्यावर बाकी कांहीं शिल्लक उरण्याची आशा नको.

गिन्नी---गुरूचें सांगणें ऐकलें नाहीं त्याचा परिणामच हा. मीं सांगितलेंच होतें कीं इतक्या कमी रकमेवर कबूल करूं नका ह्मणून. माझ्या नंदलालाची काय सारी चारच हजार रुपये किंमत. तुमच्यासारखा मुळुं मुळुं मनुष्य कांहीं कामाचा नाहीं.

गोपीः---एवढेंच जरी दिले तरी त्यांचे वाटोळें होईल.

गिन्नीः--त्यांचें वाटोळें झालें तर मला काय त्याचें, ते कांहीं माझे कोणी नातलग आहेत कीं काय? नन्दलालाला मुलगी दिली ह्मणजे त्यांच्याच चौदा पुरुषांचा उद्धार होईल हें ठाऊक असून खर्च करायचें त्यांच्या जिवावर कां येतें कोणास ठाऊक. त्याची बायको ह्मणजे त्यांतलीच. जावयाला द्यायचें ह्मटलें कीं चढल्याच तिच्या कपाळाला आठ्या. तिचें कांहीं दागिने बिगिने नाहींत का. वींक ह्मणावे ते जावायाला देण्याकरितां.

गोपीः--माझ्या मनांत एक विचार आला आहे. प्रथम चांगला ठराव करतां आला नाहीं. पण ऐन लग्नाला जायच्या वेळीं नंदलालाला कांहीं तरी हट्ट घेऊन बसायला सांगेन, ह्मणजे कांहीं तर प्राप्ति होईलच.

गिन्नीः--ह्यावेळीं तुह्माला वाटेल तें तुह्मी करा. मी कांहीं बोलणार नाहीं. पण वर्ष दोनवर्षांनीं नन्दलालाची आणखी एखादी परीक्षा पास झाल्यावर ह्या पोरीचें जर कांहीं बरें वाईट झालें तर पुन्हां नंदलालाचें लग्न करून एक दुमजली घर व माझे सर्व दागिने मी करीन कीं नाहीं पहा.

(झी येते).

झीः--- बाहेर चला, सर्व आले आहेत.

गिन्नीः--- कोण आले आहेत.

झीः--- तीं मुडदे फरास माणसें. एक ढब्बूखान, व एक उंच ढांगळ.

गोपीः--- मुडदेफरास कोण?

झीः--- आपले मित्र घटक. ज्यानें हें श्राद्ध ठरावेलें आहे तो.

गिन्नीः— हें काय तुझें अभद्र बोलणें !

झीः— त्यांच्या श्राद्धाची मी गोष्ट सांगितली. ज्यांचे पैसे खर्च होणार त्यांचें श्राद्ध. आपल्याला तर पैसे घ्यायचे आहेत. आपण आपले आगंतुक भिक्षुक.

गिन्नीः—हिला काय झालें आहे हें कळत नाहीं.

गोपीः—मला वाटतें मुलगा पाहायला व्याही आले असतील, तूं दरवाज्या आड उभी रहा. पाहतों, मग आणखी कांहीं वाढवायला सांपडलें तर. (झीला) तूं चटकन जाऊन नन्दलालाला बोलावून आण. मला वाटतें तो चक्रवर्तींच्या घरीं गेला आहे.

(गोपी व गिन्नी जातात)

झीः—बाबा, बाबा, बाबा, हें कां मुलाचें लग्न ? त्या बिचाऱ्याला मुलगी झाली हा कां त्यांचा अपराध आहे, ह्मणून त्याचा एकदम असा प्राण घ्यायचा ? आमचे यजमान व यजमानीण यांच्या खलबतांवर खलबतें चाललीं आहेत. यजमानीणबाईतर काय ह्यावेळीं यजमानाचे बाबा झाल्या आहेत. त्या सांगतात कीं जावयाला आपलें घर द्या ह्मणजे सर्व ठीक होईल. हे कायस्थ कसले—कसाई. कोठली एक चुलींतली परीक्षा पास झाली आहे. परीक्षा पास झाली ह्मणजे कांहीं स्वर्गाला हात लागला कीं काय ? पण ह्याची हांव ह्मणून सुटत नाहीं. कितीहि दिलें तरी यांचं समाधान कोठें आहे ? परवां त्या घोसांच्या दोन मुलींचीं लग्नें झालीं त्यामुळें तो बिचारा अगदीं धुळीस मिळाला. घर गेलें, चाकर गेले, सर्व कांहीं गेलें. त्यांचें जर यथास्थित असतें तर मला कशाला असल्या कसायांची नोकरी करावी लागती ! सरकार इतर बाबतींत इतका बंदोबस्त करतें पण ह्या लग्नांच्या बाबतींत मात्र कांहीं करीत नाहीं. घाटाघांटावर प्रेत जाळण्याबद्दलचे देखील नियम ठरवून टाकले आहेत. त्याप्रमाणेच मुलींच्या लग्नाबद्दलही जर नियम ठरवून टाकले तर मुलींच्या बापावर अगणीत उपकार होतील. नंदलाल कोठें असेल त्याला एकदा शोधून घेऊन येते. पास झाला आहे त्यामुळें त्याला राजाचा मान आला आहे. मला वाटतें त्याच्या डोळ्याला कांहीं विकार झाला असावा ह्मणूनच तो डोळ्यावर तावदानी— खिडकी ठेवतो.

(झी जाते)

चतुर्थ गर्भांक

(गोपीनाथाच्या घराचा दिवाणखाना.)

(गोपीनाथ, मन्मथबाबू, लोकनाथबाबू व घटक येतात.)

घटकः—कां तंबाकु वगैरे कांहीं दिली नाहीं. चाकर माणसें कोठें गेलीं. ए गोपाळ, ए राखाल, बाजारांत गेलीं वाटते सर्व गडी माणसें. संसाराचें काम कमी कां असतें? अग ए लक्ष्मी, इकडे तर ये. (मन्मथबाबूस) गोपीनाथबाबूंची आपली बाळबोध चाल. समजलें. जुनें वडिलोपार्जित घर कांहीं सोडीत नाहींत. ते ह्मणतात कीं नवें घर बांधून वडिलांचा लौकिक कां बुडवायचा. तुमच्या मुलीला सर्व तऱ्हेचे सुख मिळेल. तिच्या सासूला स्वतःची मुलगी नसल्यामुळें पोटच्या मुलीप्रमाणें तिचें संगोपन करील. सोन्यासारखा संसार, कश्शाची ह्मणून ददात नाहीं. घरांत चाकर, कुळंबिणी पुष्कळ आहेत. मुलीनें पायावर पाय टाकून खुश्शाल खावें. काडीभर देखील काम करायला नको. गोपीनाथबाबू आपल्या पसंतीनें सर्व दागिने तयार करून मुलीच्या अंगावर घालतील. ह्मणून तर त्यांनीं नगद पैसे घेतले.

गोपीः—आपल्याला कोठें नोकरी आहे ह्मणालात?

मन्मथः—स्मिदुळे स्म्यूगल कंपनीमध्यें मी क्याशिअर आहे.

गोपीः—क्याश आपल्याच हातीं असते? तर मग वरती ही बरीच प्राप्ति असेल.

मन्मथः—आहे थोडीशी पण आतां पूर्वीचे दिवस राहिले नाहींत, तेव्हां त्या शिवाय संसार कसा चालणार? शिवाय मी आडतीचें एक दुकान काढलें आहे.

घटक—(जनान्तिक) गप्प बसा, गप्पबसा.

गोपीः—काय आडतीचे दुकान आहे? कां हो घटकमहाराज ती गोष्टी मला कशी तुह्मी सांगितली नाहीं.

घटकः—त्या नुकसानीच्या धंद्याचें नांव कशाला काढूं? ह्या हिंवाळ्यांत तें दुकान बंद करायचं आहे.

गोपी०—बंद कां करतात. जावयाला कां देत नाहींत?

घटक०—(स्वगत) काय हा आशाळभूतपणा !

मन्मथ०— तें दुकान आमच्या स्त्रीधनाचे आहे. त्यावर माझी मालकी नाहीं.

(झी येते.)

झी—बाईसाहेब ह्मणतात मग विहिणीनें जावयाला दिलें तर काय वाईट. असा आनंदाचा दिवस पुन्हां केव्हां येणार ?

घटक—तूं आलीस कां ? दोन विडे तरी लावून घेऊन ये.

झी—थांबा माझी भांडीं घासायचीं तशीच पडलीं आहेत. व पानें तरी आहेत कोठे ? बाजारांत जाईन तेव्हां येतील पानें. एकट्या माणसानें काय काय ह्मणून करावें ?

गोपीः—ह्यावेळीं तूं जा, निघ येथून, मूर्ख कोठची ! नन्दलाल कोठें आहे ?

झीः—थांबा अर्धा तास. तो केंस विंचरीत बसला आहे. त्याचे केंस ह्मणजे डुकरासारखे रांठ. कितीही विंचरले तरी कांहीं नाहीं. पोराच्या जातीला इतकी छानछोकी कशाला पाहिजे ? डोक्यांत कांहीं सिंदूर बिंदूर घालणार आहे कीं काय ?

गोपीः—जा जा, तूं घरांत जा. माझ्या घरांत इतके दिवस राहून कसें बोलावें तें देखील समजत नाहीं. जा, आपल्या कामाला जा.

झीः—जातेच. येथें कांहीं उभी राहणार आहे कीं काय ? मुलीचा बाप कोणता ? हा गलेलठ्ठ बसला आहे तो कीं काय ? अहो महाराज, अशी लटपट चालायची नाहीं. आपण मला एक सोन्याची गळेसरी व एक रेशमी लुगडें दिलें पाहिजे. यजमानांना पैसे मिळतील त्यानें ते कर्ज वारतील. मुलीला माझ्या बरोबर दिवस काढायचे आहेत. यजमानीणबाई तर सून आल्याबरोबर चुलीकडे ढुंकून देखील पाहणार नाहींत. मी कांहीं वेडी नाहीं मला सर्व समजतें.

गोपीः—बाई, मी तुला हात जोडतों, तू घरांत जा एक—

मन्मथः—तुझें म्हणणं मला कबूल आहे.

झीः—हाँ हाँ, आतां कसें !

(झी जाते

गोपी०—जुनीं चाकरमाणसें जशीं काहीं डोक्यावर चढतात. त्यांतून आमची बायको ह्मणजे अगदी भोळी, ही विश्वासाची ह्मणून हिला अद्याप ठेविली आहे. बाबूसाहेब, आपलें नांव काय ?

लोक:—माझें नांव श्रीलोकनाथदास दे.

मन्मथ:—हे आमचे शालक. बासदेवपूरच्या हायस्कूलचे हेडमास्तर आहेत. दिवाळीच्या सुट्टींत येथें आले आहेत.

घटक:—ते थोर घराण्यांतले आहेत. भांगरहाटच्या देंचा मुख्य मुख्य कुलीनांशीं संबंध आहे. ह्यांचा विद्याभ्यास साधारण झाला आहे. अलीकडचीं सर्टिफिकिटें वगैरे यांना कांहीं मिळाली नाहींत. हे आपले जुन्याकाळचे लोक आहेत.

(नन्दलाल येतो)

गोपी०—ये, इकडे येऊन बैस असा. हे आमचे चिरंजीव.

घटक—वः किती सुंदर आहेत हे ! जणुं कांहीं मदनच. मन्मथबाबू, एक वेळ पाहून तर घ्या. तरी अद्याप याचे लग्न झाले नाहीं.

मन्मथ०—आपले नांव काय ?

नंद०—एन्. सरकार.

घटक—नांव आपल्या भाषेत सांगा इंग्रजींत नको. इंग्रजीची परिक्षा पुढे होईलच.

नंद०—तुह्मी कोण ?

घटक—आह्मी कोण हे ठाऊक नाहीं ? आह्मी मूलाधार प्रजापतीचे हस्तक. आह्मी नसलों तर लग्नें कशीं होतील ? आह्मी घटक.

नन्द:—घटक ? दलाल ? तुमच्याजवळ लायसेन्स आहे ?

घटक:—आमचे लायसेन्स फायसेन्स सर्व तुह्मीच.

नन्द:—I dont ;

लोक:—आपलें पुरें नांव काय ?

नन्द:—नन्दलाल सरकार. परंतु, हल्लीं युनिव्हर्सिटींत हंन्टरचें मत चालूं आहे. त्यांच्या मताप्रमाणें एन. सरकार एवढें नांव सफिसियन्ट आहे. व लोकांनीं ही एवढयांवरून समजून घेतलें पाहिजे.

लोक:—आपल्या वडिलांचे नांव ?

नन्दः—कोणते वडील ?

मन्मथः—आपल्या पित्याचें नांव विचारताहेत.

नन्दः—ते ससोरच बसले आहेत. आपण त्यांनाच विचारं. मला व्यर्थ ट्रबलस् देण्याची जरूर ?

मन्मथ—(स्वगत) हा कसला मुलगा ! जसा कांहीं अडदांड खलाशी.

घटकः—लोकनाथ महाराज, यांची थोडी परीक्षा घ्या पाहूं ? अलीकडची कालेजांतलीं मुलें बापाला देखील भीक घालायची नाहींत.

नन्दः—आतां तुह्मी काय ह्मटलें ? तुह्माला कांहीं समजतें ? कांहीं इंग्रजी शिकला आहांत ?

लोकः—आपण कोठें शिकतां ?

नन्दः—सेकंड इयर क्लास; फ्री चर्च इन्स्टिटयूशन, कॉलेज डिपार्टमेंट.

लोकः—' वन् डिव्हाइडेड बाय झिरो ' ह्मणजे किती ?

नन्दः—कसला केश्चन् ! आपण ग्राज्युएट आहांत ?

लोकः—नाहीं.

नन्दः—तर आपल्याला मी परीक्षा देऊं इच्छीत नाहीं.

मन्मथ—हे जुन्या काळांचे एक सिनिअर स्कालरशिफ्होलर आहेत. ह्यांचें चांगले शिक्षण झालें आहे. हे एका हायस्कूलचे हेडमास्तर आहेत.

नन्दः—असतील. शाळेंत शिकाविण्याचं काम ह्यांना करतां येईल पण जुन्या काळच्या लोकांना कॉलेजांत शिकविण्याचं काम कधींही येणार नाहीं. युनिव्हर्सिटीच्या डिफरंट नॉलेजच्या व्हास्ट एरिया ग्रॅप करण्याची ह्यांना कपॅसिटी नाहीं. फिजिक्स, आपटिक्स ह्यांची आयडियाही ह्यांना नाहीं.

गोपीः—विचारताहेत त्याचें उत्तर दे. काय शिकला आहेस ते त्यांना दाखीव.

नंदः—त्यांना दाखवायचें आहे काय ? माझ्या ' चादर निवारिणी ' सभेचीं सर्व लेक्चरें कां वाचीत नाहींत. ? तीं सर्व ग्रॅजुएट्स् गार्डियन ' मध्यें छापिलीं आहेत. गेल्या ॲनिव्हर्सरीच्या स्पीचमध्यें बोललों आहे. Of man's first disobedience the evil that befel on the intellectual biped breed, nothing excels in enormity,

the curse that alighted like a bombarded bomb-shell on the heads of the Bengalees (hear, hear, loud applause) I mean the use and abuse of sinful sheets vulgarly known as chadar ह्या चादरीच्या चालीमुळें बंगाली लोक इतक्या भयंकर दुःखार्णवांत पडले आहेत कीं तें कांहीं शब्दांनीं वर्णन करतां येणें शक्य नाहीं. (टाळ्यांचा गजर) आणखी काय काय ह्मणून सांगत बसूं. हें पॅमफ्लेट घेऊन जा. ह्यांत सर्व कांहीं आहे.

घटक—मन्मथबाबू, लोकनाथबाबू, पाहिलीत विद्वत्ता. इंग्रजी वक्तृत्वाचा सपाटा ह्मणजे जसा कांहीं तोफांचा धडाका. शिवाय स्वभावांतही कांहीं कमी नाहीं. बरें आतां बराच वेळ झाला, आशीर्वाद करून चला लवकर.

मन्म०—आयुष्मान् भव (मोहोर देतो.)

नंद०—मला माफी असावी. जास्त बसण्याला मला वेळ नाहीं. विलासिनी कारफर्मा इच्याशीं माझी एँगजेमेंट ठरली आहे. तेथून गोरस्थानांत जायचें आहे. मि. सिंहचें निमंत्रण आहे.

घटक—जा, जा, जेवणाचीही वेळ झाली.

गोपी०—ती मोहोर मजजवळ नको–आपल्या आईजवळ नेऊन दे. हरवशील एखादी.

नंद०—तुह्मी मला पोलिटिकल एकानमी नका शिकवूं. गुड् मॉर्निंग टु ऑल ऑफ यू.

(नंदलाल जातो.)

मन्मथः—दिसण्यांत चांगले आहेत. विद्याही झाली आहे पण प्रकृतीमात्र जरा तापट आहे.

गोपीः—पूर्वीं नव्हती अशी. अलीकडे दीडवर्ष कालेजांत जाऊं लागल्यापासून अशी तब्येत झाली आहे. युरोपियन शिक्षकाजवळ शिकतो कीं नाहीं.

घटकः—असें तर खरेंच. " यथा नियुक्तोस्मि तथा करोमि " शिक्षक जसें सांगतात तसें हे करतात. गोऱ्यालोकांच्या संसर्गानें स्वभावांत एकप्रकारचा गरपणा येतो.

लोकः—याबद्दल काळजी नको. पुढें असें व्हायचें नाहीं. ह्या एल, ए. क्लासासारखा घातक क्लास दुसरा कोणताच नाहीं. ह्यांतून पार पडले ह्मणजे पुष्कळ शांत होतील. शाळेंतून कालेजांत गेले ह्मणजे छडीबिडीची धास्ति नसते व प्रोफेसर मि. ह्मणून हाक मारतात व मोठमोठ्या गहनविषयांचीं एक दोन लेक्चरं ऐकून हा गरमपणा येतो.

घटकः—हे मास्तर आहेत की नाहींत ह्मणून ह्यांनीं ठीक ओळखलें. मास्तर झाल्याशिवाय पोरांच्या खुब्या कळायच्या नाहींत. व गुराखी झाल्याशिवाय गुरांच्या कळायच्या नाहीं.

मन्मथः—आतां परवानगी असेल तर उठतो. कारण एकदा अलीपुरास जायचें आहे. एक समन्स आहे.

गोपीः—साक्षीला जायचं आहे ? तर आपल्याला फार काम आहे.

मन्मथः—हा एक त्रास आहे.

गोपीः— त्रास कसला ? महिन्यांतून असे दोन चार प्रसंग आले तर दोन पैसे तरी मिळतील.

लोकः—नाः, व्याह्योंनीं छान कोटी केली. ह्यांनीं काय तो धंदा पतकरला आहे कीं काय ?

मन्मथः—व्याह्यांची एवढी जबरदस्त मागणी कबूल केली आहे तर असें केल्याशिवाय चालेल कसें ?

गोपीः—हः हः हः

घटकः—हः हः हः, वाः फार छान. आतां आपण दोघांनीं मिळून मला एक घर दिलें पाहिजे. ह्यावेळीं हरगौरी मिलन करून दिले आहे.

(झी येते)

झीः—हे विडे घ्या.

घटकः—आण, आण.

झीः—वाः, हे तुमच्याकरितां थोडेच आणले आहेत. हे मुलीच्या बापाला द्या. कारण, त्यांच्याकडून मला एक सोन्याची गळेसरी व एक रेशमीं लुगडें घ्यायचें आहे.

गोपी०—जा निघ येथून. तूं फार शेफारलीस.

मन्मथः—मी विडा खात नाहीं. ह्या घटकाकरितां थोडी तंबाकू घेऊन ये.

झी:—तंबाकू कोठून आणूं ?

गोपी०—जा, कोठून तरी घेऊन ये.

घटक:—बरें, जाऊं द्या. आतां कांहीं जरूर नाहीं.

मन्मथ:—आतां आह्मी जातों. नमस्कार.

गोपी०—नमस्कार, नमस्कार.

लोक:—आतां कशाला जास्त तसदी घेतां ? जा परत.

(लोकनाथ, घटक व मन्मथनाथ जातात.)

गोपी—तूं मांडलें आहेस तरी काय ? तुला स्वतःची लाज नाहीं, लोकांची लाज नाहीं. तोंडास येईल तें बडबडतेस.

(गिन्नी येते)

गिन्नी—मी तरी तेंच सांगायला आलें आहें. लहान तोंडीं मोठा घास.

झी—तुह्मी दोघेजण इतके धांवून आला ते मारणार आहांत कीं काय ?

गिन्नी—चांगली झोडपून काढीन. निघ आमच्या घरांतून. आमच्या घरांत राहतेस, आमचें खातेस आणि आमच्याच मुलाला शिव्या देतेस.

झी:— काय तुमच्या मुलाला शिव्या दिल्या. तोंड पहा मारण्याचें. तुमच्यासारखी पुष्कळ माणसें पाहिलीं आहेत.

गिन्नी:—माझ्या मुलाचे केंस डुकराच्या केंसांसारखे राठ आहेत कां ? हरामजादी कोठली.

झी:— शिव्या देऊं नका आँ, सांगतें. तोंड संभाळा आपलें.

गोपी:— जाऊं दे तें. जास्ती बोलण्याची जरूर नाहीं. असली मोलकरीण मला नको. हिला काढून दे तूं.

झी:—द्या काढून, ही मी चालले. माझा सर्व पगार चुकवून टाका.

गोपी:—जेव्हां माझ्या हातीं पैसे येतील तेव्हां घेऊन जा.

झी:—तें मला नाहीं कांहीं समजत.

गोपी:—नाहीं समजत तर जा, वाटेल तें कर. फिर्याद कर जा.

झी:—फिर्याद करूं ? शिव्या देऊन मी पैसे वसूल करून घेईन. रस्त्यांत जाऊन शिव्या देईन. मी कांहीं वेडी नाहीं. पाहतें कसे पैसे वसूल होत नाहींत तें घरांत खायला नाहीं, आणि नोकर ठेवतात. पाहिलेत कसे सभ्य आहेत ते.

गिन्नी:-चल निघ रांडे घरांतून. माझ्या घरांत बसून मलाच शिव्या देतेस.

झी:—ह्या रस्त्यांत उभी राहून शिव्या देईन. दुष्ट कोठली. देव पाहून घेईल यांना. माझे पैसे बुडवत आहेत तीन रात्रीच्या आंत ह्यांच्या मुलाचें लग्न मोडेल. अजून जगांतला धर्म नाहींसा झाला नाहीं. सोमवारानंतर मंगळवार येईल. सूर्यानंतर चंद्र उगवेल. मी जर खरी असेन तर भगवान् मधुसूदन तीन दिवसांचे आंत ह्यांना पुत्रशोक करील.

(झी जाते).

गिन्नी.—झोडपा चांगली रांडेला.

गोपी:—आतां जरूर नाहीं. ती गेली निघून. चल घरांत.

गिन्नी: —हलकट रांड कोठली.

(दोघे जातात).

अंक २ रा.

प्रथम गर्भांक.

(मन्मथबाबूंच्या घराची बाहेरची खोली.)

(गोपीनाथ, मन्मथ, घटक व परमाणिक.)

मन्मथ:—हें काय हें. आतां कां पुन्हां अशा गोष्टी.

गोपि:—मी काय करूं सांगा ?

मन्मथ:—घटक महाराज तुह्मी तरी कांहीं बोला ? आतां लग्न मंडपांत येऊन हें काय अडविणें ?

घटक:—मी तरी तेंच ह्मणतों. कांहीं तरी करून एकदा मिटवून टाका झालें. शुभ कार्यांत आता विलंब नको.

मन्मथ:—ह्याला उपाय काय तो तुह्मीच सांगा. ह्यानें माझा लौकिक जाईल. ह्या संकटांतून मला वाचवा. मजजवळ जें कांहीं होतें तें सर्व देऊन टाकलें, घर देखील गहाण टाकलें. आणखी पांचशे रुपये आणूं कोठून ?

गोपी:—मला तरी काय ठाऊक. आपण पाहिलेंतच मी त्यांतल्या एक

पशाला तरी शिवलों कां ? सर्व पैसा आपल्या जावयाच्याच हातीं आहे. कसें-ही करून त्याची समजुत केलीच पाहिजे. त्यांतला एक पैसा देखील मला गोरक्तासारखा. राम, राम.

मन्मथः— हें मोठें संकट आलें आहे. ठराव वगैरे सर्व होऊन चुकले आपले ह्मणणें मीं सर्वस्वी मान्य केलें व जीव गहाण ठेवून पैसे दिले. आतां ऐन लग्नाच्यावेळीं अडविणें ह्मणजे मला जातिबहिष्कृत होण्याचीच वेळ.

घटकः–' गतां बहुतरा कान्ता स्वल्पा तिष्ठति शर्वरी ' इतकें दिलें. आतां थोडक्याकरितां कशाला माघार घेतां. जावयाची समजूत घालून कसें तरी अर्ध्यावर भागवा ह्मणजे झालें. घरांत जा आतां. मीही जातों.

गोपीः–पहा विहिणीजवळ कांहीं असलें तर.

मन्मथ—परमेश्वरा, माझ्या शत्रूला देखील मुली देऊं नकोस. चला घटक महाराज.

(मन्मथ व घटक जातात.)

गोपीः—ए तुक्या, लवकर जा आणि नंदलालच्या कानांत सांग कीं पुरी रक्कम मिळत नसेलच तर अर्ध्यावर कबूल हो ह्मणून. विहिणीच्या हातीं सर्व आहे. आणखी त्याला ह्मण कीं आजच्या दिवस सर्व पैसा आपल्याच हातीं ठेव ह्मणजे माझा उवड माथा झाला. माझ्या जवळ पैसे नसले ह्मणजे, उपाध्याय, न्हावी, परीट वगैरे लोक देण्याबद्दल मला छळणार नाहींत. जा, लवकर.

तुक्याः—मी सर्व सांगतों.

(तुक्या जातो)

गोपी०—नन्दलाल कसा झाला तरी माझा मुलगा. त्यांतून एल. ए शिक-लेला मग काय विचारायचें आहे. आयत्या वेळीं कसा त्यानें गळा धरलान. शाबास, नन्दलाल. आतां तुझी खोली चांगली रंगवून देईल, टेबल, खुर्च्या वगैरे सर्व घेऊन देईन. पन्नास साठ रुपये नन्दलाला प्रीत्यर्थ खर्च केले नाहींत तर चांगले दिसणार नाहीं. खरें ह्मटलें तर हे सर्व पैसे त्याचेच आहेत. उजाडेल तेव्हां माझ्या मागचा त्रास सुटेल. सावकारांचे देणें एकदम देऊन टाकलें तर ते कांहींच सूट देणार नाहींत कां ? सूट दिली नाहीं तर एक पैसा देखील देणार नाहीं. करूं द्या त्यांना फिर्यादि आणि येऊं द्या खर्चाच्या

पैचांत. नंतर मी हे पैसे बँकेंत ठेवीन अगर कांहीं व्यापार करीन. पैसे मिळविण्याला व्यापरासारखे दुसरें साधन नाहीं. चक्रवर्ती देखील मोठी ऐट मारतो आहे त्याची देखील खोड मोडतो चांगली. जर तिच्या मनाप्रमाणें नंदलालाची बी, ए. परीक्षा पास झाल्यावर ह्या सुनेचें बरें वाईट झालें तर दहाहजार रुपयांत एक पैसाही कमी येणार नाहीं. मग मी चांगला श्रीमंत होईन. अलीकडच्या पोरांना ज्यास्ती बायका करणें नको. शिवाय तसें जरी असत तरी सवतीवर मुलगी देणारा पैसे का देईल. माझी बायको तरी पहा किती मूर्ख आहे ती. भिकारडीला एकच मुलगा आहे. तिनें जर पैसा दिला नाहीं तर तिचें दागीने गहाण टेवीन. व तिला दुसरा मुलगा होऊन त्याच्या लग्नाचे पैसे येतील तेव्हां ते मोडवीन.

(घटक व मन्मथ येतात.)

घटकः— पहा ईश्वराची लीला. सिद्धिदाता गणेश सर्व शुभ करील. ज्याठिकाणीं मी आहे त्याठिकाणीं अशुभाचें नाव नको.

गोपीः— काय, काय, झालें तरी काय ?

मन्मथः— व्हायचें काय. इकडे तिकडे करून नगद सत्तर रुपये मिळाले, व शिवाय तिच्या हातांत पंधरा तोळ्याचे गोट होते तेही आपणाला देतो. यांत सर्व मानून घ्या.—

घटकः— छान झालें, तुह्मी उत्तम केलेत. आता त्यांचें नांव काढू नका. ते सर्व तुमच्या मुली करितांच आहे. आतांच तुमची मुलगी हातात गोट घालून आलेली दिसेल. हे सव पैसे मुलीच्या पेटींत आहेत असें समजा. आजकालच्या मुली आपल्या नवऱ्याला अगदीं मुठींत ठेवतात. आपण पाहिलेतच, गोपीबाबूंनीं यांतल्या एक पैशाला देखील हात लावला नाहीं.

गोपी— राम, राम, तो पैसा ह्मणजे मला भावजई सारखा. मी त्या पैशाला शिवेन का ? शिवाय मला तरी त्याची जरूर काय. तें कांहीं असो. आतां सर्व आटोपलें. यथास्थित झालें.

घटकः— निर्विघ्नपणें वर मुलीच्या घरीं गेला आहे. तेथें पुष्कळ मुली जमल्या आहेत. मन्मथबाबूंचे गणगोत सर्व आलें आहे. मन्मथबाबूंनीं खर्चही खूप केला आहे.

मन्मथः—आतां यावें. थोडं कांहीं खात नाहीं कां ?

गोपीः—आतां नको. रात्रीं मी खात नाहीं. आतां घरीं जाऊन जरा पडतो. पुन्हां सकाळीं आले पाहिजे. नऊ वाजल्यावर मृत्युयोग आहे. ह्मणून त्याच्यापूर्वीच सर्व आटोपून कन्या व वर यांना घरीं घेऊन आले पाहिजे.

मन्मथः—कांहीं खाल्ल्याशिवाय येथून जाणें चांगलें दिसत नाहीं.

गोपीः—आज नको, आतां हें आमचच घर झालें आहे. वाटेल तेव्हां येऊन हक्कानें खाऊन जाईन. आतां जातो.

मन्मथः—यावर काय बोलायचें. पण—

गोपीः—पण बीण कांहीं नाहीं. आतां आपण निजा. रात्र बरीच झाली आहे. व नन्दलालालाही लवकर निजायला सांगा, नाहींतर तब्येत बिघडेल.

घटकः—आज त्यांना लवकर निजूं देणार ? आतां चला मी ही घरीं जातो. उद्यां दोघांकडूनही माझी चांगली बिदागी होऊं द्या, ह्मणजे ह्या शुभकार्याची समाप्ति होईल. व हा ब्राह्मणही आशीर्वाद देत देत जाईल.

गोपीः—तर मी आतां जातों.

मन्मथः—नमस्कार, नमस्कार हो घटक महाराज.

घटकः—कल्याण असो. कल्याण असो. मी फार मोठ काम केलें आहे.

(सर्व जातात.)

द्वितीय गर्भांक.

नवऱ्यामुलीचें (लग्न) गृह

नृत्यः—काय हो जावई बोवा, विचार कसला चालला आहे ? आमच्या बरोबर दोन शब्द बोला. तुमच्या बरोबर रात्रभर जागण्याकरितां आह्मी साऱ्याजणी आलो आहोंत.

नन्द—(स्वगत) मला सावध राहिले पाहिजे नाहींतर ह्या माझी तेव्हांच टर उडवितील व मला बावळा व अरसिक ठरवितील.

सुरः—नृत्यकाली काय ह्मणाली तें ऐकलेत कां ? तिच्या प्रश्नाचें उत्तर द्या. ती तुमची वडील मेव्हणी.

नन्दः—काय तिचें नांव ?

सुरः—नृत्य—नृत्यकाली.

नन्दः—नांव तर मोठें छान आहे. नृत्यकाली कोण ?

सुरः—पुन्हां नृत्यकाली कोण ह्मणून काय विचारितां. नृत्यकाली तुमची साली.

नन्दः—तुह्मी मोठ्या कवी आहांत, ह्मणूनच तुमच्या तोंडांतून ही काव्यरचना बाहेर आली. मी विचारलें नृत्यकाली ही कोण आहे ?

मोहिः—पुन्हां कोण ? कायस्थ—तुमची मेव्हणी कां कोणी दुसऱ्या जातीची असेल. तिच्या सासरचें आडनांव बोस. कालेजांत शिकतां आणि एवढें देखील तुह्माला कळेना. पीळगे सूरी यांचा कान.

नन्दः— तर मग नृत्यकाली बोस असें ह्मणा.

सुर— वाः वाः हाः हाः हाः ! नृत्यकाली बोस ! तूं नृत्यकाली बोस बरें कां ? हाः हाः हाः तुझ्या नवऱ्याला जर कोणी नांव विचारलें तर जीवनकृष्ण दासी ह्मणून सांगायला सांग समजलीस. हाः हाः हाः ! काय ह्मणे नृत्यकाली बोस.—मोहिनी, पिरगळ—तूं त्यांचा डावा कान व मी उजवा पिगळते व यांचा बोसें बाहेर काढते. (कान पिरगळतात.)

नन्दः—उंः अयाईई. कळ लागली. सोडा सोडा लवकर. इतकें स्त्रीस्वातंत्र्य उपयोगी नाहीं. माझा कान दुखला. ह्याला कां स्त्रीस्वातंत्र्य ह्मणावयाचें. विलासिनी कारफर्मा गोरे बाबूंचा कधींच कान पिरगळीत नाहीं. सोडा, सोडा.

मोहिः — मग आमचीं बायकांचीं नांव तुह्मी कां बिघडवितां ? आमचीं आपलीं साधीं नांव त्याला कशाला असलीं कर्णकटु उपपद जोडतां ? नृत्यकाली बोस, तर मी मन मोहिनी दत्त, व ही सुरत्कुमारी हजरा ?

वसः— मग माझें आटोपलेंच ह्मणायचें. मी वसन्तकुमारी मुजुमदार आहे हें जर आमच्या घरीं ऐकलें तर ते मला घरांतून हांकनच देतील. असला चावटपणा त्यांना बिलकूल खपावयाचा नाहीं.

नृत्यः—तें काहींही असो. आतां असें भांडतच कां बसायचें ? दोन गाणीं ऐका, कविता वगैरे कांहीं ह्मणा.

मोहिः—हें ठीक सांगितलेस. ह्मणा तर जावईबोवा एखादें पद.

नन्दः—थांबा जरा, अजून माझा कान दुखतो आहे.

वसः--इकडे करा जरा, म्हणजे मी चोळतें. पहा किती लाल झाला आहे तो. सुरी, तूं फार निर्दय, मोहिनीही कांहीं कमी नाहीं. जा तुम्ही आतां.

नन्दः—वाः आपण तर मोठे खुष झालों. स्त्री पुरुष एकत्र जमून गीत वाद्यादिकांनीं परस्परांचे मनरंजन करण्याचे जें तुम्हास वळण लागलें आहे हा एक भारतोन्नतीचा राजमार्ग आहे. बरें पण ह्या लुगडयाखालीं झांकलेली पोटळी कसली आहे. त्यात कांहीं हालचाल दिसत नाहीं ती.

वसः—त्यांत सात हजाराचा ऐवज आहे.

सुरः—ती आपली अर्धांगी आहे समजलात. तिची चौकशी करायला आपल्याला पुष्कळ वेळ आहे. सध्या गा तर खरें.

नन्दः—स्त्रीपुरुषांच्या समाजामध्यें स्त्रियांनींच आरंभ केला पाहिजे. तर (नृत्यकालीस) तुम्हीच म्हणा प्रथम.

सुरः—जावईबावांनीं तुलाच म्हणायला सांगितलें आहे तर कर आरंभ.

मोहिनीः—तुझं तें गाणें म्हण लग्नाच्या वेळीं म्हणतेस तें. ऐका, जावई-बोआ, आपल्या मेव्हणीचें गाणें. गळा तर पहा कसा गवयासारखा आहे.

नृत्यः—नको बाई, बाबांनीं जर ऐकलें तर रागावतील.

सुरः—बाबा कशाला ऐकायला बसले आहेत. ते बाहेरच्या खोलींत निजले आहेत. तूं गा आपली.

नृत्यः—हंसूं बिसूं नका. तुम्ही पुष्कळ ठिकाणीं चांगलीं चांगलीं गवयांचीं गाणीं ऐकलीं असतील. माझें काय आपलें, मी आपलें ऐकून ऐकून कांहीं तरी म्हणतें झालें.

नन्दः—तुम्ही आपल्या गा. मी हंसूं कशाला. ह्या प्रसंगावर वर्तमान पत्रात मी एक छान लेख लिहीन.

नृत्यः—असें मात्र करूं नका. असें करणार असाल तर मी मुळींच गात नाहीं.

वसः—ते कशाला लिहितील. तूं गा आपली.

नृत्यः—

(चौऱ्यायशि योनिचा फेरा फिरून सारा या चालीवर).

वारुणी विधीनें निपजविली या भुवनीं ।
लागती तियेच्या लोक अमित त भजनीं ॥

'कन्यका स्नुषा कीं भगिनि पत्नि ती जननी ।
वारुणी प्रसादें दिसति सकल समनयनीं ॥
अपपरभावा लोपावि सत्वर धन्य इची करणी ।
संसार सिंधुची साच गमे ती तरणी ॥
पानयोग्य त्या दोनचिवस्तू असती या भुवनीं ।
कामिनी अधर कीं सुरा दुजी दरहरिणी ॥

नन्दः—वाः फार छान ! Brave ! रचना फार सुंदर, तुमचा आवा-जही फार मधुर.

नृत्यः—आतां आपण गा. आपण किती तरी नाटकें पाहिली असतील, त्यांपैकीं एखादं पद गा.

नन्दः—नाटकांतलें पद ! विवाहासारख्या पवित्र मंगलकार्यांत व ह्या भगिनींच्या समोर नाटकांतलें अपवित्र पद ह्मणायचें. वा ! छान आपली निवड ह्मणायची !

मोहिः—आणि आतां ह्मटलं तें कशातलं ? तिचा नवरा तिला पुष्कळ वेळ नाटकाला घेऊन जातो. नाटकांतली कितीतरी पदें तिला येतात, चांगलीं चांगलीं देवादिकांचीं.

नन्दः—नाटकांतलें पद गायलें ? नाटकांतलें पद ऐकलें ! तरीच इतकं अश्लील. हे मला आधीं कळतं तर मी उठून गेलो असतों. मिसेस कार-फर्मा इला विचारून ह्यांचें प्रायश्चित्त घेतलें पाहिजे.

सुरः—ह्या भगिनींच्या समोर गायच नाहीं असें हे ह्मणाले, तर त्यांना विचार ह्यातल्या भगिनी कोणत्या त्या.

नन्द०ः—सर्वच. आपण सर्वजण भगिनीच.

सुर०ः—सर्वच भगिनी. ही समोर बसली आहे ही सुद्धां का ?

नन्द०ः—हो, ती देखील भगिनीच. घरीं स्त्री पण समाजांत भगिनीच.

(सर्व हंसतात)

सुर०ः—अहो बहिणीशी लग्न लावणार, दूर व्हा.

नृत्यः—गप्पा पुरे करा. आतां गाणं ऐकूं. गा, जावई बोवा, तुमच्या इच्छेस वाटेल तें गा.

नन्द०ः—ऐका तर मन पवित्र करून.

सुवर्ण केतकीपरि——या चालीवर

लग्नसमय हा सुखदायक कीं होतो, सकलां, जन वदती
परि मज तों अजी विचित्र भासे विषाद उपजे बहु चित्तीं ॥
होमहवन हें चितेपरी मज वाटे निश्चित भ्रमवि मती
मळवट दिसती सुवासिनींचे सहगमना त्या जणु जाती ॥
दीपोत्सव हा वाटे जाळी नगर सर्व हें त्या न मिती
एक दोन कीं सर्वचि दिसतें भेसुर झुरली अन्यगती ॥

(ठानदिदी येते.)

ठान०:—काय हो जावई बोवा, हें काय अवलक्षण? लग्न समारंभांत असलें अभद्र अंत्येष्टीचें गाणें कशाला?

सुर०—आजी, शिव्या देऊं नकोस त्यांना! ते तुझे रसिक नातजावई आहेत.

ठान:—खरें कीं काय. ही रसिकता हे शिकले कोठें?

नन्द:—हाय हाय! काय ही आमच्या देशाची पतितावस्था! आमच्या देशांतील सर्व स्त्रिया विलासिनी कारफर्मा व कामिनी भट्टाचार्यासारख्या कधीं होतील?

ठान:—विलासिनी व कामिनी ह्या कोण? लगीन घरीं बसून त्यांचा कशाला विचार चालला आहे?

नन्द:— हिच्याशीं अद्याप माझे भाषण वगैरे कांहीं झालें नाहीं. ही अद्याप आहे, हिला ज्ञान वगैरे कांहीं नाहीं, मग हिला माझ्याबरोबर मोठमोठ्या गहन विषयावर वादविवाद कसा करायला येईल?

ठान०:—तें कांहीं असो. आजपर्यंत ही आमची होती आतां तुमची झाली. तुह्मी तिला लिहिणें वाचणें काय वाटेल तें शिकवा. तिला सर्व येईल. आतां रात्र संपत आली, थोडावेळ निजा. मुलींनो, तुह्मीही आतां जाऊन निजा. जावईबोआंना थोडी झोप घेऊं द्या.

नन्द०:—(स्वगत) आतां उशीर करून उपयोग नाहीं. उजाडल ह्मणजे सर्वच फसेल. ह्याचवेळीं निघून जावें हें चांगलें. (प्रकाश्ये) माझ्या पोटांत कससंच होत आहे. एकवेळ दिशेला जाऊन आलें पाहिजे.

ठान०:—तर जाना, नेते, तूं ह्यांच्याबरोबर जा. व मोलकरणीला तांब्या व दिवा आणून द्यायला सांग.

नृत्यः—चला जावईबोआ, फराळाला.

सुरः—हाँ जा लवकर. आतां तुह्मी गायला त्यामुळें भूक लागलीच असेल.

नन्दः—(स्वगत) असभ्य ! हा पहा, सटकला तुमच्या हातून (उघड) चला तर.

(नृत्य व नंदलाल जातात.)

ठानः—जावईबोवा गेले. आतां तूं आपला बुरखा काढ. नवरा कसा आहे ? आवडला कां तुला ? बोलत कां नाहींस ? बोल ना ?

कुमुः—जा तूं.

ठानः—पसंत पडला का ?

कुमुः—जा, जा, तूं.

ठानः— पसंत आहे कां ?

कुमुः— मला माहीत नाहीं. तूं जा.

ठानः— इंग्रजी शिकशील ना ? नाहीं तर नवऱ्याचा संसार करतां यायचा नाहीं.

कुमुः— माझ्यावर जबरी आहे कीं काय ?

सुरः— जबरी नाहीं कशी ?

कुमुः— मी जाईन तेव्हां कीं नाहीं ?

सुरः— जाणार कशी नाहींस ?

(नृत्य येते)

नृत्यः— आजी, जावईबोवा कोठें गेले ?

ठानः— कोठें गेले ते मला काय माहीत. तूं तर त्यांच्या बरोबर होतीस ना ?

नृत्य०—चरापाठीमागें तर नाहींत. मोलकरीण तोंड धुवायला पाणी आणायला गेली, इतक्यांत ते दिसेनासे झाले.

ठान०—तर मग मला वाटते कीं मागच्या वाटेनें जाऊन बाहेरच्या दिवाणखान्यांत बसले असतील.

नृत्य०:—तांब्यांतलें पाणी जसेंच्या तसेंच आहे तर मग आंत जाऊन त्यांनीं केलें काय ?

ठान०—पहा तर मग कोठें गेले ते. आतां उजाडले, बहुतकरून दिवा-

णखान्यांत गेले असतील. सुरी, कुमीला घेऊन तूं लवकर ये, सकाळच्या न्हाण्याबिण्याच्या उद्योगाला लागलें पाहिजे.

(सर्व जातात)

तृतीय गर्भांक.

(मन्मथ बाबूंच्या घराची बाहेरची पडवी.)

मन्मथः—हे काय झालं. पहा बरं रस्त्यावर तर हिंडत नाहींत ना ?

भृत्य०:—मीं घरापाठीमागें पाहिलें, इकडला चवाठा पाहिला, तिकडला चवाठा पाहिला, कुठं दिसत नाहींत.

मन्मथः—जवळपास कोणा मित्राचं घर तर नाहीं, तेथं गेले असतील कदाचित्.

भृत्य०:—इतक्या पहाटेस कोणाचा दरवाजा उघडा असेल ? व गेले तरी अनवाणी कसें जातील. दाराशी जरीचा जोडा पडला आहे.

मन्मथः—तर हें झालें तरी काय, कांहींच समजत नाहीं. पुन्हां घरांत जाऊन पहा तर एकदा आले आहेत कां तें.

(भृत्य जातो.)

काय हें आश्चर्य ! गेले तरी कोठं ? पैसे घेऊन पळाले तर नाहींत ? हीं इंग्रजी शिकलेलीं मुलें. यांच्या ठिकाणीं सर्व कांहीं संभवतें. असं झालें असलें तर मात्र माझा सर्वस्वी घात झाला.

(गोपीनाथ व स्त्री येतात)

गोपीः—आतांच उठलां वाटतें, रात्रीं मला बिलकुल झोप आली नाहीं, थोडा पडून लागलाच इकडे आलों.

मन्मथः—जावईबोआ कोठे गेले ? घरीं तर गेले नाहींत ना ? आपल्या बरोबर दिसत नाहींत !

गोपी०:—हे काय ? घरीं कशाला जातील ? अद्याप येथले विधी राहिले आहेत ते झाल्यावर त्याला व नवऱ्यामुलीला मी घेऊन जाणार. तो कशाला घरीं जाईल.

मन्मथ०:—तर मग गेले कोठे ? मोठ्या पहाटेस तोंड धुणें परसाकडणें करायला ह्मणून बाहेर गेले तेव्हांपासून त्यांचा पत्ता नाहीं. रस्ते, आसपासच्या गल्ल्या सर्व सोधल्या पण कुठ्ठे ठिकाण नाहीं. त्यांचा जोडा देखील येथेंच पडला आहे.

गोपी:—हा काय प्रसंग ! परसाकडेला व तोंड धुवायला बाहेर गेले ? मग शौचकूपांत तर पडले बिडले नाहींत ना ?

मन्मथ:—तसली कल्पना देखील नको. ते एकमजली घर त्यांत पडण्याचें नांव नको.

गोपी:— समजलें सर्व रक्कम त्याच्याच हातीं होती. ती त्यानें कोठें ठेवली होती ?

मन्मथ:— ती त्यांनीं आपल्या धोतराच्या पदरांत बांधून पोटकुळीस ठेविली होती.

गोपी:— तर मग त्या करतांच कोणी तरी त्यांना वाटेंत छापा घातला असेल. (लुटलें असेल.)

मन्मथ:— त्यांना लुटण्याकरितां पाहटेच्यावेळीं कां चोर दबा धरून बसले असतील ? शिवाय तसें झालें असतें तर गडबड झाली नसती कां ? घरांत सर्व माणसें जागी होतीं. कोणीच कां गडबड ऐकली नसती ?

गोपी०—तर मग हें काम घरांतच झालें असलें पाहिजे. हें काम हलकें नाहीं. घरांतच त्याचा खून झाला असला पाहिजे. मी आतां पोलिसांना वर्दी देतो. ; येथल्या सर्वांचा झाडा घेववितों ह्मणजे सर्व माल येथल्या-येथें सापडेल.

मन्मथ:—मजजवळ होतें नव्हतें तें सर्व देऊन मी मुलीचें लग्न केलें आणि घरांतल्या सर्वांनीं मिळून आह्मी जावयाचा खून केला व रात्रीच्या रातीं त्याची वाट लावली. आपण हें बोलता तरी काय ?

स्त्री:—तुह्माला कळत नाहीं ! ह्यांना बुद्धिभ्रंश झाला आहे. जावईबोवा ह्मणजे का कांहीं ढेकूण ह्मणून मुलींनीं त्यांना उशीवर चिरडून मारलें. चांगला गलेलठ्ठ रेड्यासारखा आहे ! जमीनीवर हापटला तर जमीनीला पोचा येईल. बापाला पैसा द्यावा लागेल ह्मणून रात्रीच्यारातीं कोठें तरी पळून गेला असेल झालें.

गोपी०:—तूं काय ह्मणतेस हें. तूं आलीस कोठून येथें ?

झी:— मी छपून छपून तुमच्या पाठोपाठ आलें. आतां माझे पैसे टाका. मी जें सांगितलें तेंच खरें. तो लुच्चा मुलगा तुमच्या हातीं पैसे देणार ? व तुह्मी कर्ज वारणार व चैन करणार, नांव कशाला पाहिजे त्याचें. वर पाहण्यास आले होते त्यावेळीं मिळालेली मोहर देखील तुह्मी मागत होता ती त्यानें दिली नाहीं. त्यावरूनच तुह्मांला कळायला पाहिजे होतें. मला सर्व कळलें आहे.

गोपी:— तर माझें सर्वस्वी नुकसान झालें.

मन्मथ:— तुमचें नुकसान कसलें ! माझा सर्वस्वी घात झाला. होतें नव्हतें तें सर्व घालविलें व वरती हा प्रसंग !

झी:— जेथें असेल तेथून आपल्या मुलाला धुंडून आण व राहिलेले सर्व निर्धा करून दे ह्मणून सांगा याला.

गोपी:— कायग ए, तूं फारसें तोंड सोडलें आहेस. आपल्या धन्याला देखील भीत नाहींस कां ?

झी:— ऊं ! काय पण धनी ! खायला प्यायला द्यायचा मात्र धनी नाहीं व धमकावणी दाखवायला तेवढा धनी. दीड वर्षांत एक पैसा देखील मिळाला नाहीं आणि ह्मणे धनी ! टाक माझे पैसे आतांच्या आतां, चोर कोठचा. दुकानदार, पसारी या सर्वांना अशाच थापा, ह्मणे पोराचें लग्न झाल्यावर सर्व पैसे देईन. आतां कोठून पैसे देणार ? कोठें आहे तुझा मुलगा ? तो तर गेलाच, आतां आपली बायको वीक. चांगली धडधाकट आहे. कोणीही तिला पतकरील.

(घटक येतो.)

घट०:—वा:, दोन्हीही व्याही येथेंच आहेत. आतां दोवाकडची माझी मोठी बिदागी झाली पाहिजे. दोघांकडून मिळून दोनशे रुपयांहून कांहीं कमी घेणार नाहीं. मग देशीं जाऊन एक पक्के घर बांधीन. झीही येथेंच आहे! मुलगी पाहिलीस ? कशी काय आहे ? साक्षात् गौरी ?

झी:—पण त्या गौरीचा हर येथून पळून गेला.

घटक:—हें काय !

मन्मथ:—वराचा पुष्कळ शोध केला, पण कोठेंच पत्ता लागत नाहीं,

घटः—हें काय ? गेले कोठे ?

झीः—तुमची बिदागी पोचवायला गेले आहेत. तुह्मी इकडे येण्याचे श्रम कशाला घेतलेत.

(शेजारीपाजारी येतात.)

प्रथमः—कांहो मन्मथबाबू, हें काय ऐकतों ?

मन्मथः—माझें कपाळ.

२ प्रतिः—जावईबोआ पळून गेले ?

३ प्रतिः—आपल्या वडील मुलीची दागिन्यांची पेटी घरांतच होती, ती घेऊन तर पळाले नाहींत ना ?

२ प्रतिः—आह्मी ऐकलें कीं तो कायस्थ नाहीं.

१ प्रतिः मन्मथबाबूचें जसें कर्म तसें फळ. परीक्षा पास झालेला जावई मिळाला ह्मणून अगदीं नाचत होते. आह्माला कांहीं विचारलें नाहीं, घर, कूल वगैरे बद्दल कांहीं चौकशी केली नाहीं आणि कोठल्या उपटसुंभ हलकटाचें घर शोधून काढलें.

२ प्रतिः—वराचा बाप आला नाहीं कां ?

मन्मथः—हे समोर उभे आहेत तेच वराचे वडील.

प्रतिः—इतका थेरडा झालास, केव्हां मरशील याचा नेम नाहीं असें असून हा काय विश्वासघात !

गोपीः—यांत माझा काय अपराध, तुह्मीच सांगा.

२ प्रतिः— तुमचा काय अपराध ? पोराशीं संगनमत करून ह्या भल्या गृहस्थाची जात नष्ट केलीत, त्याचें सर्वस्व हरण केलेंत आणि वर विचारतां माझा काय अपराध ह्मणून. शरम नाहीं वाटत.

झीः— जळूं, जळूं, माणसाच्या अंगाला चिकटली कीं सर्व रक्त शोषून घेतलेंच समजा.

२ प्रतिः— आणि आतां पैशाची थैली घरीं ठेवून पोराला पळविलें असेल झाले.

झीः—घरीं काय उजेड आहे तो माहीत आहे. पोरगा पैसे घेऊन पळाला असेल. असल्या चोर आईबापाच्या पोटीं चांगलें पोर कोठून येणार.

३ प्रतिः—यांचा घटक कोण ?

झीः०—हाच चांडाळ मनुष्य. जातिवंत लुच्चा. असे नसतें तर मग हा प्रसंग कशाला येता. बिदागी घ्याय ा आला आहे. तुह्मी सगळेजण मिळून ह्याला चांगली बिदागी द्या.

घटक (स्वगत)—आतां दैवात असेल ते भोगले पाहिजे.

३ प्रतिः—कायरे, तुझे घर कोठे ?

घटकः—माझें घर दक्षिण मजलपुरांत.

२ प्रतिः—जातिवंत चोराचा मुलूख. हा फसवायचा, लुच्चेगिरीचा, घटकपणाचा धंदा कधीपासून पतकरला ?

घटक.—सात पिढ्या पासून हा आमचा धंदा आहे. पण लुच्चेगिरी कधींच केली नाहीं.

३ प्रतिः—ह्मणून ही केलीत नाटतें ? बोलवा कोणीतरी शिपायाला.

घटकः—बाबानो, हे काय करता तुह्मी. (पळून जातो.)

२ व ३ प्रतिः—धरा धरा चोराला. (पाठीमागे धावत जातात.)

झीः—त्यालाही पकडून ठेवा, नाहींतर पळून जाईल. मोठा दरवाजा बंद करा. त्याला ह्मणावें कीं मुलगा आणून दे नाहींतर घेतलेले सर्व पैसे परत दे. नर बीक काय पाहिजे ते कर पण पैसे दे. माझे याजन्‍ाट नात गटा । एक कमी इतके रुपये येणे आहेत, ते देखील वसूल क न ा. मी आपली देशीं जाईन, नाहींतर तुह्मी ठेवीत असाल तर तुमची नोकरी करीन.

(लोकनाथ बाबू येतो.)

लोक.—हे सर्व येथेच आहेत. कार्य निर्विघ्नपणें शेवटास गेलें ना ? काल येथें येण्याकरिता मी आपल्याकडून पुष्कळ गर्दी केली पण ट्रेन चुकली. रात्र स्टेशनावरच काढिली व पहाटेच्या गाडीनें निघालो.

मन्मथ—अरे बाबा, मी सर्वस्वी बुडा ले नव्हते त सर्व दे ा मी मुलीचे लग्न केले व आता जात जाण्याचा प्रसंग आला आहे.

लोक.—हे काय आहे ? हे कायस्थ नाहींत की काय ?

मन्मथः—व्यवहारात तर दिसत नव्हते तसे पण ही चाभाराची अवलाद दिसते. जावई येथून पळून गेला.

गोपीः—मिळालेल्या रकमेपैकीं मी एका पैशाला देखील शिवलों नाहीं.
ऐवज घेऊन गेला

लोक.—तें कांहीं आम्हाला समजत नाहीं. आह्मी आपल्याला जबाबदार धरूं. जावई गेले कोठे? तुमचें कांहीं तरी संगनमत असलें पाहिजे.

मन्मथः—कांहीं नाहीं. पहाटेच्यावेळीं पोटांत कसेसेंच होतें असें सांगून दिशेला ह्मणून गेले. पोटांत दुखणें वगैरे सब झूट. तांब्यांतलें पाणी जसेंच्या तसेंच होतें. कांहींतरी थाप देऊन पळाले झाले.

लोकः—थांबा, थांबा जरा; आलें माझ्या ध्यानांत. हावऱ्याच्या स्टेशनवर उतरून इकडे येण्याला मी गाडी पहात होतों तों त्यांच्यासारख्या चेहऱ्याचा साहेबी पोषाख केलेला असा एक गृहस्थ पाहिला. बरोबर एक किरिस्तावही होता. मला पहाताच चलाखी करून तो स्टेशनांत शिरला. त्यावेळीं मला कांहीं संशय आला नाहीं. व संशय येणार तरी कसा? आतां पक्कें ध्यानांत आलें. डोळ्याला तोच चष्मा. व तीच साहेबासारखी चालण्याची ऐट. बरोबर एक मुलगीही होती. तिच्याही पायांत बूट होता. मला वाटतें तो तिला घेऊन पळून जाणार असावा. कोणी ओळखूं नये ह्मणून इंग्रजी पोषाख केला होता.

मन्मथः—असें असेल तर ह्याचा हा बेत पूर्वीपासूनचाच असला पाहिजे. पोषाख घालून अशा कफल्लकाला मुलगी दिली.

झीः—त्या पोराचे पुष्कळ दिवसापासून मला चांगलें चिन्ह दिसत नव्हतें. नाहींतर केसाचा भाग वगैरे करण्यांत वेळ कां जाता? व डोक्याला इतकें साबण कशाला लावीत होता.

गोपीः—इतक्यांत जर आपण मागोमाग गेलों तर सांपडण्याची कांहीं आशा आहे का?

लोकः—चला सगळेच जाऊं आपण. अप्ट्रेन सुटायला अद्याप [illegible] अवकाश आहे. लवकर गेलों तर आद्यापिही हातीं लागेल.

मन्मथः—मग उशीर नको. माझे कपडे आणा—

१ प्रतिः—हे घ्या, हे घ्या. आमचेच कपडे घालून जा. उशीर करूं नका. दुर्गा, श्रीहरी.

झीः—मी गाडीच्या मागें बसून येते. मी आपला पगार वसूल करून घेईन.

व तो वांदर कसा सजला आहे तेंही पाहीन. व सांपेल तर त्याच्याबरोबर असलेल्या त्या पोरीलाही दोन रपाटे हाणीन. चला, चला, लवकर.

(सर्व जातात.)

चतुर्थ गर्भांक

हावरा—रेलवे स्टेशन.

(मिस्तरसिंह, विलासिनी व नंदलाल येतात.)

नन्दः—आपला सूट माझ्या अंगाला छान बसला.

सिंहः—इंग्रजांच्या डोळ्यानें तुह्मी धरले जाल. पण नेटिव्हांचा बाप आला तरी कांहीं व्हायाचें नाहीं. ह्या ड्रेसानें तें काय ओळखणार. त्यांना काय ड्रेसाची माहिती.

नन्दः—हा ड्रेस फक्त इथल्या प्रवासापुरताच. मुंबईला गेलों ह्मणजे दुसरा ड्रेस करवीन. तेथें आयते तयार सूट्स मिळतात ना ?

सिंहः—Everything. शिवाय येथल्यापेक्षां सुंदर मेक व किंमत कमी. फक्त प्यासेजला लागणारेच कपडे खेरदी करा. इंग्लडांत पोचल्यावर सर्व नवीन तयार केले पाहिजेत. इकडील ड्रेस तिकडे बिलकूल पसंत पडावयाचा नाहीं.

नन्दः—मिसेस कारफर्मा, आपण हांसतासें ? मी कांहीं चमत्कारिक दिसतो कीं काय.

विलाः—Oh dear no. आपल्या पळून जाण्याच्या युक्तीचा विचार मनांत येऊन हासूं आलें.

नन्दः—कां युक्ति वाईट होती कीं काय ?

विलाः—Cleverly done. बरें पण तुह्मी आंगावर नुसती शालजोडी घेऊन अनवाणी पायांनीं चालत आला. रस्त्यांत तुह्माला कोणी कांहीं विचारले नाहीं. !

नंदः—पहाटेची वेळ असल्यामुळें लोकांची रहदारी सुरू झाली नव्हती.

परंतु, रस्त्यांत एका शिपायानें अडविलेन, त्याला सांगितलें कीं माझा बाप अत्यावस्थ आहे त्याला गंगेवर घेऊन जाण्यास डोली पहातो आहे. एव-ढयावर झालें काम.

सिंह:— तुह्मी तर अगदी फर्स्टक्लास साहेब बनला. खूप presence of mind. I wonder what the old fool is doing now.

नन्द:—दोन हातांनीं थोबाडांत मारून घेत असेल व डोक्यांत राख घालून बसला असेल व आमचे श्वशूरही त्यांचेच अनुकरण करीत असतील.

विला०:—दंपत्याच्या मनांत एकमेकाबद्दल प्रीति जमल्याशिवाय लग्न करण्याचें प्रायश्चित्त ! Marriage without love is like a—like a-a-a-

सिंह:—Coat without a tail.

विला:— Tnank you, just so.

(कान्स्टेबल येतो.)

नंद०:—कॉन्स्टेबल ! उपरका गाडी प्लाटफार्मके पास कब आवेगा ?

सिंह०:—Don't you speak to that fellow. I will inquire of the Station Master.

कान्स्टे:—आपतो बंबाई मलमे जागा ? उसका अबि देर हाय. ओ सब हम ठीक कर देगा. टैम होनेसे हम सब चीजवस्त गाडीपर उठा देगा. आप कू कुच नहीं करना होगा.

नन्द:— बहूत आच्छा. हाम टोमको बकसीस डेगा.

कान्स्टे:— हुजूरका मेहेरबानी.

(कान्स्टेबल जातो.)

(गोपीनाथ, मन्मथ, लोकनाथ व स्त्री येतात.)

लोक:— ह्या ठिकाणीं उभा होता. आतां पाहूं कोठें आहे तो. अरे, हा समोर त्या मुलीच्या उजव्या बाजूला आहे तो तर नव्हे ?

गोपी— तोच पाजी. पहा कशी आहे चोराची दगाबाजी ती. आज त्याला चांगला खेटराखालीं वठणीस आणतो. (पुढें होऊन) अरे ए कायस्थ कुलांगारा हे काय तुझें करणें. माझें सर्वस्वी नुकसान केलेस. मला फसवि-

लेस, लग्नविधी पुरते होऊं दिले नाहींस व सर्व पैसे घेऊन ह्या रांडेबरोबर पळून चाललास कां ?

विला:–Sir ! Sir !

सिंह:–Old man ! a repetition of another such language, and your gray hairs will not protect you from my wrath.

गोपी.–साहेब आपण काय ह्मटलेत ?

सिंह:–थेरड्या, आतां जें काय बोललास त्याची पुनरुक्ति होऊं दे कीं, तुझे पांढरे केस माझ्या रागापासून तुझें रक्षण करूं शकणार नाहींत.

गोपी:–साहेब असे रागावतां कां ? मी आपल्या पोराला वाटेल तें बोलेन, त्याबद्दल तुह्माला राग कां ?

सिंह:– तूं ह्या लेडीला रांड का ह्मणालास ?

झी:— पायांत बूट घालून, डोक्यावर कांहींएक न घेतां ही कोणी कुलीन स्त्री आहे हें ह्या ह्मातान्याला कसें कळावें.

सिंह: — चूप रहो. तुम कोन हाय ?

झी:—आमी जे हाय से हाय. इस् चुप रहो. मोठा मेला साहेब.

गोपी:—झी, तूं गप्प बैस. तर मग ही बाई कोण आहे.

झी:—ह्या साहेबाची मावशी !

सिंह:—ही विलासिनी कारफर्मा बी. ए. हावर्षी सांगमध्यें एम. ए. होणार.

गोपी:—कोणीही असो, पण आमच्या गरिबाच्या पोराच्या कां ही राशीस लागली आहे.

मन्द:—बाबा, तुह्मी मोठे असभ्य.

सिंह:— आपला मुलगा ब्यारिस्टर होण्याकरितां विलायतेस जातो आहे. ही स्त्री त्यांची मैत्रीण ह्मणून त्यांना पोचवायाकरितां स्टेशनवर आली आहे.

झी:—अरे हतभागी पोरा ! एवढावेळ गुडमुड करीत होतास पण मराठींत बोलल्या बरोबर तुला ताबडतोब ओळखलें. अरे हा साहेब कोठला? समजलं कां मन्मथबाबू , हा कोलुतोल्यांतल्या तितूसिंहाचा मुलगा. त्यांचे घरीं मी फार दिवस होतें. ह्याला मी लहानाचा मोठा केला. लहानपणीं

मला ह्मणे ' झी मा मला एक शाकलेचा पेला दे ' हें सर्व विसरून गेला व आतां मला ह्मणतो ' तुम कोन है ' लहानपणींच याचा बाप वारला. आईनें ह्याचें संगोपन केलें, पण ह्यानें एके दिवशीं आपल्या आईची पेटी उघडून त्यांत जें कांहीं होतें नव्हतें तें घेऊन पोबारा केला. पोर कोठें गेलें, पोर कोठें गेलें असें ह्मणून आईनें आकांत केला. कांहीं दिवसांनीं विलायतेस गेल्याची खबर लागली. तिला भेटायला एकदां मी गेले होतें. त्यावेळीं बिचारी किती तरी रडली आणि ह्मणाली पोरगा परत आला आहे, परंतु प्रायश्चित्त वगैरे घ्यायला लागेल ह्मणून मुसलमानांच्या वस्तींत एक बंगला घेऊन राहिला आहे. ह्या मुसलमानणीशीं लागू आहे असें मला वाटतें. घरीं सोन्यासारखी बायको ह्याच्या नांवानें रडत बसली आहे. आपलें तोंड काळें केलें तें केलें व वर एका प्रतिष्ठित मनुष्याच्या मुलाला फूस लावून लंकेला पाठवितो आहे.

मन्म:—बाबा, आपण आपल्या आईला व स्त्रीला शोकसागरांत ढकलून वर आणखी दोन प्रतिष्ठित कुलांना दुःखसागरांत लोटलेत ना?

सिंह:—तुमच्या कोणच्याच प्रश्नाचें मी उत्तर देत नाहीं. तूं तर स्त्री, शिवाय तुझें शिक्षण वगैरे कांहीं झालें नाहीं ह्मणून मी तुला माफ करतों.

झी:—शिक्षण वगैरे झालें असतें तर गोळी घालून ठार मारतास कीं काय.

गोपी:—नन्दलाल, झालें तें जाऊंदे. आतां घरीं चल कसा.

विला:—नन्दबाबू, मोठया परीक्षेची वेळ आली आहे. आपलें हृदय फायरप्रुफ असूं द्या.

गोपी:—कांहो, तुह्मी भांडण वाढवितां?

विला:—भगिनीचें पाठबळ असल्याशिवाय बंधू माठमोठ्या कामाला प्रवृत्त होत नाहींत. माझें कर्तव्य मीं केलें.

लोक:—आपण बी. ए. पास असून एम. ए. ला जाणार असें ऐकतों. आपणाला हाय एज्युकेशन मिळालें आहे. असें असून आईबापापासून पोराची ताडातोड करणें, व लग्न मंडपांतून पतीपत्नी भेद करणें हें आपल्याला योग्य कां?

विला:—पतिपत्नी भेद कसला. अकरा वर्षांच्या मुलीचा पति कसला?

तिला प्रीतीचें काय ज्ञान आहे ? ती पतीला गुरु समजून त्याजवर भक्ति करील, दासी होऊन त्याची सेवा करील. परंतु, प्रीति पण ती प्रीति नव्हे जिला ' लव्ह ' ह्मणतात ती प्रीति तिला कधींही कळायाची नाहीं, व आपला अधिकार काय आहे हेंही तिला समजणार नाहीं. व इकडे ह्यांच्याकडे पाहिलें तर हे पुढें होणाऱ्या मोठ्या लाभावर दृष्टि देऊन ह्या अवघड कामाला प्रवृत्त झाले आहेत. यशस्वी होऊन परत आल्यावर हे जेव्हां बारमध्यें साईन करतील त्यावेळीं एनसरकारच्या वाडिलांचा केवढा लौकीक होईल ?

झी:—जसा तूं लौकिक संपादला आहेस तसाच कां नाहीं ?

विला:—तूं जर अशिक्षित नसतील तर तुला दोन हात दाखविले असते.

झी:—शिक्षणाची काय जरूर आहे. चल, आतांच होऊं दे दोन हात. तुझ्यासारख्या किरिस्तावणी मी कुळकुळ पाहिल्या आहेत.

विला:—पुन्हा जर तोंडातून—

सिंह:—Let her alone, let her alone, for my sake; come let us be off.

(विलासिनी व सिंह जातात.)

गोपी:—चल बाबा, घरीं चल.

नन्द:—मी येत नाहीं.

गोपी:—नाहीं येत ?

नन्द:—नाहीं.

गोपी:—तुझ्या आईला देखील भेटायला येत नाहींस ?

नन्द:—आईला माझे कांप्लिमेंट सांगा. परत आल्यावर भेट होईल.

मन्मथ:—माझ्या मुलीनें काय करावें ?

नन्द:—मला काय माहीत.

मन्मथ:—तुह्मी तिजबरोबर लग्न केलें आणि तुह्माला माहीत नाहीं.

नन्द:—पुरें लग्न झालें नाहीं, ह्मणून तें Null and void असें समजावें. पण मी एवढें सांगतों कीं जर तुह्मी आपल्या मुलीला मिसेस

कारफर्मा प्रमाणें विद्वान कराल तर विलायतेहून परत आल्यावर कायद्या प्रमाणें रजिष्टरी करून मी तिला आपली स्त्री मानीन.

मन्मथः—हाय हाय ! पास झालेला मुलगा धुडण्यांत सर्वस्व न घालवित एखादा लहान सहान रोजगारी पाहून त्याला मुलगी दिली असती तर माझें धन, कूल, मान व जात हीं न जातीं. गोपीनाथ बाबू, मी तुह्माला सोडणार नाहीं. एवीं तेवीं बुडालोंच आहे, तर आतां हायकोर्टापर्यंत जाईन व कांहीं दाद लागते कीं नाहीं तें पाहीन.

नन्दः—आपलें ह्मणणें न्याय आहे. आपण बाबाकडून डायमेज भरून घ्या.

गोपीः—तूंच सर्व पैसे घेतलेस आणि माझ्या जवळून डायमेज घ्यायला सांगतोस.

नन्दः—फार बोलण्याची जरूर नाहीं. पाहिजे असेल तर रुपये पावल्याची रसीद देतो.

गोपीः—तुझ्या सारख्या पोराला पोरगा ह्मणणें ह्मणजे झक मारणें आहे. पाजी कोठचा ?

नन्दः—पहा, बाप समजून मी पुष्कळ सहन केलें या उप्पर मात्र ऐकून घेणार नाहीं.

(कॉन्स्टेबल येतो.)

कॉन्स्टेः—क्या हाय बुड्ढे, साहेबको काहे दिकू करता, हट जाव.

गोपीः—तो साहेब नव्हे. तो माझा मुलगा आहे.

कॉन्स्टेः— तुमारा बेटा—तुम पागल हुवा.

गोपीः—खरेंच माझा मुलगा, पाहिजे तर विचारून पहा.

कॉन्स्टेः—क्यां पुछेगा, हमारा आंख नहीं, हम साहेबका लडका—या बंगालीका लडका पहिचानता नाहि ? हटजाव.

नन्दः—(स्वगत) माझ्या पोषाखावरून मी कोण हें ह्या कॉन्स्टेबलला ओळखतां येत नाहीं, ह्मणून बाबांचें ह्मणणें याला खरें वाटत नाहीं. सबब मलाही मोठ्या सावधगिरीनें पुरी बतावणी केली पाहिजे.

झीः—अहो जमादार साहेब, तुह्मी माझें ह्मणणें ऐका. हा ह्याच ह्मात-

त्याचा मुलगा आहे. घरांत चोरी करून वेष पालटून हा पळून जातो आहे. तुह्मी याला कैद करा.

कान्स्टे:—अरे चुप रहो मागी गिरफ्तार करनेवाली.

स्त्री:—जा मर तर मग. जसा कांहीं न्यायाधीश. हे कोणीही असोत, मला त्याच्याशी काय करायाचें आहे. माझे जर हक्काचे पैसे असतील तर मला मिळालेच पाहिजेत.

(स्त्री जाते.)

लोक:—चला आतां घरीं जाऊं. घरीं मंडळी काळजींत असतील. बाप व लेक हे दोघेही पाजी. आदालतींत किंवा समाजांत जाऊन याला कांहीं तरी तोड काढिली पाहिजे.

मन्मथ:—चला तर.

(लोकनाथ व मन्मथ जातात.)

गोपी:—तुला वाटेल तिकडे तूं जा. माझे पैसे परत दे ह्मणजे झालें.

नन्द:—एक पैसा देखील मिळणार नाहीं.

गोपी:—अर्धे तरी दे. निदान कांहीं तरी दे.

नन्द:—तुह्माला देऊन चालायचे नाहीं. मला तेथें चांगल्या स्टाईलनें राहिलें पाहिजे.

गोपी:—मी तुला लहानाचें मोठें केले, कालेजमध्यें शिकण्याला खर्च केला. त्याबद्दल तरी मला कांहीं दे. उद्यां सावकार मला तुरुंगांत पाठवतील.

नन्द:—कुच परवा नहीं. मी बॅरिस्टर होऊन आलों ह्मणजे तुह्माला इन्साल्व्हंट ठरवून सोडवीन. त्याबद्दल कांहीं फी देऊं नका ह्मणजे झालें.

कान्स्टे:—साब, ए कुच मांगता ?

नन्द:—हाँ, तुम देखो टो ओ साब कहाँ गया ?

कान्स्टे:—आच्छा हुजूर, गाडीकी बी टैम हो आया.

(कान्स्टेबल जातो.)

नन्द:—आच्छा हम् वेटिंग रूममे जाटा. बाबा, आतां येथें उभे राहूं नका. मनाला अगोचर असें पाप नाहीं. तुह्मी सुद्धां मुलगी पाहिली नाहीं, कांहीं नाहीं, व केवळ पैशाचा लोभ धरून माझें लग्न केलेंत. मी कॉलेजांत शिकलो, मला पॉलिटिक्स समजतें. तुह्मी कां माझ्या डोळ्यांत

धूळ टाकणार. तुह्मी कांहीं मनांत आणूं नका. पैसा सत्कारणीं खर्च होतों. आहे. मी परत आल्यावर तुह्माला व आईला विलायतेस पाठवीन ह्मणजे ह्मातारपणीं कीर्ति होऊन सुखाचें मरण येईल. Now good bye ! मिसेस कराफर्मा असती तर मजवर रागावती. ती कोठें आहे तें पाहतो. बाबा, तुह्मी मोठे असभ्य, लेडीचा मान तुह्माला कळत नाहीं. मी जातों आता आईला माझा Compliment सांगा व तुह्मी दोघेजण इंग्रजी शिका. fare well for the present.

(नन्दलाल जातो.)

गोपीः— मी अगदीं चकित झालों आहे. हा ह्मणाला तरी काय वेडया-सारखे. त्याचा तरी यांत काय दोष. पैसे जास्त मिळावे ह्मणून ह्याला इतकें शिक्षण देऊन चढवून ठेवला. आतां त्याला सर्व दुनिया कसपटा-सारखीं भासूं लागली आणि मी देखील इतर गोष्टीची चौकशी न करितां केवळ पैशांच्या लोभानें ह्याचें लग्न करून एका प्रतिष्ठित गृहस्थाचें सर्वस्वीं वाटोळें केले. त्याबद्दल परमेश्वरानें मला कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें शिक्षा दिलीन. "-आळवणी आलें आणि तळवणी घेऊन गेले" ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. आतां घरीं जाऊन तिला खबर देतो. ती पेटी उघडून पैशाची वाट पहात बसली आहे. पोरगा तर निघून गेला, व व्याह्यांनींही फिर्यादीची धमकी घातली आहे. आतां त्यांच्या-कडे जाऊन त्यांच्या हाता पायां पडतो व सुनेला घरीं आणून कशी तरी मिटवा मिटव करतों. भिक्षेची झोळी आहे व फांस घ्यायला दोरीही आहे हें चांगलें पण मुला मुलींचे लग्न करून पैसा मिळविण्याचा धंदा मात्र कोणी करूं नये. हें फार नीच कृत्य ! अती पाजीपणा ! ! केवळ कसायाचें काम ! ! !

पडदा पडतो.

समाप्त.